# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३३५/२०१०.

श्री. बाबूराव संभाजी कुरवटकर,
मु. पो. सुबई, ता. राजूरा,
जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ना. स. इंगळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, राजूरा,
जि. चंद्रपूर.

श्री. था. च. अगडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, राजूरा,
जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, राजूरा यांचेकडे घर बांधणे अग्रीम रुपये ५०,०००/- चे कपातीचे विवरण व कपात

... २

केलेली रक्कम संबंधित विभागास अदा केल्याची माहिती मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त यांना लेखी निवेदन सादर केले आहे. त्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दिनांक १९.१.२०१० चे आदेशानुसार श्री. व्ही. एम. कुमरे, रोखपाल, पंचायत समिती, राजूरा यांनी मला आवश्यक असलेली माहिती पुरविली असून आता माझे समाधान झालेले आहे. त्यामुळे कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कसल्याही प्रकारची कार्यवाही न करण्यास विनंती करण्यात येत आहे. सबब मी आपणाकडे केलेली द्वितीय अपील याद्वारे मागे घेत आहे. तरी प्रकरण खारीज करण्यास विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३३१/२०१०.**

श्री. राजेश किसन डोंगरे,
मु. पो. गोसे (बुज.), ता. पवनी,
जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
भारती कन्या शाळा, तुमसर,
जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.५.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. येरणे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे भारती कन्या शाळा, तुमसर येथील मुख्याख्यापक आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांबाबत एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने आज दिनांक

... २

३१.३.२०१० ला भारती कन्या हायस्कूल, तुमसर यांचेकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिनांक १.२.२०१० अन्वये प्रथम अपीलात मागविलेली माहिती पेज क्रमांक १ ते ७४ पाने दिले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातील अधिक्षक यांनी दिली असून अपीलकर्ता यांची पोच असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३६४/२०१०.

श्री. पुरुषोत्तम विठोबा उमरेडकर,
संत तुकाराम नगर, प्लॉट नं. ३ सी,
कळमना रेल्वे क्वार्टर, जुना कामठी रोड,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. कांडगे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
इंदिरा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय,
ता. कळमेश्वर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. आर. व्ही. गोधणे, सहाय्यक शिक्षण संचालक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, इंदिरा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर, जि. नागपूर यांचेकडे माहे सप्टेंबर २००५ मधील श्री. आनंद कारुजी

... २

चव्हाण यांचे हजेरी रजिस्टरचा उताराबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगास निवेदन सादर केले की, वरील द्वितीय अपील प्रलंबित असून माझे आणि श्री. आनंद कारुजी चव्हाण कडूनच जी माहिती हवी होती त्याची माहिती मिळून गेल्याने मी बिनाशर्ती वरील द्वितीय अपील परत घेण्यास इच्छितो अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४११/२०१०.

श्री. जनार्दन गुलाबराव मून,
७९१, नागसेन वन,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. श्रीधर एस. शहाणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.१०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे दिनांक १८.८.२००४ ते ३१.१२.२००९ पर्यंत नवीन अपंगाच्या अनुदानित विशेष शाळा कर्मशाळाची माहिती एकूण ६ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती

साधारण पोस्टाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक ३.४.२०१० रोजी पत्र क्र. निरंक, दिनांक १२.३.२०१० व पत्र क्र. १८४, दिनांक २.२.२००९ च्या संदर्भात संदर्भीय दोन अन्वये सदर माहिती ज्या संस्थेशी/शाळेशी संबंधित आहे त्या शाळेचे मुख्याध्यापक/संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना अनुक्रमे जनमाहिती अधिकारी/अपीलीय अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तेंव्हा सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता संबंधित संस्थेकडे अपील करावे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती ही समाज कल्याण विभागातच उपलब्ध असते. त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात सर्व प्रस्ताव व मंजूरी ही विभागात दिली जाते. त्यामुळे संपूर्ण माहिती ही त्यांचेकडे आहे व दिनांक २.२.२०१० रोजी माहितीचा अर्ज देऊन सुध्दा ३० दिवसांचे मुदतीत काहीही कळविण्यात आलेले नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुद्या क्रमांक १ व ३ ची माहिती त्यांचेकडे उपलब्ध होऊ शकेल. परंतु मुद्या क्रमांक २, ४, ५ व ६ ची माहिती ही संस्थेकडेच उपलब्ध असते. संस्थेकडून मान्यतेसाठी प्रस्ताव व त्या प्रस्तावास मान्यता दिल्याबाबत कळविण्यात येते. तशा प्रस्तावाची माहिती समाज कल्याण विभागाकडून उपलब्ध होऊ शकते. अपीलकर्ता यांना त्या प्रस्तावाची माहिती उपलब्ध झाली ती माहिती समाज कल्याण विभागाकडूनच उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक २.२.२०१० च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील सर्व प्रस्तावाच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४१२/२०१०.

श्री. जनार्दन गुलाबराव मून,
७९१, नागसेन वन,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. दिलीप राठोड, संशोधन अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अपंग आयुक्त कार्यालय, चर्च

... २

रोड, पुणे यांचेकडे बंद पडलेल्या व कालांतराने अन्य संस्थांना हस्तांतरीत केलेल्या अपंग शाळांची/ कर्मशाळाची माहिती देण्याबाबत. सदरची माहिती स्पिड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांचेकडून अवर सचिव तथा माहिती अधिकारी यांनी दिनांक ६.३.२०१० रोजी एकूण १२३ पृष्ठांसाठी २४६/- रुपये व जलद डाकेने पाठवावयाच्या टपाल खर्च रुपये ५०/- असा एकूण २९६/- रुपये आपण मंत्रालयातील विभागाच्या खालील लेखाशिर्षांतर्गत चलनाद्वारे जमा करावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मात्र लेखाशिर्षांतर्गत खर्चाचा भरणा केलेला नाही तर मनीऑर्डर पाठविली. परंतु ती परत आली असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु मनीऑर्डर आल्याचा कोणताही उल्लेख दिसून येत नाही. वास्तविक चलानद्वारे भरणा करण्याचा उल्लेख असतांना अपीलकर्ता यांनी मनीऑर्डर पाठविण्याची आवश्यकता नव्हती. मनीऑर्डर नाकारण्याचा कोणताही पुरावा नाही. तरीही अपीलकर्ता यांनी दाखल केल्याप्रमाणे मनीऑर्डर परत आली असा उल्लेख केलेला आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात सुनावणी न घेता आपला निर्णय कळविण्याबाबत अर्जदाराने केलेली विनंती आणि त्यासोबत मनीऑर्डर पाठविल्याची पोस्टाच्या पावतीची सादर केलेली प्रत विचारात घेऊन अपीलीय अधिकाऱ्याने अर्जदारास विनाशुल्क माहिती पाठविण्याबाबत माहिती अधिकाऱ्यास निदेश दिले व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १.४.२०१० च्या पत्रान्वये स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या परंतु बंद पडलेल्या मान्यताप्राप्त अपंगाच्या विशेष शाळा व कर्मशाळांचे अन्य संस्थांना सन २००८-०९ व सन स००९-१० मध्ये हस्तांतरित केलेल्या आहेत. त्याबाबतची शासन आदेश यांची सत्यप्रत व असे आदेश काढण्यासाठी लिहिलेल्या कार्यालयीन टिपणीची प्रत उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ती माहिती प्राप्त झाली नाही. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसले तर पुन्हा पाठविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(५) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करुन देण्याची जबाबदारी ही जनमाहिती

अधिकारी यांचे असल्यामुळे आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी यांनी हजर राहणे आवश्यक होते. परंतु ते उपस्थित राहिले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.१.२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जनमाहिती अधिकारी अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०००/- शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव हे आयोगापुढे सुनावणीस उपस्थित न झाल्यामुळे व प्रतिनिधी पाठविल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांनी करावयाची असून त्याकरिता स्वतंत्रपणे निर्णयाची एक प्रत **प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई** यांचेकडे पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४१४/२०१०.

श्री. जनार्दन गुलाबराव मून,
७९१, नागसेन वन,
नागपूर - ४४० ०१७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. एस. वानखेडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक (सहकार),
समाज कल्याण संचालनालय,
पुणे - १.

श्री. शिवाजी ज. मोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक (सहकार),
समाज कल्याण संचालनालय,
पुणे - १. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांचेकडे रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल, जळगांव या संस्थेस दिलेल्या वाहन

... २

प्रशिक्षणाची परवानगी बाबत एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती ही माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (सहकार), समाज कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडे उपलब्ध आहे या कारणासाठी अधिनियमाचे कलम ६(३) नुसार हस्तांतर करण्यात आली व तसे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. परंतु अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.२.२०१० रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.५.२०१० रोजी निर्णय देऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आले. परंतु तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२०१० रोजी पाठविलेली माहिती उपलब्ध झाली असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु त्यात रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल, जळगांव यांना जे कंत्राट देण्यात आलेले आहे त्या संदर्भात ज्या निविदा मागविण्यात आल्या होत्या त्या निविदाची माहिती दिली नाही. वास्तविक रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल, जळगांव या संस्थेच्या संदर्भात कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही व त्यामुळे कंत्राट कशा पध्दतीने पास केले व कोण्या कंत्राटदाराशी तुलना केली ही माहिती लपविली आहे. त्यावर सहाय्यक संचालक (सहकार) यांनी आयोगापुढे असे सांगितले की, या कार्यालयात जेवढी माहिती उपलब्ध आहे तेवढी माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु कंत्राट मंजूरीची कार्यवाही ही शासन स्तरावर झाली असल्यामुळे शासनाकडे ती कागदपत्रे उपलब्ध असावी. याचा अर्थ शासनाकडे अर्ज केल्यास त्यांनी समाज कल्याण संचालनालयाकडे अर्ज हस्तांतर करावा व संचालनालयानी मात्र माहिती ही शासनाकडेच आहे असे कळवावे. त्यामुळे अपीलकर्ता यांना मात्र माहिती पासून वंचित ठेवले जात आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल, जळगांव यांना १४ कोटी रुपये देण्यात आलेले आहे व त्यामुळेच ही माहिती लपविण्यात येत आहे असे दिसून येते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव व जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (सहकार) हे दोन्ही याबाबत दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक

झाले आहे. प्रथम अपीलाची सुनावणी व निर्णय हा अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर केलेला आहे. कारण द्वितीय अपीलाची नोटीस ही दिनांक २८.४.२०१० रोजी काढण्यात आलेली होती व ती नोटीस आल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुनावणीस पाठविलेली दिसून येते. याचा अर्थ समाज कल्याण संचालनालय हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचे अंमलबजावणीकरिता गंभीर आहे असे दिसुन येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे प्रथम अपील हे त्यांचेकडे दिनांक ११.५.२०१० रोजी आले. याचा अर्थ सदरचे अपील हे कोणत्या तरी कर्मचाऱ्यांकडे प्रलंबित होते असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यां विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना रमेश मोटार ड्रायव्हिंग स्कूल, जळगांव व इतर मोटार ड्रायव्हिंग स्कूल यांचेकडून दाखल झालेल्या निविदा (दरासहीत) विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती विहित मुदतीत दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई** यांनी करावयाची असल्यामुळे त्यांचेकडे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४१७/२०१०.

श्री. जनार्दन गुलाबराव मून,
७९१, नागसेन वन,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. एस. निमगडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे सहाय्यक माहिती अधिकारी श्री. एन. जे. संतापे, (वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता) हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, समाज

... २

कल्याण विभाग, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे दिनांक १८.८.२००४ ते ३१.१२.२००९ पर्यंत नविन अपंगाच्या अनुदानित विशेष शाळा कर्मशाळाची माहिती एकूण ६ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती साधारण पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला दिसून येत नाही व प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २९.४.२०१० रोजी ठेवण्यात आली. परंतु तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असल्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी झालेली दिसून येत नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक २०.२.२०१० रोजी माहिती संकलीत होताच आपणांस माहिती पाठविण्यात येईल. माहिती प्रतिपृष्ठ रुपये २/- प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतरही कोणत्याच प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. आयोगापुढे हजर असतांना हजर झाले नाही. वरील माहिती अधिकारी यांचे बदली झाली आहे व सहाय्यक माहिती अधिकारी हे हजर नाही. परंतु सहाय्यक माहिती अधिकारी व माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रांची माहितीही दिसून येत नाही व त्यांनी कोणत्याही प्रकारची तजबीज करुन घेतेलेली दिसून येत नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहेत. त्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २.२.२०१० च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे व आता विद्यमान जनमाहिती अधिकारी हे सुध्दा हजर झाले नसल्यामुळे दोघां विरुध्द रुपये २५०००/- शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची रक्कम ही विभागीय उपसंचालक, समाज कल्याण विभाग, नागपूर यांनी जबाबदारी निश्चित करुन त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>विभागीय उपसंचालक, समाज कल्याण विभाग, नागपूर</u>** यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४१३/२०१०.

श्री. जनार्दन गुलाबराव मून,
७९१, नागसेन वन,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. नासीर खान,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वाहतुक अभियंता,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. नासीर खान,
जनमाहिती अधिकारी तथा
वाहतुक अभियंता,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वाहतुक अभियंता, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे शहर बस वाहतुक कंत्राटाबाबत वाहतुक विभाग कार्यालयातील पत्र जावक क्रमांक ४२५ ते ४३५ च्या रजिस्टर मधील पानाची झेरॉक्स प्रत. निविदा टाकणाऱ्या वंश इन्फ्रा, नागपूर

... २

ॲल्युमिनियम कारपोरेशन व एम.एस.एस.आय.डी.सी.लि. या एजन्सीचे पूर्ण पत्ते, मोबाईल नंबर तसेच त्यांनी टेंडर फॉर्म विकत घेतल्याचा १०,०००/- रुपयांची पावती व ईएमडी म्हणून भरलेल्या १ लाख रुपयांच्या पावतीची झेरॉक्स प्रत. सदरची माहिती स्पिड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ५.२.२०१० रोजी माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता झेरॉक्स आणि स्पीड पोस्टाच्या खर्चाकरिता एकूण रुपये १००/- चे डि. डि. वाहतुक अभियंता, नागपूर महानगरपालिका यांचे नावाने जमा करावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अतिरिक्त रक्कमेचा भरणा केलेला आहे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जी माहिती त्यांना उपलब्ध झाली ती माहिती त्यांनी मागितली नव्हती. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. परंतु ही बाब अपीलकर्ता यांना सुध्दा कळविले नाही व प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये तसा उल्लेख दिसून येत नाही. परंतु आता ते आयोगापुढे सांगत आहेत ही माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही. तसे असल्यास त्यांनी अपीलकर्ता यांना स्पष्टपणे कळविणे आवश्यक होते. परंतु तसेही त्यांना कळविलेले नाही. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये महानगरपालिका, नागपूर ही गंभीर आहे असे दिसून येत नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी योग्यरित्या माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा काहीही कळविले नसल्यामुळे ही शास्ती योग्य आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १८.१.२०१० च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी योग्यरित्या माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी करुन जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांना दिलेला अधिकार हा योग्यरितीने चौकशी करुन अंमलबजावणी केली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत **आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर** यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४१६/२०१०, अपील क्रमांक ४१८/२०१०,अपील क्रमांक ४१९/२०१०, अपील क्रमांक ४२०/२०१०, अपील क्रमांक ४२१/२०१०, अपील क्रमांक ४२२/२०१०, अपील क्रमांक ४२३/२०१०, अपील क्रमांक ४२४/२०१०, अपील क्रमांक ४२५/२०१०, अपील क्रमांक ४२६/२०१०, अपील क्रमांक ४२७/२०१० व अपील क्रमांक ४२८/२०१०.**

श्री. जनार्दन गुलाबराव मून,
७९१, नागसेन वन,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

डॉ. कमल किशोर फुटाणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. भरत केंद्रे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, भंडारा.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम.

... २

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, वाशिम.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, ठाणे.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, ठाणे.

श्री. श्याम चव्हाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर.

श्री. व्ही. आर. लिंगराज,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, सोलापूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

श्री. शेख दाऊद,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

श्री. यु. एम. घुले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, बिड.

... ३

श्री. पी. बी. गोपाळघरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, बिड.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, हिंगोली.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, लातूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना.

श्री. डी. एम. भगत ,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, जालना.

श्री. दयानंद रक्षेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, नाशिक.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नंदूरबार.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, नंदूरबार. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.५.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये एकूण १२ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या १२ द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपील क्रमांक ४१६/२०१० मध्ये जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. एम. आर. रामटेके, सहाय्यक सल्लागार हे हजर आहेत. अपील क्रमांक ४१८/२०१० मध्ये जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. के. टी. वाघमारे, सहाय्यक माहिती अधिकारी हे हजर आहेत. अपील क्रमांक ४१९/२०१० मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. आर. बी. तायडे, सहाय्यक सल्लागार हे हजर आहेत. अपील क्रमांक ४२०/२०१० मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. एम. बी. पिंजरकर, विस्तार अधिकारी हे हजर आहेत. अपील क्रमांक ४२१/२०१० मध्ये उत्तरवादी हे हजर आहेत. अपील क्रमांक ४२२/२०१० मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. पी. ई. गायकवाड, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता हे हजर आहेत व माहिती अधिकारी हजर आहेत. अपील क्रमांक ४२३/२०१० मध्ये

... ५

उत्तरवादी हे हजर आहेत. अपील क्रमांक ४२४/२०१० मध्ये श्री. अनिल बोरीकर, निरिक्षक हे हजर आहेत. अपील क्रमांक ४२५/२०१० मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. अपील क्रमांक ४२६/२०१० मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. अपील क्रमांक ४२७/२०१० मध्ये जनमाहिती अधिकारी तर्फे श्री. जी. एम. गोरे, सहाय्यक सल्लागार हे हजर आहेत. अपील क्रमांक ४२८/२०१० मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. रामचंद्र लाखावसावे, निरिक्षक हे हजर आहेत.

२. वरील सर्व अपीलांमध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर, भंडारा, वाशिम, ठाणे, सोलापूर, औरंगाबाद, बिड, हिंगोली, लातूर, जालना, नाशिक व नंदूरबार यांचेकडे दिनांक १८.८.२००४ ते दिनांक ३१.१२.२००९ पर्यंत नविन अपंगाच्या अनुदानित विशेष शाळा-कर्मशाळाची माहिती एकूण ६ मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदरची माहिती साधारण पोस्टाने मागितलेली आहे. अपीलकर्ता यांनी अर्ज हा केंद्रीय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच, ७९१, नागसेन वन, नागपूर-१७ असा पत्ता दिलेला आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने बहुतांश लातूर येथील माहिती अधिकारी वगळून सर्वांनी त्यांच्या त्यांच्या जिल्हा परिषदेच्या कक्षेमध्ये ज्या नावाने शाळा आहेत त्यांना पत्र दिले व त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिली. काही जिल्हा परिषदेच्या जनमाहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करावा असा प्रकारे अपीलकर्ता यांना पत्र दिलेले आहे. सर्व जिल्हा परिषद हया नागपूर, भंडारा, वाशिम, ठाणे, सोलापूर, औरंगाबाद, बिड, हिंगोली, लातूर, जालना, नाशिक व नंदूरबार या जिल्हयाच्या असल्यामुळे त्या त्या माहिती अधिकाऱ्यांनी साधारण पोस्टानेही पत्र दिले असे आयोगापुढे सांगितले. अपीलकर्ता यांनी सुध्दा काही अर्जाचे संदर्भामध्ये माहिती मिळाली. काही अर्जाचे संदर्भामध्ये अपूर्ण माहिती मिळाली व खर्चाच्या भरणाचे जे पत्र मिळाले ते काही पत्रे विलंबाने मिळाली. काही पत्रे त्यांना मिळालीच नाही. परंतु आयोगापुढे आज येतांना सर्व समाज कल्याण विभागाचे माहिती अधिकारी यांनी माहिती आणली आहे व ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली. नागपूर जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग यांनी ३२ शाळांची माहिती संकलीत केली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी सन २००४ ते २००९ च्या कालावधीतील नवीन शाळांची माहिती मागितली होती व त्या नवीन ८ शाळा आहेत. त्याची माहिती आज

... ६

संध्याकाळ पर्यंत उपलब्ध करुन देतो म्हणून सांगितले. लातूर जिल्हा परिषद यांचे समाज कल्याण विभागाने कोणत्याही प्रकारची कागदपत्रपण दाखल केली नाही व त्यांचे माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी हेही हजर नाही व त्यामुळे त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुध्दा त्यांच्या संघटनेचा पत्ता न देता वैयक्तिकरित्या मागितली तर पोस्टाचा जो व्यवहार होतो तो निश्चितपणे माहिती असतो. परंतु संघटना वेगळया पत्त्यावर असल्यामुळे त्यांना पत्र मिळालेच असते याबद्यल खात्री नसते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे जे आहे त्यांना पत्र मिळाले नाही असे म्हणणे बरोबर नाही. त्यांनी काही पत्रे मिळाली व काही पत्रे मिळाली नाही. परंतु आता सर्वच समाज कल्याण विभागाने त्यांना माहिती उपलब्ध त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील क्रमांक ४२५/२०१० सोडून सर्व अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपील क्रमांक ४२५/२०१० हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २.२.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) अपील क्रमांक ४१६/२०१०, अपील क्रमांक ४१८/२०१०, अपील क्रमांक ४१९/२०१०, अपील क्रमांक ४२०/२०१०, अपील क्रमांक ४२१/२०१०, अपील क्रमांक ४२२/२०१०, अपील क्रमांक ४२३/२०१०, अपील क्रमांक ४२४/२०१०, अपील क्रमांक ४२६/२०१०, अपील क्रमांक ४२७/२०१० व अपील क्रमांक ४२८/२०१० या सर्व अपीलांमध्ये माहिती मिळाली असून सर्व अपीले खारीज करण्यात येत आहेत.
३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४३०/२०१० व अपील क्रमांक ४३१/२०१०.

श्री. शैलेश देविदास निनावे,
द्वारा - श्री. जी. आर. सोरते,
मु. पो. रोहना, ता. आर्वी,
जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव,
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२.

जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
अमरावती.

श्री. विजय शंकरराव पिंपरकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
संशोधन अधिकारी,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० व दिनांक ३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपील क्रमांक ४३०/२०१० मध्ये उत्तरवादी यांचे तर्फे श्रीमती वसुधा नाईक, उपसंचालक, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर हे हजर आहेत. अपील क्रमांक ४३१/२०१० मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक ४३०/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) महाराष्ट्र राज्याची अनुसुचित जातीची यादी केंद्र शासनाने घटनेच्या ३४१ अनुच्छेद नुसार कोणत्या तारखेस प्रसिध्द केली. २) अनुसुचित जमातीची यादी कोणत्या तारखेस प्रसिध्द केली त्या दुरुस्तीसह तारखांची माहिती द्यावी. ३) अनुसुचित मागासवर्गीय ओ.बी.सी. ची तारीख कळवावी. ४) अनुसुचित जमातीला महाराष्ट्रातील कोणत्या तारखेची वास्तवाची दिनांक असतो (वास्तव्याचा पुरावा). ५) एन.टी, व्ही.टी. साठीची वास्तव्याची अट कोणती ? सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याच्याकरिता खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अर्जदार हे दारिद्रय रेषेखालील असल्यामळे त्यांनी खर्चाचा भरणा न करता दिनांक १५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.२.२०१० रोजी देण्यात आला. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात आले व त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०१० च्या पत्रान्वये माहिती विनामुल्य देण्यात आली. परंतु सदरची माहिती अपूरी आहे. दिनांक ६ सप्टेंबर १९५० ला क्षेत्रबंधन असलेल्या भागात वास्तव्याचा पुरावा दिनांक ६ सप्टेंबर १९५० हा चुक आहे. या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, मुद्या क्रमांक २ ची माहिती अपूर्ण आहे व चुकीची आहे. वास्तव्याच्या दिनांकाची माहिती दिली नाही. वास्तविक अपीलकर्ता यांनी केंद्र शासनाचे दिनांक ६ सप्टेंबर १९५० ला पहिली अनुसुचित जमातीची यादी प्रसिध्द केली व त्यामुळे त्यापुर्वीचे वास्तव्याचे पुरावे

मागितले जातात अशी माहिती दिली आहे. परंतु अधिसुचनेत असलेले पुर्वीचा मध्यप्रदेश व आताच्या विदर्भातील असलेले सिरोंचा, गडचिरोली (चांदा) व मेळघाट, अमरावती सोडून इतर तालुक्यांना वास्तव्याचा दिनांकाची माहिती अपेक्षित आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी खुलासा करतांना असे सांगितले की, अनुसुचित जमातीचे व्यक्तिनी अधिसुचनेचा दिनांक हा ६ सप्टेंबर १९५० असल्याने दिनांक ६ सप्टेंबर १९५० चा वास्तव्यांचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे असा खुलासा केला. माहितीच्या अधिकारात कागदपत्रे उपलब्ध होतात. अपीलकर्ता यांना अधिसुचना उपलब्ध करुन दिली आहे. त्या अधिसुचनेत गुणवत्तेच्या संदर्भात स्पष्टीकरण व्हावे असल्यामुळे इतर ते संदर्भ विभागाकडून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. वास्तविक मंत्रालयीन अधिकाऱ्यांची माहिती करिता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(५) अन्वये माहिती उपलब्ध करुन दिली किंना नाही तसेच माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्यास अधिनियमाचे कलम २०(१) च्या दुसऱ्या परंतुकाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी प्रत्यक्ष त्यांचे म्हणणे मांडणे आवश्यक असते. परंतु मंत्रालयीन अधिकारी नागपूर येथील आयोगापुढे हजर राहावयाचे टाळून येथील प्रतिनिधींना पाठवितात हे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन आहे व आयोगाचा अवमान आहे व याबाबत वैयक्तिक हजर न राहिल्यास शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ४३१/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अनुसुचित जमाती पडताळणी प्रमाणपत्र समिती, अमरावती यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) अमरावती जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती हलबा, हलबी जमाती बद्दलच्या चालिरीती, संस्कृती, आडनावे, देवदैवते, आप्तभाव, रुढी, परंपरा Affinity इत्यादीचे शास्त्रीय संशोधन उपलब्ध असल्यास त्या सर्वांच्या प्रमाणित प्रती पुरविण्यांत याव्यात. २) अनुसुचित जमातीच्या व्यक्तिस अधिसुचनेनुसार वास्तव्याचा प्रमाणपत्र तपासतांना कोणत्या वर्षीचा दिनांक पकडल्या जातो. याबाबतच्या जी.आर. सत्यप्रतीची झेरॉक्स प्रती पुरविण्यात याव्यात. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २८.१.२०१० रोजी अधिनियमाचे कलम २(च) अन्वये कार्यालयात अभिलेख्यांच्या स्वरुपात जी माहिती

उपलब्ध आहे तीच माहिती पुरविणे अपेक्षित आहे. अर्जदार यांनी मागितलेली माहिती ही या कार्यालयात अभिलेख्यांच्या स्वरुपात उपलब्ध नसल्याने अर्जदार यांना सदरहू माहिती पुरविता येत नाही असे कळविले व तसेच दोन्ही मुद्दांच्या माहितीचे स्त्रोत हे कार्यालय नाही. ज्या माहितीचे स्त्रोत हे कार्यालय नाही ती माहिती पुरविणे अपेक्षित नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती ही माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे किंवा चुकीची माहिती दिली आहे. वास्तविक ज्या निकषानुसार अनुसुचित जमातीची जात पडताळणी केली जाते त्या निकषाची संशोधन अधिकारी यांचेकडे माहिती असणे आवश्यक आहे. परंतु ती त्यांनी दिली नाही. अनुसुचित जमातीच्याबाबत अधिसुचनेनुसार वास्तव्याचे प्रमाणपत्र पडताळणी कोणत्या वर्षीचा दिनांक पकडल्या जातो या विषयीची झेरॉक्स प्रत उपलब्ध नाही. परंतु अधिसुचनेचा दिनांक पकडला जातो असे त्यांनी आयोगापुढे तोंडी सांगितले. वास्तविक संशोधन अधिकारी यांचेकडे अनुसुचित जमातीच्या संदर्भामध्ये विशेषतः हलबा/हलबी या जमातीच्या संदर्भामध्ये जर संशोधन उपलब्ध असेल तर ते संशोधन माहिती किंवा संकलीत केली असेल तर ते संकलीत केलेली माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अशा प्रकारची माहिती ही उपलब्ध नसते तर अर्जदार यांचे अर्जामध्ये ज्या चालिरिती, संस्कृती, आडनावे, देवदैवते देतात तसेच सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांनी जे वेळोवेळी निर्णय देतात त्या निर्णयाचे आधारावर तपासणी केली जाते व निर्णय मान्य नसल्यास उच्च न्यायालयामध्ये त्याविरुध्द याचिका दाखल करण्यात येते. क्रमांक २ च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली असती व दोनही मुद्यांच्या संदर्भात माहिती ही विनामुल्य अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपील क्रमांक ४३०/२०१० मध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४३१/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने दोन्ही मुद्यांच्या संदर्भात स्पष्टीकरण करणारी माहिती किंवा कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४३२/२०१०.**

श्री. अरुण अमृत गवई,
सी.पी.डब्ल्यू.डी. क्वॉर्टर २७,
टाईप - तीन (जुने),
सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
अकोला.

श्री. गरकल,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, अकोला यांचेकडे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना

... २

दिनांक २४.११.२००९ रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्या क्रमांक १ व २ उपविभागीय अधिकारी, अकोला यांचे कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे आपला अर्ज उपविभागीय अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यांत आला आहे. तसेच मुद्या क्रमांक ३ व ४ तलाठी, लोणाग्रा यांचेशी संबंधित असल्यामुळे अर्जाची प्रत तलाठी यांचेकडे वर्ग करण्यांत आली आहे व त्यांचेकडे स्वतंत्र माहिती अधिकारी असल्यामुळे आपण त्यांचेशी संपर्क साधावा. मुद्या क्रमांक ५ बाबत आपल्याला नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा बोध होत नाही असे कळविण्यात आलेले आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००९ रोजी तहसीलदार, अकोला यांना सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी याकरिता पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २१.१.२०१० रोजी पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २३.१२.२००९ रोजी दिनांक १.१.१९९५ ते दिनांक ८.१२.२००९ या कालावधीतील टेनन्सी रजिष्टरच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावी असे तलाठी यांना आदेश दिलेले दिसून येते व अपीलकर्ता यांना दिनांक १.१२.२००९ रोजी तलाठी, लोणाग्रा यांनी पिक पाहणी तारीख वाईज केलेली असून लोकसभा, विधानसभा अशा महत्वाचे शासकीय कामामुळे दैनंदिनी लिहिणेकडे दुर्लक्ष झालेमुळे दैनंदिनी लिहिल्या गेली नाही. तरी पिकपाहणीचा कार्यक्रम शासनाने ठरवून दिलेल्या मुदतीत करुन तसा पिकपाहणीचा कार्यक्रम दिनांकाचे गटवाईज आपणास शासकीय नमुन्यात देत आहो. तसेच मुद्या क्रमांक ४ ची ७ ब नक्कल सोबत पाठविता आहो अशा प्रकारे आपणास मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती देत आहो. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.३.२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो व त्यात पुन्हा जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला दिसून येतो व माहिती उपलब्ध करुन दिली याकारणास्तव अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ व ३ ची माहिती उपलब्ध झाली. मुद्या क्रमांक ४ ची माहिती अपूर्ण आहे व त्यामध्ये टेनन्सी रजिस्टरची प्रत दिली नाही. तसेच तलाठी यांनी जी पिकपाहणी केलेली आहे त्या पिकपाहणीच्या संदर्भात कागदपत्रे घेतली

नाही किंवा ज्या आधारावर निर्णय घेतला आहे ती कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाही. मुद्या क्रमांक ५ च्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, पुन्हा हीच माहिती तहसीलदार यांचेकडे आहे व दिनांक २३.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना कळविले आहे. अशा प्रकारे अपीलकर्ता ही एकाच अर्जामध्ये वेगवेगळया अधिकाऱ्यांकडे माहिती मागत असतात. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना तलाठी यांचेकडून टेनन्सी रजिस्टरची प्रत तसेच पीकपाहणीच्या वेळेस संबंधित व्यक्तिकडून कागदपत्रे घेतली असल्यास त्या कागदपत्राची छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४३५/२०१०.

श्री. अरुण प्रल्हाद उराडे,
घर नं. ३९९, वार्ड नं. २२,
चामोर्शी रोड, आर्शिवाद नगर,
ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
गडचिरोली.

श्री. एस. पी. खलाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांचे तर्फे श्री. जी. एल. मोहुर्ले, अव्वल कारकून हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गडचिरोली यांचेकडे इस्तेगासा क्र. ९४/२००८ कलम १०७, ११६(३) सीआरपीसी, दिनांक २६.३.२००८ इस्तेगासा सोबत

जोडलेल्या सर्व कागदपत्रांची झेरॉक्स प्रती मिळण्याबाबत जाब देणार राधेश्याम भोयर. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.३.२०१० रोजी कार्यालयाकडे कागदपत्रे आढळून आली नाही. परंतु फौजदारी विभागातील लिपिक यांनी पुरविलेल्या माहिती सदर दस्तऐवजांचा कालावधी एक वर्षाचा आहे. दिनांक २७.३.२००९ रोजी सदर दस्तऐवजाचा जतन करण्याच्या कालावधी संपत असल्यामुळे सदर दस्तऐवज या कार्यालयामध्ये आढळून आले नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच सदरहू प्रकरणाची फौजदारी प्रकरण नोंदवही मध्ये नोंद घेतली नाही असे नमुद केलेले आहे. तसेच दिनांक २८.९.२००९ रोजी व्ही. एस. मेश्राम, कोतवाल यांनी कार्यालयातील ५ गठ्ठे चोरुन रद्दी विक्रेत्याला विकतांना पकडण्यात आले होते. सदर ५ गठ्ठे जप्त करुन कार्यालयात आणण्यात आले. त्यांचे अहवालात नमुद केल्यानुसार यापूर्वी सुध्दा श्री. मेश्राम, कोतवाल यांनी कार्यालयातील गठ्ठे/रद्दी गहाळ केली असल्याची शक्यता वर्तविली आहे. त्यामुळे प्रकरण उपलब्ध झाले नाही असे अहवालात नमुद केले आहे. असे असल्यास सदरची कागदपत्रे गहाळ झाल्या प्रकरणी संबंधित पोलीस अधिकाऱ्याकडे एफ.आय.आर. दाखल करणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भामध्ये कागदपत्रे गहाळ झाली आहेत असे आयोगापुढे सांगण्यात आल्यामुळे सदरची कागदपत्रांच्या संदर्भामध्ये संबंधित पोलीस स्टेशन मध्ये एफ.आय.आर. दाखल करावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४९९/अम/२००९.

श्री. अनंत दत्तात्रय उंबरकर,
सानेगुरुजी नगर, अकोली रोड,
अमरावती. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
चांदूर बाजार, जि. अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
चांदूर बाजार, जि. अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २५.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी यांच्या वतीने श्री. एस. एन. गवई, कनिष्ठ लिपिक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. जी. डी. मालढाणे, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, चांदूरबाजार यांचेकडे एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग यांना निवेदन सादर केले. सदर प्रकरणी

मला आवश्यक असलेली माहिती देण्याचे व योग्य सहकार्य करण्याचे आश्वासन मला संबंधितांनी दिल्यामुळे त्यांचे संदर्भातील माझे अपील आपण खारीज करावी अशी माझी आपणास विनंती आहे. त्याकरिता सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४९७/अम/२००९, अपील क्रमांक १४९८/अम/२००९, अपील क्रमांक १५००/अम/२००९ व अपील क्रमांक १५०१/अम/२००९.**

श्री. अनंत दत्तात्रय उंबरकर,
सानेगुरुजी नगर, अकोली रोड,
अमरावती. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,
जि. अमरावती.

श्री. स. म. श्रीराव,
जनमाहिती अधिकारी तथा
लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,
जि. अमरावती.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग,
वाशिम.

जनमाहिती अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग,
वाशिम.

श्री. जी. एस. निपाने,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष भुसंपादन अधिकारी,
लघु सिंचन कामे,
अमरावती.

श्री. जे. के. गिरी,
जनमाहिती अधिकारी तथा
मंडळ अधिकारी,
विशेष भुसंपादन अधिकारी,
लघु सिंचन कामे,
अमरावती.

डॉ. के. एस. वासनिक,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ.

श्री. डी. एन. देढे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये ४ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची पुढील सुनावणी आज दिनांक २५.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांची सर्व अपीले ही दिनांक १५.४.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु त्यांच्या विनंती प्रमाणे व सोईप्रमाणे आज रोजी मुदत देण्यात आली होती. परंतु ते आज गैरहजर आहेत व त्यामुळे सर्व अपीलांची सुनावणी घेण्यात आलेली आहे. अपील क्रमांक १४९७/अम/२००९ मध्ये माहिती अधिकारी हे हजर आहेत. अपील क्रमांक १४९८/अम/२००९ मध्ये उत्तरवादी यांच्या वतीने श्री. एस. सी. उके, उपकार्यकारी अभियंता हे हजर आहेत. अपील क्रमांक १५००/अम/२००९ व अपील क्रमांक १५०१/अम/२००९ मध्ये उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक १४९७/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी या सर्व अपीलांमध्ये त्या त्या कार्यालयामध्ये त्यांचे वर्तमान पत्रातून दिलेल्या जाहिरातीच्या संदर्भातील प्रलंबित देयकांची माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक १२.११.२००८ रोजीच्या अर्जातून देयकाची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २४.१२.२००८ रोजी देण्यात आली. परंतु समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्याप्रमाणे

अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ३.१.२००९ रोजी खर्चाचे पत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला दिसून येतो व त्यांना दिनांक ५.१.२००९ रोजी संपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

३. अपील क्रमांक १४९८/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात दिनांक २३.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्यात चुकीची माहिती दिली असे कारण आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी संपूर्ण वेगळीच माहिती मागितलेली दिसून येते. मात्र त्याबाबतचे उत्तर सुध्दा दिनांक ५.१.२००९ रोजी दिलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना दिनांक २३.१०.२००८ रोजी दिलेली माहिती योग्य आहे असे दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १५००/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००८ रोजीच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक २२.७.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचे संदर्भात झालेल्या टिपणी वरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना दिनांक १५.२.२०१० रोंजी धनादेश उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १५०१/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००८ रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक १८.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. विलंबाकरिता जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता असे सांगितले की, अपीलकर्ता यांना त्यांची देयके ही एक वेळा अमरावती येथे मागितली व एक वेळा यवतमाळ येथे मागितली त्यामुळे देयके देण्यास विलंब झालेला आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे वरील सर्व अपीले ही खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४३६/२०१०.

श्री. गोपाळा मारोतराव पोटदुखे,
रा. चिंचगुंडी, ता. अहेरी,
जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. एस. ढोरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, अहेरी, जि. गडचिरोली.

श्री. बी. एम. बोरकुटे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, अहेरी,
ता. अहेरी, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, अहेरी यांचेकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

... २

३.     अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही या करिता सचिव यांनी सांगितले की, त्यांचेकडे प्रभार दिला त्यावेळेस मागितलेल्या माहितीबद्यल कोणतेही कागदपत्रे मिळाली नाही. त्यापुर्वीचे सचिव सुध्दा हजर आहेत. त्यांना सुध्दा २००१ मध्ये प्रभार मिळाला त्यावेळेसही कागदपत्रे उपलब्ध झाली नव्हती. त्यामुळे गट विकास अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिने चौकशी करुन आदेश देणे क्रमप्राप्त होते. कारण ग्रामपंचायत सचिवांवर नियंत्रण हे गटविकास अधिकारी यांचे असते व त्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी ही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होईल असे पाहणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

१) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, अहेरी, जि. गडचिरोली यांनी सदरच्या प्रकरणातील प्रथम अपीलामध्ये सुनावणी घेऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होईल असे पहावे. अन्यथा जबाबदारी निश्चित करुन संबंधित सचिवाविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४३७/२०१०.

श्री. गोपाळा मारोतराव पोटदुखे,
रा. चिंचगुंडी, ता. अहेरी,
जि. गडचिरोली. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,
चंद्रपूर.

श्री. के. गोणीवसापा,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
लघु पाटबंधारे (स्था. स्तर)
उपविभाग अहेरी, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, अहेरी यांचेकडे दिनांक २७.१.२०१० च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक

... २

१८.२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २.३.२०१० रोजी उपविभागीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक २९.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली असली तरी नियमाप्रमाणे त्यांच्या धान या पिकास पाणी दिल्या जात नाही. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना नियमानुसार पाणी उपलब्ध करुन दिले जात होते. तसेच भारनियमन व इतर शेतकऱ्यांना प्रमाणामध्ये तसेच क्षेत्राच्या प्रमाणामध्ये पाणी उपलब्ध करुन दिले जाते. परंतु कमी पाणी उपलब्ध करुन दिले जाते याकारणास्तव अपीलकर्ता यांना उत्तर दिले व आता पुन्हा १२ तास पाणी मिळेल अशी त्यांची मागणी आहे. परंतु तसे शक्य नाही. त्यामुळे आयोगास त्याप्रमाणे कोणत्याही प्रकारचे आदेश देता येत नाही. अपीलकर्ता यांनी वरिष्ठाकडे तक्रार करावी व न्याय मिळवून घ्यावा. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/५७७-५७८/२५.५.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३३७/२०१०.

श्री. रघुनंदन दशरथ पराते,
चौरागड, प्लॉट नं. ३२,
शारदा चौक, जुना सुभेदार ले आऊट,
नागपूर - ४४० ०२४. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११ ००१.

जनमाहिती अधिकारी तथा
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११ ००१. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.५.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोग, पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २५.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व त्रयस्थ पक्ष श्री. वसंत एस. पाटील, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, क्विन्स गार्डन, पुणे यांचेकडे श्री. वसंत एस. पाटील (अधिकारी वर्ग-१) सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन,

गिरीपेठ, नागपूर यांनी शासनास सादर केलेल्या त्यांच्या संपत्तीचे विवरण. महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती नियम, १९७९ च्या नियमानुसार राजपत्रित अधिकाऱ्यांनी दर ५ वर्षांनी त्यांनी प्राप्त केलेल्या चल व अचल संपत्तीचे विवरण शासनास सादर करणे आवश्यक आहे. आपले अधिनस्त असलेल्या आदिवासी विकास विभागात कार्यरत श्री. वसंत एस. पाटील, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, गिरींपेठ, नागपुर यांनी शासन सेवेत रुजू होतेवेळी शासनास आपले चल-अचल संपत्तीचे सादर केलेले विवरण, तसेच आजपर्यंत दर ५ वर्षांनी त्यांच्या चल अचल संपत्तीचे विवरण शासनास सादर केलेले विवरण यांच्या साक्षांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले असून वरील माहितीसाठी आवश्यक असलेला शुल्क मी भरण्यास तयार आहे असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी दिनांक ६.६.२००९ रोजी श्री. व्ही.एस.पाटील, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर यांना पत्राद्वारे मागणी केल्यानुसार चल व अचल संपत्तीचे विवरणपत्राची माहिती या कार्यालयास पाठवावी म्हणजे सदरहु प्राप्त झालेली अर्जदारास केंद्र शासनाच्या माहिती अधिकार २००५ अंतर्गत देता येईल असे कळविलेले दिसून येते. त्या संदर्भात दिनांक २.७.२००९ रोजी श्री. व. सु. पाटील यांनी जनमाहिती अधिकारी यांना चल व अचल संपत्तीची माहिती मागितलेली आहे. सदर माहिती मागणे हे व्यक्तिगत खाजगी जीवनात अतिक्रमण होत असल्याने अशी व्यक्तिगत स्वरुपाची माहिती दिली जाऊ शकत नाही. त्यामुळे माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११(१) चे तरतुदीनुसार अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात यावा ही विनंती. तसेच श्री. लोकेशचंद्र (भा.प्र.से.) व श्रीमती आभा शुक्ला (भा.प्र.से) यांच्या संदर्भात अशाच प्रकारच्या माहितीबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिलेला निर्णय लोकसत्ता या दैनिकांच्या वृत्तपत्रातील दिनांक २.७.२००९ च्या अंकात प्रसिध्द झालेल्या वृत्ताचे कात्रण देण्यात यावयाच्या निर्णयाच्या बळकटी करण्याकरिता आपल्या माहितीस्तव जोडून पाठवित आहे असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना यावर माहिती अधिकारी तथा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी निर्णय देण्यापुर्वीच अपीलकर्ता यांनी शासकीय माहिती अधिकारी यांच्या दिनांक ६.६.२००९ च्या पत्राच्या संदर्भ देऊन त्याविरुध्द प्रथम अपीलीय

अधिकारी यांना दिनांक ८.८.२००९ रोजी अपील दाखल केले. सदरचे अपील हे दिनांक १७.८.२००९ रोजी प्राप्त झाले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.८.२००९ रोजी देण्यात आलेला असून अपील फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे निवेदन दिलेले आहे ते खालील प्रमाणे आहे. १) मी दिनांक १४.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे कार्यालयाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नियमानुसार माहिती मिळविण्यासाठी अर्ज सादर केला आहे. (जोडपत्र - १) २) सदर अर्ज जनमाहिती अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना प्राप्त झाल्याचे अर्जदाराला दिनांक ६.६.२००९ अन्वये कळविले आहे. पत्रानुसार अर्जात मागणी केलेली माहिती अर्जदाराला देण्यात यावी असे श्री. व्ही. एस. पाटील, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांना कळविले आहे (जोडपत्र - २) ३) माहितीच्या अर्जात नमुद विषयाच्या अंतर्गत अर्जदाराने माहिती जनमाहिती अधिकारी यांना मागितलेली होती. परंतु जनमाहिती अधिकाऱ्याने विषयांकित माहिती उपलब्ध करुन दिली नाही. उलट ज्या अधिकाऱ्याची माहिती मागितली होती त्याच अधिकाऱ्याला पत्र लिहून माहिती उपलब्ध करुन देणेबाबत कळविले. श्री. व्ही. एस. पाटील, उपाध्यक्ष तथा सहआयुक्त, अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचे पत्र अर्जदाराला जनमाहिती अधिकाऱ्याने पाठविले नाही. ४) जनमाहिती अधिकाऱ्याने विहित मुदतीत अर्जात नमुद विषयांतर्गत माहिती पुरविली नाही. म्हणून अर्जदाराने नियम १९(१) अन्वये अपीलीय अधिकारी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले (जोडपत्र-३) ५) जनमाहिती अधिकारी यांनी स्वतःचे पत्र दिनांक ६.६.२००९ व श्री. व्ही. एस. पाटील, उपाध्यक्ष तथा सहआयुक्त अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचे अर्ज दिनांक २.७.२००९ तसेच दुसऱ्या प्रकरणी न्यायालयाचा निवाडा बाबतचे वृत्तपत्र बातमीचे कात्रण प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे सादर केले आहे. (जोडपत्र ४/१, ४/२) ६) प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अर्जदार व जनमाहिती अधिकारी यांचे समक्ष या प्रकरणाची सुनावणी केलेली नाही.

तसेच जनमाहिती अधिकारी व श्री. व्ही. एस. पाटील यांचे अर्जावर विचार करुन दिनांक २७.८.२००९ रोजी अपील निकाली काढले आहे. (जोडपत्र - ५ ) ७) मी नम्रपणे नमुद करतो की, मी श्री. व्ही. एस. पाटील यांची वैयक्तिक माहिती मागितली नाही. त्यांनी शासनास चल अचल संपत्तीचे जे विवरण सादर केलेले आहे. त्या विवरणाची प्रत मागितली आहे. तसेच लोकसत्ता वर्तमानपत्राच्या बातमीचे सादर केले त्या प्रकरणाचा आणि अर्जातील माहिती पुरविण्याच्या प्रकरणाचा संबंध येत नाही. स्वतःच्या बचावासाठी श्री. व्हि. एस. पाटील यांनी लिहिलेले पत्र व वृत्तपत्राच्या बातमीचे कात्रण प्रथम अपीलीय अधिकाऱ्याचे ग्राहय धरणे व अपील फेटाळणे कायदेशीर ठरत नाही. ८) अर्जदाराला विषयांकित माहिती मिळाली नाही व दिनांक २८.८.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकाऱ्याने दिलेला निर्णय समाधानकारक नसल्यामुळे दिनांक ५.११.२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग, पुणे यांचेकडे द्वितीय अपील सादर केले आहे. (जोडपत्र -६) ९) दिनांक ५.११.२००९ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपीलात माझे तर्फे संपूर्ण स्पष्टीकरण व विवरण देण्यात आलेले आहे. आपणांस विनंती करण्यात येत आहे की, जोडपत्र -६ मध्ये नमूद सर्व बाबींचा विचार करुन विषयांकित माहिती उपलब्ध करुन द्यावी व जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी श्री. व्ही. एस. पाटील, उपायुक्त तथा उपाध्यक्ष हयांची जाणूनबुजून पाठराखन केलेली आहे. तेंव्हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० उपकलम १ अन्वये जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना नियमानुसार शास्ती लावावी व उपकलम २ नुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यास पात्र ठरवावे. १०) प्रत्यक्ष सुनावणीचे वेळी माझे सोबत एक प्रतिनिधी अथवा वकील उपस्थित राहण्यासाठी परवानगी देण्यात यावी ही विनंती.

४. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती, १९७९ च्या नियमानुसार दर ५ वर्षांनी प्राप्त केलेल्या चल व अचल संपत्तीचे विवरण शासनास सादर केले असल्यास त्याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती वैयक्तिक स्वरुपाची आहे व ती श्री. व्ही. एस. पाटील यांचेशी संबंधित आहे. या कारणासाठी अधिनियमाचे कलम ११(१) अन्वये ती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्यांना विचारणा करणे आवश्यक असते. त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना

माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता कळविलेले दिसून येते. त्यावर मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यां निर्णयाचा निकाल घेऊन अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देऊ नये अशी हरकत त्रयस्थ पक्षाने श्री. व्ही. एस. पाटील यांनी घेतलेली दिसून येते. त्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्ता अर्जदार यांनी कळविण्यापुर्वीच त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये अपीलकर्ता यांचे अपील फेटाळण्यात आलेले आहे. त्यामुळे द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी जे निवेदन दिलेले आहे त्याचा विचार केला असता व त्रयस्थपक्ष श्री. व्ही. एस. पाटील यांनी घेतलेल्या हरकतीच्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम १९(४) प्रमाणे त्रयस्थपक्षाचे म्हणणे ऐकून घेणे हे आयोगास बंधनकारक आहे व त्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता दिनांक ५.५.२०१० रोजी श्री. वसंत एस. पाटील, त्रयस्थ पक्ष यांना आयोगाचे कार्यालयातून नोटीस काढण्यात आली होती व त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी त्यांना देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे आज दिनांक २५.५.२०१० रोजी पुन्हा सुनावणीचे वेळेस त्रयस्थ पक्ष श्री. वसंत एस. पाटील यांनी त्यांचे म्हणणे आयोगापुढे लेखी स्वरुपात सादर केले आहे. तसेच तोंडी युक्तिवाद सुध्दा केला व लेखी निवेदन खालील प्रमाणे सादर केले व तेच तोंडी युक्तिवादामध्ये सांगितले आहे. ते खालील प्रमाणे आहे.

५. वरील विषयाच्या आपल्या संदर्भांकित पत्रातील निदेशास अनुसरुन मी आपणासमोर आज दिनांक २५.५.२०१० रोजी हजर झालो आहे व मी माझे लेखी म्हणणे व श्री. रघुनंदन दशरथ पराते यांना माझ्याशी संबंधित मागितलेली माहिती देण्यास विरोध म्हणून माझे लेखी उत्तर खालील प्रमाणे आक्षेपांसह आपणांस सादर करीत आहे. सुरुवातीला नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देतो की, मी दिनांक १७.६.२००६ पासून सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर या पदावर कार्यरत आहे. त्यातील दिनांक १७.६.२००६ ते दिनांक १.९.२००६ या कालावधीत माझी मुळ नियुक्ती सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती या पदावर होती व सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार माझ्याकडे दिनांक १७.६.२००६ ते १.९.२००६ या कालावधीत होता. तद्नंतर मात्र मी दिनांक २.९.२००६ पासून सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर या पदावर नियमितपणे

... ६

कार्यरत आहे. आपणांस विदितच आहे की, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती ही न्यायिकवत समिती असून महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र क्र. २३) च्या कलम ९ नुसार या समितीला दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. राज्यात ८ अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या कार्यरत असून त्यांचे अध्यक्ष हे मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे आहेत. परंतु प्रत्यक्षात नागपूर समितीच्या सर्व सुनावण्यांना माझ्या कार्यकालामध्ये मी सहआयुक्त तथा उपाध्यक्ष व पिठासीन अधिकारी या नात्याने अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी प्रक्रियेमध्ये सहभागी झालो आहे. वरील प्रक्रियेमध्ये अनुसुचित जमातीच्या परंतु अनुसुचित जमातीचे खोटे किंवा बनावट प्रमाणपत्र प्राप्त करुन अनुसुचित जमातीचा फायदा घेतलेल्या व्यक्तींच्या विरुध्द महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३) व महाराष्ट्र अनुसुचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ मधील तरतुदींप्रमाणे व संबंधित प्रकरणातील पुराव्यांच्या गुणवत्तेच्या आधारे बहुतांशी दावे अवैध झालेले आहेत. परिणामी, दावे अवैध ठरलेल्या दावेदारांची निवडणूकीतील पदे, नोकरीतील पदे, वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेश त्यांना गमवावे लागलेले आहेत. तसेच काहींच्या पदावनत्या झाल्या आहेत. एवढेच नव्हे तर समितीच्या निर्णयाविरुध्द अशा व्यक्तींची मा.उच्च न्यायालयात सादर केलेल्या रिट याचिकांमध्ये माझ्या पिठासीन अधिकारी म्हणून निर्णय प्रक्रियेत सहभागी झाल्याच्या सुमारे पावणेचार वर्षाच्या कार्यकालात एकही निर्णय या दावेदारांच्या बाजुला लागलेला नाही. त्यामुळे अशा खोटया अनुसुचित जमातीच्या व्यक्तींचा अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूरवर तसेच समितीचा पिठासीन अधिकारी म्हणून मी निर्णय प्रक्रियेत सहभागी झालो असल्याने माझ्यावर प्रचंड वैयक्तिक रोष आहे. परिणामी, कार्यालयात घुसून मारहाण करणे व शिवीगाळ करणे, कार्यालयाबाहेर समितीच्या शासकीय वाहनावर पेट्रोल बॉम्ब फेकणे, समितीचे अधिकारी यांच्यावर प्राणघातक हल्ला करणे, समितीच्या पोलीस दक्षता पथकाच्या पोलीस उपअधिक्षकांवर

हल्ला करणे व शिवीगाळ करणे, समितीचे उपाध्यक्ष शासकीय प्रशिक्षणात गुंतलेले असतांना त्यांच्या दालनात घुसून त्यांच्या खुर्चीवर हार घालणे व पुजा करणे आणि समिती उपाध्यक्ष हजर नव्हते अशी चुकीची बदनामकारक प्रसिध्दी वर्तमानपत्रातून देणे, हलबा-कोष्टी जातीचे असलेल्या श्री. चंद्रभान पराते नावाच्या उपजिल्हाधिकाऱ्यांनी १८०० ते २००० बोगस व्यक्तींना हलबा या अनुसुचित जमातीची प्रमाणपत्रे हेतुपुरस्सर निर्गमीत केल्याने त्यांच्या विरुध्द असलेल्या चौकशीतील कारवाईला अडथळा आणण्यासाठी कार्यालयात येऊन धमक्या देणे, समिती उपाध्यक्षांवर चप्पल फेक करणे, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, समितीच्या सदस्य-सचिव मानसीकरित्या सक्षम नसल्याबाबतची माहिती माहिती अधिकारांतर्गत मागणे, समिती सदस्यांची शैक्षणिक पात्रता व निवड योग्य असल्याचे मा.उच्च न्यायालयाचे निर्णय झाले असून देखील वारंवार तोच तोच प्रश्न रिट याचिकांद्वारे उपस्थित करणे, असे अनेक प्रकार करुन समितीच्या सदस्यांवर व पदाधिकाऱ्यांवर दडपण आणून त्यांचे नितीधैर्य खचविण्याचा उद्योग अव्याहतपणे हे लोक करीत आहेत. सोबत सादर केलेल्या दाखल गुन्हयांच्या प्रगती अहवालाच्या तक्त्यामधील अ.क्र. १५ वरील श्री. चंद्रभान सोमाजी बारापात्रे व अ.क्र. १४ वरील श्री. चंद्रभान बारापात्रे यांची पत्नी श्रीमती शांताबाई चंद्रभान बारापात्रे यांच्या विरुध्द सन २००१ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. २३ च्या कलम ११(१)(अ)(ब) अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच आपणांस सादर केलेल्या खालील तपशिलामध्ये अ.क्र. १ व ३ वर नमुद असलेले श्री. चंद्रभान सोमाजी बारापात्रे यांच्या विरुध्द समितीच्या उपाध्यक्षांना मारहाण करणे व शिवीगाळ करणे तसेच इतर व्यक्तींबरोबर समितीच्या उपाध्यक्षांच्या दालनात घुसून त्यांच्या खुर्चीला हार घालणे व पुजा करणे या त्यांच्या कृतीविरुध्द गुन्हे नोंदविले आहेत व आता त्यांनी दिनांक १९.५.२०१० रोजी नागपूर समितीच्या शासकीय माहिती अधिकाऱ्यांना अर्ज सादर करुन समितीच्या सदस्य-सचिव श्रीमती वसुधा नाईक शासकीय सेवेसाठी मानसीकदृष्टया सक्षम नसल्याबाबत उपचार सुरु असल्याची वदंता नमुद करुन त्याबाबतची माहिती मागितली आहे. त्याबाबतचे जे गुन्हे संबंधित पोलीस स्टेशनला समितीतर्फे नोंदविण्यात आले आहेत, त्यांचा तपशील खालील प्रमाणे सादर आहे :-

... ८

| अ. क्र. | पोलीस स्टेशनचे नांव | गुन्हा घडल्याची तारीख | गुन्हा नोंदविल्याची तारीख | फिर्यादीचे नांव | आरोपीचे नांव | गुन्हयाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सिताबर्डी, नागपूर | १३.१२.२००६ | १३.१२.२००६ | श्री.व.सु.पाटील, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष तर्फे श्री. लक्ष्मण सावरकर, अ.ज.प्र.त.स., नागपूर | श्री. चंद्रभान सोमाजी बारापात्रे | कार्यालयात घुसून मारहाण करणे व शिवीगाळ करणे. |
| २. | सिताबर्डी, नागपूर | ४.६.२००७ | ४.६.२००७ | श्री. मधुकर कवरे, चौकीदार, आदिवासी विकास विभाग, नागपूर | अज्ञात व्यक्ती | कार्यालया बाहेर समितीच्या शासकीय वाहनावर पेट्रोल बॉम्ब फेकणे. |
| ३. | सिताबर्डी, नागपूर | ७.९.२००७ | ८.९.२००७ | श्री.व.सु.पाटील, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष तर्फे श्री.एस.एस.चव्हाण उपसंचालक,अ.ज.प्र.त.स., नागपूर | चंद्रभान सोमाजी बारापात्रे, ॲड. नंदा पराते, रमेश वाकोडीकर, श्रीमती बेबीताई पराते, श्रीमती जिजाबाई धकाते, अनिल दुरुगकर, राजेश पराते, योगेश गोन्नाडे | समितीचे उपाध्यक्षांच्या दालनात घुसून त्यांच्या खुर्चीला हार घालणे व पुजा करणे. |
| ४. | सिताबर्डी, नागपूर | १८.१०.२००७ | १८.१०.२००७ | श्री.व.सु.पाटील, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अ.ज.प्र.त.स., नागपूर | श्रीमती जिजाबाई प्रेमलाल धकाते व श्रीमती पुष्पा प्रभाकर मोहाडीकर | शासकीय कामात अडथळा निर्माण करणे. |
| ५. | अंबाझरी, नागपूर | १८.१.२००८ | १८.१.२००८ | श्री.वामन भगवंतराव सावरकर (श्री.एस.डब्ल्यू.सावरकर तत्कालीन संशोधन अधिकारी, अ.ज.प्र.त.स. नागपूर यांचे वडील) | अज्ञात ३ ते ४ व्यक्ती | समितीचे अधिकारी श्री.सुरेंद्र सावरकर यांच्यावर प्राणघातक हल्ला करणे. |
| ६. | सिताबर्डी, नागपूर | २८.१.२००८ | २८.१.२००८ | श्री.एन.झेड.कुमरे,पोलीस उपअधिक्षक, पोलीस दक्षता पथक, अ.ज.प्र.त.स., नागपूर. | श्रीमती विमल मोतीराम पौनीकर व श्रीमती बेबी केशवराव पराते | समितीच्या पोलीस दक्षता पथकाच्या पोलीस उपअधिक्षकांवर हल्ला करणे व शिवीगाळ करणे. |
| ७. | सिताबर्डी, नागपूर | ११.२.२००८ | ११.२.२००८ | श्री.व.सु.पाटील, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष तर्फे श्री. संतोष कुंभारे, पोलीस निरिक्षक, अ.ज.प्र.त.स., नागपूर | श्री. प्रेमलाल गोविंदराव भांदककर व इतर ४ | समिती अध्यक्षांवर चप्पलफेक करणे. |
| ८. | गडचिरोली | २.१२.२००८ | ३.१२.२००८ | श्री.व.सु.पाटील, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष तर्फे श्री.एस.एस. चव्हाण, उपसंचालक, अ.ज.प्र.त.स., गडचिरोली | श्रीमती नंदा चंद्रभान पराते | सरकारी कामात अडथळा निर्माण करणे. |

आपल्या असेही निदर्शनास आणू इच्छितो की, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली मधील सहआयुक्त तथा उपाध्यक्ष हे पद रिक्त असून या पदाचा अतिरिक्त कार्यभार मी दिनांक १४.१२.२००६ पासून सांभाळीत आहे. नागपूर व गडचिरोली समित्यांच्या कामकाजामध्ये स्वतःला हलबा या अनुसुचित जमातीचे म्हणविणाऱ्या व प्रत्यक्षात मात्र हलबा-कोष्टी या विशेष मागासवर्ग प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींची प्रकरणे मुख्यत्वे मला समितीच्यांच्या पिठासीन अधिकारी या नात्याने मोठया प्रमाणात हाताळावी लागली आहेत आणि महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्यावे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३) च्या कलम ११(१)(अ)(ब) अन्वये दोन्ही समित्यांच्या माझ्या कार्यकालात (आपणास अहवाल सादर करेपर्यंत) एकूण ४८ हलबा-कोष्टी जातीच्या व्यक्तींविरुध्द समित्यांतर्फे विविध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्यातील ४० व्यक्ती हया नागपूर समितीच्या कार्यक्षेत्रातील असून ८ व्यक्ती हया गडचिरोली समितीच्या कार्यक्षेत्रातील आहेत. त्यांच्या गुन्हयाचा प्रगती अहवाल दर्शविणारी दोन विवरणपत्रे आपल्या अवलोकनार्थ सादर करीत आहे. नागपूर समितीच्या ४० पैकी ३२ प्रकरणांमध्ये संबंधित न्यायालयांमध्ये दोषारोप पत्रे सादर झाली आहेत व गडचिरोली समितीच्या ८ प्रकरणांपैकी ६ प्रकरणांमध्ये संबंधित न्यायालयांना दोषारोप पत्रे सादर झाली आहेत. नागपूर समितीमध्ये समिती सदस्य तसेच समितीच्या पोलीस दक्षता पथकामध्ये संशोधन अधिकारी अशी दोन स्वतंत्र कालावधींमध्ये दोन्ही प्रकारची भूमिका बजावलेले अधिकारी श्री. सावरकर यांनी समितीचे सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांना दिनांक ३.२.२००७ रोजी लिहिलेले पत्र वरील स्फोटक परिस्थितीचे अगोदरच सुतोवाच करणारे होते, हे मी विवक्षीतपणे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. कारण श्री. सावरकर यांनी दिनांक ३.२.२००७ रोजी पत्र लिहिल्यानंतर दिनांक १८.१.२००८ रोजी त्यांच्यावर भीषण प्राणघातक हल्ला झाला. त्यांच्या हल्लेखोरांचा आजपर्यंत तपास लागलेला नाही. आपणास सादर केलेल्या सोबतच्या विवरणपत्रांवरुन आपल्या लक्षात येईल की, हलबा-कोष्टी जातीच्या व्यक्तींच्या व्यक्तींचा रोष हा माझ्यावर वैयक्तिक त्यांच्या जातीच्या लोकांविरुध्द केलेल्या करवाईमुळे मुख्यत्वे आहे. वैयक्तिक आकसापोटी व मानसिक त्रास देण्याच्या दृष्टिने सदरची माहिती मागविण्यात आली आहे.

... १०

न्यायिकवत समितीचा पिठासीन अधिकारी म्हणून काम करतांना वरील प्रकारचे हल्ले, शिवीगाळ या बाबींना मी त्रस्त झालेलो असतांनाच समितीचे माजी सदस्य श्री. एस. डब्ल्यु. सावरकर यांच्यावर जो भीषण प्राणघातक हल्ला झाला त्यामध्ये त्यांच्या छातीवर व पोटावर नागपूर येथील डॉ. दंदे यांच्या इस्पितळामध्ये शस्त्रक्रिया करुन त्यांना छातीवर व पोटावर ४८ टाके घालावे लागलेत. हा गंभीर प्रकार पाहून मला शासनाने माहे जून, २००७ पासून पोलीस विभागातर्फे शस्त्रधारी शिपाई माझ्या संरक्षणासाठी नेमलेला असून तो आजतागायत वरील परिस्थितीमुळे कार्यरत आहे. ज्यावेळी वरील गुन्हे नोंदविले गेले, त्यावेळी मुख्यत्वे नागपूर महानगरपालिकेच्या दोन निवडणूकांमध्ये निवडून आलेले हलबा-कोष्टी जातीचे एकूण १६ नगरसेवक या समितीच्या निर्णयाच्या आधारे अपात्र ठरले होते. त्या कालावधीत मला माझ्या निवासस्थानी २४ तास पोलीस विभागातर्फे सुरक्षारक्षक पुरविण्यात आले होते. मा. उच्च न्यायालयाचे निदेशाप्रमाणे अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्याबाबत मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मुंबई यांच्या स्तरावर दर ३ महिन्यांनी आढावा घेतला जातो. माझ्या गेल्या ३½ वर्षाच्या कालावधीत ५ वर्षे ते १५ वर्षे या कालावधीसाठी प्रलंबित असलेली प्रकरणे पिठासीन अधिकारी या नात्याने मी मोठया प्रमाणात निकाली काढली. त्यामुळे समितीच्या निर्णयाअभावी शासन सेवेत अशा दिर्घ कालावधीसाठी सेवेत राहिलेल्या व्यक्तिंना आमच्या समितीचा निर्णय झाल्याबरोबर शासकीय सेवेपासून मुकावे लागले. त्यामध्ये देखील मुख्यत्वे हलबा-कोष्टी समाजाचा समावेश आहे. शैक्षणिक प्रकरणांच्या बाबतीत देखील हिच स्थिती आहे. परिणामी हलबा-कोष्टी जातीच्या लोकांच्या माझ्या विरुध्द असलेल्या असंतोषात भर पडली. त्यामुळे हलबा-कोष्टी जातीच्या विविध संघटनांनी माझ्या विरुध्द व समितीतील माझ्या समव्यापी (Co-extensive) सदस्यांविरुध्द विविध गैरमार्गाचा व दबावतंत्राचा वापर सुरु केला आहे. समिती सदस्य व पदाधिकारी यांचे मनोधैर्य खचेल व ते समिती व्यतिरिक्त आदिवासी विकास विभागातील इतर समकक्ष पदांवर निघून जातील व नंतर येणाऱ्या सदस्यांना देखील दहशतीखाली काम करावे लागेल. अशी परिस्थिती निर्माण करण्याच्या उद्देशाने सदरची माहिती मागितली आहे. ही माहिती मागून सध्या ज्यांच्या विरुध्द गुन्हे दाखल आहेत अशा सर्व व्यक्तींच्या गुन्हयाच्या तपासात अडथळा आणणे आणि त्याच जातीच्या ज्या अर्जदाराचे दावे नागपूर व गडचिरोली समित्यांकडे प्रलंबित आहेत, त्यांचे दावे आमच्या कार्यकालात तातडीने निकाली निघत असल्याने त्यायोगे

भविष्यात दाखल होऊ शकणाऱ्या गुन्हयांच्या दाखलीकरणाला पुर्वनियोजीत विरोध करणे असा स्पष्ट आशय अर्जदारामार्फत करण्यात आलेल्या अर्जान्वये अशा संघटनांकडून केला जात आहे हे स्पष्ट आहे. आपल्या निदर्शनास नम्रपणे आणून देऊ ईच्छितो की, राज्यातील ८ अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांपैकी मुख्यत्वे नागपूर व गडचिरोली समितीमध्ये मोठया प्रमाणात हलबा-कोष्टीची प्रकरणे प्राप्त झाली असून त्यांची संख्या लक्षणीय आहे आणि अर्जदार किंवा त्यांच्या जातीच्या कोणत्याही व्यक्तीने हलबा-कोष्टी जातीची प्रकरणे हाताळत नसलेल्या इतर ६ समित्यांच्या अधिकाऱ्यांची मालमत्तेची माहिती मागितलेली नाही. तसेच ज्यांचे दावे अवैध ठरत आहेत अशा ईतर जातीच्या (जसे - क्षत्रिय ठाकूर, गोवारी, धनगर, धनवर, धोबी, मन्यपवार, भुजवा, छत्री, भाट, इंझवार, कुंभार, खैरे कुणबी) व्यक्ती वा संघटना हलबा-कोष्टी जातीच्या संघटनांसारखे धमक्या देणे, दहशत निर्माण करणे, मानसिक छळ करणे असे प्रकार करीत नाहीत. या इतर जातीचे लोक अनुक्रमे ठाकूर, गोंड, गोवारी, धनगड, धोबा, मन्नेवार, भुंजिया, चट्री, भात्रा, बिंझवार, कमार, खारीया या अनुसुचित जमातीचा दावा करतात. आपल्या असेही निदर्शनास आणून देण्यात येते की, हलबा-कोष्टी जातीच्या व्यक्तिंनी नागपूर समितीच्या जनमाहिती अधिकाऱ्यांकडे मोठया प्रमाणात माहिती अधिकारान्वये माहिती मागविली आहे व बहुतांशी प्रकरणांमधील माहिती ही हेतुपुरस्सरपणे व त्रास देण्याच्या उद्देशाने मागविण्यात आली होती व त्यामुळे त्यांचे अर्ज जनमाहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी नाकारले होते. अशा अर्जदारांमध्ये ज्यांची जात प्रमाणपत्र तपासणीची प्रकरणे समितीत्यांकडे निर्णय प्रक्रियेत होती अशांचा देखील समावेश होता. नगरसेवक पद गमावलेल्या हलबा-कोष्टी जातीच्या श्रीमती जयमाला जागेश्वर बारापात्रे यांनी रिट याचिका क्रमांक २९६३/२००७ मा.उच्च न्यायालयाला सादर करुन महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३) च्या वैधतेला देखील आव्हान दिले होते. मात्र त्यांची रिट याचिका मा. उच्च न्यायालयाने दिनांक १२.१०.२००७ च्या आदेशान्वये सदर रिट याचिका खारीज केली. हलबा-कोष्टी जातीच्या संघटनेतर्फे केलेली अशाच आशयाची श्री. देवराव बारसुजी नांदकर यांची याचिका देखील मा.उच्च न्यायालयाने फेटाळली आहे व अशा प्रकारे अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी प्रक्रियेतूनच वगळून घेण्याचा प्रयोग देखील फसल्याने आता

... १२

अर्जदारामार्फत माझी वैयक्तिक माहिती मागवून मानसिक छळ करुन माझे समितीच्या कामकाजातील मनोधैर्य खचविण्याचा हा प्रयत्न आहे. वरील परिस्थितीत न्यायिकवत प्राधिकारी म्हणून आता आणि भविष्यात अनुसुचित जमातीच्या व्यक्तींचे घटनात्मक अधिकार ठरविण्याच्या न्यायदानाचे महत्वाचे काम गुणवत्तेनुसार व्हावे व कोणत्याही भिती, दडपण किंवा दहशतीखाली होऊ नये व समितीच्या सदस्यांचे कायदा अंमलबजावणीचे काम त्यांचे मनोधैर्य न खचता व्हावे यादृष्टीने आणि तसेच अर्जदार श्री. पराते हे माझी वैयक्तिक माहिती मला मानसिक त्रास देण्याबरोबरच तिचा वापर माझे वैयक्तिक जीवन आणि माझी शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल अशी करतील, हे पाहता त्यांना त्यांनी मागितलेली माहिती देता येत नसल्याचा जो निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला आहे तो कायम करावा, अशी माझी आपणांस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ११(१) अन्वये विनंती आहे. मला आपणापुढे असेही सादर करावयाचे आहे की, न्यायाधिश (संरक्षण) कायद्यामध्ये नमुद केलेले न्यायिक अधिकारी करीत असलेले काम मी गडचिरोली व नागपूर समित्यांचा पिठासीन अधिकारी या नात्याने करीत आहे. मी सहआयुक्त या नात्याने कार्यकारी अधिकारी म्हणून जरी काम करीत असलो तरी नागपूर व गडचिरोली समितीचा पिठासीन अधिकारी म्हणून मी अनुसुचित जमातीच्या व्यक्तींचे घटनात्मक अधिकार ठरविणाऱ्या समितीचा उपाध्यक्ष व पिठासीन अधिकारी म्हणून निर्णय प्रक्रियेत भाग घेत आहे. त्यामुळे मला देखील माझ्या पदावर मी सद्‍भावनेने (Good faith) तसेच कायदा व नियमातील तरतुदींच्या आधारे आणि प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेच्या आधारे निर्णय प्रक्रिया राबविली आहे व अर्जदाराने अर्ज केल्याचा उद्येश हा सदर प्रक्रियेला खिळ बसविण्याचा आहे. वरील प्रतिकुल परिस्थितीत मी कोणत्याही दबावाखाली न येता प्रत्येक प्रकरणाची गुणवत्ता पाहून समितीच्या निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी झालो आहे हे आपणास सादर करीत आहे. तसेच हलबा-कोष्टी जातीच्या संघटना, व्यक्ती यांच्या दबावतंत्रांना व दहशतीला बळी न पडता आजर्यंत शासनाकडे विनंतीवरुन बदलीची मागणी केलेली नाही हे पाहता सदरचे अनुज्ञेय असल्याने अर्जदाराचे अपील फेटाळावे हे आपणांस सादर विदित आहे.

६. अपीलकर्ता यांना सुध्दा युक्तिवाद करण्यास आयोगाने विचारले होते. परंतु अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, माहिती हवी आहे व त्यांनी कोणत्याही अधिनियमाचे तरतुदीच्या संदर्भात युक्तिवाद केला नाही.

अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्रयस्थ पक्ष श्री. वसंत एस. पाटील (अधिकारी वर्ग-१) यांची महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती नियम, १९७९ च्या नियमानुसार राजपत्रित अधिकाऱ्यांनी दर ५ वर्षांनी त्यांनी प्राप्त केलेल्या चल व अचल संपत्तीचे विवरण शासनास सादर केले असल्यास त्या विवरणाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही उपलब्ध करुन देण्यात येऊ नये असे अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे त्रयस्थ पक्ष यांनी हरकत घेतल्यामुळे उपलब्ध करुन देण्यात आली नाही व प्रथम अपील सुध्दा फेटाळण्यात आलेले आहे. वास्तविक महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती नियम, १९७९ च्या नियमानुसार राजपत्रित अधिकाऱ्यांनी प्राप्त केलेली चल व अचल संपत्तीचे विवरण त्या नियमाचे पालन करण्याचे दृष्टीने सादर करणे बंधनकारक असते व अशा प्रकारचे विवरण सादर केल्यानंतर सदरचे विवरण हे गोपनीय ठेवण्यात येते. सदरचे विवरण हे त्यांचे वैयक्तिक विवरण असते. परंतु विवरण सादर केल्यानंतर ते सार्वजनिक अभिलेख्यांचा भाग होत असल्यामुळे ते सार्वजनिक अभिलेख होते. परंतु विशिष्ट परिस्थितीमध्ये उपलब्ध करुन देण्याची कोणतीही हरकत असल्याचे कारण नाही. परंतु माहितीच्या अधिकारामध्ये ज्या ज्या वेळेस अधिकाऱ्यांचे संपत्तीचे विवरणाची प्रत मागितली जाते ती प्रत ही माहितीची पारदर्शकता असावी यादृष्टिने मागितली जाते असे नाही किंवा त्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द भ्रष्टाचाराचे आरोप असल्यास सदरची माहिती मागितल्यास उपलब्ध करुन देण्यास हरकत नसते. परंतु माहितीच्या अधिकारामध्ये जरी अर्जदारास माहिती मागण्याचे कारण विचारता येत नसले तरी अधिनियमाचे कलम ११(१) मध्ये जनमाहिती अधिकारी यांनी जर लोकहितार्थ अशी माहिती प्रकट करणे हे अशा त्रयस्थ पक्षाच्या हिताला होणारी कोणतीही संभाव्य हानी किंवा क्षती यापेक्षा अधिक महत्वाचे असेल, तर ती माहिती प्रकट करण्याची परवानगी देता येईल अशी तरतुद आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय देणे आवश्यक होते. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचे निर्णयाचे संदर्भात दिलेला दिसून येतो. श्री. लोकेशचंद्र (भा.प्र.से) व श्रीमती आभा शुक्ला (भा.प्र.से.) यांना दोन्ही त्रयस्थ पक्षाचे संदर्भात अर्जदाराने माहिती मागितली होती व त्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगाचे खंडपीठाने माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले होते. परंतु त्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये त्रयस्थ पक्ष म्हणून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नव्हते. त्यामुळे मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ

नागपूर यांनी त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घ्यावे अशा प्रकारचे आदेश खंडपीठ नागपूर यांना दिलेले होते. परंतु त्यामध्ये पुन्हा अधिकारीतेचा प्रश्न असल्यामुळे सदरचे प्रकरण हे मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे प्रलंबित आहे. त्रयस्थ पक्षाची माहिती संदर्भात असल्यास त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे हे बंधनकारक आहे. असेच निर्णय मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी श्री. स्वरुपसिंग नाईक यांचे प्रकरणात आयोगास दिले होते व त्याप्रमाणे श्री. स्वरुपसिंग नाईक यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे त्याप्रमाणे प्रक्रिया झाली होती. त्यामुळे या प्रकरणात सुध्दा त्रयस्थ पक्ष म्हणून श्री. वसंत एस. पाटील त्रयस्थ पक्ष यांचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता त्यांना नोटीस काढणे आवश्यक होते व त्याप्रमाणे ती नोटीस काढण्यात आली होती.

६. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रास्ताविकेमध्ये माहितीची पारदर्शकता याबाबतच्या कार्यशैलीच्या दृष्टिने तसेच भ्रष्टाचाराला आळा घालणे व राज्य शासन व त्यांची यंत्रणा या जनतेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याचे दृष्टिने अत्यावश्यक आहे. ज्याअर्थी प्रत्यक्ष व्यवहार हा माहितीच्या प्रकटनामुळे अथवा संबंधित सार्वजनिक हितसंबंधाने तसेच शासकीय कामकाज कार्य सक्षमरित्या चालणे, मर्यादितरित्या कोणत्या साधन संपत्तीचा विस्तृत वापर करणे व संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे या बाबींना बाधा येण्याची शक्यता आहे. ज्याअर्थी लोकशाही आदर्शता परमोचित कायम राखतांना या परमोचित विलंबासंबंधी मेळ घालणे आवश्यक आहे. असा हेतु असल्यामुळे माहिती प्रकट करण्याची गोपनीयता राखण्याच्या दृष्टिने ज्या तरतुदी अधिनियमाचे कलम ८ मध्ये दिलेल्या आहेत त्याबाबतचा सुध्दा विचार करणे आवश्यक असते. अधिनियमाचे कलम ८ मध्ये माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद म्हणून १० मुद्दे दिलेले आहेत. त्यामध्ये (त्र) जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टिने आवश्यक आहे अशी यथास्थिती, केंद्रीय जनमाहिती अधिकाऱ्यांची, राज्य जनमाहिती अधिकाऱ्यांची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरुन, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत विनाकारण हस्तक्षेप करील अशी वैयक्तिक तपशिलसंबंधातील माहिती :- परंतु जी माहिती संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तिला देण्यासही नकार देता येणार नाही अशी तरतुद आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी जी माहिती

मागितलेली आहे ती त्रयस्थ पक्षाची असून त्या व्यक्तिंच्या खाजगी बाबतीत हस्तक्षेप करील असे आहे. अपीलकर्ता हे शिक्षणसेवक असले तरी त्यांचे बाबतीतही माहिती प्रकट करतांना सार्वजनिक कामकाज असे हित संबंधाशी नसल्यास प्रकट करण्याची आवश्यकता नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व त्यासंदर्भात त्रयस्थ पक्ष श्री. वसंत एस. पाटील यांनी केलेला युक्तिवाद व दिलेले निवेदन व त्यातील सर्व सहपत्रे यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मागितलेली माहिती ही कोणतेही व्यापक लोकहिताचे दृष्टिने किंवा सार्वजनिक कामकाजाचे दृष्टिचे आहे असे दिसून येत नाही. तर आता पर्यंत अपीलकर्ता व त्यांचे इतर सहकारी यांनी ज्या पध्दतीचे वर्तन केले आहे व एक शिक्षणसेवक म्हणून त्यांचेवर दबाव आणण्या पर्यंत केलेले आहे तसेच गैरमार्गाने शासकीय अधिकाऱ्यांकडून विशिष्ट काम करुन घेण्याची एक मानसिकता दिसून येत असल्यामुळे व तशी माहिती प्रकट केल्यास पुढील येणाऱ्या सर्व तक्रारी व आजही काम करणारे सर्व अधिकाऱ्यांच्या संदर्भात एक वेगळा संदेश जाऊन त्यांचे मनोभंग होऊ शकते. वास्तविक अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कामकाजाच्या संदर्भामध्ये विधान मंडळाच्या अधिनियम आहे व त्या अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे एक विशिष्ट कार्यपध्दती दिलेली आहे व त्या कार्यपध्दतीप्रमाणे समिती निर्णय घेते. ते निर्णय मान्य नसले तर अर्जदार मा.उच्च न्यायालयात न्याय मागावयाचे असते. परंतु तसे न करता अपीलकर्ता व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेले आहे ते अतिशय गंभीर असे दिसून येते. एका अधिकाऱ्यास जिवानिशी मारण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो व त्यामुळे सदरची माहिती प्रकट केल्यास अधिनियमाचे कलम ११(१) च्या परंतुकाप्रमाणे त्रयस्थ पक्षाच्या हिताला येणारा संभाव्य हानी क्षती ही अधिक असू शकते व त्यामुळे माहिती ही प्रकट करणे योग्य होणार नाही. उलटपक्षी अधिकारी व कर्मचारी यांचे मनोधैर्य कमी करण्यासारखे होईल. अपीलकर्ता यांना मा.उच्च न्यायालयाचा मार्ग हा अधिक न्यायोचित होईल व त्याप्रमाणे त्यांना समितीने दिलेल्या निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करणे योग्य राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३१७/नाग/२०१०
अपील क्रं. ३१८/नाग/२०१०

१) श्री अरुण विठ्ठलपुरी वैकुंठी,
प्लॉट नं.५८, बँक कॅालोनी, दुर्गा नगर,
मानेवाडा रोड, नागपूर-४४००२४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
गोसावी हायस्कुल लिंगा, पोस्ट लिंगा, ता.कळमेश्वर जि.नागपूर. उत्तरवादी

अपील क्रं. ३१८/नाग/२०१०

४) जन माहिती अधिकारी तथा सचिव,
गोसावी आदिवासी बहुउद्देशिय औद्योगिक शिक्षण संस्था,
प्लॉट नं.यु/६०, उज्वल सोसायटी, नरेंद्र नगर, जि.नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपील क्रमांक ३१७/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपील क्रमांक ३१८/नाग/२०१० मध्ये जन माहिती अधिकारी गैरहजर आहे.**

**२. अपील क्रमांक ३१७/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गोसावी हायस्कुल यांचेकडे, गोसावी हायस्कुल लिंगा या शाळेला मिळालेल्या अनुदानाबाबत चौकशी. कालावधी २००९. एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती तयार असल्याबाबत लेखी कळविल्यास अर्जदार स्वत: शाळेत येवून माहिती घेवून जाईल असे नमुद केले आहे. तसेच अर्जदार माहितीचा खर्च भरण्यास तयार आहे असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी २९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे उपस्थित न राहिल्यामुळे झालेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, जन माहिती अधिकारी यांचेकडे**

**( पान २ वर..)**

स्वत: जावून कोणत्या प्रकारची माहिती पाहिजे हे त्यांना समजावून सांगितले होते. तरीही माहिती उपलब्ध झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी शाळेच्या स्थापनेपासून माहिती पाहिजे किंवा कसे याबाबत माझ्या मनात संभ्रम होता म्हणून माहिती दिली नाही. व संभ्रम दूर करण्याकरीता अपीलकर्ता यांना स्पष्टपणे विचारलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता अर्ज स्पष्ट व सुटसुटीत भोषत आहे व त्यात कोणत्या कालावधीतील माहिती हवी तो काळ २००९ असे नमुद केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या मनात कोणत्याही प्रकारचा संभ्रम असण्याचे कारण नाही. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे ही बाब ते प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर राहिले नाही त्यावरुन सिध्द होते. व त्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीच्या बाबत त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांचा संभ्रम दूर झालेला आहे व माहिती आता उपलब्ध करुन देतो परंतु शास्ती लावण्यात येवू नये, असे सांगितले. परंतु माहिती उपलब्ध करुन देण्याचा कालावधी निघून गेला असल्यामुळे शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ३१८/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, गोसावी आदिवासी बहुउद्येशिय औद्योगिक शिक्षण संस्था यांचेकडे, सभेला उपस्थित राहाण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी व सदस्य यांना काढण्यात आलेल्या नोटीसांच्या सत्यप्रती. सभेचे वृत्तांतच्या सत्यप्रती, इ.माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २००९ असा दिला आहे. माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. परंतु, सचिव, गोसावी आदिवासी बहुउद्येशिय औद्योगिक शिक्षण सस्था, नागपूर यांनी त्यांचे संदर्भिय पत्रानुसार या कार्यालयास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी आपण कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु, गोसावी आदिवासी बहुउद्येशिय शिक्षण संस्था नागपूर यांनी, आपल्या कार्यालयात सादर केलेली माहिती ही सत्यापीत केली नसल्याचे आढळून आले. आम्ही संबंधीत लिपिक तथा आपल्या कार्यालयाचे माहिती अधिकारी श्री राऊत साहेब यांना भेटून माहिती सत्यापीत करुन उपलब्ध करुन देण्यास मौखिक विनंती केली. त्यावर त्यांनी पुन्हा ३-४ दिवसांने पुन्हा कार्यालयात येवून माहिती घेवून जावी असे मौखिक सांगितले. त्यानुसार आम्ही दिनांक ८.१२.२००९ रोजी आम्ही पुन्हा आपल्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु अद्यापही माहिती सत्यापीत करण्यात आली नसल्याचे आढळून आहे, असे अर्जदार यांनी कळविलेले दिसून येते.

५. तसेच संस्थेच्या संदर्भात अपील क्रमांक ८६२/२००९ च्या संदर्भात त्यातील प्रथम अपीलाची सुनावणी घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी व संस्थेविरुध्द योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करावी असे आदेश आयोगाने दिलेले असून सुध्दा त्याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे तक्रार सुध्दा दाखल केली होती. परंतु याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली नाही. यावरुन त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपील क्रमांक ८६२/०९ मध्ये प्रथम अपीलाच्या संदर्भात चौकशी करावी. तसेच या अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना संस्थेकडून जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती सत्यापीत करुन द्यावी अन्यथा कार्यालयातील लिपिक यांचेविरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे संयुक्तिक राहील. तसेच संस्थेकडून जी माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची आहे ती संस्थेने उपलब्ध करुन न दिल्यास संस्थेच्या विरुध्द मान्यता काढून घेण्यासाठी किंवा अनुदान कमी करण्याची शिफारस करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील ३१७/नाग/२०१० मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.१२.२००९ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती म्हणजे ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये १,०००/-(रुपये एक हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. शास्तीबाबत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकुण घेतले. परंतु त्यांचे म्हणणे समाधानकारक नाही. सदरच्या शास्तीची वसुली ही संबंधीताचे दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करावी.**

**३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३१८/नाग/२०१० मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २६.११.२००९ च्या अर्जाप्रमाणे संस्थेचे सचिव तथा माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संस्थेचे अनुदान कमी करण्याची किंवा मान्यता काढून घेण्याची शिफारस करण्यात यावी.**

**४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३२२/नाग/२०१०

१)श्री सुनिल ईश्वरदासजी कांबळे,
द्वारा-सुरेशरावजी वाघमारे, गणेश नगर, बोरगांव(मेघे)वर्धा,
जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(सामान्य प्रशासन विभाग)जिल्हा परिषद वर्धा. जि.वर्धा उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग),
जिल्हा परिषद वर्धा, ता.जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दिनांक १.९.२००९ ते आजतागायत या कालावधतील (१) श्री एस.आय.कांबळे व.स.यांचे समायोजन उपविभाग हिंगणघाट येथे करण्याकरीता कोणते निकष लावण्यात आले त्याची माहिती द्यावी. व तसेच त्याबाबत शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन द्यावी. (२) वर्धा जिल्हा परिषदमध्ये एकुण व.स.ची मंजूर पदे एकुण भरलेली पदे, रिक्त पदे यांची माहिती देण्यात यावी. (३) वर्धा मुख्यालयातील इतर कार्यालयातील रिक्त पदाची माहिती द्यावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.११.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच दिनांक ११.११.२००९ च्या अर्जाप्रमाणे दिनांक २०.११.२००९ रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक २४.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, माहिती उपलब्ध झाली होती. परंतु मुद्या क्रमांक १ मधील शासन निर्णय उपलब्ध झालेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अतिरिक्त कर्मचा-यांचे समायोजन करण्याकरीता शासन निर्णय नसतो. त्यांच्या कार्यालयाने अतिरिक्त आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविल्यामुळे त्यांच्या**

**(पान २ वर..)**

**आदेशाने समायोजन केले जाते व त्याबाबतची जाण अपीलकर्ता यांना दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३२१/नाग/२०१०

१)श्री महादेव चंपतराव ठमेकर,
दत्त मंदिर समोर, रामनगर वर्धा, ता.जि.वर्धा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वर्धा, ता.जि. वर्धा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तलाठी,
मौजा इटाळा, पटवारी ह.नं.४० ता.जि.वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी मौजा इटाळ यांचेकडे मौजा इटाळा ता.वर्धा येथील शेत सर्व्हे नंबर १/१ख व ३/१ ख या शेताचे संबंधात १९६५ ते २००९ पर्यंतची ७/१२ ची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.३.२०१० रोजी देण्यात आला असून अर्जदार यांनी मौजा इटाळा येथील सर्व्हे नंबर १/१ख व ३/१ख या शेताच्या संदर्भात सन १९६५ ते २००९ पर्यंतची माहिती मागितलेली असून ती प्रश्नोत्तराच्या स्वरुपात आहे. संबंधीत माहिती उपलब्ध नसल्यामुळे देता येणार नाही. परंतु अर्जदाराची इच्छा असल्यास उपरोक्त शेत सर्व्हे नंबरचे सन १९७५-७६ ते २००९ पर्यंतचे ७/१२ उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांच्या शेतीचे क्षेत्र/आराजी कमी दाखविण्यात आली. तसेच आतापर्यंत जी नांवे दाखल करण्यात आली ती कोणत्या आधारे दाखल करण्यात आली याबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, जेव्हापासून ७/१२ अंमलात आला तेव्हापासूनचे उतारे अपीलकर्ता यांना देण्यात आले आहे. ती नांवे कशी बदलण्यात आली व आराजी मध्ये कसा बदल झाला याबाबतची माहिती दप्तरात नाही. त्याकरीता त्यांना तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचे मार्फत क्षेत्र दुरुस्तीसाठी व नांवे कमी करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ च्या कलम १३५, १०६ प्रमाणे अपील सादर करावे लागेल. अपीलकर्ता यांनी सांगितले की, दिनांक २९.४.२०१० रोजी उपविभागीय**

**( पान २ वर )**

**अधिकारी यांचेकडे संबंधीत शेत जमीनीच्या संदर्भात अपील दाखल केले आहे. परंतु त्यांनी ते अपील हे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचे मार्फत दाखल केलेले नसून थेट दाखल केलेले आहे. त्याकरीता त्यांनी क्षेत्र दुरुस्ती व नांव कमी करण्याबाबतचा स्वतंत्र अर्ज दाखल करणे संयुक्तिक राहील. परंतु अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३१९/नाग/२०१०

१)श्री ओमप्रकाश र.गांधी,
अनुजा अपार्टमेंट, श्रीराम ॲाकीज जवळ, मंगळवारी पेठ, उमरेड,
ता. उमरेड, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक,
भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपूर विभाग,
नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी
भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपूर विभाग, नागपूर
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इमारत, ए विंग, दुसरा माळा,
तेलंगखेडी, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक यांचेकडे, दिनांक ७ ते ९ एप्रिल दरम्यान गडचिरोली जिल्हयात करण्यात आलेल्या चौकशींबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना ३ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या मध्ये पुन्हा श्री गेडाम(यां) यांचेवर झालेल्या कथित हल्ला प्रकरणी दिनांक ७ ते ९ एप्रिल दरम्यान करण्यात आलेल्या चौकशीबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही, अहवालावर आवक क्रमांकाची नोंद नाही. तसेच पत्र क्रं.भूसविय /उसंना /आस्था/ मा.अधिकार/४५१४ दिनांक २९.१२.२००९ चा मुद्या व क्रं. १ व ३ तर्कसंगत वाटत नाही असे प्रथम अपीलाचे कारण दिले व त्यात ज्या तक्रारीच्या आधारावर चौकशी करण्यात आली त्याची प्रत. चौकशीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल इ.माहिती स्पष्टीकरण करुन मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना दिनांक १२.१.२०१० रोजी एकुण शुल्क रुपये ३६+ ४५=८१ चा भरणा करण्यात यावा असे कळविण्यात आले. त्यावर अपीलकर्ता यांनी ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असा आक्षेप घेतलेला आहे. व दिनांक १०.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना पुन्हा ५ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती**

**( पान २ वर..)**

**आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. व त्यात पत्र क्रं.भूसविय/आस्था/मा.अधी/४५१४ दिनाक २१.१२.२००९ च्या मुद्या क्रं. १ ते ३ चे अधिन राहून तपासणी नुसार कार्यालय प्रमुख यांचे समवेत काही पत्रव्यवहार झाला असल्यास त्याच्या साक्षांकित प्रती उपलब्ध व्हाव्या असे कारण दिलेले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, संबंधीत कार्यालयाची जी तपासणी झाली आहे ती कोणत्या तक्रारचे आधारावर झाली आहे त्या तक्रारीची प्रत त्यांना उपलब्ध होणे आवश्यक होते व तशी ती माहितीच्या अधिकारात सुध्दा मागितली आहे. तसेच इतरही त्या तपासणीच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार किंवा त्यांच्या कार्यालयाशी झालेल्या पत्रव्यवहाराची कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी तशा प्रकारची कागदपत्रे उपलब्ध करुन लिी आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु मुळात तपासणी कोणत्या तक्रारीच्या आधारावर झाली त्या तक्रारीच्या संदर्भात केलेला पत्रव्यवहार उपलब्ध करुन दिला नाही. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत, कार्यालयाची तपासणी ज्या तक्रारीच्या आधारावर झाली किंवा पत्रव्यवहार ज्या आधारावर झ ाला असेल त्या तक्रारीच्या किंवा तक्रारीच्या सोबत जी कागदपत्रे असतील त्याच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात. व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३२०/नाग/२०१०

१)श्री उध्दव शामरावजी खडसे,
मंगलधाम सो.प्लॅाट नं.३५, हिंगणा रोड टाकळी सिम,
नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,
परिमंडळ क्रं.१, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
सिताबर्डी विभाग, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी नागपूर यांचेकडे, दिनांक ११.१०.२००९ ला मला जातीय वाचक शिविगाळ व जिवे मारण्याच्या दिलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही करण्यात आली,याची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना तक्रारीच्या अनुषंगाने अपराध क्रमांक ६२३७/२००९, भा.द.वि. कलम २९४, ५०६ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. गुन्हयाचा तपास करुन गुन्हयाचे अ फायनल विधि अधिकारी यांच्या अभिप्रायावरुन मा. ज्युडीशियल मॅजीस्ट्रेट साहेम कोर्ट येथे दिनांक १.१२.२००९ अ.फा.क्रं.०४/०९ पाठविण्यात आले आहे. सदरचे फायनल सोबत राहुल करागळे, सोनु कनोजिया, इंद्रावती श्रीवास्तव बलमिदर व इतर इसमाचे साथीदारांचे जबाब असून सदरचे जबाब सुध्दा संबंधीत अ फायनल सोबत न्यायालयात पाठविण्यात आले आहे. तरी अर्जदाराने संबंधीत दस्तऐवज मिळण्यासाठी मा. JMFC-२ येथे जाण्याची समज देण्यात यावी असे कळविले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.२.२०१० रोजी देण्यात आला असून अपील काहीअंशी मंजूर करण्यात आले असून त्याने मागितलेल्या माहिती बाबतचे कागदपत्रे ही न्यायालयात दाखल असल्याने ते कागदपत्रे न्यायालयातून प्राप्त करुन अपीलकर्ता यांना विनामुल्य देण्यात यावी. जी माहिती प्राप्त झाली नाही त्याबाबत अपीलकर्ता यांना लेखी कळवावे असा आदेश देवून अपील निकाली काढण्यांत आली. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती अधिकारी यांनी न्यायालयाकडे कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याकरीता मागणी केली असता फिर्यादीने अर्ज करावा असे सांगण्यात आले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता**

**( पान २ वर..)**

**यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, जी माहिती मागितली ती पोलीस स्टेशन मधील असल्यामुळे ती कागदपत्रे माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ते न्यायालयात गेले होते. परंतु त्यांना न्यायालयातून सांगितले की, ती संपूर्ण कागदपत्रे पोलीसांकडे असते व त्यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी. मात्र अपीलकर्ता यांनी मा. न्यायालयात लेखी अर्ज केल्यास त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकतील. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, न्यायालयात सर्व कागदपत्रे दाखल करावी लागतात व त्याप्रमाणे ती न्यायालयात दाखल केली आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी सांगितले की त्यांना अ फायनलच्या तारखेची सुध्दा चौकशी करावयाची आहे किंवा बयाण घ्यावयाचे आहे असे दोन पत्रे मिळाली आहे. त्यांची एक तक्रार आहे व त्या तक्रारीच्या संदर्भात जर न्यायालयात कागदपत्रे दाखल झाली असतील तर पुन्हा चौकशी घेण्याचे कारण काय. त्यांनी ती पत्रे सादर केलेली होती. जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा ती पत्रे कशाच्या आधारावर देण्यात आली आहे हे सांगितले नाही. परंतु, त्यांनी न्यायालयाकडे सदरच्या पत्रांचे संदर्भात चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल असे आयोगापुढे सांगितल्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून मा.न्यायालयातून माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी स्वतःच अर्ज दाखल करणे योग्य राहील. अपीलकर्ता यांनी जी नंतरची पत्रे आयोगाचे निदर्शनास आणली, त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी चौकशी करुन योग्य ती माहिती द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३११/नाग/२०१०

१)श्री प्रकाश मार्तंडराव मामिलवार,
प्लॉट क्रं.३४२, बारलींगे ले आऊट, दिक्षाभूमी समोर,
लक्ष्मीनगर(पूर्व), नागपूर-४४००२२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त,
महानगरपालिका, नागपूर, सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी,
महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी

४)जन माहिती अधिकारी तथा वार्ड अधिकारी/सहा.आयुक्त,
नागपूर महानगर पालिका झोन क्रं.१, लक्ष्मी नगर, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे. (१) दिनांक २५.७.९२ चे शेजा-यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्रमाणित प्रतची पूर्तता करणे. (२) दिनांक २३.३.०९ रोजी विभागीय अधिकारी झोन क्रं.१ यांनी केलेल्या आटाचक्की निरीक्षण रिपोर्टच्या प्रमाणित प्रतची पुर्तता करणे. (३) दिनांक १९.८.०६ रोजीचे वार्ड अधिकारी/विभागीय अधिकारी झोन क्रं.१चे नोटीसचे प्रमाणित प्रतची पुर्तता. (४) दिनांक २१.८.०६ रोजी श्रीमती लता मलगेवारने सादर केलेल्या उत्तराचे प्रमाणित प्रतची पूर्तता करणे. (५) दिनांक २५.९.०६ रोजीचे वार्ड अधिकारी/विभागीय अधिकारी झोन क्रं.१चे नोटीस व दिनांक ३०.११.०६ चे स्मरण पत्रचे प्रमाणित प्रतची पूर्तता करणे. (६) क्रं.५ मध्ये उल्लेखित नोटीसचे अनुषंगाने श्रीमती लता मलगेवारने दिनांक ३.१०.०६ व दिनांक ८.१२.०६ रोजी सादर केलेल्या उत्तराची प्रमाणित प्रतची पूर्तता करणे. (७) दिनांक ७.५.२००७ रोजीचे वार्ड अधिकारी/विभागीय अधिकारी झोन क्रं.१ने जारी केलेल्या नोटीसचे प्रमाणित प्रतची पूर्तता करणे. (८) दिनांक ३.८.०७ रोजीचे वार्ड अधिकारी/विभागीय अधिकारी झोन क्रं.१यांनी श्रीमती लता मलगेवार यांचे आटाचक्की संबंधी घेतलेल्या निर्णयाचे प्रमाणित प्रतची पूर्तता करणे (९) दिनांक १४.११.२००८ रोजी विभागीय अधिकारी/वार्ड अधिकारी यांनी लता मलगेवारला जारी केलेल्या नोटीसचे प्रमाणित प्रत पूर्तता करणे. (१०) दिनांक २४.११.२००८ रोजीचे श्रीमती लता मलगेवारचे उत्तराची प्रमाणित प्रतची पूर्तता करणे (११) दिनांक २४.१२.२००८ चे वार्ड अधिकारी/विभागीय अधिकारी झोन क्रं.१ यांनी लता मलगेवारला जारी केलेल्या स्मरणपत्रचे प्रमाणित प्रतची पूर्तता करणे (१२) दिनांक २४.१२.२००८ चे स्मरणपत्रचे अनुषंगाने श्रीमती लता मलगेवारने सादर केलेल्या उत्तराची प्रमाणित प्रतची पूर्तता करणे (१३) दिनांक १७.३.९९ व दिनांक ४.५.२००० रोजी श्रीमती लता मलगेवार यांनी धारण केलेले/यांचेकउे असलेले घर क्रं.७३४, प्लॉट क्रं.३४३ लक्ष्मीनगर येथे आटाचक्की व्यवसाय करण्याकरीता मनपा नागपूरने प्रदान केलेले वैध व अधिकृत अस्थाई ना**

**हरकत प्रमाणपत्राचे प्रमाणित प्रतची पूर्तता करणे, अशी माहिती मागीतली आहे. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.९.०९ रोजी माहिती उपलब्ध झाली. परंतु मुद्या क्रं. १३ ची माहिती उपलब्ध झाली नाही. त्याकरीता दिनांक १०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.१२.२००९ रोजी दिला असून माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मुद्या क्रं. १, ११, १२ व १३ ची माहिती ही आठवडयाचे आंत देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना मुद्या क्रमांक १३ मध्ये फक्त प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले आहे. परंतु त्याकरीता इतर जी कागदपत्रे दाखल केली ती मला उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, नस्तीमध्ये जी कागदपत्रे उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन दिली आहे. ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता ज्या कागदपत्रांची आवश्यकता असते त्याची अपीलकर्ता यांना अपेक्षा आहे. परंतु ती उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांनी स्वतंत्रपणे त्याकरीता सक्षम अधिकारी यांचेकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील. अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३१४/नाग/२०१०

१)श्री राजा खान मेहबुब खान
सुमित अपार्टमेन्ट, शनिवारी, कॅाटन मार्केट घर क्रं. २७९/एफ/१,
ब्लॅाक क्रं.१, १ला माळा, सुभाष रोड, नागपूर-४४००१८. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(कच्चामाल)
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ,
कृपानिधी, ९, वालचंद हिराचंद मार्ग, बेल्लार्ड इस्टेट, मुंबई-३८. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक,
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ,
पंचशील सिनेमा जवळ, रामदास पेठ, वर्धा रोड, नागपूर-१२. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत. मात्र सुनावणी झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. रुतविक सुभेदार हे हजर झाले व त्यांनी लेखी युक्तीवाद सादर केला.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, म.ल.उ.विकास महामंडळ यांचेकडे, (१) महामंडळा तर्फे वर्ष २००९ चे एप्रिल महिन्या पासून ते आज पर्यंत कोणकोणत्या कोळसा उद्योजकाला व विटा भटटी धारकांना दर महिन्याला किती किती टन कोळसा कोण कोणत्या कोळसा खाणीतून देण्यात आला असत्याची सविस्तर माहितीची सत्यप्रत देण्याचे करावे. (२) महामंडळाने वर्ष २००९ साला पासून मोहित मिनरल्स, या कंत्राटदाराला लायजनिंगचे कंत्राट दिल्या संबंधाने या कार्याचे कार्य आदेशाची सत्यप्रती देण्याचे करावे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही तरी अपीलकर्ता यांना दिनांक ११.१२.२००९ रोजी अतिरिक्त माहिती करीता खर्च रुपये ४००/- कार्यालयात जमा करण्यास कळविले होते. परंतु सदर पत्र आपल्या अर्जावरील पत्यावर पाठविले असता लिफापा या कार्यालयास पोस्टमनच्या शे-यानुसार not known असा शेरा मारुन परत आला. त्यामुळे रुपये ४००/- भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. त्यात अर्जाप्रमाणे माहिती दिली नाही व जादा पैसा घेतला. देण्यात येणा-या माहितीचा हिशोब सुध्दा दिलेला नाही असे प्रथम अपीलाचे कारण नमूद केले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक १५.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली होती. व प्रत्यक्ष कार्यालयात येवून माहिती घेतली असल्यामुळे टपाल खर्च रुपये ६८/- चा धनादेश सुध्दा परत पाठवित आहे असे कळविले. परंतु अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक २ ची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, मुद्या क्रमांक २ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्याचप्रमाणे त्यांनी जी कागदपत्रे उपलब्ध करुन दिली त्याकरीता त्यांच्याकडून जादा खर्च घेण्यात आला.**

परंतु त्यांनीच दाखल केलेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, त्यांनी स्वतः माहिती घेतली असल्यामुळे रुपये ६८/- टपाल खर्च त्यांना परत करण्यात आला आहे.

**४.** जन माहिती अधिकारी यांचे तर्फे जो खुलासा केलेला आहे त्या खुलाशामध्ये अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे म्हटलेले आहे. मोहित मिनरल प्रा.लि.या कंपनीसोबत केलेल्या ॲग्रीमेन्टची प्रत सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिली नाही असे सांगितले. परंतु अपीलकर्ता यांनी कार्य आदेशाची प्रत मागितली होती. व अपीलकर्ता यांना ॲग्रीमेन्टची मुळ प्रत मिळालेली नसल्यामळे छायांकित प्रत दाखल केली आहे. परंतु ती विलंबाने दाखल केलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्याबाबत विचारता आले नाही. तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही असे सांगितले. व सुनावणी घेण्याबाबत दूरध्वनीवरुन टाळाटाळीची उत्तरे देण्यात आली आहे.

यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे तसेच शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते. व त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीतच मुद्या क्रमांक २ च्या प्रमाणे कार्य आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात. तसेच आयोगापुढे उत्तरवादीपैकी कोणीही हजर झाले नाही हा आयोगाचा अवमान आहे. परंतु अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत मुद्या क्रमांक २ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचे म्हणणे ऐकुण घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मुद्या क्रं. २ मधील मोहित मिनरल यांना दिलेल्या कार्य आदेशाची प्रत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती तथा कार्य आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे त्यांचे विरुध्द शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबत त्यांनी आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांचे म्हणणे सादर करावे, अन्यथा शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३३३/नाग/२०१०

१)श्री सतिश विठ्ठलराव काळबांधे,
रा.पो.भिसी, ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर-४४२९०३. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी,
चिमूर, ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
चिमूर, ता. चिमूर जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालयात, (१) मौजा खापरी(म.) प.ह.न.२० येथील भूमापन क्रमांक ७४ मधील विठ्ठल जैराम काळबांधे यांचे नांवे किती रक्कमेचे अनुदान मंजूर करण्यात आले. त्याबाबत प्रकाशीत यादीची सत्यप्रत मिळावी. (२) मंजूर अनुदान रक्कमेपैकी आजपर्यंत किती रक्कम ग्रामीण बँक खात्यावर जमा करण्यात त्याबाबत सत्यप्रत मिळावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १३.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नसून त्यांना दिनांक २४.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध**
**झालेल्या महितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करताना सांगीतले की, सन २००८-०९ मध्ये लष्करी अळीने प्रभावीत झ ालेल्या सोयाबिन पिकाकरीता शासकिय अनुदान मंजूर करण्यात आले. शासकिय अनुदान वाटप करण्यासाठी प्रभावीत सोयाबिन क्षेत्रासह तथा पात्र लाभार्थी यादी प्रकाशित करण्यात आली. प्रकाशित पात्र लाभार्थी यादीमध्ये विठ्ठल जैराम काळबांधे यांच्या २.०० हे.आर शेतजमिनीपैकी १.४० हे.आर नुकसान प्रभावित क्षेत्र दर्शविण्यात आले होते. तसेच त्यासमोर शासकिय नियमाप्रमाणे ७०००/- लिहिले होते. प्रकाशित पात्र लाभार्थी यादी नुसार बँक खाते क्रमांक घेऊन मंजूर शासकिय अनुदान बँक खात्यावर जमा करण्यात आले. वैनगंगा क्षेत्रीय ग्रामीण बॅक शाखा भिसी येथे सदरील शासकिय अनुदानाबाबत चौकशी केली असता बँक खात्यावर ५,०००/- जमा करण्यात आले असे कळले. मी स्वत: प्रत्येक कृषि सहाय्यक श्री रोकडे, श्री जाधव तालुका कृषि अधिकारी श्री गुरुमुखी यांचेकडे सविस्तर चर्चा केली असता समाधानकारक उत्तरे मिळाले नाही. त्यामुळे माहितीच्या अधिकारात अर्ज केला. मात्र विठ्ठल जैराम काळबांधे यांचे नांवे किती अनुदान मंजूर करण्यात आले त्याबाबत पात्र लाभार्थ्यांची यादीची सत्यप्रत मागितली होती ती दिली नाही. मंजूर अनुदान किती सत्यप्रत**

**मागितली होती, ती दिली नाही. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व प्रथम अपीलात कोणतीही माहिती दिली नाही. दिलेली माहिती विसंगत व दिशाभूल करणारी आहे. यावरुन माहिती देण्यासाठी टाळाटाळ केलेली आहे असे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, त्यांचेकडे मंडळ अधिका-यांकडून सविस्तर माहिती येते. त्याप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम ठरविता येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना रुपये ५०००/- मंजूर झाले होते. व त्याबाबतची माहिती त्यांना दिली आहे. याबाबत त्यांनी निदर्शनास आणून न दिल्यामुळे व ७ महिन्यानंतर त्यांनी मागणी केल्यामुळे तसे कळविले आहे.**

**४. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. मंडळ अधिकारी यांचेकडून आलेली यादी जर उपलब्ध करुन दिली असती तर त्यातून निश्चित माहिती मिळू शकली असती. त्याकरीता या संबंधातील सर्व कागदपत्रे प्रमाणित करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी समक्ष म्हणणे् सादर केले. त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २.९.२००९ च्या अर्जात मागितलेल्या दोन मुद्यांप्रमाणे कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रमाणित करुन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक २.९.२००९ च्या अर्जात मागितलेल्या माहितीप्रमाणे मुद्येनिहाय कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन न दिल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) नुसार रुपये २,०००/- (रुपये दोन हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली संबंधीतांचे दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासीकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३३४/नाग/२०१०

१)श्री जहीरहुसेन रजबअली अजाणी,
नगर परिषद वरोराचे समोर, द्वारा शब्बीर ऑईल एजंसी, वरोरा
ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स.व सु.विभाग)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.वरोरा,
ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(का)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,वरोरा
ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, मे.शब्बीर ऑईल एजन्सी सोबत झालेल्या व्यवहारासंबंधाने कोर्ट कामासाठी खालीलप्रमाणे माहिती. मार्च १९९५ ते ३० जून, १९९५ पावेतो. सदरचे अर्जासोबत यादीमध्ये नमूद केल्याप्रमाणे मे.शब्बीर ऑईल एजन्सी कडून वरील कालावधीत डिझ ेल, पेट्रोल, ऑईल खरेदी करण्यासाठी देण्यात आलेल्या इंडेन वरील अधिकारी यांच्या सहया असलेल्या अधिका-यांचे नांव, गाडी, ड्रायव्हरचे नांव, कोणत्या वाहनामध्ये किती डिझेल, पेट्रोल, ऑईल भरण्यांत आले त्याचे स्पष्ट विवरण, गाडीचे लॉगबुकातील संपूर्ण लेखी सविस्तर माहिती, बिलाच्या रक्कमा चेकद्वारे दिल्या असल्यास चेक नंबर, तारीख, रकमा, बँकेचे नांव इ. व तसेच नगदी दिली असल्यास कोणत्या तारखेला किती रक्कम दिली, त्याची रक्कम व तारीख व रक्कम स्विकारणा-याचे नांव, त्याची पावती इत्यादि संपूर्ण सविस्तर लेखी माहिती. सोबत इंडेन नंबर १३२ व तारीख १६.३.१९९५ पासून ५.६.१९९५ या कालावधीतील दिलेले आहे. माहिती व्यक्तीशः पुरविण्यात यावी, असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.२.२०१० रोजीच देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे निर्णय कायम करण्यात आला आहे. परंतु समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी १९९५ ते ३० जून, १९९५ पर्यंतची इंडेनची माहिती मागितली होती. व जन माहिती अधिकारी यांनी ज्या कालावधीची घेटना सांगितली आहे ती १९९३-९४ या कालावधीतील आहे. असे असेल तर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरच्या प्रकरणामध्ये जप्ती दिनांक**

**१८.८.१९९७ ला झाली असल्यामुळे संपूर्ण कागदपत्रे जप्त होऊन न्यायालयात गेलेले आहे. व अपीलकर्ता सुध्दा त्याच प्रकरणात आरोपी आहे. त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असा त्यांनी त्यांचे वकीलाचा सल्ला घेवून निर्णय घेतला आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, न्यायालयात जी केस आहे त्या केसच्या संदर्भात माहिती मागितली नाही. परंतु ही बाब प्रथम अपीलात स्पष्ट करता आली असती. परंतु सुनावणी घेण्यात आली नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून अपीलकर्ता यांचे अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती व न्यायालयीन प्रकरणात असलेली कागदपत्रे यांची शहानिषा करुन अपीलकर्ता यांना माहिती देता येईल किंवा नाही याबाबतचा स्पष्ट निर्णय देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रकरण परत पाठविण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे प्रत्यक्ष उपस्थितीत तसेच संपूर्ण अभिलेखे समोर घेवून व कागदपत्रांची शहानिषा करुन अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. १८/२०१०

१) श्री नंलाल श्रावण करंबे,
रा.चांदली, ता.ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. — तक्रारकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. — गैरतक्रारदार

३)जन माहिती अधिकारी तथा तलाठी सा.क्रं.३, कालेता
ता.ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. — गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक ४.५.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**तक्रारकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००९ रोजी अपील क्रमांक ७५३/२००९ मधील दिनांक १.१०.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक ४.५.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात दिनांक २५.१.२०१० रोजी खुलासा मागविण्यात आला होता. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी आयोगापुढे सांगितले की, मौजा चांदली गांव १९७६ मध्ये खेडमाळा साज्यात समाविष्ठ होते. तलाठी साजा क्रमांक ३ कलेता या साज्यातील संपूर्ण रेकार्डची तपासणी केली असता तेथे मौजा चांदली येथील ग.ण्.८७ दिनांक ३०.३.१९७६ ची फेर फार पंजी तलाठी दप्तर मध्ये उपलब्ध नसल्यामुळे १९७६ ची नक्कल देता येत नाही. सन १९८२ ला हलकाबंदी झाल्यामुळे मौजा चांदली हे गांव त.सा.क्रं.३ कलेता येथे समाविष्ट झाले. यापुर्वी चांदली हे गांव खेडहलक्यामध्ये समाविष्ट होते. हलकाबंदी होण्यापुर्वी तलाठी खेड यांनी आपला जूना रेकार्ड तालुक्यात किंवा जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालयातील रेकॉर्डरुमला जमा केलेला असावा. आपण सन १९७६ चा रेकॅार्ड मागीत असल्यामुळे तलाठी प्रत्येक ५ वर्षानी रेकॅार्ड रुमला किंवा तालुक्यात जमा करीता असेल या कारणामुळे आपण तालुक्यात किंवा चंद्रपूर येथील रेकॅार्ड रुमला १९७६ ची फेरफार पंजीची मागणी करावी. तरी मौजा चांदली येथील ग.ण.७८ दिनांक ३०.३.१९७६ ची फेरफार पंजी**

**( पान २ वर..)**

**तलाठी दप्तर मध्ये उपलब्ध नसल्यामुळे आपणाला पंजीची नक्कल देता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. आयोगाचे आदेशाप्रमाणे सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात चौकशी केली. तसेच अभिलेखागारात सुध्दा चौकशी केली. परंतु त्यात फेरफार पंजी आढळून आली नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. दिनांक २२.१.२०१० ला जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना शोध घेण्यास कळविण्यात आले होते. स्वतः जावून आलो परंतु त्या ठिकाणी सुध्दा माहिती उपलब्ध नाही. असे असल्यास तक्रारदार यांना त्याप्रमाणे लेखी देणे संयुक्तिक राहील. तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)	तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.**

**२)	तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३३२/नाग/२०१०

१)श्री विक्रम मारोती जांगळे,
मु.पो.हरदोली, ता.लाखांदूर जिल्हा भंडारा. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, गट-अ,
जिल्हा परिषद, भंडारा, ता.जि.भंडारा. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
सर्वोदय विद्यालय, हरदोली, ता.लाखांदूर, जि. भंडारा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. माहिती अधिकारी गैरहजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे, सन २००४-०५ मध्ये शिकत असलेला मुलींची शिष्यवृत्ती वाटप केली नाही त्यामुळे सर्व मुली लाभापासून वंचित राहिल्या. वर्ग ८ ते १० च्या कां वाटप केले नाही याची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ८.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २०.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कार्यालयात संपूर्ण चौकशी झाली असून चौकशी पूर्ण झाल्यानंतर आपणास माहिती कळविण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे व त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नसल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये त्यांचेवर रुपये १,०००/- (रुपये एक हजार फक्त)ची शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नियंत्रक अधिकारी म्हणून शोध घेउन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३.१०.२००८ च्या अर्जातील मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाची दखल घेतलेली नसल्यामुळे व आयोगापुढे हजर झालेले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली संबंधीतांचे दर महिन्याचे वेतनातून वसूल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी. सदरच्या शास्तीची वसुलीची कार्यवाही ही समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद भंडारा यांनी करावयाची आहे.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३३०/नाग/२०१०

१)श्री घनशाम विठोबाजी गौरकर,
गौरकर निवास, माकडे नगर, तुमसर-४४१९१२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, भंडारा. ता.जि. भंडारा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
लोकमान्य टिळक राष्ट्रीय विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, तुमसर
ता.तुमसर, जिल्हा भंडारा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, लोकमान्य टिळक राष्ट्रीय विद्यालय, तुमसर यांचेकडेसन २००९ या कालावधीतील कनिष्ठ महाविद्यालयात ११ व्या वर्गात प्रवेशाकरीता शुल्क आकारले त्यासंबंधी व परीक्षे संबंधी एकुण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. मुद्या क्रमांक ७ ची माहिती निरंक दाखविण्यात आलेली आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३०.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.२.२०१० रोजी देण्यात आला असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागितलेली माहिती न पुरविल्यामुळे आपल्या माहे मार्च पेड इन एप्रिल, २०१० चे वेतन पुढील आदेशापर्यंत थांबविण्यात येत आहे, असे तत्कालीन मुख्याध्यापक श्री पडोळे यांचे विरुध्द आदेश देण्यात आले आहे. तरी सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्यात आले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना एकाच मुद्याची माहिती मिळाली. इतर मुद्यांची माहिती मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा विद्यमान प्राचार्य यांनी सांगितले की, तत्कालीन मुख्याध्यापक यांना निलंबित करण्यात आलेले असून त्यांनी प्रभार दिलीा नाही व प्रभार दिलेला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, तत्कालीन मुख्याध्यापक श्री पडोळे यांचे**

**( पान २ वर..)**



**माहिती न दिल्यामुळे वेतन रोखले आहे. व त्यामुळे जो पर्यंत ते प्रभार देत नाही तो पर्यंत वेतन रोखणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून विद्यमान प्राचार्य यांनी श्री पडोळे, मुख्याध्यापक यांचेकडून प्रभार मिळाल्यावर अपीलकर्ता यांना मागितलेली संपूर्ण माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ६३/०१०

१) श्री डॉ. मो.नजीर रशीदी,
विशेष कार्यकारी अधिकारी वारिसपुरा, कामठी
मु.पो.ता.कामठी, जिल्हा नागपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २१.३.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी दिनांक ६.१.२००९ रोजी अपील क्रमांक ६८२/२००९ मध्ये दिनांक २९.९.२००९ रोजी दिलेल्या निर्णयामधील आदेश क्रमांक १ प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक ४.५.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात दिनांक ९.३.२०१० रोजी खुलासा मागविण्यात आला होता. त्याप्रमाणे नस्ती उपलब्ध नाही असे कळविण्यात आले होते. परंतु आता नस्ती उपलब्ध आहे असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, ते जी माहिती देण्यास तयार आहे ती खोटी आहे. परंतु जशी माहिती उपलब्ध आहे तशी उपलब्ध होईल. उपलब्ध असलेली माहिती प्रमाणित करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी आज ४.०० वाजता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित होऊन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३४३/नाग/२०१०

१)श्री नानाजी जैदास रामटेके,
रा. जानवा, पो.इटखेडा, ता.अर्जुनी/मोर, जि. गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
लघु पाटबंधारे जि.प.उपविभाग, अर्जुनी/मोर,
ता.अर्जुनी/मोर, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत कार्यालय जानवा,
ता.अर्जुनी/मोर, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, जानवा यांचेकडे, ग्राम पंचायत कार्यालय, जानवा येथील मा.मा.तलावाच्या पाळीवरील धुनाघाट बांधकामाकरीता त्या जागेतील काटेबाबरीचे तोडलेली झाडे (संख्या ७) वृक्षांची विल्हेवाट केल्याविषयी माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक २५.९.२००९ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी वस्तुस्थिती कळवून माहिती ही ग्राम पंचायत कार्यालयाकडून घ्यावी असे कळविले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, माहिती ग्राम पंचायत कार्यालयाकडे उपलब्ध असून ती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध नाही. व ही बाब त्यांनी पुर्वी सुध्दा कळविली आहे. असे असल्यास अपीलकर्ता यांनी संबंधीत कालावधीतील ग्राम पंचायतीचे अभिलेखे, कार्यवृत्त कार्यालयात**

**( पान २ वर..)**

**उपस्थित होऊन तपासून त्यात माहिती असल्यास ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत शासकिय कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेले कार्यवृत्त तपासणी करुन त्यात माहिती असल्याची खात्री करुन घ्यावी. माहिती उपलब्ध असल्यास ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य घ्यावी.**

**२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर त्यांना अभिलेखे व ग्राम पंचायत कार्यवृत्त वही अवलोकनाकरीता उपलब्ध करुन द्यावी. व त्यातून माहिती उपलब्ध असल्यास विना मुल्य छायांकित प्रतीचे स्वरुपात घ्यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३६१/नाग/२०१०

१)श्री मनोहर धकाते
अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर, ता.जि.चंद्रपूर-४४२४०२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक,
चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र,चंद्रपूर,
उर्जा नगर, चंद्रपूर-४४२४०४. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता(प्रशासन)
चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर.
उर्जा नगर, चंद्रपूर-४४२४०४. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२०१० रोजी राज्य माहिति आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता(नि) प्रशासन यांचेकडे, अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांची जातीचे वैधता प्रमाणपत्र, जातीचा दाखला, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र व सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत इ.च्या प्रती एकुण ९ कर्मचा-यांची नांवे देवून मागितलेल्या दिसून येतात. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु श्री मनोहर पंजाबराव मसराम यांच्याबाबत तसेच इतरांच्या बाबत मागितलेली कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव दिनांक ११.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.२.२०१० रोजी देण्यात आला असून मागितलेली सर्व दस्तऐवज पुरविण्यात आली आहे. समाधान होत नसल्यास आपण स्वत: कर्मचा-यांची सेवा पुस्तके व उपलब्ध कागदपत्रे कार्यालयीन वेळेत आपणास प्रत्यक्ष पाहता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली आहे. व उपलब्ध करुन दिली ती माहिती अपूरी आहे. त्याकरीता त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्या प्रथम अपीलासोबत ती बाब नमूद केली होती. परतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाचे वाचन न करता किंवा सुनावणी न घेता माहिति उपलब्ध करुन दिली या कारणास्तव अपील खारीज केले. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय**

**( पान २ वर..)**

**अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मागितलेली सर्व माहिती मिळाली नाही. व ते प्रथम अपीलात सुध्दा नमुद केले होते. उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पत्र हे मोघम आहे, त्यामुळे अपूर्ण माहित उपलब्ध करुन दिली या अपीलकर्त्यांच्या म्हणण्यात तथ्य दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.१२.२००९ च्या अर्जात मागितलेली माहिती संपूर्ण कागदपत्रांच्या सहित छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.१२.२००९ च्या अर्जातील संपूर्ण माहिती कागदपत्रासहित छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य किंवा प्रत्यक्ष उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील यांची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३४५/नाग/२०१०

१)श्री सुरेश शालीकराम दुरुगकर,
चंद्रशेखर वार्ड, श्रीनगर, बब्बाभवनच्या जवळ, गोंदिया,
पो.ता.जि.गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१,
नागपूर विभाग, नागपूर, सदर नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१
नागपूर विभाग, नागपूर, सदर नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत**

**२. अपील क्रमांक ३४५/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, विभागीय समाज कल्याण, नागपूर यांचेकडे श्री नर्मदा प्रसाद बद्रप्रसाद यादव यांनी जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करीता दिलेल्या सर्व कागदपत्रांची सष्ट छायांकित प्रमाणित केलेली प्रत तसेच शाळेचे टी.सी. तसेच दिनांक १७.१२.१९९९ रोजी आपल्या कार्यालयामधून पडताळणी करणारे अधिकारी यांचे नांव, हुद्दा इ. माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.१.२००९ नुसार श्री नर्मदा प्रसाद बद्रीप्रसाद यादव यांचे जात वैधता प्रमाणपत्राची छायांकित प्रत या कार्यालयास सादर करावी जेणेकरुन आपण मागितलेल्या माहितीचा शोध घेवून माहिती देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. परंतु दिनांक ५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांनी आवश्यक असलेली माहिती व सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन करण्यात आले. तसेच जन माहिती अधिकारी यांचा खुलावा व त्यांच्याकडे माहिती सादर करण्याच्या अनुषंगाने अपूर्ण माहितीचा विचार करता खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येतो. सुनावणीचे वेळी जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर केलेल्या पुराव्याचे अनुषंगाने मागितलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम क्रं. ११ नुसार कार्यवाही करावी. तसेच याबाबतची माहिती/निर्णय अपीलकर्त्यांस कळविण्यात यावा, असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन**

**( पान २ वर..)**

**दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही कागदपत्रात दाखल न करता फक्त शपथ पत्रावर देण्यात आलेले आहे. व म्हणून त्यांनी ही माहिती मागितली आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस प्रमाणपत्राची प्रत सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात आली होती. परंतु त्यानंतरही माहिती देण्यात आली नाही. तसे प्रथम अपीलाच्या निर्णयात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, प्रमाणपत्र दाखविले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी दिले नाही. ही बाब संयुक्तिक वाटत नाही. कारण प्रथम अपीलाच्य सुनावणीस जन माहिती अधिकारी हे सुध्दा हजर होते. त्याच वेळेस प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे ही बाब स्पष्ट झाल्यावर अपीलकर्ता यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य होते. परंतु ती घेतलेली दिसून येत नाही. व आता अपीलकर्ता यांनी दिली नाही असे ते म्हणत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, समिती ही २००१ पासून अस्तित्वात आली. मागितलेली माहिती १९९९ ची आहे व त्यावेळेस जात पडताळणी ही एक वेगवेगळया कार्यालयामध्ये शाखा होती. व त्यावेळचे कागदपत्र समितीकडे उपलब्ध असेलच असे नाही. परंतु तसे जर असेल तर अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये दिनांक १७.१२.१९९९ ही तारीख प्रमाणपत्राची दिली असल्यामुळे त्या दिवशीचे अभिलेखे शोधून काढून त्यातून माहिती उपलब्ध करुन देणे ही बाबत अशक्य आहे असे वाटते. परंतु तपास करावयाचा नाही व माहिती द्यावयाची नाही या मानसिकतेमुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असेल तर अपीलकर्ता यांनी त्यांचेकडे असलेल्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत सर्व तपशिलाकरीता जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व ती उपलब्ध करुन दिल्यावर प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रमाणपत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन द्यावी. तसेच दिनांक १७.१२.२००९ या तारखेच्या संदर्भातील अभिलेख्याचा शोध घेवून त्यादिवशी प्रमाणपत्र वितरीत केले आहे किंवा नाही याबाबतची माहिती शोध घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३४६/नाग/२०१०
अपील क्रं. ३४७/नाग/२०१०

१)श्री सुरेश शालीकराम दुरुगकर,
चंद्रशेखर वार्ड, श्रीनगर, बब्बाभवनच्या जवळ, गोंदिया,
पो.ता.जि.गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गोंदिया. जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
तहसिल कार्यालय, गोंदिया. ता.जि. गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत**

**२. अपील क्रमांक ३४६/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी एपीएल, बीपीएल, अंत्योदय, शुभ्र कार्ड शहरी व ग्रामीण राशन दुकानदार वाईज शिधापत्रिका नवीन व दुहेरी, खरेदी विक्री निरीक्षक वैकुंठीने आपले सहीने किती ग्राहकाला राशन कार्ड देण्यात आले, त्याची ओ.सी.रेकार्ड दाखविण्यात यावे. आवश्यकता पडल्यावर छायांकित प्रमाणित प्रती घेण्यात येतील. तहसिलदार ने पिंडकेपार स्वस्त धानय दु.क्रं.३४ यांची चावडी वाचन, दवंडी व चौकशीसाठी आपल्या कर्मचारीला व ग्रामपंचायत पिंडकेपारला पत्र दिले असतील तर त्याची छायाप्रत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.१२.२००९ ला पत्र देण्यात आले व श्री पटले, क.लि. हे रजेवर होते. म्हणून त्यांना दिनांक १८.१२.२००९ ला पत्र देण्यात आले. त्यांचेकडून आज पर्यंत माहिती मिळालेली नाही. माहिती मिळताच देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविले असून श्री रंगारी, अ.का.यांना प्रतिलीपी दिलेली दिसून येते. परंतु त्यानंतरही दिनांक २९.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना मुद्या क्रं. १ ची माहिती अद्याप उपलब्ध झाली नाही, उपलब्ध झाल्यावर देण्यात येईल. मुद्या क्रमांक २ ची माहिती श्री रंगारी यांचेकडून प्राप्त झ ाली असून या पत्रासोबत छायांकित प्रत देण्यात येत आहे. मुद्या क्रमांक ३ ची माहिती देण्यात यावी म्हणून श्री रंगारी यांना पत्र देण्यात आले आहे. व माहिती प्राप्त होताच उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून**

**( पान २ वर..)**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १०.२.२०१० रोजी निर्णय दिला असून, अपीलार्थी यांनी मागणी केलेली मुद्या क्रमांक १ व ३ ची माहिती उपलब्ध असल्यास पुरविण्यात यावी किंवा माहिती उपलब्ध नसल्यास तसे कळवावे. प्रश्नार्थक किंवा अभिप्रायात्मक उत्तरे देण्याबाबत केंद्रिय माहितीच्या अधिकाराखाली कोणतीही तरतुद नाही. अपील अंशतः मंजूर केलेले दिसून येते. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, श्री रंगारी, अ.का. व श्री पटले, क.लि. यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी याकरीता पत्र दिलेले आहे. परंतु त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. यावरुन माहिती उपलब्ध करुन न देण्यास श्री रंगारी, अ.का. व श्री पटले, क.लि. जबाबदार दिसून येतात. जन माहिती अधिकारी यांचेकडे सर्व माहिती उपलब्ध असतेच असे नाही. व त्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे इतर कर्मचारी/अधिकारी यांचे सहाय्य घेणे आवश्यक असते. व असे सहाय्य घेतले असल्यास असे अधिकारी/कर्मचारी अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यास किंवा प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही माहिती उपलब्ध झालेली नसल्यास जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. व या प्रकरणामध्ये श्री रंगारी, अ.का. व श्री पटले, क.लि. यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.१२.२००९ व १८.१२.२००९ ला पत्रे दिलेली असल्यामुळे व त्यांनी आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांना माहिती अधिकारी समजण्यात ययेते व ते अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ३४७/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, केरोसिन हाकर्स/रिटलर्स फेडरेशन, महाराष्ट्र राज्य बाबुरावजी मेश्राम (राज्य अध्यक्ष) रजिस्टर नं.एन.जी.पी. ५०४६ यांनी दिलेले पत्र व शासनाने दिलेले संस्था प्रमाणपत्राची छायांकित प्रत. (२) APL, BPL अंत्योदय शिधापत्रिका रद्य करण्याचे शासन. (३) गोंदिया शहरचे स्वस्त धान्य, राशन दुकान शासनाचे दिलेले स्थळ व्यक्तीचे नांव व वर्तमान मध्ये चालवत असलेले स्थळ व्यक्तीचे नांव व त्यांचे जाहिरनाम्याची प्रत (४) केरोसिन हॅाकर परवाना क्रं.१२५/४१८३ याची जाहिरनाम्याची प्रत, अशी माहिती मागितलेली दिसून येते.
अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.१२.२००९ रोजी मुद्या क्रं. १, २, ३, व ४ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे दिनांक २२.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.१.२०१० रोजी देण्यात आला असून, अपीलार्थीस अपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली. माहिती अधिकारी यांचेकडे माहिती असल्यास संपूर्ण माहिती पुरविण्याची व्यवस्था करावी किंवा तसे मुद्येनिहाय कळवावे. प्रश्नार्थक, अभिप्रायात्मक खुलासा सादर करण्याची तरतूद नाही. परंतु माहिती

( पान ३ वर..)

**उपलब्ध झाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.**

**३.     अपीलकर्ता यांनी सांगितले की, अपूर्ण माहिती दिली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे कार्यालयामध्ये जाहिरनाम्याची प्रत उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)     अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३४६/२०१० हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत श्री रंगारी, अ.का. व श्री पटले, क.लि. यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून ती विनामुल्य पुरवावी.**

**२)     श्री रंगारी, अ.का. व श्री पटले, क.लि. यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्याकरीता त्यांना दिनांक ११.१२.२००९ व दिनांक १८.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पत्र दिले होते. परंतु माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये प्रत्येकी रुपये २,०००/-ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".**या लेखाशिर्षात जमा करावी.**

**३)     अपील क्रमांक ३४७/२०१० अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा शोध घेवून ती उपलब्ध झाल्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**४)     अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३५७/नाग/२०१०

१)श्री सुरेश यशवंत भौतकर,
उपकार्यकारी अभियंता (म.रा.वि.वि.कं.मर्या.),
४३, जेतवन सोसायटी,खामला, नागपूर-४४००२५. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(भांडार)
प्रमुख भांडार क, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या,
प्रकाशभवन, गड्डीमोदाम, नागपूर-४४०००१. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(भांडार)
प्रमुख भांडार क, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या,
प्रकाशभवन, गड्डीमोदाम, नागपूर-४४०००१. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, दिनांक २.७.२००९ ते दिनांक ३०.७.२००९ व दिनांक १२.११.२००९ ते दिनांक ३०.११.२००९ या कालावधीतील आवक टपालाच्या नोंदी रिसिप्ट रजिस्टरमध्ये ज्या पृष्ठ क्रमांकावर घेतलेल्या आहेत त्या पृष्ठांच्या छायांकित व कार्यकारी अभियंता (भांडार) द्वारा साक्षांकित केलेल्या प्रती देण्यात याव्या. तसेच व्यवस्थापक (पीए सेल) प्रकाशगड मुंबईचे पत्र क्रं. जीएडी/पीएसेल/२००७-०८/१३८६ दिनांक २.७.२००९ आपले कार्यालयास प्राप्त झाले आहे काय, असल्याची त्याची प्रत देण्यात यावी, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते.**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ९.२.२०१० रोजी निर्णय दिला असून त्यात फेरफार करुन अपूर्ण व चुकीची माहिती पुरविली हे म्हणणे संयुक्तिक व वस्तुस्थितीला धरुन नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना दिलेली माहिती ही अपूर्ण व चुकीची व खाडाखोड करुन दिलेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना जी माहिती दिलेली आहे ती जशी आहे तशीच**

**( पान २ वर..)**

**दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी जो युक्तीवाद केला आहे तो त्याच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात केला आहे. व प्रत्येक अर्जाच्या वेळेस किंवा पत्रव्यवहाराच्या वेळेस त्यांनी त्रुटया काढून कारण सांगितले. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती जशी आहे तशी उपलब्ध होते. माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३५४/नाग/२०१०

१)श्री दिलीप शामराव कापकर,
मु.पो.चंदनखेडा, ता.भद्रावती, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक,
आरोग्य सेवा हिवताप/हत्ती रोग नागपूर,
माता कचेरी, दिक्षा भूमीचे समोर, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी,
हिवताप कार्यालय, रामनगर, बोखारे प्लॉट चंद्रपूर,
ता.जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपले आस्थापनेवर १९९० पासून तर २००५ पर्यंत वर्ग ३ व वर्ग ४ ची रिक्त पदे हंगामी फवारणी कर्मचा-यांमधून भरण्यात आली आहे. त्यांची संपूर्ण तपशिलवार व फवारणीचे कामात लागल्याचा दिनांक व नियुक्तीचा दिनांक टाकून संपूर्ण यादी मिळण्यात यावी. (२) १९९० पासून हंगामी फवारणी कर्मचा-यांच्या ऐवजी लागलेल्या दरवर्षीची त्यांचे ऐवजी लागले त्यांचे नांव व त्यांची नाते व जात अशाप्रकारे ऐवजी कर्मचा-यांची यादी मिळण्यात यावी,अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने माहिती १९ वर्षापुर्वीची असल्यामुळे व एकत्रित नसल्यामुळे ती संकलीत करण्याकरीता थोडा कालावधी लागणार आहे असे दिनांक ७.१२.२००९ रोजी कळविण्यात आले होते. त्यानंतर दिनांक २४.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.२.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती तीनही कार्यालयाकडून संकलीत करुन उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी**

**( पान २ वर..)**

**सांगितले की, त्यांना स्वत: कार्यालयात बोलावून त्यांचेकडून जशी माहिती पाहिजे तशी संकलीत करुन देण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३५९/नाग/२०१०

१)श्री आनंद मधुकरराव मेश्राम,
प्लॉट नं.८९, बावला नगर, वार्ड नं.२, नविन वसाहत,
बुटीबोरी, नागपूर-४४११०८. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
सरस्वती किसान विद्यालय, रेल्वे स्टेशन रोड, बुटीबोरी, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, सावित्रिबाई फुले शिष्यवृत्ती योजना आपल्या शाळेत केव्हा पासून लागू करण्यात आली व आतापर्यंत आपल्या शाळेमार्फत किती मुलींना त्याचा फायदा देण्यात आला याबाबतची एकुण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः देण्यात यावी असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. त्यानंतर दिनांक ३.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना रुपये १००/- खर्चाचा भरणा करावा व माहिती मिळेल असे पत्र दिलेले दिसून येते. व त्याबरोबर अपीलकर्ता यांना माहितीची यादी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना ३० दिवसांचे आंत माहिती दिली नाही. परंतु व्यक्तीशः माहिती घेणार असे नमुद केले व माहिती घेण्यास आले नाही असे जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. आर.एस. अखान यांनी युक्तीवाद करताना सांगितले. अपीलकर्ता हे केव्हाही जन माहिती अधिकारी यांना भेटले नाही व त्यांनी माहिती मागितली नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही किंवा पत्र देता आले नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते त्यांच्या कार्यालयात बाबुला भेटले होते. परंतु त्यांनी माहिती सांगितली नाही. परंतु बाबुंनी त्यांना काय सांगितले त्याकरता जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरता येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांना निरोप पाठविला नाही ते, माहिती घेण्यास आले नाही, असे सांगितले. यावरुन दोनही पक्षकार हे तोंडी सांगत आहे. लेखी**

**( पान २ वर..)**

**दिले नाही. परंतु व्यक्तीशः माहिती मागितल्यावर अपीलकर्ता यांनी कमीत कमी ३० व्या दिवशी तरी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होऊन माहिती घ्यावयाची असते किंवा माहिती न दिल्यास आक्षेप घेणारे पत्र देणे आवश्यकत असते. व तसे ते दिलेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांना इतर माहिती ही त्यांनी खर्चाचा भरणा केल्यावर उपलब्ध करुन देता येईल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती शाळेच्या रजिस्टर वरुन उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यात चुक असेल तर ती तपासून पुन्हा देता येईल. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होऊन खर्चाचा भरणा करुन उर्वरित माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तसेच जी माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्याबाबत तपासणी करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून व त्यांचेकडे उपस्थित व्हावे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यावर माहितीचे एकुण पृष्ठे व त्याप्रमाणे खर्च अपीलकर्ता यांना कळवावा व खर्चाचा भरणा केल्यावर माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे, त्या संदर्भातील सर्व तपशिल अपीलकर्ता यांना निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावा.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३६३/नाग/२०१०

१)श्री शालीग्राम उध्दवराव ढोरे,
नागभूमी ले आऊट, पूर्व छत्रपतीनगर, वर्धा रोड, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर, सदर नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (मुख्यालय)
नागपूर सुध्दार प्रन्यास, नागपूर, सदर नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता (का), नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर यांचे कार्यालयात अजनी स्ट्रीट स्किम संदर्भात एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.२.२०१० रोजी अपेक्षिलेल्या नेमक्या माहितीचा अर्थबोध होत नाही. तसेच या योजनेअंतर्गत भूअर्जन केलेल्या सर्वे नंबर प्रमाणे लेआऊटची यादी उपलब्ध नाही. अपेक्षित माहितीचा खसरा क्रमांक व मौजा याची माहिती पुरविल्यास अभिलेखाची पडताळणी करुन माहिती उपलब्ध असल्यास पुरविता येईल. तसेच, न्यायालयीन प्रकरण क्रमांक पुरविल्यास आपणास अपेक्षित असलेली माहिती पुरविता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.३.२०१० रोजी देण्यात आला असून त्यात, मागितलेली माहिती व्यापक स्वरुपाची असून ती संकलीत स्वरुपात उपलब्ध नसल्यामुळे अपीलार्थीने अपेक्षित माहितीचा खसरा क्रमांक व मौजा याची माहिती पुरविल्यास अभिलेख्याची पडताळणी करुन उपलब्ध असल्यास माहिती यांनी ती विनामुल्य अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याकरीता युक्तीवाद करताना त्यांना संपूर्ण अजनी स्ट्रिट स्किमची माहिती लेआऊट सहित पाहिज आहे असे दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, भूअर्जन केलेला खसरा नंबर मिळू शकतील परंतु त्यातील सर्व लेआऊटची माहिती मिळू शकणार नाही. त्या संपूर्ण परिसरात आरक्षण कोणते आहे, त्याबाबत संपूर्ण नकाशा मिळू शकेले परंतु त्याबाबतची संपूर्ण माहिती तपशिलात मिळू शकणार नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात**

**( पान २ वर..)**

**उपस्थित होऊन, निरीक्षण करुन त्यांना जी माहिती आवश्यक असेल त्याबाबतची मागदपत्रे छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून, उपस्थित राहून संबंधीत अजनी स्ट्रिट स्किमच्या संदर्भातील अभिलेखे किंवा कागदपत्रे किंवा नोंदवही इ. तपासणी करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३५५/नाग/२०१०

१)श्री रमेश बुधा चौधरी,
मु.पो.गोरेगांव (ग्रेन मार्केट समोर गोरेगांव)
ता. गोरेगांव, जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोरंगावं, ता. गोरेगांव, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्राम पंचायत कार्यालय, घोटी, ता. गोरेगांव, जि. गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत, घोटी यांचेकडे, माझे अर्ज न.भू.क्रं.६३७ क्षेत्र ३३५.०० वर्ग-अ दिले होते. त्याबाबत काय झाले त्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने त्यांना दिनांक ५.२.२०१० रोजी ग्राम विकास अधिकारी यांनी, सदरच्या माहिती करीता रुपये ४०/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे रक्कमेचा भरणा केलेला दिसून येतो व त्यानंतर दिनांक १२.२.२०१० रोजी खालीलप्रमाणे कळविलेले दिसून येते.**

**"वरील संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहिती अधिकारा खाली मागणी केली असता आपले पत्र दिनांक १९.६.२००९ सभेत ठेवले असता उपस्थित सदस्यांनी पेंडींग ठेवण्यात यावे असे मत दर्शविले. पुन्हा दिनांक २९.९.२००९ ला सभेत ठेवले. ठराव क्रं. ९ नुसार उपस्थित सदस्यांनी सदर अर्जासोबत सादर केलेले इतारत जागासाठी नमूदना पत्र नोंदणी क्रं. ६३५ चे आहे व त्याचा सोबत जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख नगर भूमापन अधिकारी क्रं. १, भू.क्रं. ६३७ क्षेत्र ३३५.०० चौ. मिटर तसेच दूसरे ३३५.०० चौ.मिटार वहिवाट क्षेत्र ३१९ चौ.मिटर नोंद आहे. सदर सभेत यावर चर्चा करण्यात आली की १६ चौ.मिटर जागा ६३८ च्या धारकाकडे आहे असे दर्शविले. करीता ३१९ चौ.मिटर जागा अर्जदारास मोजणीचे वेळी दाखविली व वहीवाटी प्रमाणे आहे. मुंबई ग्राम पंचायत अधिनियम शासन आदेश व्हिीजीएम २६९९/प्रक्र/८८५/२२ दिनांक १२.१२.२००१ नुसार नोंदणी चौरस फुटात नोंद घेण्यात यावी असे आदेश आहे. आपण सादर केलेले भूमी अभिलेख मध्ये लांबी रुंदी चौरस फुट मध्ये नाही. करीता नोंद घेण्याचे ठराव नामंजूर करण्यात आले. करीता या बाबत आपणास या पत्र क्रं. १२०/ दिनांक ३०.९.२००९ व पत्र क्रं. १२८ दिनांक १२.११.२००९ ला दोन पत्र सादर करण्यात आले. तरी पण आपण ग्राम**

**( पान २ वर..)**

**पंचायतला माहिती पुरविली नाही व उलट अर्जा बाबत काय झाले माहिती अधिकाराखाली माहिती मागणी केली त्या बाबत माहिती सादर करण्यात येत आहे." सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी त्यांचे प्लॅाट त्यांचे नांवावर चढवून घेण्याकरीता अर्ज दिला होता. परंतु, सदरचा प्लॅाट हा चौरम मिटर मध्ये असून लांबी रुंदी नसल्यामुळे ग्राम पंचायतीच्या बैठकीत अर्ज नामंजूर करण्यात आला. भूमी अभिलेख कार्यालयाकडून चौरस फुटामध्ये लिहून मिळत नाही. व त्यामुळे त्यांचे नांव चढविले नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांनी जर तसा अर्ज दिलेला असेल तर दूस-या इसमानी तो प्लॅाट त्यांना विकला आहे असे निमुद केले आहे. त्यामुळे ग्राम पंचायत ठराव केल्यानंतर योग्य ती कार्यवाही करता येईल व तसे त्यांना कळविले आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारात अपीलकर्ता यांनी माहिती मागितली आहे. परंतु त्याबाबत कोणत्याही कार्यवाहीचा आदेश आयोगास देता येणार नाही. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४००/नाग/२०१०

१)श्री कमल नारायणदास सारडा,
प्लॅट नं.ई-१, ५ वा माळा, आग्नेय अपार्टमेन्ट, धंतोली
जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक-३, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
कोतवाली विभाग, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, गणेशपेठ पोलीस स्टेशन, नागपूर यांचेकडे, दिनांक २१.१०.२००८ व २०.१०.२००८ रोजी पोलीसासंनी केस नं. ७४८/०८ कमल विरुध्द सरकार या केसमध्ये दाखल केलेल्या पोलीस रिपोर्टची प्रत, अशी माहिती मागितली असून सदरची माहिती व्यक्तीशः तर्फे अॅड. अजय ढाढे यांचे मार्फत घेणार असे नमूद केले आहे.**

**३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ११.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ८.४.२०१० रोजी, अपीलकर्ता अर्जदार यांनी केस नंबर ७४८/२००८ मध्ये पोलीस निरीक्षक गणेशपेठ यांनी न्यायालयात दाखल केलेल्या पत्राची नक्कल प्रत मिळण्याबाबत अपील केली असून सदर केसचे संबंधात पोलिस निरीक्षक, गणेशपेठ यांचेकडे दाखल एम केस नं.M२/०८, M३/०८, M५/०९, M६/०९, M८/०९,M९/०९ च्या केस मध्ये अजूनही चौकशी सुरु असतांना**

**( पान २ वर..)**

आपण मागितलेली माहिती माहितीचे अधिकार २००५ कलम ८ पोट कलम १(ज) नुसार पुरविता येणार नाही. सदर माहिती प्राप्त करावयाची असल्यास मा.सत्र न्यायाधिश नागपूर यांचे न्यायालयातून प्राप्त करुन घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. अनमोल गुप्ता यांनी युक्तीवाद केला. युक्तीवाद करताना त्यांनी असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती आतापर्यंत त्यांना उपलब्ध करुन दिली नाही. व दिनांक ८.४.२०१० रोजी जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये ती माहिती उपलब्ध करुन देता येणान नाही. कारण चौकशी सुरु आहे असे त्यांना कळविले आहे. परंतु त्यांनी जी माहिती एम.केस २१०८ यामध्ये मागितली आहे ती M२ आहे. व त्या संदर्भातील आरोप पत्र दिनांक २९.४.२००८ रोजी दाखल करण्यात आलेले आहे. आरोप पत्र दाखल झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची चौकशी ही होत नसते व त्यामुळे चौकशी सुरु आहे हे कळविणे म्हणजे दिशाभूल करण्यासारखे आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २६.२.२०१० रोजी पत्र देवून सदरची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविले आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, सदरचे पत्र त्यांना मिळाले नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी जावक क्रमांक व जावक नोंदवही मधील नोंदी आयोगाच्या निदर्शनास आणल्या व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक २६.२.२०१० रोजी पत्र दिलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व तीच माहिती त्यांना दिनांक ८.४.२०१० रोजी सुध्दा देण्यात आली आहे. त्या संदर्भात सहाय्यक पोलीस आयुक्त, कोतवाली विभाग, नागपूर यांचेकडून आयोगाचे निदर्शनास आणण्यात आले की, सदरच्या अहवालाची प्रत ही मा. न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेली आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सदर न्यायालयामध्ये रिव्हीजन दाखल केली आहे. व त्यात सदरच्या अहवालाची प्रत पोलीसांनी दाखल करावी अशा प्रकारचे आदेश मिळावे म्हणून त्यांनी अर्ज केलेला आहे. व त्यामुळे सदरच्या न्यायालयात अहवालाची प्रत दाखल केली नाही याकरीता, अपीलकर्ता हे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास तयार आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून नंतर सांगण्यात आले की, सदरची प्रत ही दाखल करताना

( पान ३ वर..)

**सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत दाखल केली जाते. व त्यांनी सदरचा अहवाल हा सरकारी अभियोक्ता यांचेकडे दिलेला आहे. अशा परिस्थितीत त्यांनी प्रत्येक मुद्यांची शहानिशा करुन माहिती उपलब्ध करुन देता येईल किंवा नाही याबाबतचा निर्णय देणे आवश्यक असते. परंतु चौकशी सुरु आहे म्हणून माहिती देता येणार नाही अशा प्रकारचे उत्तर दिल्यावर कोणत्याही प्रकारची चौकशी न करता प्रथम अपीलाचा निर्णय दिला आहे, तो योग्य नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा सुनावणी घेवून प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये प्रत्येक मुद्याची शहानिशा करुन सदरचा अहवाल मा. न्यायालयात दाखल केलेला असल्यास अपीलकर्ता यांना न्यायालयातून माहिती उपलब्ध करुन घेता येईल. परंतु, तो दाखल केला नसल्यास त्यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत संपूर्ण प्रकरणात सुनावणी घेवून प्रलंबित असलेल्या गुन्हयाच्या तपासाच्या संदर्भात तयार केलेल्या अहवालाची संबंधीत नस्ती तसेच सदरचा अहवाल हा मा. न्यायालयात दाखल झालेला नसल्यास त्या अहवालाची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३६९/नाग/२०१०
अपील क्रं. ३७०/नाग/२०१०

१)श्री भास्कर मिठूजी डोंगरे,
कस्तुरबा वार्ड (पंचशील झेंडयाजवळ) गोंदिया,
पो.ता.जिल्हा गोंदिया- ४४१६०१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष
दिक्षा भूमी शिक्षण संस्था, वरठी, ता.मोहाडी, जि. भंडारा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
दिक्षा भूमी शिक्षण संस्था, वरठी, सनफ्लॅग गेट जवळ,
वरठी (भंडारा रोड), ता. मोहाडी, जिल्हा भंडारा. उत्तरवादी

अपील क्रं. ३७०/नाग/२०१०

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष
श्री संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, कातुर्ली,
पो. सितेपार, ता.आमगांव, जि. भंडारा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
श्री संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, कातुर्ली,
पो. सितेपार, ता.आमगांव, जिल्हा भंडारा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ७.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपील क्रमांक ३६९/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, जानेवारी २००० ते डिसेंबर, २००५ या कालावधीत डॅा. आंबेडकर विद्यालय गोंदिया (सुर्याटोला रोड) येथील उपरोक्त कालावधीत शाळा समितीचे अध्यक्ष श्री प्रमोद चहांदे यांचे अध्यक्षतेखाली श्री एम.बी. कोलते, मुख्याध्यापक, श्री आय.एस. साखरे, मुख्याध्यापक आणि श्री एन.डी. मौतिक मुख्याध्यापक जे वेळोवेळीचे शाळा समितीचे सचिव होते, त्यांच्या कारकिर्दीत जे ठराव घेण्यात आले त्या ठरावाच्या नोंदी केलेल्या रजिस्टर मधील पानांच्या प्रमाणित झेरॅाक्स प्रती, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः किंवा कोरीअर सर्व्हीसने घेणार असे नमुद केले आहे.**

**( पान २ वर..)**

३.	सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना, संबंधीत प्रकरणी शाळा न्यायाधिकरण नागपूर येथे स्वाक्षरी तपासणी करीता जमा करण्यात आले आहे. त्यामुळे आपण मागितलेली माहिती आपणास पुरविता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २३.२.२०१० रोजी पुन्हा अध्यक्ष दिक्षाभूमी शिक्षण संस्था यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४.	उत्तरवादी गैरहजर आहे. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. उलट, माहिती मागतात या कारणास्तव त्यांनाच दोष दिलेला आहे. व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना खालीलप्रमाणे कळविलेला दिसून येतो.

"या चार वर्षाच्या काळात आपण जवळपास पन्नास ते साठ पत्रान्वये माहिती मागितलेली आहे. पुरविण्यात आलेल्या माहितीचा आपणास काही एक उपयोग नसून आपली आर्थिक डिमांड व अरेरावी आम्ही मान्य करावी असा आपला हेतू आम्हांस मान्य नसल्याने आमच्य कर्मचा-यांचे संस्थेविरुध्द कार्यवाहया ठरवणे, तेच ते मुद्ये/उपमुद्ये उपस्थित करुन आमच्या मुळा कामाकडून लक्ष विचलित होऊन आपण मागितलेली माहिती व उत्तर/स्पष्टीकरण देण्यांत वेळ वाया घालविला आहे. सेवानिवृत्तीमुळे आपणाकडे जरी इतरांना सळवत आणण्याशिवाय काहीएक उपयोग उरले नसले तरी आम्हांस मात्र शाळा प्रगतीसाठी अनेक कार्य करायची असतात. योग्य गरजेशिवाय वारंवार माहिती मागून माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चा दुरुपयोग व आपमान आपण करीत असून आमच्यांवर निव्वळ माणसिक, आर्थिकरित्या दडपण आणण्याचा आपला हेतू आपण स्वतः उजागर करीत आहात. तेव्हा यापुढे आपण जेष्ठ नागरिकांच्या प्रतिष्ठेनुरुप आपली भूमिका ठेवावी व वरीलप्रकारच्या अनुचित कार्यवाहया थांबवाव्या. अन्यथा यापुढे उदभवणा-या परिणामास आपण स्वतः जबाबदार राहाल, याची गंभीरपणे नोंद घ्यावी."

आज आयोगापुढे हजर राहून उत्तरवादी यांनी बाजु मांडणे आवश्यक होते. परंतु हजर न राहिल्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे सचिव, हे शास्तीस पात्र आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

५.	अपील क्रमांक ३७०/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी श्री के.एस. कोरे, सचिव, संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था यांचेकडे, श्री किशोर सिताराम कोरे यांचे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६.	जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे आज हजर झालेले नसल्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती दिलेली नसल्यामुळे त्यांनी माहिती

( पान ३ वर..)

**देण्यासाठी टाळाटाळ केली आहे असा निष्कर्ष काढून ते दोषी आढळून येत असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये ते शास्तीस पात्र आहे. त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३६९/२०१० हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी मागितलेली माहिती ही छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सचिव, दिक्षा भूमी शिक्षण संस्था यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) नुसार रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करावा, अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.**

**३) अपील क्रमांक ३७०/२०१० हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.१०.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.**

**४) जन माहिती अधिकारी तथा सचिव, यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.१०.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) ची शांस्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करावा. तसे न केल्यास शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३७३/नाग/२०१०

१)श्री दिपक महेन्द्र पांडेय,
चुडी मोहल्ला, वार्ड नं.१०, पुलगांव, ता.देवळी, जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून(नगरपालिका प्रशासन)
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ता.जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ७.५.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे, नगर परिषद पुलगांव दी महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३१३ पोट कलम (बी) व (ई) अन्वये कार्यवाहीस पात्र असल्याने अशा आशयाची शासनास शिफारस झालेल्या आदेशाची प्रत पुरविण्याबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे.**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३१.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.१.२०१० रोजी देण्यात आला असून, अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**( पान २ वर..)**

**४. अपीलकर्ता यांच्या याच माहितीच्या संदर्भात अपील क्रमांक ३५७/०८ हे खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे पुन्हा त्याच विषयाच्या माहितीच्या संदर्भात चौकशी करुन निर्णय देणे संयुक्तिक नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३७५/नाग/२०१०

१)श्री दिपक महेन्द्र पांडेय,
चुडी मोहल्ला, वार्ड नं.१०, पुलगांव, ता.देवळी, जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,
नगर परिषद पुलगांव, ता.देवळी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा बांधकाम अभियंता,
नगर परिषद, पुलगांव, ता.देवळी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ७.५.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा बांधकाम अभियंता, नगर परिषद पुलगांव यांचेकडे, महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र नगर पालिका नगर पंचायती व औद्योगिक वसाहती अधिनियम १९६५ चे ज्या कलमान्वये बांधकामासाठी मंजूरी दिली त्याची सविस्तर आशयाची प्रत मिळण्याबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना रुपये १४/- चा भरणा करण्यासाठी दिनांक २.१२.२००९ रोजी कळविण्यात आले व त्यांनी दिनांक ८.१२.२००९ रोजी दस्तऐवज प्राप्त करुन घेतला आहे. परंतु समाधान न झ ााल्यामुळे त्यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ६.१.२०१० रोजी सुनावणी घेवून बांधकाम परवानगी नगर रचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलमांचे निरीक्षण देण्याबाबत तसेच अपीलकर्ता यांनी तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्तीस सोबत आणल्यास नकाशासंबंधी माहिती सात दिवसांच्या आत समजवून देण्याबाबत आदेश**

**( पान २ वर..)**

**देण्यात आले. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना, standard building Bye-Laws and Development Control Rules दिलेले आहे. व त्यांना सर्व तांत्रिक बाबी समजावून सांगितल्या आहेत. परंतु त्यांना तांत्रिक बाबी कळत नसल्यामुळे त्यांनी तांत्रिक बाबी समजणारी व्यक्ती आणल्यास त्यांना समजावून सांगण्यात येईल, असे आयोगापुढे सांगितले. यावरुन प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३७६/नाग/२०१०

१)श्री दिपक महेन्द्र पांडेय,
चुडी मोहल्ला, वार्ड नं.१०, पुलगांव, ता.देवळी, जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक अधिकारी,
जिल्हा निबंधक कार्यालय, वर्धा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
दुय्यम निबंधक कार्यालय, पुलगांव, ता.देवळी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ७.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, दुय्यम निबंधक कार्यालय यांचेकडे, श्रीमती रमादेवी सत्यनारायण पांडेय यांनी सन २००७ मध्ये विक्रीपत्राद्वारे श्री मोईन हुसेन फक्करुद्दीन बोहरा यांचे नावाने केलेले मालमत्तेचे कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित प्रती पुरविणेबाबत सन २००७ मध्ये झालेल्या त्या विक्रीपत्रांचा पंजीयण क्रमांक २०६९१०७ हा आहे, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.१०.२००९ रोजी एकुण २८ पृष्ठांकरीता, रुपये २०/- प्रती पेज प्रमाणे रुपये ५६०/- शासन जमा करावे लागेल, असे कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.१.२०१० रोजी देण्यात आला असून, जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**( पान २ वर..)**

**३.	परंतु, प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१)	प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३६८/नाग/२०१०

१) सौ.सुनंदा प्रभाकर दूरबुडे,
संत ज्ञानेश्वर वार्ड, हिंगणघाट जूना पेट्रोल पंप, नागपूर रोड,
ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, हिंगणघाट, ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तलाठी,
सा.क्रं.३४, तलाठी कार्यालय, हिंगणघाट, ता.हिंगणघाट,
जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ७.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचेकडे, सौ. सुनंदा प्रभाकर दुरबुडे, ४६ या वारसानाच्या नावाने १४+६=२० एकराचे फेरफार शेत स.नं.२३२ चे १४ व शेत स.न. २३१ चे ६ एकरचे फेरफार करुन दयावे, अशी माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.३.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ अन्वये आपण मागितलेली माहिती नियमानुसार नाही. आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ अन्वये माहिती मागितल्यास तात्काळ पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे दिनांक २५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल न करता तहसिलदार यांचेकडे अर्ज सादर केला आहे. व त्या अर्जाप्रमाणे दिनांक २.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना फेरफार देण्याच्या संदर्भात कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे केस नंबर २६९/९९ च्या निर्णयाप्रमाणे श्री बळीराम मुळेच्या नांवाचा जूना ७/१२ व फेरफार रद्य करणे २००५ ला पटवारी रेकॅार्डवर चढविलेले ७/१२ फेरफार रद्य करणे व शेत स.न.२३१ व २३२ चे २० एकरचा फेरफार अर्जदाराचे एकटीचे नांवाने करुन देण्याबाबत विनंती केली होती. परंतु तलाठी किंवा तहसिलदार हे कार्यवाही करुन देण्यास तयार नाही. व त्यामुळे ती कार्यवाही करुन मिळावी यासाठी अर्ज केला. त्यावर जन माहिती अधिकारी व तहसिलदार यांनी असे सांगितले की, दिवाणी न्यायालयाचे आदेश दिनांक ८.४.२००८ च्या आदेशाचे अवलोकन केले**

**असता वादी श्री बळीराम मुळे यांनी दाखल केलेले अपील खारीज करण्याबाबत असल्यामुळे व आदेशामध्ये अर्जदाराने एकटीच्या नांवे रेकॅार्ड करण्याबाबत उल्लेख नसेल तर शेत सर्व्हे नंबर २३२ चे ७/१२ रेकॅार्ड मध्ये कोर्टाचे आदेशानुसार हक्क बदल करता येत नसल्यामुळे फेरफार करण्याची कार्यवाही करता येत नाही. व तशी ती कार्यवाही अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे करता येत नाही, असे तलाठी व जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना जे कळविले आहे ते योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३८८/नाग/२०१०

१)श्री सुरेंद्र बाबुराव शिंदे,
द्वारा-अभय मसिह, १/६, विश्राम नगर,
राजाबाक्षा, पो.अजनी, नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कर्मशाळा व्यवस्थापक,
राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यशाळ,
हिंगणा रोड, एम.आय.डी.सी. नागपूर-१६. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी,
राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यशाळ,
हिंगणा रोड, एम.आय.डी.सी. नागपूर-१६. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, मध्यवर्ती कार्यशाळा यांचेकडे,सन १९७१ पासून संपूर्ण ३१ वर्षाची एकुण सर्वच प्रकारची १६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक ७.२.२०१० रोजी, आपण दिनांक २८.११.२००९ रोजी माहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती ही विविध विषयाची व विविध कालावधीची (एकुण १६ विषयाबाबत) अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे जोडपत्र-अ, नियम (३) मधील दिलेल्या परिपत्रकातील (टिप सूचना नुसार) माहिती सादर केलेली नसल्यामुळे आपणास माहिती देता येणार नाही. तरी माहिती पाहिजे असल्यास खालील बाबीचा अंतर्भाव करुन अर्ज करावा. (१) माहितीचा विषय- विषयाचा स्थूल प्रवर्ग दर्शविण्यांत यावा. (२) माहितीचा संबंधीत कालावधी- ज्या कालावधीचा संबंधीत माहिती आवश्यक आहे तो कालावधी दर्शवावा. (३) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन- माहितीचा विशेष तपशिल दर्शविणे आवश्यक आहे. तसेच अर्जावर कोर्ट फी स्टँम्प लावलेला नाही, असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, ते माजी सैनिक आहे व माजी सैनिकांस आपुलकीने वागणुक द्यावी असे शासनाचे परिपत्रक आहे व त्यांस न्याय मिळवून द्यावा अशी विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे १९७१ ला**

**( पान २ वर..)**

**माजी सैनिक होते. त्यानंतर त्यांना एस.टी.मध्ये नोकरी देण्यात आली. त्या कालावधीत ते तीन वेळा बडतर्फ झ ाले. त्यामुळे आता माजी सैनिक म्हणून त्यांचे भांडवल करण्याची आवश्यकता नाही. व आजही ते जी माहिती मागत आहे ती निरनिराळया प्रकारातून माहिती मागत आहे. त्यांनी सुरुवातीला जी माहिती मागितली होती त्यासंदर्भात मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडे अपील दाखल केले होते. त्या अपीलाच्या निर्णयामध्ये सुध्दा अपीलकर्ता अर्जदार यांना काय माहिती अपेक्षित आहे हे कळत नाही या कारणास्तव अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात सुध्दा अपील क्रमांक २१३२/२००७ व अपील क्रमांक १६६८/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात आले होते व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश झाले होते. ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ च्या तरतुदीप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सचिव, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांनी महामंडळातर्फे जी माहिती द्यावयाची होती ती संपूर्ण अर्जदारास दिलेली आहे. अर्जदार महामंडळाच्या सेवेतून बडतर्फ झाल्यानंतर व बडतर्फीच्या अपीलातील त्यांचे सर्व प्रयत्न झाल्यानंतर ते वेगवेगळया माध्यमातून अर्ज करीत असतात. यावरुन अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २८.११.२००८ च्या अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सदरची माहिती अपीलकर्ता यांनी महामंडळास वेठीस धरण्याच्या दृष्टीने मागितलेली दिसून येते. परंतु अशा प्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींचा वापर करणे हे गैर असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१)	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३८९/नाग/२०१०

१)श्री कवडुजी जनार्धन येनप्रेड्डीवार,
मु.पो.मुल, ता.मुल, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर आयुक्त,
आदिवासी विकास विभाग, गिरीपेठ, आर.टी.ओ.आफीस समोर,
अमरावती रोड, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
अप्पर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय,
गिरीपेठ, आर.टी.ओ.ऑफिस समोर, अमरावती रोड, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १५.७.२००९, ११.८.२००९, १२.९.२००९, १८.२२.२००९ व दिनांक २१.१२.२००९ ला दिलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. तसेच खर्चाचा भरणा करण्यास तयार आहे असे नमुद केले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व प्रथम अपीलाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१२.२००९ रोजी कार्यासन-२ (नियोजन शाखा) यांनी संबंधीत कर्मचारी, कार्यालय, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांना उद्येशून लिहिलेल्या अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.११.२००९ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती आपल्या कार्यासनाशी संबंधीत असल्यामुळे ती या कार्यालयास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी जेणेकरुन विहित मुदतीत माहिती पाठविणे सोईचे होईल, असे कळविलेले दिसून येते. परंतु नियोजन शाखेने दिनांक १.१.२०१० चे पत्रान्वये माहिती या कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी परस्पर अर्जदारास माहिती पुरविण्याबाबत पत्र देण्यात आले. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही.**

**४. वास्तविक, अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात स्पष्टपणे वेगवेगळया तारखेने दिलेल्या अर्जाची माहिती दिलेली आहे. व त्यावरील कार्यवाहीची माहिती मागितली आहे. सदरचे पत्र हे**

**( पान २ वर..)**

कोणत्या कार्यालयाला दिले व त्यावर कोणत्या प्रकारची कार्यवाही झाली हे शोधून काढून अपीलकर्ता यांना कार्यवाही बाबतची माहिती उपलब्ध करुन देता आली असती. परंतु तसे काहीही न करता नियोजन विभागाला पत्र पाठविले व त्यांनी सुध्दा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे माहिती उपलब्ध होईल, अशा प्रकारचे मोघम उत्तर दिले. व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी विषयाचे आकलन न करुन घेता माहिती गडचिरोली येथे मिळू शकेल असे कळवून स्वस्थ बसले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची सखोल चौकशी केली नाही व त्यावर फक्त पत्र घालून पुढील कार्यवाही केलेली नाही. व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. तसेच नियोजन विभागातील संबंधीत अधिकारी/कर्मचारी हे सुध्दा दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या अर्जावर तारखेनुसार झालेली कार्यवाही टिपणीच्या स्वरुपात विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी योग्यरित्या अर्जाचे हस्तांतरण केलेले नसल्यामुळे तसेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी ३० दिवसांचे आंत कोणताही प्रयत्न केलेला नसल्यामुळे तसेच नियोजन शाखेने सुध्दा अर्जाची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणतेही प्रयत्न केलेले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी करावयाची आहे. त्या करीता निर्णयाची एक प्रत अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३८७/नाग/२०१०

१)श्री प्रशांत सुंदरदास नगराळे,
शांतीकुंज निवास अपार्टमेंट, त्रिमुर्ती नगर, रिंग रोड,
संभाजी यांच्या पुतळयाजवळ, नागपूर-४४००२२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी,
बॅ. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा,
ता. कळमेश्वर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी ,
बॅ. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा,
ता. कळमेश्वर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, यांचेकडे त्यांच्या दिनांक १०.८.२००९ च्या अर्जाच्या संदर्भात एकुण ९ मुद्यांमध्ये माहिती मागितली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. त्यानंतर पुन्हा दिनांक २७.३.२०१० रोजी अर्ज दाखल केलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक २५.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना, आपल्या अर्जाची दखल घेतली नाही कारण तो विशिष्ट नमून्यात नाही. तसेच कोर्ट फी स्टँम्प लावलेला नाही, असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या**

**( पान २ वर..)**

**करीता अर्जामध्ये भरपूर त्रुटया होत्या व त्याकरीता त्यांना वारंवार सूचना दिलेल्या होत्या. परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारची त्रुटींची पुर्तता केली नाही. कार्यालयाकडून त्यांच्या राजीनाम्याच्या पत्राची प्रत मागण्यात आली. परंतु त्यांच्या राजीनाम्याची प्रत नव्हती तर 'लीन'ची प्रत होती. ती पाठविण्यात आली. व त्यावर कार्यवाही होऊन अपीलकर्ता यांना भविष्य निर्वाह निधीचा धनादेश मिळाला आहे. आजपर्यंत अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारे त्रुटींची पुर्तता केली नाही. मात्र माहितीच्या अधिकारात ते कार्यवाही करुन मागत आहे. ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष कार्यवाहीची माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३८६/नाग/२०१०

१)श्री कुदनलाल मणीराम प्रजापती,
रंजन बिछायत केंद्र,हंसापूरी, धोंडबा चौक, नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उपशिक्षणाधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद खलाशी लाईन, नागपूर तर्फे श्री निराला विद्यालय, हंसापुरी नागपूर येथील श्रीमती निलकोश रहीम यांच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्राची तपासणी करण्यासंबंधात कार्यालयात दिनांक १९.६.२००८ रोजी केलेल्या तक्ररीचा ऐवजी आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्याबाबत, माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांना दिनांक ३.३.२०१० रोजी प्रत्यक्ष शाळेच्या सर्व नस्ती मा.उपसंचालक, नागपूर यांचेकडे चौकशीसाठी असल्यामुळे आपण मागितलेली माहिती आपणास विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे शक्य नाही. नस्ती प्राप्त झाल्यावर माहिती पुरविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**( पान २ वर..)**

**३.	अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही हे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरावरुन दिसून येते व तसे त्यांनी आयोगापुढे सुध्दा सांगितले. मात्र, मा.शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडून नस्ती उपलब्ध झाल्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे सतर्क राहून माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अन्यथा ते शास्तीस पात्र राहातील, याची नोंद घ्यावी. अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)	अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून मा.शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडून संबंधीत नस्ती प्राप्त झाल्याबरोबर अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाचे अनुषंगाने विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील, याची नोंद घ्यावी.**

**२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत किरकोळ अर्ज-

किरकोळ अर्ज क्रं.३/नाग/२०१०
(मुळ अपील क्रं. ४९१/२००९)

१)श्री रविंद्र सदाशिव बागडे,
प्लॉट नं. ८४७, आहूजा नगर,
नारा रोड, जरीपटका, नागपूर-१४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, रामटेक, ता.रामटेक,जि.नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.७.२००९ रोजी नोटीस काढून दिनांक ४.९.२००९ रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहे. व त्यावेळेस जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुण घेण्यात आले होते व अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकुण घेण्याकरीता त्यांच्या किरकोळ अर्जाप्रमाणे दिनांक १८.५.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४९१/२००९ हे खारीज करण्यात आले होते व त्यात अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलात नव्याने मागणी करुन प्रत्यक्ष योजना पाहून माहिती देण्यात यावी अशी मागणी केलेली असल्यामुळे व ही मागणी नव्याने अपीलात केलेली असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे असा निर्णय दिलेला होता.**

**३. आज अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, सन १९७१ ते १९७२ एकत्रिकरणाच्या नंतर सन १९९१-९२ मध्ये अधिकार अभिलेखामध्ये झालेले फेरबदल कोणत्या आधारावर झाले याबाबतची माहिती दिली नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु अशी**

**( पान २ वर..)**

**माहिती त्यांनी दिनांक १६.६.२००८ च्या अर्जात मागीतली नव्हती. प्रथम अपील मेमोमध्येही त्यांनी तशी माहिती मागितली नाही. परंतु सुनावणीत त्यांनी तशी माहिती मागितलेली दिसून येते. परंतु, अपील क्रमांक ४९१/२००९ चा निर्णय झालेला असल्यामुळे व त्यात कोणताही बदल पुन्हा करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे निदर्शनास आणल्याप्रमाणे पुन्हा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे अर्ज सादर करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. किरकोळ अर्ज खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)     अपीलकर्ता यांचा किरकोळ अर्ज खारीज करण्यात येत आहे.**

**२)     अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३९६/नाग/२०१०

१)श्री जगन्नाथ दयाराम रेवतकर,
रा.खर्रा, पो. गंगाझरी, ता.जि. गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गोंदिया, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा धान्य खरेदी निरीक्षक,
तहसिल कार्यालय (अन्न विभाग), गोंदिया, ता.जि.गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, अन्न विभाग, तहसिल कार्यालय, गोंदिया यांचेकडे, मौजा खर्रा स्वस्त धान्य दुकान नं.१४ चे रेकार्ड मिळण्याबाबत एकुण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.२.२०१०, १२.३.२०१०, १८.३.२०१० व २५.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती अपूर्ण आहे व कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.३.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे या कारणास्तव अपील खारीज करण्यात आलेले दिसून येतात. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्यासंदर्भातीत संपूर्ण कागदपत्र किंवा व्हाऊचर हे व्यापक प्रमाणत आहे व अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे. त्यामुळे संपूर्ण खर्च करणे शक्य नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती तयार करुन देण्यात आली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी कागदपत्र मला दाखविल्यास माहितीच्या छायांकित प्रती तयार करुन घेण्यास तयार आहे. तसे असल्यास अपीलकर्ता यांना संपूर्ण नस्ती किंवा कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्यातून अपीलकर्ता यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांच्या खर्चाने उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून उपस्थित राहावे व संपूर्ण कागदपत्रांचे निरीक्षण करुन त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांच्या खर्चाने उपलब्ध करुन घ्याव्या. अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या ८ मुद्यांच्या संदर्भात कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे व त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना त्यांच्या खर्चाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३९७/नाग/२०१०

१)श्री जगन्नाथ दयाराम रेवतकर,
रा.खर्रा, पो. गंगाझरी, ता.जि. गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गोंदिया, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार ,
तहसिल कार्यालय गोंदिया, ता.जि.गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, गोंदिया यांचेकडे, ग्राम पंचायत गंगाझरी सर्कल कार्यालयाकडील नागरिकाचे सनदीप्रमाणे कोणकोणती कामे केली जातात त्याची माहिती मिळण्याबाबत एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.८.२००९ रोजी रुपये १६४/- चा खर्चाचा भरणा करावा असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु दिनांक ३१.८.२००९ रोजीच अपीलकर्ता यांनी ते दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक असल्यामुळे त्यांना शुल्क रुपये १६४/- भरणा करणे गैरकायदेशिर आहे असा आक्षेप घेतलेला दिसून येतो. त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.१०.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात उत्तरार्थी यांचेकडून आपण मागणी केलेली माहिती या कार्यालयास प्राप्त झाली असून आपण स्वतः कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत हजर होऊन माहिती पाहाणी करुन प्राप्त करुन घ्यावी व नोंद घ्यावी व पोच द्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १६.११.२००९ रोजी मुद्या क्रमांक १,२,३ व ५ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक ३.११.२००९ रोजी प्रथम अपीलचा निर्णय देण्यात आला असून मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती कार्यालयात उपलब्ध असल्यास माझे समक्ष सादर करावी व नसल्यास तसे कळवावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक १६.११.२००९ रोजी सदरची माहिती तहसिलदार यांनी माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध**

**( पान २ वर..)**

**करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना काही माहिती मिळाली आहे व काही माहिती मिळाली नाही. व कागदपत्रे मिळाले नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये मुद्येनिहाय खुलासा देण्यात आला आहे तरी सुध्दा समाधान न झाल्याने त्यांनी पुन्हा जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित राहून संपूर्ण नस्ती निरीक्षण करावे व त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून उपस्थित राहावे व मागितलेल्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या संपूर्ण नस्तींचे निरीक्षण करुन त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांच्या खर्चाने उपलब्ध करुन घ्याव्या. अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी नस्ती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्या व त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना त्यांच्या खर्चाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३९८/नाग/२०१०
अपील क्रं. ३९९/नाग/२०१०

१)श्री जगन्नाथ दयाराम रेवतकर,
रा.खर्रा, पो. गंगाझरी, ता.जि. गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, गोंदिया, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभाग, गोंदिया, ता.जि.गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग, गोंदिया यांचेकडे, मौजा खर्रा येथील जलकन्या तलावाचे दस्तऐवजाचे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२०१० रोजी दोनही प्रथम अपीले दाखल केलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २६.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भात, सदरचा तलाव गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया यांचा असून या संबंधी कोणताही दस्तऐवज या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. तसेच इतर कार्यवाही त्यांना कळविण्यात आलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरच्या तलावाच्या मालकीच्या संदर्भात अपीलकर्ता यांना माहिती हवी आहे. परंतु सदरचा तलाव पुर्वी भंडारा जिल्हा परिषदेकडे होता व त्यानंतर गोंदिया जिल्हा परिषदेकडे त्यातील किती क्षेत्र आले याबाबतची माहिती किंवा नस्ती उपलब्ध नाही. त्यानंतर त्या संदर्भात चालना आलेली असून त्याकरीता वरिष्ठ पातळीवरुन समितीच्या बैठकी सुरु आहे व त्या तलावाच्या संदर्भात निर्णय घेणे सुरु आहे. त्यामुळे चौकशी संपल्यानंतर जो अहवाल प्राप्त होईल त्याची प्रत उपलब्ध करुन देता येईल. दरम्यान जे कागदपत्र किंवा नस्ती जिल्हा परिषद गोंदियाकडे उपलब्ध आहे त्याच्या छायांकित प्रती**

**( पान २ वर..)**

**अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. अपीलकर्ता सुध्दा सदरच्या छायांकित प्रती घेण्यासाठी खर्च करण्यास तयार आहे असे त्यांनी सांगितले. त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३९८/नाग/२०१० व अपील क्रमांक ३९९/नाग/२०१० अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून उपस्थित राहावे व तलावाच्या संदर्भातील संपूर्ण नस्तीचे निरीक्षण करुन त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांच्या खर्चाने उपलब्ध करुन घ्याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४०६/नाग/२०१०
अपील क्रं. ४०७/नाग/२०१०

१)श्री लस्मय्या राजम नागुला,
वन परिक्षेत्र कार्यालय, नागभीड,
मु.पो.ता.नागभीड, जिल्हा चंद्रपूर-४४१२०५. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२, चंद्रपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्ह समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२, चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दोनही अपीलांमध्ये संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव यांचेकडे तसेच विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, यांचेकडे, दिनांक १ जानेवारी, २००१ ते ३१ डिसेंबर, २००१ पर्यंतची तसेच भोई समाजाच्या अनेक उमेदवारांची जात वैध/अवैध प्रमाणपत्रे देण्याच्या संदर्भातील माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जांचे अनुषंगाने दिनांक २६.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना अ.क्रं. १ ते ८ पर्यंतच्या प्रकरणाचा कालावधी १० वर्षांचा आहे. त्यामुळे अ.क्रं. १ ते ८ पर्यंतच्या वैधता प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती या कार्यालयास सादर कराव्या जेणेकरुन त्याचा शोध घेवून माहिती आपणास उपलब्धतेनुसार देता येईल. तसेच अ.क्रं. ९ ते ११ बाबत जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२ यांचेशी संपर्क साधून माहिती घ्यावी असे कळविलेले दिसून येते. तसेच इतरही माहिती अपीलकर्ता यांनी व्यापक स्वरुपात मागितलेली दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांना यापुर्वी सुध्दा दिनांक १२.१.२००९ रोजी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४००/२००९, अपील क्रमांक ११४०/२००९, अपील क्रमांक ११४१/२००९ पैकी अपील क्रमांक ४००/२००९ खारीज करण्यात आलेले आहे व उर्वरित दोन अपीले अंशत: मंजूर करण्यात आलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविले होते. परंतु, मा. उच्च न्यायालयाने समितीस पुन्हा नैसर्गिक न्यायाच्य तत्वानुसार संधी देवून निर्णय घेण्याचे आदेश दिलेले असल्यामुळे ते प्रकरण समितीकडे परत आलेले आहे.**

**( पान २ वर..)**

अपीलकर्ता वारंवार १०-१५ वर्षाची माहिती मागत आहे. व त्यातून दबाव तंत्राचा वापर करीत आहे. ते शासकिय अधिकारी आहे व तरी सुध्दा ते अशा प्रकारे त्रास देत आहे. जाती प्रमाणपत्र पडताळणी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे समितीचा निर्णय मान्य नसेल तर मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करणे हा एक मार्ग आहे. परंतु अशा प्रकारे वारंवार अर्ज करुन कोणत्याही प्रकारचा तपशिल न देता माहिती मागणे हा दबावतंत्राचाच एक भाग आहे. त्याप्रमाणे खुलासा दाखल केला आहे तो खालीलप्रमाणे.

"श्री नागूला एल.आर.यांनी खालीलप्रमाणे माहिती अधिकार अन्वये माहिती मागविलेली आहे.

जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जाती प्रमाणपत्र पडताळणी करीता स्वत:ची बेस्ती व बडीलांची बेस्ती शाळा सोडल्याचा दाखले जाती विषयक पुरावे सादर केलेले असून सदर जात इतर मागास प्रवर्गात येत असून त्यांच्या मुलांचे व भावाचे वैधता प्रमाणपत्राच्या आधारे जाती वैधता देण्याकरीता दबाव तंत्राचा वापराकरीता जाणिव पुर्वक खालीलप्रमाणे माहिती अधिकारी अन्वये माहिती मागविलेली आहे.

१. दिनांक २१.३.२००९ जाती प्रमाणपत्र पडताळणी लोकप्रतिनिधी यांच्या मार्फत सबळ पुराव्या अभावी जाती प्रमाणपत्र निर्गमित करावे नसता मला न्यायनिवाडया करीता प्रकरण न्याय प्रविष्ठ करावे लागेल. त्याच्या प्रती विविध ठिकाणी पाठविण्यांत आल्या.

२. दिनांक ६.४.२००९ अन्वये या कार्यालयाकडे उपलब्ध माहिती देण्यांत येऊनही माहिती अपूर्ण दिली असे नमुद केले श्री नागूला यांनीच अपूर्ण माहिती दिलेली अपू-या माहितीच्या आधारे माहिती अपूरी दिली हे म्हणणे योग्य नाही. या कार्यालयाने संपूर्ण अभिलेखा पडताळणी करुनच माहिती दिलेली आहे.

३. दिनांक ३०.३.२००९ अन्वये विविध शासन निर्णयाच्या प्रती मागविण्यांत आल्या त्या संदर्भात या कार्यालयाने पत्र क्रं. २२६६ दिनांक २९.६.२००९ अन्वये शासनाने जनहित लक्षात घेवून वेबसाईड तयार करुन त्यावर सर्व शासन निर्णय उपलब्ध आहेते ते संकेत स्थळावरुन प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले आहे. अर्जदार हे शासन सेवेत असून त्यांचेकडे सर्व शासन निर्णय उपलब्ध असूनही जाणिवपुर्वक या कार्यालयास शासन निर्णय मागणी केलेली आहे.

४. सदर समिती दिनांक ३.१०.२००७ पासून कार्यरत झालेली असून त्यांच्या मुलांची व भावाची जाती वैधता प्रमाणपत्र नागपूर व पूणे समितीने निर्गमित केलेले आहेत हे माहिती असूनही संबंधीत समितीस अर्ज न करता समितीस त्रास देण्यांच्या हेतूनेच माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करीत आहे.

५. दिनांक १३.५.२००९ अन्वये पुन्हा शासन निर्णयाच्या प्रती मागविण्यांत आलेल्या आहेत.

६. दिनांक २०.५.२००९ व २९.५.२००९ व ३०.५.२००९ अन्वये पुन्हा शासन निर्णयाच्या प्रती मागविण्यांत आलेल्या आहेत.

७. दिनांक २८.५.२००९ अन्वये १० उमेदवारांच्या माहिती मागविण्यांत आली त्यामध्ये त्यांनी सदर प्रकरणांचा सविस्तर माहिती दिलेली नसून या कार्यालयाने पत्र क्रमांक २२६६ दिनांक २९.६.२००९ अन्वये आपणांस कोणत्या स्वरुपाची माहिती हवी

( पान ३ वर..)

**त्यासंबंधीचे वर्ष व प्रकरण क्रमांक देण्यांचे सूचवूनही माहिती दिलेली नाही.**

**८. दिनांक ४.८.२००९ अन्वये माहिती मागविण्यांत आली.**

**ही समिती दिनांक ३.१०.२००७ पासून अस्तित्वात आली असून त्यापुर्वीचा रेकॉर्ड या समितीकडे नाही. तत्पुर्वीचे शासन निर्णयही उपलब्ध असणे शक्य नाही. सदरची माहिती शासनाच्या वेबसाईडवर उपलब्ध आहे.**

**श्री नागूला यांची जात इतर मागासवर्गात येत असून समितीस भोई या जातीचे वैधता प्रमाणपत्र मिळण्यांकरीता जाणिवपुर्वक त्रास देत आहेत. ते माहितीचा अधिकार वापरुन दबावतंत्र निर्माण करीत आहेत. ते शासकिय कर्मचारी असून जाणिवपूर्वक समितीस त्रास देणे ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. करीता सदर माहिती आपणांस सविनय माहितीस्तव सादर करण्यांत येत आहे."**

**यावरुन अपीलकर्ता जी माहिती मागत आहे त्यात कोणतेही व्यापक जनहित नसल्यामुळे व त्यांच्या वैयक्तिक हिताकरीता माहिती मागत असल्यामुळे सदरची दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४०६/नाग/२०१० व अपील क्रमांक ४०७/नाग/२०१० खारीज करण्यात येत आहेत.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४०९/नाग/२०१०

१)श्री खटूजी संभाजी गुरनुले,
मु.पो.नाग मंदिर कॅालनी, सिन्देवाही
ता. सिन्देवाही, जिल्हा चंद्रपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती सिन्देवाही, ता.सिन्देवाही, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत कार्यालय, सिन्देवाही, ता.सिन्देवाही,जि.चंद्रपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, नागपूर-चंद्रपूर मेन रोडला लागून असलेले नाग मंदीर कॅालनीला जाणा-या रोड लगतचे मुत्रीघर ग्राम पंचायतीने निर्लेखित केले किंवा कसे, याबाबतची संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.८.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.९.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी ग्राम पंचायतने संबंधीत बाबीची खातरजमा करुन सदर माहितीचा शोध घेवून १५ दिवसांचे आंत लेखी माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्यामुळेही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना चुकीची माहिती दिली आहे. श्री तुम्मे यांचा**

**(पान २ वर..)**

**मालकी हक्क नसताना व ती शासकिय जमीन असताना श्री तुम्मे यांची जमीन आहे अशी माहिती दिली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या जागेच्या संदर्भात कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे तो गट नंबर ४६५ ची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली. त्याबाबत कोणत्याही प्रकारची दूसरी माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचेकडे जी इतर माहिती उपलब्ध आहे. यावरुन त्यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे ग्राम पंचायत अधिनियमाप्रमाणे तक्रार करणे संयुक्तिक राहील. अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३४४/नाग/२०१०

१)श्री राजू रामाजी राहूलकर,
शेठ प्रताप वार्ड, गर्ल्स कॅालेज जवळ, गोंदिया,
ता.जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, गोंदिया, ता.जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
मनोहरभाई पटेल विद्याभारती हायस्कुल, पुरगांव(धमान)
पो. गणखैरा, ता.गोरेगांव, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.५.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मनोहरभाई पटेल हायस्कुल यांचेकडे, मुला मुलींची शिष्यवृत्ती वाटप व सन २००८ ते २००९ मधील एस.एस.सी. परीक्षेत बसलेल्या मागासवर्गीय मुलांची शिष्यवृत्तीच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः/टपालाने घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. आज जन माहिती अधिकारी हजर नाही. तसेच त्यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दाखल केलेली नाही. प्रथम अपीलाच्या सुनावणी मध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे मान्य केले होते. परंतु आतापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही, असे अपीलकर्ता यांनी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी आज हजर नसून त्यांनी मुदवाढ मिळण्याबाबत अर्ज दिलेला आहे. परंतु त्यांनी कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाही. याचाच अर्थ, त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्ता यांना दिलेली नाही असे दिसून येते. व त्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- ची शास्ती**

**( पान २ वर..)**

**लादणे आवश्यक आहे. परंतु त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे आवश्यक असल्यामुळे त्यांचा खुलासा मागविणे आवश्यक आहे. अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी त्यांचे अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा त्यांचे विरुध्द रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.९.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने तसेच प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत करावा व तसे न केल्यास रुपये २५,०००/- ची शास्ती कायम होईल व ती जन माहिती अधिकारी यांचे दर महिन्याचे वेतनातून वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४०८/नाग/२०१०

१)श्री राजू राहूलकर,
अध्यक्ष, राष्ट्रीय मजदूर सेना,
शेठ प्रताप वार्ड, गर्ल्स कॅालेज रोड, गजानन स्टोर्स के सामने,
गोंदिया. ता.जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
बाघ पाटबंधारे व्यवस्थापन उपविभाग, आमगांव,
ता. आमगांव, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,
पाटबंधारे उपविभाग, आमगांव, स्टेशन रोड आमगांव,
ता. आमगांव, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.५.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, पुजारीटोला, कालीसरार, सोरपूर कॅनल मरम्मत रिपेरिंग दुरुस्ती कामाबाबत एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यानंतरही माहिती मिळाली ती अपूर्ण असल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती तपशिलात उपलब्ध करुन दिलेली नसून एकाच मुद्यांवर संपूर्ण माहिती तयार करुन उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी हे गैरहजर असले तरी उपविभागीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ७.१.२०१० रोजी शाखा अभियंत्यांकडून माहिती मागितलेली व मिळाल्यावर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले. व त्याप्रमाणे दिनांक १८.१.२०१० रोजी करारनामा आदेशाची सत्यप्रत (१०) उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येते. नंतर दिनांक २३.१.२०१० रोजी पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ती माहिती अपूर्ण आहे. उपविभागीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, शाखा अभियंता हे माहिती अधिकारी आहे. परंतु शाखा**

**( पान २ वर..)**

**अभियंता जर माहिती अधिकारी आहे व अर्ज त्यांचेकडे आमगांवकडे केलेला असल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तसेच ते आज आयोगापुढे सुनावणीसाठी हजर राहाणे आवश्यक होते. परंतु ते गैरहजर आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी टाळाटाळ केलेली दिसून येते. व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) आज जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, पाटबंधारे उपविभाग, आमगांव हजर नाही. व माहिती सुध्दा देण्याची त्यांनी टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त)ची शास्ती कां लादण्यात येवू नये याचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करण्यात यावा, अन्यथा शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४१०/नाग/२०१०

१)श्री सुभाष हरिश्चंद्रजी कापगते,
मु.रेंगेपार/कोहळी पो.पिंपळगांव, ता.लाखनी, जिल्हा भंडारा. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद गोंदिया, ता.जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
त्रिवेणी हायस्कुल सडक अर्जूनी, ता.सडक अर्जूनी,
जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. नरेश जिभकाटे हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे त्रिवेणी हायस्कुल, सडक अर्जूनी येथे कु. गिता बोरकर, स.शि. बी.एससी.बी.एड दि. ४ जुलै, १९९४ ते ३०.४.१९९६ पर्यंत कार्यरत होत्या. व नंतर त्यांनी शाळा सोडलेली आहे. सदर कालावधीची शिक्षक हजेरी रजिस्टरची प्रत, राजिनामा प्रत तसेच वार्षिक तपासणी अहवालाची सत्यप्रत अशा स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.३.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात माहिती देण्यास सांगितले, असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. नरेश जिभकाटे हजर आहे व त्यांनी मुदतीचा अर्ज दिला आहे. परंतु आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.४.२०१० रोजी नोटीस काढण्यात आली होती. म्हणजे जन माहिती अधिकारी यांना एक महिन्याचा कालावधी आयोगाकडे खुलासा करण्याकरीता मिळाला होता. परंतु त्यांनी त्या कालावधीत खुलासा सादर केला नाही व कागदपत्रेही दाखल केली नाही. व मुदत घेण्यास मात्र वकीलांना पाठविले आहे. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे ते आज आयोगापुढे हजर राहाण्यास टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढवा लागतो. जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.१०.२००८ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे कागदपत्रे दाखल केली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे दोषी**

**( पान २ वर..)**

**आढळून येतात व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १५.१०.२००८ च्या अर्जात मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे हजर झालेले नाही. त्यांचा मुदतीचा अर्ज फेटाळण्यात आलेला आहे. व त्यांनी आतापर्यंत माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/-( रुपये पंचवीस हजार फक्त)ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत करावा अन्यथा शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४४४/नाग/२०१०

१)श्री परमानंदजी रतिरामजी मेश्राम,
मु.पो.कोडेलाहारा, ता.तिरोडा, जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,
हरिकृष्ण विद्यालय, कोडेलोहारा, ता.तिरोडा, जिल्हा गांदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
हरिकृष्ण विद्यालय कोडेलोहारा, ता.तिरोडा, जि.गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २१.५.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे, सन २००८-०९ या कालावधीतील विमुक्त जाती-अ, भटक्या जाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड या जातीच्या मुलांच्या संदर्भात व शिष्यवृत्तीच्या संदर्भात एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २१.१.२०१० रोजी संस्थेचे सचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी ज्या वेळेस अर्ज केला त्यावेळेस माहिती त्यांना देण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे त्यावेळेस शिष्यवृत्ती प्राप्त झाली नव्हती म्हणून तशी माहिती दिली होती. परंतु आता दिनांक १२.५.२०१० रोजी विभागीय जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडून रुपये ८०,६९९/- चा शिष्यवृत्तीचा धनादेश प्राप्त झाला आहे.**

**( पान २ वर..)**

**व त्यातून शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात येईल असे आयोगास सांगितले. त्यामुळे दिलेली माहिती योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४४६/नाग/२०१०

१)श्री बापू महादेवराव पाटमासे,
एम.एम.बोरींग वर्क्स, पारशी अग्यारी जवळ, गांधीसागर,
नागपूर-१८. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कं.मर्या.महाल विभाग,
पी.सी.एफ.जूनी शुक्रवारी, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,

म.रा.विद्युत वितरण कं.मर्या.तुळशिबाग, उपविभाग, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २१.५.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांचेकडे, सन १९९९ पासून मिटर क्रमांक ४१००२२६४८३७५ चा विद्युत पुरवठा खंडीत केल्याबाबतची माहिती एकुण पाच मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.११.२००९ रोजी, आपण मागितलेली माहिती तुळशिबाग उपविभाग यांचेशी संबंधीत असल्यामुळे आपला अर्ज तुळशिबाग उपविभाग यांचेकडे पाठविण्यात आला आहे. तरी आपण हवी असलेल्या माहिती करीता, माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, तुळशिबाग यांचेकडे संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. व पत्राची प्रतिलीपी उपकार्यकारी अभियंता, तुळशिबाग यांना दिलेली दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक २६.११.२००९ रोजी उपकार्यकारी अभियंता, तुळशिबाग उपविभाग यांनी अपीलकर्ता यांना ५ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध**

**झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक ६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात एकुण ७ मुद्यांमध्ये पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यानंतर पुन्हा अपीलकर्ता यांना दिनांक ५.५.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. व त्यात पुन्हा मिटरवर थकबाकी नसताना पुरवठा खंडीत कोणत्या नियमानुसार केला आहे व त्याबाबतची माहिती त्यांनी जोडपत्रात दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना सांगितले की, त्यांच्या परिसरात दोन मिटर आहेत. एक मिटर १९९६ ला बंद करण्यात आले व एक मिटर १९९९ ला बंद करण्यात आले. त्यावेळेस त्यांनी थकबाकी**

**( पान २ वर..)**



**भरलेली होती. परंतु विद्युत जोडणी करुन देण्यात आली नाही. व त्यामुळे माहिती मागितली आहे. ज्या मिटरची त्यांनी माहिती मागितली आहे त्या मिटरच्या संदर्भात त्यांनी ९,०००/- रुपयाची थकबाकी भरलेली आहे. परंतु तरीही विद्युत पुरवठा जोडून देण्यात आलेला नाही. व त्यामुळे खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असे त्यांचे म्हणणे आहे.**

**४. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मुळ अर्जात दिलेल्या मिटरच्या संदर्भात थकबाकी ही भरण्यात आलेली असली तरी त्याच परिसरात दूसरे मिटर आहे व त्यावर थकबाकी आहे. व एकाच परिसरात जर थकबाकी असेल तर विद्युत जोडणी करुन देता येत नाही असा नियम आहे. त्यामुळे त्यांना विद्युत जोडून देण्यात आली नाही. तसेच त्यांना दिनांक ५.५.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय कळविण्यात आला आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचेकडे त्या त्या वेळेस थकबाकी भरल्याच्या पावत्या आहेत. परंतु अपीलकर्ता यांची जी तक्रार आहे त्या तक्रारीच्या संदर्भात गुणवत्तेच्या बाबत तपासणी करण्याचा अधिकार आयोगास नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांचा प्रश्न सोडवून घेण्याकरीता कार्यकारी अभियंता यांचेकडे उपस्थित होऊन त्यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन प्रश्न सोडवून घेणे संयुक्तिक**

**राहील. मात्र त्यांच्या दिनांक १३.११.२००९ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण कं.मर्या.महाल विभाग, पी.सी.एफ. जूनी शुक्रवारी, नागपूर यांचेशी संपर्क साधून त्यांचा प्रश्न सोडवून घ्यावा. त्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी सहकार्य करावे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४४७/नाग/२०१०
अपील क्रं. ४४८/नाग/२०१०
अपील क्रं. ४४९/नाग/२०१०

अपील क्रं. ४४७/नाग/२०१० **व** अपील क्रं. ४४८/नाग/२०१०

१) श्री प्रा.सौ.निर्मला दादाराव कानतोडे,
८४, आयुर्वेदिक ले-आऊट, नागपूर-२४. अपीलकर्ता

अपील क्रं. ४४९/नाग/२०१०

२) श्री विजय ईश्वर देशमुख,
एम.आय.जी.हाऊसिंग बोर्ड क्वार्टर, तुकडोजी पुतळा,
सूपर स्पेशालीटी हास्पीटल समोर, नागपूर-२७. अपीलकर्ता.

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष,
नागरिक शिक्षण मंडळ,क्रिडा चौक,हनुमान नगर, नागपूर. उत्तरवादी

अपील क्रं. ४४७/नाग/२०१०

३)जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,
बजरंग सभागृह/ईश्वर देशमुख सभागृह,
नागरिक शिक्षण मंडळ, क्रिडा चौक, हनुमान नगर, नागपूर. उत्तरवादी

अपील क्रं. ४४८/नाग/२०१०

४)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
श्री भैय्याजी पांढरीपांडे नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ सोशल वर्क,
क्रिडा चौक, हनुमान नगर, नागपूर. उत्तरवादी

अपील क्रं. ४४९/नाग/२०१०

५)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
नागरिक शिक्षण मंडळ, क्रिडा चौक, हनुमान नगर, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २१.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ते यांनी दिनांक २३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपील क्रमांक ४४७/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, संस्थेच्या सभागृहात १ जानेवारी, २००८ ते ३१ डिसेंबर, २००८ या**

**( पान २ वर..)**

कालावधीत झालेले लग्न/समारंभ व इतर कामाकरीता दिल्या गेले या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने किंवा प्रत्यक्ष घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना, आमची शिक्षण संस्था असून सार्वजनिक विश्वस्थ संस्था आहे. व त्यास माहितीचा अधिकार लागू होत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. व त्याप्रमाणे दिनांक २४.२.२०१० रोजी, **as far as the Ishwar Deshmukh Sabhagrih it it exclusively unsed by the Ishwar Deshmukh College of Physical Education for the activities of the their students only. As regards the Bajrang Sabhagrih, it is exclusively used by the Society for conducting their programme etc. and also sometimes allowed to use by our well wishers from a nominal sum is recovered and credited in the respective account.**, असे कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये संस्थेला अनुदान मिळत नाही त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही असे नमूद केले आहे. परंतु संस्थेच्या वकीलानी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचे निर्णयाप्रमाणे संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही. तसेच सोसायटी म्हणून लग्न समारंभाकरीता वापरत नाही असे त्यांनी त्यांच्या शपथपत्रात दिलेले आहे. अर्जदाराने जी माहिती मागितली आहे ती शिक्षण संस्था म्हणून मागितली नाही तर सार्वजनिक विश्वस्थ संस्था म्हणून मागितली आहे. व सार्वजनिक विश्वस्थ संस्थेस शासनाचे अनुदान नसतील तर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही असे त्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी निर्णय दिलेला आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ४४८/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी श्री भैय्याजी पांढरीपांडे यांचेकडे, महाविद्यालया बाहेरील व्यक्तींचे चालत असलेले शिकवणी वर्गाची माहिती एकुण ९ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.१२.२००९ रोजी ९ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. दिनांक २४.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज केलेले दिसून येते. सदरच्या अपीलात सुध्दा अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञापत्राची छायांकित प्रत दाखल केली आहे. व त्यांचे वकील श्री प्रशांत पी. ठाकरे यांनी अध्यक्ष यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. व त्यामध्ये माहिती माहिती जरी दिलेली असली तरी सार्वजनिक विश्वस्थ संस्था असल्यामुळे कायदा लागू होत नाही असे त्यांनी कळविले आहे. व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक ४४९/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, संस्थेत नोकरीला लावलेल्या व्यक्तीसंबंधी (१) १ फेब्रुवारी, २००६ ते नोव्हेंबर, २००९ (२) वरील कालावधीत किती लोकांना नोक-या दिल्या, त्यांची नांवे, कोणत्या शाळा, महाविद्यालयांत कोणत्या पदावर (३) त्याकरीता कोणते निकष लावण्यांत आले, नोकरी

( पान ३ वर..)

**लावताना आर्थिक व्यवहार झाला काय, प्रत्येक व्यक्तीकडून मिळालेली देणगी इ.माहिती टपालाने किंवा प्रत्यक्ष घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२०१० राजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सुध्दा माहितीचा अधिकार लागू होत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**६. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, सदरच्या शिक्षण संस्थेस शासनाकडून अनुदान मिळते, त्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. प्रशांत ठाकरे यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, नागपूर यांनी सार्वजनिक विश्वस्त संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही व नागरिक शिक्षण मंडळ ही सार्वजनिक विश्वस्त संस्था असल्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही, असे कळविण्यात आले होते. असे असले तरी शिक्षकांची माहिती मागितली असल्यामुळे अपीलकर्ता यांना ती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती त्यांना आता उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यावर वकीलानी युक्तीवाद करताना सांगितले की, जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचा तसा समज असल्यामुळे त्यांनी त्यावेळेस माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु, शिक्षण संस्थेस अनुदान असल्यास व शिक्षकांची माहिती असल्यास ती उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही म्हणून अपीलकर्ता यांना आता ती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४४७/नाग/२०१०, अपील क्रमांक ४४७/नाग/२०१०, व अपील क्रमांक ४४७/नाग/२०१० खारीज करण्यात येत आहेत.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४४५/नाग/२०१०

१)श्री संजय ताराचंद सहारे,
इंदिरा माता नगर, बिनाकी ले आऊट, नागपूर-१७. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,
परिमंडळ क्रमांक ३, नागपूर शहर, नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
लकडगंज विभाग, नागपूर शहर, नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २१.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांचेकडे, दिनांक २६.११.२००९ ला पोलीसा विरुध्द केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून यते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.२.२०१० रोजी माहिती तयार असल्याबाबत शुल्क आकारणी पत्र तयार करण्यात आले. त्यावर अर्जदार यांनी दिनांक ८.३.२०१० रोजी शुल्क भरल्याबाबत पावती सादर करुन माहिती माहिती तयार असल्यास देण्याबाबत तोंडी विनंती केल्यामुळे अर्जदारास दिनांक ८.३.२०१० रोजी पोलीस स्टेशन कडून उपलब्ध झालेली माहिती त्यांची स्वाक्षरी घेवून त्वरीत देण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांनी अवाजवी शुल्क आकारणी केली म्हणून दिनांक ९.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. परंतु, अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेला होता व अर्जात माहिती ही स्पिड पोस्टाने घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे व त्यांनी नंतर स्वत: विनंती करुन माहिती स्वहस्ते घेतली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आले. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना १० पृष्ठे देण्यात आली व १३ पृष्ठांचे शुल्क आकारण्यात आले. तसेच माहिती त्यांनी स्वहस्ते घेतली परंतु स्पिड पोस्टाचे चार्जेस घेतले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात स्पिड पोस्टाने माहिती घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे त्यांना स्पिड पोस्टाचा खर्च कळविण्यात आला होता. तो खर्च भरणा जरी त्यांनी केलेला असला तरी त्यांनी स्वतः माहिती**

**( पान २ वर..)**

**देण्याबाबत विनंती केली व माहिती स्वत: घेतली आहे. त्यांना एकुण १३ कागदपत्रे दिलेली आहेत. असे असेल तर जन माहिती अधिकारी यांनी स्पिड पोस्टाचा खर्च अपीलकर्ता यांना परत करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत स्पिड पोस्टाचा जेवढा खर्च येतो तेवढी रक्कम परत करण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४५०/नाग/२०१०
अपील क्रं. ४५१/नाग/२०१०

१)श्री शंकरराव फकिराजी बानकर,
पंचशिल वार्ड(मस्जीद वार्ड) राजूरा(माणिकगड)
ता.राजूरा, जिल्हा चंद्रपूर-४४२९०५. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद राजूरा. ता.राजूरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक,
नगर परिषद राजूरा, ता.राजूरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २६.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० व २०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, गरोबा देवस्थानच्या संदर्भात एकुण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच दिनांक १६.११.२००९ रोजी त्याच देवस्थानाचे संदर्भात एकुण १५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. व त्या संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक १०.१२.२००९ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध करुन दिलेल्या दोनही माहितीच्या संदर्भात समाधान न**

**झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२०१० रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येतात. दोनही प्रथम अपीलांचा निर्णय दिनांक १९.५.२०१० रोजी दिलेला असून अपीलकर्ता यांना संपूर्ण कागदपत्रे दाखविली असताना सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोागाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.**

**३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु युक्तीवाद करतांना त्यांनी उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी गुणवत्तेच्या बाबत आयोगापुढे मुद्ये मांडले. परंतु मुख्याधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जूनी सन १९८८च्या दरम्यानची आहे. व त्यानंतर त्यांचे कार्यालय दोन वेळा स्थानांतर झालेले आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध असेल परंतु ती (misplace)आढळून येत नाही असे लिपिक यांनी सांगितले. त्याबाबत शोध घेतला होता. अपीलकर्ता यांना सर्व कागदपत्रे दाखविली**

**( पान २ वर..)**

**असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु, अजूनही शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४५०/नाग/२०१० व अपील क्रमांक ४५१/नाग/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा शोध घेवून कागदपत्रे उपलब्ध झाल्यास त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४५२/नाग/२०१०

१)श्री हर्षमुमार प्रल्हाद निखाडे,
डॉ.राजेंद्रप्रसाद वार्ड, रामदेव मंदीराजवळ,
मु.पो.ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर-४४२९०७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
कर्मवीर विद्यालय, चरुरखटी, ता.वरोरा, जि.चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २६.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे, सत्र ९३-९४ माहे जून, ९३ (२) सत्र ९३-९४ माहे ऑगष्ट, ९३ च्या हजेरी बुकाची**
**झेरॉक्स प्रत तसेच त्यांना नोकरीतून कमी केल्याबाबत टर्मिनेशन ऑर्डरची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने, दिनांक १४.१०.२००९ रोजी न्यायालयीन खटला चालू असल्यामुळे आमच्याकडे हजेरी बुक प्राप्त झाले नाही. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहे जून, ९३ च्या हजेरी पटाची झेरॉक्स प्रत अर्जदारास १५ दिवसांचे आंत देण्याबाबत निर्णय देण्यात येत आहे असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही दिनांक २०.२.२०१० रोजी त्यांचेकडे हजेरी बुकाची प्रत प्राप्त नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, यापूर्वी सुध्दा त्यांना जून, १९९३ चे हजेरी बुक हे न्यायालयात दाखल केले आहे असे कळविले होते. परंतु त्यांनी न्यायालयात अर्ज केल्यानंतर न्यायालयात ते दाखल झालेले नाही असे त्यांना कळविले आहे. व त्यामुळे त्यांनी ही माहिती मागितली आहे. परंतु तरी सुध्दा हजेरी बुक न्यायालयात दाखल झालेले आहे, असेच कळविले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झालेला दिसून येत नाही. व पुन्हा न्यायालयातून प्राप्त झाल्यावर देण्यात येईल, असेच कळविण्यात आलेले आहे. मुख्याध्यापक यांनी ॲड. त्र्यंबक कुडे यांचेकडे दिलेल्या पत्राची प्रत आयोगाकडे दाखविली व त्यात शिक्षक हजेरी बुक न्यायालयात दाखल केले होते. खटल्याचा**

**( पान २ वर ..)**

**निकाल लागलेला आहे व परंतु रेकॅार्ड शाळेला प्राप्त झालेला नाही. अर्जदाराने जून, ९३ चे हजेरी बुक मागितले आहे, असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यातून ॲड. कुडे यांनी त्याबाबत दिलेले उत्तर मात्र दाखल केलेले नाही. व तीन महिन्याचा कालावधी झाल्यानंतर आज आयोगापुढे, वकीलाकडे अर्ज केला आहे, असे सांगत आहे. तीन महिन्यामध्ये वकीलांना वस्तुस्थिती सांगण्यास वेळ मिळत नाही, हे आश्चर्यकारक आहे व त्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ होत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.**

**४. मुख्याध्यापक यांनी निवेदन सादर केले आहे व त्यात आतापर्यंत त्यांना जून, ९३ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार मे, ९३ पर्यंतचा पगार दिलेला आहे. तसेच सेवा समाप्त होऊन सुध्दा पगाराची मागणी केली आहे असा खुलासा केला आहे. यावरुन जून, ९३ ची हजेरी बुकाची प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे दिसून येते. व ती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ होत आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे विरुध्द रुपये ५००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत त्यांनी मागितलेली जून, ९३ च्या हजेरी बुकाची छायांकित प्रत विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.९.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दर महिन्याचे पगारातून वसून करुन ती** "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४५३/नाग/२०१०

१)श्री कृष्णा हेमराज कनोजिया,
बुध्द नगर, आनंद बुध्द विहाराजवळ,
पो.आंबेडकर मार्ग, नागपूर-४४००१७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी ,
ग्राम पंचायत आंबोरा, पो.उर्जानगर, ता.जि.चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत आंबोरा, पो.उर्जानगर, ता.जि.चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २६.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत आंबोरा यांचेकडे, एकुण ६ मुद्यांवर निर्मल ग्राम स्पर्धा योजनेच्या संदर्भात सन २००६-०७ या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.३.२०१० रोजी रुपये २३२/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक १३.४.२०१० रोजी एकुण ६ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर जी माहिती उपलब्ध झाली आहे त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी निर्मल ग्राम स्पर्धा योजनेच्या संदर्भात जेव्हापासून योजना सुरु झ ाली तेव्हापासून माहिती मागितली होती. परंतु देण्यात आली नाही. व सन २००७-०८ ची माहिती देण्यात आली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी सन २००६-०७ ची माहिती मागितली होती ती दिली. सुरुवातीपासूनची माहिती त्यांनी मागितली नाही. व सन २००७-०८ या कालावधीत सदरची योजना राबविण्यात आली नाही. तसेच आयोगापुढे खुलासा करताना जन माहिती अधिकारी यांनी सन २००३-०४ पासून २००६-०७ पर्यंतची माहिती दिलेली दिसून येते. यावरुन ही संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध आहे. व ती संपूर्ण माहिती अपीलकर्ता यांना**

**( पान २ वर..)**

**छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१)	अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २०.१.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने निर्मल ग्राम स्पर्धा योजनेच्या संदर्भात संपूर्ण माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ ाागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिा-ायम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३५८/नाग/२०१०

१)श्री रमेश विनायकराव कोतवाल,
गणेश नगर, गोंदिया, ता.जि. गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी अध्यक्ष,
गर्व्हनींग कौंसिल, श्री समर्थ न्यू एज्यूकेशन सोसायटी, गोंदिया,
क्षत्रीय गुर्जर समाजवाडीच्या मागे, रेलटोली, गोंदिया,
ता.जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,
गर्व्हनींग कौंसिल, श्री समर्थ न्यू एज्यूकेशन सोसायटी, गोंदिया,
क्षत्रीय गुर्जर समाजवाडीच्या मागे, रेलटोली, गोंदिया,
ता.जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.५.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधि-नयम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. विकास डी. खानोरकर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे ॲड. श्री महाजन हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी म्हणून सचिव, गर्व्हनींग कौंसिल, श्री समर्थ न्यू एज्यूकेशन सोसायटी, गोंदिया यांचेकडे रजिस्ट्रेशन कालावधी व वेळोवेळी केलेली सुधारणा कालावधी ते अद्यावत सुधारणा केली त्या कालावधीची संबंधीत माहिती (१) परिशिष्ट-अ संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी बाबत. (२) परिशिष्ट-ब विधानपत्र (ज्ञापन) ममोरँडम ऑफ असोसिएशन (३) परिशिष्ट-क संस्थेचे नियम व नियमावली (४) परिशिष्ट-ड संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये परिशिष्ट एक (नियम ७) सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० चे कलम ४ प्रमाणे संस्थेचे कार्यकारी मंडळाची विहित नमून्यातील यादी इ. माहिती टपालाद्वारे आवश्यक आहे, असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते.**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.२.२०१० रोजी श्री के.जी. बैस, सचिव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आपल्या संदर्भिय पत्रात मागितलेली माहिती हा कायदा संस्थेला लागू होत नाही. करीता आपण मागितलेली माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.३.२०१० रोजी देण्यात आला असून अपील मंजूर करण्यात आलेले असून, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा**

**( पान २ वर..)**

निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे लेखी निवेदन सादर केले व त्यामध्ये परिशिष्ट-२ मध्ये "That, the Respondent/Secretary in this appeal has informed to the Appellant Ramesh Kotwal that the provisions of R.I. Act २००५ are not applicable to the concerned society that mean Shree Samarth New Education Society Gondia, But it is totally wrong and illegal and not responsible for the simple and clear reason that the said society is receiving १००% grants from the state Govt.to run its ६ High Schools and Two Jr. Colleges. Therefore, the said society is fully covered under preview of R.I. Act २००५. Hence the contention of the information Officer and Secretary to that effect are totally baseless etc..." असे नमूद केले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हे संस्थेचेच अध्यक्ष आहे व त्यांनीच अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे.

४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे सांगितले की, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा संस्थेला लागू होत नाही कारण संस्थेचे सचिव हे माहिती अधिकारी नाही व श्री व्ही.एन.मेश्राम हे संस्थेचे प्रथम अपीलीय अधिकारी नाही. व त्यामुळेच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु, संस्थेला अनुदान मिळते, त्यामुळे संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होतात.

५. जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री विकास डी. खानोरकर यांनी यंक्तीवाद करताना आयोगापुढे सांगितले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, नागपूर यांचे पुढील याचिका क्रमांक ५२९४/२००८ मध्ये दिनांक २८.४.२००९ रोजी निर्णय दिलेला असून सार्वजनिक विश्वस्थ संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होत नाही. व श्री समर्थ न्यू शिक्षण संस्था ही सार्वजनिक विश्वस्थ संस्था असून मुंबई सार्वजनिक विश्वस्थ संस्था अधिनियमाच्या प्रमाणे पंजिबध्द झालेली असल्यामुळे संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होणार नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केली नाही किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांची सुध्दा नियुक्ती केलेली नाही. परंतु त्याच मा.न्यायमुर्ती श्री सी.एल. पांगारकर यांच्या निर्णयामध्ये परिच्छेद-८ मध्ये "**Any person seeking to establish that a particular public trust is covered by the provisions of the Right to Information Act will have to first prove that it is a public trust created by Government or Parliament or** is substantively financed by the government." असे नमूद आहे. तसेच मा.न्यायमुर्ती श्री अे.बी.चौधरी यांचे पुढील याचिका क्रमांक ५१३२/२००८ मध्ये दिनांक २०.८.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे, "संस्था, ही सार्वजनिक विश्वस्थ संस्था आहे. व त्यांना कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही किंवा शासनाचे नियंत्रण नाही व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होणार नाही. व परिच्छेद-८ मध्ये सदरची संस्था ही माहितीच्या

( पान ३ वर..)

अधिकारात येत नाही" असा निर्णय दिलेला आहे. व त्यामुळे सदरचा निर्णय हा विनाअनुदानित संस्थेच्या संदर्भात असल्यामुळे श्री समर्थ न्यू शिक्षण संस्था, गोंदिया या संस्थेस लागू होणार नाही.

६. तसेच शासकिय नवीन शाळा मंजूर करतांना जी संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० च्या प्रमाणे तसेच सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० प्रमाणे नोंदणी

झालेली आहे अशाच संस्थांना शाळा सुरु करण्याची मंजूरी मिळते. वैयक्तिक व्यक्तीला शाळा सुरु करण्याची मंजूरी दिली जात नाही. माध्यमिक शाळा संहिता ही शासनाने प्रसिध्द केली आहे. सदरच्या माध्यमिक शाळा संहिता, अशासकिय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानासाठी शासानाकडून लागू करण्यात आलेली संहिता आहे. व ही संहिता १९६३ पासून अंमलात आलेली आहे. सदरच्या संहितेमध्ये माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी परवानगी मिळविण्याचा अर्ज परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या नमून्यात करावा असे मान्यतेच्या शर्ती, मंजूरी, मान्यता नाकारणे व काढून घेणे या भागात दिलेले आहे. तसेच २.८ मध्ये नवीन माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत खालील निकष पूर्ण करणा-या व्यवस्थापनाचीच शिफारस करण्यात येईल.

(१) संस्था नोंदणी अधिनियम १८६० आणि किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे - नोंदणीकृत असावी.

(२) संस्थेत मागील सलग दोन वर्षात किमाा तीस हजार रुपये निधी शिल्लक असावा. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जी संस्था आदिवासी उपयोजना क्षेत्रात माध्यमिक शाळा सुरु करु इच्छिते अशा संस्थांच्या बाबतीत रुपये १०,०००/- चा निधी संस्थेत शिल्लक असावा किंवा वरील रकमे इतके संबंधीत संस्थेबाबत बँकेमार्फत हमीपत्र दिले गेले असावे.

(३) संस्थेने मागील सतत किमान दोन वर्षाचा सनदी लेखपालामार्फत लेखा परीक्षा अहवाल सादर केलेला असावा.

(४)ज्या ठिकाणी नवीन शाळा सुरु करावयाची आहे त्या ठिकाणी शाळेसाठी संस्थेच्या मालकीची किंवा भाडयाची किमान जागा वा इमारत उपलब्ध असावी.

(५)संस्थेच्या एकूण सदस्यांपैकी किमान ३० टक्के सदस्य महिला असाव्यात.

(६) संस्थेतील कोणत्याही सदस्यास भारतीय दंड संहितेच्या तरतुदीनुसार गंभीर गुन्हयाबाबत तुरुंगवासाची शिक्षा झालेली नसावी.

वरील निकष पूर्ण करणा-या व्यवस्थापनाची शिफारस करण्यात येईल अशी तरतुद आहे. यावरुन नवीन शाळा सुरु करावयाची परवानगी ही फक्त नोंदणीकृत संस्थांना मिळते हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे आुदानासाठी अर्ज, अशा प्रकारची जी तरतुद आहे त्यामध्ये सुध्दा ८६.२ मध्ये सहाय्यक आुदानाची पात्रता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे- खाजगी मालकीच्या शाळा(म्हणजे १८६० चा संस्था नोंदणी अधिनियम क्रमांक एकवीस किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० किंवा शासनाने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या शाळा, जातीय शाळा आणि शासनाने बिगर सहाय्यक अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळा) हया लोकनिधीतून कोणतेही सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असणार नाहीत. तसेच अनुदानाचे प्रकार-८७ यामध्ये- मान्यता प्राप्त शाळा मंजुरी

( पान ४ वर..)

प्राधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार निधी उपलब्ध असेल तर खालील प्रकारची अनुदाने मिळण्यास पात्र असतील. मात्र ज्या संस्था अशा शाळा चालवीत असतील त्या संस्थांची वेळोवेळी दुरुस्त केलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेली असली पाहिजे.

(१) वेतन अनुदान

(२) वेतनेतर अनुदान

(३) इमारत अनुदान आणि

(४) शासकिय वेळोवेळी मंजूर करील अशी इतर अनुदाने

तसेच अनुदानातील कपात-९७.१ मध्ये व्यवस्थापन या संहितेत नमूद केलेल्या नियमांचे यथोचितरित्या पालन करीत नसल्याचे आणि शाळेच्या सर्वसाधारण कार्यक्षमतेचा -हास झाला असल्याचे आढळून आल्यास व्यवस्थापनास स्पष्टीकरण देण्याची यथोचित संधी दिल्यानंतर संबंधीत उपसंचालक अनुदान कपात करु शकतील. ९७.२ मध्ये अक्षम्य गैरव्यवहार कार्यक्षमता व शिस्त यांचा दर्जा गंभीरपणे खालावला असल्यास विभागाचे आदेशाचा भंग इ. कारणास्तव अनुदान कमी करण्याची तरतूद आहे. ९७.३ मध्ये व्यवस्थापनास संचालकांकडे अपील करण्याची तरतूद आहे.

७. यावरुन शैक्षणिक संस्थांनी अटी व शर्ती पूर्ण केल्याानंतरच अनुदान मंजूर होते. व त्यामुळे सदरचे अनुदान प्रत्यक्ष शाळेस देण्यात आलेले असले तरी ते संस्थेच्या माध्यमातून देण्यात येते. याचा अर्थ सदरचे अनुदान हे मान्यताप्राप्त किंवा अटी व शर्ती पूर्ण करणा-या सार्वजनिक विश्वस्थ संस्थेसच असते असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यातही नियंत्रणाचा विचार केल्यास माध्यमिक शाळा संहितेमध्ये खाजगी शाळेच्या संदर्भात कशा प्रकारचे नियंत्रण आहे याबद्दलचे संपूर्ण नियम दिलेले आहेत. तसेच महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या अटी व शर्ती विनियमन अधिनियम, १९७७) यामध्ये सुध्दा खाजगी शाळेच्या संदर्भात तरतुद करण्यात आलेली आहे. व त्यामुळे शाळेला अनुदान मिळते परंतु, संस्थेला अनुदान मिळत नाही हे म्हणणे बरोबर नसल्यामुळे संस्थेस व्यस्थापनाच्या शैक्षणिक संबंधातील कामकाजाबाबत उदा. शिक्षक/कर्मचारी नियुक्ती, बडतर्फी सेवाविषयक इ. संदर्भात माहिती मागितली तर संस्थेच्या माहिती अधिका-यांनी ती देणे आवश्यक आहे.

८. मा. उच्च न्यायालय, दिल्ली मा.न्यायमुर्ती संजीव खन्ना यांनी नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया वि. केंद्रिय माहिती आयोग आयोग या याचिका क्रं. ४७४८/२००७ मध्ये दिनांक १५ एप्रिल, २०१० रोजी दिलेला निर्णय हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (ज) मधील "सार्वजनिक प्राधिकरण" या संज्ञेच्या व्याख्येचे विश्लेषण केले असून त्यातील प्रत्येक संज्ञेच्या अर्थानुसार कोणकोणती संस्थेचा सार्वजनिक प्राधिकरणाचे व्याख्येत समावेश होतो याबाबत निर्णय दिलेला आहे. व त्या प्रत्येक निकषाचे विश्लेषणाप्रमाणे सार्वजनिक विश्वस्थ संस्था-शैक्षणिक-ही सार्वजनिक प्राधिकरणाचे व्याख्येत समाविष्ठ होते.

नॅशनल स्टॉक एक्सचेंज हया संस्थेस शासनाचे आर्थिक सहाय्य नाही तसेच securities contracts (Regulations) Act, १४५६ खाली पंजीबध्द असून सुध्दा माहितीचा अधिकार, २००५ चे कलम २ (ज) मधील "सार्वजनिक प्राधिकरणाचे व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण आहे" असा निर्णय दिला आहे.

( पान ५ वर..)

**९. निर्णयाच्या परिच्छेद १३ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या (२००५) ६ SCC ६५७ या निर्णयाचा आधार घेतलेला आहे तो खालीलप्रमाणे-**

**१३. More recently in Binny Limited and Another versus V.V. Sadasivan, (२००५) ६ SCC६५७, the Supreme Court has reiterated that Article २२६ of the Constitution is couched in a way that even a Writ can be issued against a body which is discharging public function and the decision sought to be corrected or enforced must be in discharge of a public function. A body is performing a public function when it seeks to achieve some collective benefit for the public or a section of the public and is accepted by the public and is accepted by the public or that section of the public as having authority to do so. Bodies, therefore, exercise public functions when they intervene or participate in social or economic affairs of public interest. In the said judgment, the Supreme Court quoted the following passage on what are regarded as public functions from De Smith, Woolf and Jowell in the book Judicial Review of Administrative Action, Fifth Edition in Chapter ३, paras ०.२४, which reads as under:-**

> "A body is performing a 'public function' when it seeks to achieve some collective benefit for the public or a section of the public and is accepted by the public or that section of the public as having authority to do so. Bodies therefore exercise public functions when they intervene or participate in social or economic affairs in the public interest. This may happen in a wide variety of ways. For instance, a body is performing a public function when it provides 'public goods' or other collective services, such as health care, education and personal social services, from funds raised by taxation. A body may perform public functions in the form ofadjudicatory services (such as those of the criminal and civil courts and tribunal system). They also do so if they regulate commercial and professional activities to ensure compliance with proper standards. For all these purposes, a range of legal and administrative techniques may be deployed, including rule making, adjudication (and other forms of dispute resolution); inspection; and licensing.
>
> Public functions need not be the exclusive domain of the State.Charities, self-regulatory organizations and other nominally private institutions (such as universities, the Stock Exchange, Lloyd's of London, churches) may in reality also perform some types of public function. As Sir John Donaldson, M.R. urged, it is important for the courts to 'recognize the realities of executive power' and not allow 'their vision to be clouded by the subtlety and sometimes complexity of the way in which it can be exerted'. Non-governmental bodies such as these are just as capable of abusing their powers as is Government."

**तसेच Dharasing Girls Highschool v/s State Government of Uttar Pradesh & Others (AIR २००८ Allahabad ९२) या याचिकेच्या मा. उच्च यायालय, अलाहाबाद निर्णयात-**

**"Right to Information Act, २००५, ५२ (४) (d) (ii)- Public Authority -Defination-Non-Government Educational Institution recognized under U.P.Highschool and Intermediate Education Act, १९२१ and receiving grant-in-aid from State Govt. falls**

**( पान ६ वर..)**

**within definition of "Public Authority" and amenable to provisions of Act" असा निर्णय दिलेला आहे.**

**१०. यावरुन शैक्षणिक संस्था हया सार्वजनिक विश्वस्थ संस्था असल्यातरी व अनुदानित/विना अनुदानित असल्यातरी शिक्षणाचे सार्वजनिक कामकाज करतात, व त्यावर शासनाचे नियंत्रण आहे, व त्यामुळे अनुदानित शैक्षणिक सार्वजनिक विश्वस्थ संस्थेस माहितीचा अधिकार लागू होतो व सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत असल्याने माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे बंधनकारक आहे.**

**११. त्यामुळे आदानित शिक्षण संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत समाविष्ट होते, अशी आयोगाचे मत झालेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे संस्थेचेच अध्यक्ष आहे व त्यांनी दिलेला प्रथम अपीलाचा निर्णय योग्य दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून श्री समर्थ न्यू शिक्षण सस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू होतो. त्यामुळे सचिव, यांना जन माहिती अधिकारी नियुक्त करावे.**

**२) संस्थेचे अध्यक्ष यांनी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून दिलेला प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे त्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना मागितलेली सर्व माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**ना**गपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 292/2009**

श्री होमराज केशवराव खुसपरे सचिव
ओम साईनाथ बाबा ग्रामीन विकास
शिक्षण विद्या प्रसारक मंडळ वाकी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 8.10.2009 रोजी अपील क्र. 166/2009 च्या निर्णय दि. 5.5.2009 प्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. त्यावर आयोगाचे कार्यालयातून खुलासा मागविण्यात आला होता. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना सर्व रजिस्टर दाखविण्यात आले आहे असे कळविण्यात आले होते असे गेरतक्रारदार यांनी आयोगाकढे सांगितले. व सर्व रजिस्टर मध्ये अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेले दस्तऐवजाची नोंद नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दस्तऐवजाच्या नोंदीचे रजिस्टर दाखविण्यात आले. परंतू गेरतक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की असे कोणत्याही प्रकारचे वेगळे रजिस्टर नसते. सर्व आवक जावक रजिस्टर एकच असते. व त्यात दस्तऐवजाची नोंद नसेल तर ते प्रस्ताव आले नाही तेव्हा तत्कालीन अधिका–यानी नोंद केली किंवा नाही यापलीकडे काहीही माहिती त्यांना सांगता येणार नाही त्यामुळे अपीलकर्ता यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 42/2010**

श्री चंद्रभान सिताराम बारापात्रे
299 ओम नगर नागपूर 440009 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड उपविभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **गैर तक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 26.11.2009 रोजी त्यांच्या तक्रारीच्या दि. 4.11.2009 च्या अनुषंगाने लेखा अधिका–याबरोबर बैठक करुन निर्णय दिला नाही व त्यांना माहिती उपलब्ध झाली करुन दिली नाही अशी तक्रार केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना विजेचे देयकातील सर्व माहिती समजावून सांगितली आहे. त्यांना आतापर्यंत कागदपत्रे व नियमाच्या प्रती दिलेल्या आहेत. परंतू त्यांची देयके चुकीची आहे व त्यामध्ये तफावत आहे व ती दुरुस्ती करुन मिळावी अशी त्यांची मागणी दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदीप्रमाणे कागदपत्रे उपलब्ध होतात व त्यांना सर्व कागदपत्रे उपलब्ध झाली आहे. त्यातून त्यांनी निष्कर्ष काढून स्वतंत्रपणे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही करुन मिळत नाही. सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 316/2010**

श्री सचिदानंद नथ्थुजी लोखंडे
संघर्ष 58 मोहगाव (झिलपी)
ता. हिंगणा जि. नागपूर 441110 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
2) श्री ए. एस. वाडेकर
जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.12.20090 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका भूमी अभिलेख यांचेकडे सन 1911–12 चे बंदोबस्त मिशल मधिल शेतजमिनीच्या दस्तऐवजाची व पूर्ण नकाशाची छायांकीत प्रत मिळणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.1.2010 रोजी अपीलकर्ता यांना सदरच्या नकलेकरीता आपणास बंदोबस्त मिशलचे एका नोंदीस 15 रु. याप्रमाणे तसेच नकाशाकरीता प्रत्येक नंबर करीता 15 रु. प्रमाणे जेवढे नंबर असतील तेवढी फी कार्यालयात भरावी लागेल. सदरची फी भरल्याशिवाय नक्कल देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 18.1.2010 रोजी दारिद्रय रेषेखालील व्यक्तीकडून कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही याबद्यलची तरतूद माहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणले. त्यावर दि. 20.1.2010 रोजी आपण मागितलेली माहिती वैयक्तीक कारणासाठी मागितली नसल्याचे दिसून येते. व त्यात पुन्हा त्यांना फी ची मागणी केलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.2.20090 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.3.2010 रोजी देण्यात आलेला असून महाराष्ट्र जमीन महसूल 1966 चे कलम 327 चे पोट कलम 8,9,10,11,12 अन्वये कळविले असून अर्जदार यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात नियमाप्रमाणे फी भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व त्याचप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या संदर्भामध्ये यशदानी नियम केलेल्या अहवालाची माहिती त्यांना दिली. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक हे त्यांना आवश्यक तेवढीच माहिती कधी मागत नाही. या अर्जदाराने सुध्दा संपूर्ण गावाच्या नकाशा सहीत बंदोबस्त मिशलची सर्व माहिती मागितली व ती अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे ती प्रति पृष्ठ 2 रु. नी देणे शक्य नाही. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 5 च्या नियम 4 प्रमाणे विभागाने त्यांचेकडे नकाशा इतर माहिती देण्याकरीता नियम केले असतील तर त्या नियमाप्रमाणे खर्चाचा भरणा करण्यात यावा व जी माहिती प्रत्यक्ष तयार आहे त्या माहितीचे प्रति पृष्ठ 2 रु. प्रमाणे फोटोप्रत घ्यावी अशी तरतूद आहे. व त्यामुळे नियमाप्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे त्यांनी कळविले होते. त्याहीपेक्षा त्यांना आवश्यक असतील त्या दस्तऐवजाचे निरीक्षण त्यांनी केल्यास त्यांना ती सन 1911–12 ची माहिती मिळू शकेल व तसे त्यांना सुचविण्यात आले होते. त्याप्रमाणे निरीक्षण घेण्यास अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशी तारीख व वेळ कळवून त्यांचेकडे उपस्थित राहून संबंधीत अभिलेखाचे निरीक्षण करावे. व त्यातून माहिती घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 326/2010

श्री जिवन विक्रम निकोसे
बी/2 अनमोल अपार्टमेंट मेकोसाबाग
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वि. वा. बोभाटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (सेवा)
सार्वजनिक बांधकाम विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) श्री दि. वा. दळवी
जन माहिती अधिकारी तथा उपसचिव (वि.चौ.)
सार्वजनिक बांधकाम विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.3.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे श्री जी.वी.निकोसे यांचे विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. सन 2000 मध्ये मुख्य अभियंता सा.बां.प्रादेशिक विभाग नागपूर यांनी पाठविलेली पत्रे, विशेष चौकशी अधिकारी, विभागीय चौकश्याा, विभागीय आयुक्त कार्यालय यांनी सदर प्रकरणी सन 2001 मध्ये शासनास सादर केलेला विभागीय चौकशीचा अहवाल, त्या अहवालावर शासन करीत असलेल्या कार्यवाहीच्या कार्यालयीन टिप्पण्या, आणि त्यात नमूद केलेली सर्व दस्तऐवजांच्या प्रती. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 26.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.1.2010 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आली आहे. तसा विभागीय चौकशीचा अहवाल वरील कार्यालयाने टिप्पणीच्या प्रती सदर

विभागीय चौकशीबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याने न देण्याचा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना अपूर्ण माहिती मिळाली व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (च) नुसार माहिती नाकारलेली आहे. सदरची तरतूद ही अपराध्याच्या संदर्भात आहे. मी अपराधी नाही. मी अपचारी आहे. त्यामुळे सदरची तरतूद विभागीय चौकशीच्या संदर्भात लागू होत नाही. परंतू सदरच्या युक्तीवादाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकढे असे सांगितले की मराठी भाषांतरामध्ये अपराध हा शब्द वापरलेला आहे. परंतू मूळ इंग्रजी प्रतीमध्ये प्रॉसीक्यूशन हा शब्द वापरलेला आहे. व प्रॉसीक्यूशनमध्ये विभागीय चौकशीचा समावेश होवू शकतो व त्यामुळे त्यांना तसे कळविण्यात आलेले आहे. कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे. परंतू काही माहिती उपलब्ध करुन देता येत नसेल तर त्याकरीता अधिनियमाच्या कलम 8 मध्ये अपवाद करण्यात आलेला आहे. व त्या अपवादाच्या कलम 8 (1) (ज) प्रमाणे कळविलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णय योग्य आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 327/2010**

श्री पुरुषोत्तम मारोतराव नंदेश्वर
थ्वक्रमशिला नगर बोधिसत्व, बुध्द विहाराजवळ
सिंदी(मेघे) वर्धा जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(क.व.औ.स.)
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन
डॉ. आनंदराव नायर मार्ग
सेंट्रल मुंबई 400008
2) श्री इ. एफ. परब
जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन
डॉ. आनंदराव नायर मार्ग
सेंट्रल मुंबई 400008 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी यांचेकडे दि. 4.10.2009 ला झालेल्या वि.क.अ. पदाच्या स्वतःची व क्र. 3, 14,21,33,35 च्या उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती तसेच स्वतःच्या प्रत्येक प्रश्नाचे मिळालेले मार्क आदर्श उत्तर पत्रिकेची छायांकित प्रत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.11.2009 रोजी अपीलकर्ता यांना तीन मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.2.2010 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असा निर्णय देवून अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी स्वतःच्या उत्तर पत्रिकेची माहिती व इतरांच्या उत्तर पत्रिकेची छायांकित प्रती मागितलेली होती. परंतू ती त्यांना अधिनियमच्या कलम 8 (1) (जे) नुसार देण्यात आलेली नाही. वास्तविक परीक्षेमध्ये कोणत्या प्रश्नाला किती गुण मिळाले ही माहिती मला उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतू गोपनियतेच्या कारणास्तव ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की

उत्तर पत्रिका हया गोपनिय असतात त्यावर तपासणी करणा–या परीक्षकाची नावे असतात व त्या उपलब्ध करुन दिल्यास त्याचा गैरवापर होण्याची शक्यता असते. तसेच इतरांच्या उत्तर पत्रिका उपलब्ध करुन देणे हे शक्य नसल्यामुळे तसे त्यांना कळविण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला आहे. परंतू स्वतःची उत्तर पत्रिका ही गोपनिय नाही. मात्र परीक्षकाची नावे किंवा सहया हया प्रकट न करता उत्तर पत्रिकेची छायांकित प्रत ही अवलाकनार्थ दाखविणे संयुक्तिक राहिल. इतरांच्या उत्तर पत्रिका हया त्रयस्थ पक्षाच्या असल्यामुळे त्याच्या छायांकित प्रती देणे हे योग्य नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे जे अर्ज आहे त्यामध्ये मिळालेले गुण व आदर्श उत्तर पत्रिकेची प्रत मिळालेली दिसून येत नाही. ती त्यांनी अपीलामध्ये मागितलेली होती. आता त्यांना मिळालेल्या गुणाची माहिती दिलेली आहे. आदर्श उत्तर पत्रिकेची प्रत परीक्षा संपलेली असल्यामुळे देण्यास हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाची तारीख व वेळ कळवून त्यांचे कार्यालयात उपस्थित होवून त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकेचे अवलोकन करावे. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर त्यांची उत्तरपत्रिका त्यांना अवलरेकनार्थ दाखविण्यात यावी. तसेच सोबत आदर्श उत्तर पत्रिकेची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 323/2010

कु. वुदना प्रभाकर लांजेवार
मु. हिरापूर रोड गोरेगाव
पो. ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन मुंबई 32.
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन मुंबई 32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी उपसचिव शालेय शिक्षण विभाग यांचे कार्यालयामध्ये केंद्रिय प्रथ. शाळेच्या मुख्याध्यापकाच्या पदोन्नती व शैक्षणिक पात्रतेबाबद शासन निर्णय 14 नोव्हेंबर 1994 नुसार एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती साधारण टपालाद्वार घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.9.2009 रोजी अपीलकर्ता यांना केंद्र शासन शिक्षण सल्लागार समितीवर शाळा समुह केंद्राच्या मुख्याध्यापकाने सदस्य म्हणून नियुक्ती करणे केंद्र प्रमुखाची शैक्षणिक पात्रता शासन निर्णय क्र.पीआरई–1094/704/प्राशि–1 दि. 18.1.1995 अन्वये निश्चित केले आहे. चार पृष्ठाकरीता रु. 8/– पोस्टेज खर्च भरावा असे त्यांना कळविण्यात आलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 18.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व कागदपत्रे कोणतीही दाखल केलेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की शासन निर्णय दि. 18.1.1995 च्या मुद्या क्र. 5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे केंद्र प्रमुख व पात्र मुख्याध्यापक अशी

दोन वेगवेगळे पद आहेत. ज्यामध्ये केंद्र प्रमुखाची शैक्षणिक पात्रतेचा उल्लेख आहे. परंतू पात्र मुख्याध्यापकाच्या शैक्षणिक पात्रतेचा उल्लेख नाही व तीच माहिती हवी आहे व ती माहिती दिलेली नाही. एकंदरीत केंद्रिय प्रथ. शाळेतील पात्र मुख्याध्यापकाची शैक्षणिक पात्रता पदवीधर (बी.ए.) असणे आवश्यक आहे किंवा नाही याची माहिती मिळाली नाही.

4. अपीलकर्तायांनी आयोगास दि. 18.1.1995 चा शासन निर्णय दाखविण्यात आला. परंतू शासन निर्णयाप्रमाणे केंद्र प्रमुख यांची अर्हता दिलेली आहे. परंतू केंद्र पात्र मुख्याध्यापक याबाबत माहिती दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 2.7.2009 च्या अर्जात तसेच प्रथम अपीलाच्या मध्ये जे स्पष्टपणे दिलेले आहे त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. दिलेली माहिती दिशाभूल करणारी व चुकीची आहे हे निश्चित दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहितीची आवश्यकता आहे. शास्तीची त्यांची मागणी नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 2.7.2009 च्या अर्जात तसेच दि. 18.9. 2009 च्या प्रथम अपील मेमोमध्ये स्पष्टपणे मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 325/2010

श्री व्ही. टी. पाटील
अध्यक्ष आर.टी.आय.कमिटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असा.
ऑफ इंजिनिअर्स नागपूर शाखा
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन
डरुवला कॉलनी वर्धा रोड नागपूर 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आ. बा. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव
जलसंपदा विभाग
मंत्रालय मुंबई
2) श्री प्र. प्र. गोसावी
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा)
जलसंपदा विभाग
मंत्रालय मुंबई ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा) जलसंपदा विभाग यांचेकडे श्री ब. ग्या. गोन्नाडे कार्यकारी अभियंता यांचे संदर्भात तीन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 12.1.2009 रोजी उत्तर दिलेले दिसून येते. परंतू त्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे दि. 29.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 3.3.2009 रोजी सदर धारीका मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून परत घेण्यापूर्वीच अपील अर्ज केला असून माहिती अद्याप प्राप्त न झाल्याचे कळविले आहे. पुन्हा कळविण्यात येते की मागितलेली माहिती ही सद्या सदरीकरणात असलेल्या धारीकेत

समाविष्ट आहे. आपणास हवी असलेली माहिती नाकारण्यात आलेली नाही. अपील अर्ज विचारात घेता येणार नाही. तरी व्यक्तीशः काही प्रतीपादन करावयाचे असल्यास दि. 12.3.2009 रोजी उपस्थित व्हावे असे कळविलेले दिसून येते. परंतू त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून नस्ती परत आल्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 28.4.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती उपलब्ध झालेली असेल व त्यामुळेच अपीलकर्ता गैरहजर राहिलेले असतील असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 324/2010**

श्री कृष्णा हेमराज कनोजिया
बुध्द नगर आनंद बुध्द विहाराजवळ
नागपूर 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महसुल व वन विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) श्री एस. एस. गोखले
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
महसुल व वन विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव महसुल व वन विभाग यांचेकडे श्री जी.एन.खापेकर तहसीलदार आमगाव, गोंदिया यांना निलंबित केल्याचे कागदपत्रे, चार्जशीट, नोटशीट सह तसेच शासन सेवेत पुनः स्थापीत केल्याबाबतच्या नस्तीच्या टिप्पणीच्या सगळे कागदपत्रे मिळणेबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 23.3.2010 रोजी द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा अर्ज दि. 8.2.2010 रोजी प्राप्त झाला. दि. 19.3.2010 रोजी अतिरीक्त शुल्क भरण्यास त्यांना कळविण्यात आले. दि. 5.4.2010 रोजी त्यांनी अतिरीक्त शुल्काचा भरणा केला. दि. 19.4.2010 रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

2

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 336/2010**

श्री कृ. के. चांदेकर
50 दत्तात्रय नगर नागपूर
ता. जि. नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आय. एस. कसबे
प्रथम अपीलीय अधिकारी
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे
2) श्री एस. एम. यादव
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
28 क्वीन्स गार्डन पुणे 411001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचेकडे A Compilation of historical authorities showing the koshti as a separate occupational caste distict from the Halba tribe and the koshti not being merely the name of the profession of weaving अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 27.7.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

अपीलकार श्री चांदेकर यांनी ज्या पुस्तकाची प्रत मिळण्याची विनंती केली आहे ते पुस्तक नसून शासनाने हलबा/हलबी कोष्टी या जातींचा अभ्यास करण्यासाठी डॉ. फरेरा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ञ समितीने त्यांचा अहवाल तयार करण्यासाठी

पूर्व अभ्यास म्हणून तयार केलेले साहित्याचे एकत्रिकरण आहे. डॉ. फरेरा यांनी तयार केलेला अहवाल शासनास सादर केलेला आहे. त्या अहवालाची प्रत अर्जदार यांना शासनाकडून मागणी करता येईल. तथापि, सदर अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी समितीने वापरलेल्या प्राथमिक दस्तऐवज किंवा इतर कोणतेही साहित्य या कार्यालयात उपलब्ध नाही. तसे यापूर्वीही शासनास अर्जदारास तसेच मा. राज्य माहिती आयोगासही दुस–या एका प्रकरणात सादर केलेले आहे.

प्रसंगतः असेही नम्रपणे नमूद करण्यात येते की श्री चांदेकर यांनी हलबा/हलबी कोष्टी यासंबंधी आजवर या कार्यालयाकडे शासनाकडे तसेच या कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार या कायद्याअंतर्गत एकुण 19 वेळा माहितीची मागणी केलेली आहे त्या अनुषंगाने त्यांना आवश्यक असलेली माहिती 19 वेळा देण्यासाठी या कार्यालयाने प्रामाणिकपणे प्रयत्न करुन जी माहिती उपलब्ध आहे त्याची प्रत श्री चांदेकर यांना वेळोवेळी या कार्यालयाचे पत्र दि. 13.2.2006, 17.3.2006, 17.7.2006, 22.2.07, 10.11.06, 20.11.06, 4.11.06, 10.11.06, 20.11.06, 12.1.07, 18.10.07, 10.12.07, 5.1.08, 1.11.08, 14.11.08, 6.2.09, 20.2.09, 13.5.09 उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच त्याच अनुषंगाने या कार्यालयामध्ये असलेल्या गंथालयातील विविध संदर्भ ग्रंथ/पुस्तके कार्यालयीन वेळेत पाहण्याबाबतही त्यांना वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तरी श्री चांदेकर यांनी विचारणा केलेली माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने ती त्यांना उपलब्ध करुन देता आलेली नाही व देता येणे शक्य नाही. सबब सदरचे अपील कृप्या खारीज करण्यात यावे ही विनंती.

वरील खुलाशात दिलेले उत्तर योग्य आहे असे दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

**आ दे श**

1) जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 341/2010**

श्री डॉ. मुन्नावार युसुफ
म्हेंदीबाग गार्डन पो.ऑ.आंबेडकर मार्ग
बिनाकी मंगळवारी नागपूर 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद
पाणचक्की औरंगाबाद 431002
2) जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद
पाणचक्की औरंगाबाद 431002 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचेकडे Copy of Wakf Regulations २००३ as referred in the Minutes of Wakf Board meeting dated ६-१२-२००३. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2009 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 26.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 7.1.2010 रोजी 15 दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री ॲड. कडू यांनी युक्तीवाद केला. व आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती त्यांचेकडून उपलब्ध झाली नाही तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे एकाच कार्यालयात असतांना सुध्दा त्याच दिवशी माहिती उपलब्ध करुन न देता 15 दिवसात माहिती द्यावी असा माहिती देण्या टाळाटाळ करणारा निर्णय त्यांनी दिला. व असा युक्तीवाद केला की एकाच कार्यालयात ते उपस्थित होते. त्यामुळे मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी सुध्दा सदरच्या Regulation ची प्रत देण्यास हरकत नव्हती.

4. उत्तरवादी हजर नाहीत व त्यांचे तर्फे जी व्यक्ती हजर आहे त्या व्यक्तीच्या हजर राहण्यास अपीलकर्ता यांनी हरकत घेतली आहे. ते कोणतेही पदाधिकारी नाही व वक्फ बोर्डाचे कर्मचारी नाही व त्यांना त्याबद्यल काहीही माहिती नाही. ही त्या व्यक्तीनी सुध्दा कबूल केले. व तसेही कोणतेही

कागदपत्र दाखल केलेले नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे ते शास्तीस पात्र आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतू त्यांना संधी देवूनही ते आज हजर झालेले नाही. व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांनी दि. 23.11.2009 च्या निर्णयात मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. ती न उपलब्ध करुन दिल्यास ते पुन्हा शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 23.11.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही व अर्जाची सुध्दा दखल घेतली नाही या कारणास्तव त्यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 51/2010**

श्री डी. नंदन लोहरुका
प्लॉट नं. 62ए साई महिमा कॉलनी
चिचभवन वर्धा रोड नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री सुरेश देव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (नि)(पश्चिम)
नागपूर सुधार प्रन्यास सदर स्टेशन रोड
नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 21.1.2010 रोजी अपील क्र. 1011/2009 मधील दि. 30.11. 2009 च्या निर्णयाप्रमाणे 20 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) प्रमाणे तक्रार केली आहे. सदर तक्रारीच्या संदर्भामध्ये दि. 3.3.2010 रोजी खुलासा करण्यात आला होता. सदरच्या खुलाशाप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 8.1.2010, 13.1.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे आयोगाकडे कळविण्यात आले. त्याप्रमाणे पुन्हा दि. 21.1.2010 रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना तपशीलात संपूर्ण प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व असे असून सुध्दा तक्रारदार यांनी पुन्हा तक्रार दाखल केलेली आहे. पुन्हा गैरतक्रारदार श्री डी. नंदन लोहरुका यांनी मागितलेल्या माहितीमध्ये दि. 25.2.2009 व 16.1.2010 यांना वेगवेगळी माहिती प्राप्त झाल्याचे कळविले आहे. ती माहिती नागपूर सुधार प्रन्यासच्या अभिलेखामध्ये एकत्रित उपलब्ध नसल्याने ती संकलीत केल्यावर त्यांना देण्यात आली आहे. या अभिन्यासातील अभिलेखे/धारीका हया नागपूर महानगर पालिकेकडून प्राप्त झाले असून त्यामध्ये नागपूर महानगर पालिकेकडून काही धारीकाची माहिती त्यांचेकडून पाठविण्यात आले नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामध्ये त्या पत्राद्वारे सहा. संचालक, नगर रचना, नागपूर महानगर पालिका नागपूर यांना उपरोक्त प्रकरणात काही भूखंडाच्या धारीका त्यांच्या रेकार्ड मध्ये राहील्या असल्यास त्या नागपूर सुधार प्रन्यासला पाठविण्यात यावे. तसेच यापूर्वी पाठविण्यात आलेल्या धारीकेची यादी पाठविण्याची विनंती केली आहे. नागपूर महानगर पालिकेकडून माहिती अप्राप्त आहे. वरील खुलाशावरुन व जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे दिसून येते की यामध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध असून ते उपलब्ध करुन देत नाही असे दिसून येत नाही. महानगर पालिका व नागपूर सुधार प्रन्यास हया सार्वजनिक प्राधिकरणाची व शासनाच्या धारणाच्या संदर्भामध्ये निर्णय

प्रक्रियेमधील धारीका माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध झाली आहे किंवा नाही व या प्रकरणाची व्याप्ती फार मोठी आहे. तीन लाखापर्यंत भूखंड धारक असावे व त्यामुळे संपूर्ण धारकाची स्वतंत्र एजन्सीला काम देण्यात येवून त्यांची नोंद सुरु आहे असे सांगितले. व त्यावरुन फक्त माहिती अधिकारी दोषी आहे असा निष्कर्ष काढता येत नाही व त्यांनी चुकीची माहिती दिली आहे असाही निष्कर्ष काढता येत नाही. त्यावरही गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की तक्रारदार यांना ज्या ज्या भूखंड धारकाकडून माहिती उपलब्ध होईल त्याची माहिती त्यांनी जर त्यांना आणून दिली तर ती तपासून पुढील कार्यवाही करता येईल. अन्यथा नोंदणीचे काम हे दीड वर्षापर्यंत सुरु राहील. त्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 342/2010

श्री राजहंस मन्याराम बोरकर
मु. बुधेवाडा पो. झरपडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वाकुलकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विषेश समाज कल्याण अधिकारी
गडचिरोली ता. जि. गडचिरोली
2) श्री विजय शामरावजी समर्थ
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
अंकुर आश्रम शाळा वैरागडे
ता. आरमोरी जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे कर्मचाल्याची सेवा जेष्ठता यादी. संचमान्यतेची प्रत सन 1997—98 ते 2009 पर्यंतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 14.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 29.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ती माहिती त्यांना चुकीची उपलब्ध करुन दिली. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांना मिळालेल्या सेवा जेष्ठता यादीचे अवलोकन केले असता त्यामध्ये श्री आर.एम.बोरकर यांचे नावा पुढे कालावधी दि. 17.7.1998 ते 30.7.98 असा दिलेला आहे. तो सकृतदर्शनी युकीचा आहे. दि. 17.7.197 अपेक्षित आहे. परंतू ती लेखन चुक आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व ती लेखन चुक त्यांनी अपीलकर्ता यांना दुरुस्त करुन दिली असून ती प्रमाणित करुन दिली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 340/2010**

श्री दिगंबर नत्थु रामटेके
कुंभारे नगर पिंपरा रोड
श्री राहुल देशभ्रतार यांच्या घरासमोर तुमसर
पो. ता. तुमसर जि. भंडारा 441912 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ग. ब. रबडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ औरंगाबाद
मिलींद कॉलेज समोर छावणी पोसट बॉक्स क्र. 566
औरंगाबाद 431002
2) श्री एम. एस. पाटील
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ औरंगाबाद
मिलींद कॉलेज समोर छावणी पोसट बॉक्स क्र. 566
औरंगाबाद 431002 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचेकडे दि. 1.10.1999 पासून मंजूर केलेल्या आगावू वेतनवाढ पुर्नविलोकन कार्यवाहीची माहिती माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 1.11.2010 रोजी कार्यालयात रु. 11/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतू तसे न करता अपीलकर्ता यांनी दि. 9.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. निरंक रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

2

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्यांच्या दिनांक 28.8.2006 च्या पुर्नविलोकन अर्जाचा विचार करुनच माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. दि. 18.2.2010 रोजी अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. व तशी ती दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 290/2010**

कु. मिना तुकाराम मोरखंडे
प्लॉट नं. 51 सहयोग नगर नारी रिंग रोड
पावर ग्रेड ऑफिसचे मागे नागपूर 26 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुरेश सोने
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क्रमांक 3 नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एच. एल. डुंबरकर
जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त
लकडगंज विभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 28.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधिकारी लकडगंज पोलीस स्टेशन नागपूर यांचेकडे दि. 13.5.1996 रोजी लकडगंज पोलीस स्टेशन नागपूर यांचेकडे श्री ईश्वर सुर्यभानजी बोलधन आणि सौ. पुष्पा ईश्वर बोलधन राह.बगडगंज भंडारा रोड नागपूर यांचेविरुध्द अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा 1989 अंतर्गत दिलेली तक्रीबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.1.2010 रोजी आपण मागितलेल्या अर्जाच्या माहिती संबंधाने सदर तक्रारीची पोलीस नियमावली भाग(2) नियम 262 अन्वये अर्ज जतन करण्याचा कालावधी 2 वर्षाचा असल्याने आपण मागितलेली माहिती कालबाहय झाल्यामुळे माहिती पुरविता येत नाही. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.3.2010 रोजी देण्यात आलेला असून पडताळणी केली असता असे दिसून येते की अर्जदार यांनी 13.5.1996 रोजी श्री ईश्वर सुर्यभानजी बोलधन आणि सौ. पुष्पा ईश्वर बोलधन यांचे विरुध्द पोलीस स्टेशन लकडगंज येथे रिपोर्ट दिला की सन 1986 पासून भारतीय विद्यानिकेतन बगडगंज शाळेत शिक्षिका म्हणून काम करीत होती तेथील संचालक श्री ईश्वर बोलधन यांनी तिला आजपावेतो परमनन्ट केले नाही व पगार दिला नाही. व पगार मागण्यास गेली असता गैरवर्तन केले यासंबंधाने पो.स्टे.लकडगंज येथे स्टेशन डायरी गुन्हा क्र. 41 प्रमाणे नोंद करुन एन.सी.क्र. 196 कलम 504 भादंवि प्रमाणे गैरअर्जदारास कोर्टात कारवाई करण्याची समज दिली आहे. आपण अपील अर्जात मागितलेली माहिती, माहिती अधिकारी तथा सपोओ लकडगंज विभाग व पो.स्टे.लकडगंज यांनी पुरविल्यावरुन अपीलकर्ता यांना सदरची माहिती सोबत जोडून देण्यात येत आहे

असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे वकील ॲड. नानाबाबू एस. भगत यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये जे बयाण घेतलेले आहे त्याच्या प्रती जतन करणे आवश्यक होते परंतू त्या नष्ट करण्यात आलेल्या आहेत किंवा उपलब्ध नाही असे कळविणे म्हणजे माहिती देण्याची टाळाटाळ करणे आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अभिलेखे जतन करण्याच्या नियमाप्रमाणे अभिलेखे नष्ट केले जातात व सदरची एन.सी. असल्यामुळे त्याबाबतची कागदपत्रे जतन करण्याची आवश्यकता नसते व त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आलेले आहे. परंतू एन.सी. जरी असली तरी पोलीस स्टेशन डायरी माध्ये त्याबाबतची नोंद असेते व ती रजिस्टरे ही कायम स्वरुपी अभिलेखे असल्यामुळे तेवढी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे. असे असेल तर त्यांना कागदपत्रे पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन देता येतील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशी तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून संबंधित अभिलेखाचे पाहणी करुन त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य घ्याव्या. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता हजर झाल्यावर यांना अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात यावी व माहिती उपलब्ध झाल्यास विनामुल्य छायांकित प्रती द्याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 237/2010

श्री रमेश धनसिंग राठोड
1 के बापूनगर उमरेड रोड
नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त
विक्रीकर भवन नागपूर
2) श्री दिपक वाधमाने
जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त यांचे स्वीय सचिव
विक्रीकर भवन नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 12.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2010 रोजी अपीलीय अधिका–याचे संदर्भिय पत्र दि. 9.4. 2010 रोजी प्राप्त झाल्यामुळे त्यांना हवी असलेली माहिती बाबतचे अपीलकर्ता यांचे समाधान झाले आहे करीता अपील मागे घेत असल्याचे कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord६.६९३-

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 304/2010**

श्री सुरेंद्र पुंडलिकराव रेवतकर
प्लॉट नं. 345 हनुमान मंदिर मागे आय.यु.डी.पी.काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क्रमांक 1 नागपूर
2) श्री पी. पी. धरमसीकर
जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त
सिताबर्डी विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी सहा. पोलीस आयुक्त सिताबर्डी नागपूर यांचेकडे केस क्र. 382/08 एफआयआर नं.एम केस1/08 सिताबर्डी पोलिस स्टेशन नागपूर अंतर्गत न्यायालयात सादर केलेल्या चार्जशिटची संपूर्ण कागदपत्राची सत्यप्रत देण्याची तसदी करावी. तसेच चार्जशिट नं. आणि केव्हा सादर केली ती दिनांक दयावी. कोण्या कोर्टाचा जामिन आणला पोलिस विभागाला सहा रिपोर्ट झाल्या त्यावर झालेली कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.2.2010 रोजी मागितलेल्या माहितीच्या बद्यल चार्जशिट गेलेली नसल्यामुळे कागदपत्रे देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व इतर माहिती त्यांना पुरविलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 2.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.3.2010 रोजी देण्यात आलेला असून दि. 14.2.2010 रोजी अर्जदार यांना माहिती देण्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी पत्र तयार केले. परंतू अर्जदार यांनी माहिती घेण्यास नकार दिला. तसेच त्यांचे इतर माहितीच्या संदर्भात अपील अंशतः मान्य करुन केस क्र. 382/08 मध्ये प्रथम न्यायदंडाधिकारी वर्ग पहिला कोर्ट क्र.2 एम केस दाखल करुन गुन्हयाचा तपास करण्याबाबत आदेश दिल्याने पो.स्टे.सिताबर्डी येथे एम.केस क्र.1/08 कलम 379, 176, 193, 202, 201, 203, 204, 34 भादंवि सह कलम 05 मडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेगनेन्शी ॲक्ट 1971 प्रमाणे दाखल असून सदर एम. केस मध्ये एकुण 14 आरोपी असून एकाही आरोपीने कोर्टाची जामीन घेतलेली नाही व त्यांना सदर गुन्हयात अटक केलेली नसुन कोर्टात दोषारोपपत्र पाठविलेले नसल्याने दोषारोप नंबर नाही. दि.1.2.08 ते 31.1.10 या कालावधीत कोणत्याही आरोपीने कोर्टातून जामीन घेतलेला नाही. परंतु सदर एम. केस मध्ये झालेल्या तपासाबाबतचा अहवाल वेळोवेळी मा. प्रथम न्यायदंडाधिकारी वर्ग पहिला कोर्ट क्र.2 यांचे कोर्टात पाठविलेला आहे. ही माहिती आपणास देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना अपेक्षित अशी माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की तपासाबद्यलची सर्व माहिती व अहवाल हा न्यायालयाकडे सादर करण्यात आलेला आहे. परंतू तो अपीलकर्ता यांनी घेण्यास नकार दिलेला आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना अपेक्षित अशी माहिती नसल्यामुळे त्यांनी तो घेण्यास नकार दिला होता. गुन्हयाचे स्वरुपात व त्याबाबतचा तपास व त्याबाबतची कार्यपध्दती जशी असे त्याप्रमाणे कार्यवाही झालेली असल्यास त्या कार्यवाहीची माहिती जशी आहे तशी उपलब्ध होवू शकेल. अपीलकर्ता यांना काय पाहिजे किंवा अपीलकर्ता यांची काय अपेक्षा आहे त्याप्रमाणे माहिती असेलच असे नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी उपलब्ध असलेली माहिती घेणे संयुक्तिक राहिल. त्याप्रमाणे त्यांनी आयोगाचे समोर उपलब्ध असलेली माहिती घेतली. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 351/2010

श्री मनोज सुखदेव खोब्रागडे (पो.हवा.)
गुन्हे अन्वेषन विभाग पथक चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मा. जिल्हा न्यायाधिश–1
जिल्हा न्यायालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक
जिल्हा न्यायालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी प्रबंधक जिल्हा न्यायालय यांचेकडे श्री ए. एफ. गवई सहा.धर्मदाय आयुक्त यांचे विषयी केलेला चौकशी अहवालाची प्रत मिळणेबाबत. सदरची माहिती टपालाद्वार घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 21.1.2010 रोजी सदरचा चौकशी अहवाल हा मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे पाठविलेला असल्यामुळे तो उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 29.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 26.2.2010 रोजी देण्यात आलेला असून अधिनियमाचे कलम 8 (1) (जे) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे तक्रार केली होती व त्या तक्रारीची चौकशी मा. जिल्हा न्यायाधिश यांनी केलेली असल्यामुळे त्यांना माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा

चौकशी करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने केलेले असल्यामुळे चौकशी अहवाल हा मा. उच्च न्यायालयाकडे पाठविण्यात आलेला आहे. व सदरची चौकशी ही गोपनिय असल्यामुळे जिल्हा न्यायालयामध्ये त्याबद्यलची कोणतीही कागदपत्रे आता नाही. त्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांनी ज्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये तक्रार केली होती त्या सार्वजनिक प्राधिकरणासच मागणे संयुक्तिक झाले असते. मा. उच्च न्यायालयानी चौकशी करण्याचे आदेश केले असल्यामुळे चौकशी अहवालाची प्रत ही जिल्हा न्यायालयाकडून उपलब्ध करुन देणे सुध्दा शक्य नाही. त्यामुळे व अपीलकर्ता यांनी सदरची बाब मान्य केली असल्यामुळे त्यांनी मा. उच्च न्यायालयामध्येच ज्या तारखेला तक्रार केली होती त्याबाबतचा संदर्भ देवून मागणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 352/2010

श्री वासुदेवराव पांडुरंग सातफळे
गाळा क. 87, 88–203
गाळे अल्प उत्पन्न गट दवलामेटी
नागपूर 440023 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री जैराम तेजराम रघुवंशी
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी मिळकत व्यवस्थापक वसुली अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे 1. गाळा क. 87,88 ची निश्चित किंमत किती
2. 64000 च्या व्यतिरिक्त व्याजाची आणि घराची किंमत वाढते का?
3. 20 रु. च्या कारा स्टॅम्प पेपरवर काय माहिती लिहजी व तसेच त्याची झेराक्स कॉपी देण्यात यावी
4. गाळा क. 87,88 चे आजपर्यंत किती पैसे भरले व राहिलेले किती पैसे भरावे लागेल याची माहिती दयावी. अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.12.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 21.12.2009 माहिती मागण्याचा अर्ज केलेला दिसून येतो. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.2. 2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.5.2009 रोजी देण्यात

आला. परंतू अपीलाच्या संदर्भामध्ये कोणती चुक आहे असे त्यांनी स्पष्ट केले नव्हते व तारखेवर हजर झाले नाही व त्यामुळे संपूर्ण
माहिती उपलब्ध झाली असे गृहीत धरुन सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे तसे त्यांना कळविलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना चुकीची माहिती उपलब्ध दिलेली आहे. गाळा क्र. 88 चे रु. 75,540/– चे मुळ बिल आहे. तो म्हाडा यांच्या पत्रानुसार रु. 34000 भरले आहे व ते संपूर्णपणे चुकीचे असून मला ते मान्य नाही करीता मी आपल्याकडे प्रतिज्ञापत्र सादर करीता आहे. मात्र यामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारे त्यांचेकडे असलेले कागदपत्रे सादर केलेले नाही व प्रतिज्ञापत्रातही कोणत्याही प्रकारचा खुलासा नाही. त्यावरुन अपीलकर्ता यांना काय अपेक्षित आहे याबद्यलचा काहीही निष्कर्ष काढता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती मिळालेली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. मिळालेल्या माहिती वरुन व त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या पुराव्यावरुन त्यांनी म्हाडा कार्यालयात त्यांचेकडे असलेले पुरावे सादर करुन न्याय मिळवून घेता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे गुणवत्तेच्या बाबत कोणतीही चौकशी करता येत नाही. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 350/2010

श्री जनार्दन गुलाबराव मून
केंन्द्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच
791 नागसेवन नागपूर 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर
ता. जि. कोल्हापूर
2) जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक
समाज कल्याण विभाग
जिल्हा परिषद कोल्हापूर
ता. जि. कोल्हापूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडे दि. 18.8.2004 ते 31.12.2009 पर्यंत नविन अपंगाच्या अनुदानित विशेष शाळा कर्मशाळाची माहिती माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती साधारण टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 20. 2.2009 रोजी अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या कलम 3 प्रमाणे नागरीक म्हणून मागणी केलेली नसल्यामुळे अर्ज फेटाळणत आलेला दिसून येतो. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 27.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी केंद्रीय अध्यक्ष नागरी हक्क संशोधन मंच असा जरी अर्ज केलेला असला तरी त्यांचे नाव व पत्ता दिलेला आहे. नाव दिलेले असल्यामुळे ते नागरीक आहेतच व त्यामुळे त्या कारणास्तव

अर्ज नाकारणे हे संयुक्तिक नव्हते. नाव न देता पदाधिकारी म्हणन अर्ज केला असता तर अर्ज नाकारणे संयुक्तिक होते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी न घेता निर्णय सुध्दा दिलेला नाही. अधिनियमाच्या कलम 19 (5) अन्वये माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही किंवा का नाकारले हि सिध्द करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी अपीलात माहिती मिळाली नाही असे कारण जरी दिलेले असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना विचारणे क्रमप्राप्त आहे. परंतू तसे न करता अपीलकर्ता गैरहजर आहे या कारणास्तव अपील खारीज करणे किंवा सुनावणी न घेणे हे गैर आहे. उत्तरवादी यांचे तर्फे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी हे उपस्थित नाही. त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री बाळासाहेब वाकडे सहा. सल्लागार हे उपस्थित आहे. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांना माहिती दि. 26.3.2010 रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की आयोगाचे कार्यालयातून दि. 9.4.2010 रोजी नोटिस काढल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्याचे दाखवून तारीख मात्र दि. 26.2.2010 दिलेली आहे. व हया कार्यालयातून नोटिस काढल्यानंतर सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे हे जरी मान्य केले परंतू जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व ती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे त्या कारणास्तव त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा 30 दिवसाचे आत किंवा विशेष परिस्थितीमध्ये 45 दिवसाचे आत प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली किंवा नाही याबाबतची खात्री करुन निर्णय देणे आवश्यक असते. तो दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे तसेच शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 2.2.2010 रोजी अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद कोल्हापूर** यांनी करावयाची आहे

2) प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची विहित मुदतीत सुनावणी न घेता अधिनियमाच्या तरतुदीचे तसेच शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना समज देण्यात येते.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 349/2010**

श्रीमती पंचफुलाबाई ओंकार रामटेके
आंबेडकर नगर त्रिशरण चौक कुंजीलाल पेठ
भगवान नगर नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिगांबर मेहेर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन्य नागपूर
2) श्री भूते
जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक (नगर रचना विभाग)
महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन्य नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त धंतोली झोन क्र. 4 यांचेकडे वार्ड क्र. 14 येथील घर क्र. 3611/अ24/9 चे मालक गणेश जयदेव नगरकर यांनी घराचे बांधकामाकरीता म.न.पा.ची मंजूरी घेतली आहे काय? असल्यास मंजूर बांधकाम नकाषाची सत्यप्रत मिळण्याबाबत तसेच वरील घराचे बांधकाम अधिकृत आहे किंवा अनधिकृत आहे अशी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.1.2010 रोजी सहा. आयुक्त वार्ड अधिकारी धंतोली झोन क्र. 4 यांनी सहा. संचालक नगर रचना यांचेकडे अर्ज हस्तांतर केला व अपीलकर्ता यांना कळविले. माहिती अधिकारी तथा सहा. संचालक यांनी दि. 15.2.2010 रोजी अर्जात माहिती बाबतचे पुर्ण तपशिल दिलेले नाही (घर मालकाचे नाव, मंजूर नकाशा क्रमांक व इमातर परवाना क्रमांक इत्यादी) तपशील दिल्यास व ती माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध असल्यास आपणास योग्य शुल्क भरुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील सुध्दा दि. 8.3.2010 खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की मालमत्तेच्या संदर्भात माहिती ही बिल्डींग परमीट व प्लॅन नंबर प्रमाणे ठेवण्यात येते. घर नंबर किंवा वार्ड नंबर किंवा मालमत्तेच्या मालकाचे नावाप्रमाणे ते बदलण्याची आवश्यकता असल्यामुळे माहिती उपलब्ध होवू शकत नाही. परंतू बिल्डींग परमीट व प्लॅन नंबर हा त्या सर्वसाधारण नागरीकास माहिती नाही व म्हणूनच त्यांनी माहिती मागितलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की कमीत कमी
बांधकामाचा कालावधी दिल्यास त्या ठरावीक कालावधीमध्ये शोध घेता येईल. आता मात्र सिटी सर्व्हे व मौजा प्रमाणे माहितीची नोंद ठेवण्यात येत असल्यामुळे व सिटी सर्व्हे नंबर हा कधीही बदलत नसल्यामुळे माहिती मिळू शकेल. आयोगापुढे महानगरपालिकेच्या संदर्भामध्ये कर निर्धारणाच्या संदर्भात मालमत्तेच्या नोंदी संदर्भात

किंवा बांधकामाच्या संदर्भामध्ये माहिती मागणा–याची संख्या भरपूर आहे. परंतू त्या त्या विभागातून सुध्दा माहिती ही योग्य रित्या संकलित केलेली नसल्यामुळे उपलब्ध होवू शकत नाही. वास्तविक महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये प्रत्येक मालमत्तेची संपूर्ण माहिती एकत्रित असणे अपेक्षित असते. परंतू प्रत्येक विभाग हा दुस–या विभागाकडे निर्देश करुन अर्जदाराना माहितीही उपलब्ध करुन देत नाही किंवा योग्य ते मार्गदर्शनही करीत नाही व त्यामुळे संगणकीय काळामध्ये एका मालमत्तेच्या संदर्भामध्ये कर भरल्याची माहिती, बांधकामाच्या परवानगीच्या संदर्भात तसेच पाणीपटीच्या संदर्भामध्ये माहिती एकत्रित माहिती संकलित केल्याचा कोणत्याही नागरीकाची तक्रार असण्याचे कारण नाही व त्याप्रमाणे महानगरपालिकेनी संगणकामध्ये माहिती संकलित करावी. जेणेकरुन नागरीकांना एकत्रित माहिती उपलब्ध होवू शकेल. सद्याच्या अपीलाच्या संदर्भामध्ये मात्र बांधकामाचा कालावधी दिल्यास माहिती शोधून काढता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे बांधकामाचा कालावधी देणे संयुक्तिक राहिल. सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 348/2010**

अध्यक्ष, द रॉयल व्हेटेरिनरिअन्स सोसायटी ऑफ इंडिया
477 हिवरी लेआऊट वाठोडा रोड
नागपूर 440008 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गणवीर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त
महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन्य नागपूर
2) श्री डॉ. सतिश भोयर
जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी (स्व)
महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन्य नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी (स्व) महानगर पालिका नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

अ. आपल्या अधिन असलेल्या आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत कार्यशाळा, कांडवाडा व आरोग्य (स्व) या विभागात महानगर पालिकेच्या विविध कामासाठी किती कंत्राटदार त्यांच्या सेवा देत आहे? मागील तीन वर्षातील कंत्राटदारांच्या यादीसह सविस्तर माहिती देण्यात यावी.

ब. आपल्या अधिन असलेल्या आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत कार्यशाळा, कांडवाडा व आरोग्य (स्व) या विभागात महानगर पालिकेच्या विविध कामासाठी नियुक्त कंत्राटदारांना महानगर पालिकेच्या वतीने त्यांच्या कामाचा मोबदला दिला जातो काय?

क. कंत्राटदारांना मोबदला दिल्या जात असल्यास मागील वर्षात कंत्राटदारांना देण्यात आलेल्या मोबदल्याची सविस्तर माहिती यादीसह देता येईल का?
ड. कंत्राटदारांना देण्यात आलेला मोबदला कंत्राटदारांने कसा खर्च करावा यावर आपल्या विभागाचे किंवा महानगर पालिकेचे नियंत्रण असते काय?
इ. 'ड' चे उत्तर होकारार्थी असल्यास मागील तीन वर्षात महानगर पालिकेच्या वतीने देण्यात आलेला मोबदला कुठल्या कंत्राटदारांने कसा खर्च केला याची माहिती आपल्या कार्यालयाला प्राप्त झाली काय? जर झाली असेल तर मागील तीन वर्षातील माहिती देण्यात यावी.
ई. 'ड' चे उत्तर नकारार्थी असल्यास याबाबत काही नियम अस्तित्वात असल्यास कृपया कळवावे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 17.2.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 23.10.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.3.2010 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थीने मागितलेली माहिती मुद्येसुद असून माहिती अधिकार अधिनियमाच्या ''माहिती'' या अंतर्गत मोडते. माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीला दिलेली माहिती अगदी अपूर्ण व मुद्यांचा विचार न करता देण्यात आलेली दिसते. अपीलार्थीस म.न.पा. व इतर कंत्राटी ऐजन्सी मध्ये झालेल्या कराराची प्रत व देण्यात येणार मोबदला संबंधीत संपूर्ण माहिती सात दिवसाचे आत देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू अपीलकर्ता यांना दि. 23.3.2010 ची माहिती उपलब्ध करुन दिली त्यामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दिलेली नाहीत. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाचे आत जी माहिती दिलेली आहे ती अत्यंत त्रोटक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांनी योग्य रितीने दिली नाही असा निष्कर्ष काढून माहिती 7 दिवसाचे आत द्यावी असा आदेश दिला. व दिलेली माहिती अत्यंत त्रोटक स्वरुपात व कागदपत्रे दिलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असे आयोगाचे मत झालेले आहे. त्यामुळे ते दोषी आढळुन येत असल्यामुळे शास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत मागितलेली माहिती मुद्येनिहाय कागदपत्रासह विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. माहितीचा खर्च व रजिस्टर पोस्टाचा खर्च हा जन माहिती अधिकारी यांनी स्वतः सोसायचा आहे.

3



2) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 18.1.2010 रोजीच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही व प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे सुध्दा योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली

आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे करीता त्यांचे म्हणणे ऐकुन घेतलेले आहे. समाधानकारक खुलासा त्यांनी केलेला नाही व त्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहााचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 356/2010**

श्री उदितकुमार मुकेश दुबे
मु. पो. गिरड
ता. समुद्रपूर जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एस. देशमुख
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी
ता. हिंगणघाट जि. वर्धा
2) श्री ए. एच. चोरमके
जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार
पोलीस स्टेशन गिरड
ता. समुद्रपूर जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी निवेदन दिले आहे. परंतू सुनावणीस उपस्थित राहिले नाही. उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता नंतर दुपारी 4.30 वा. हजर झाले.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस स्टेशन गिरड यांचेकडे 1. उदितकुमार मुकेश दुबे पोलीस स्टेशन गिरड येथे कोणते गुन्हे दखलपात्र व अदखलपात्र स्वरुपाचे दाखल आहे त्या संबंधी संपूर्ण माहिती एफ आय आर इस्तेगाशा व आरोपत्र सह माहिती दयावी.
2. पोलीस स्टेशन गिरड येथे मुंबई दारुबंदी कायदा कलम 85 (1) नुसार एकूण किती लांकांवर गुन्हे दाखल आहे. त्या घटनेचे फिर्यादी कोण आहे व गुन्हा घडण्याची वेळ तारीख आणि इस्तेगासा व एम एल सी नककल प्रत देण्यात यावी.
3. श्री साहेबराव शिवनकर व शंकरराव चौधरी यांची पो.स्टे.गिरड मध्ये एकूण प्रकरणात साक्ष आहे संबंधीत प्रकरणाची यादी सोबत माहिती दयावी.
4. कलम 85 (1) अन्वये अटक केलेल्या आरोपी पैकी किती लोकांनी मा. न्यायालयात गुन्हे कबूल केले. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 13.10.2009 रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यानंतर त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 8.12.2009 रोजी प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 31.12.2009 रोजी देण्यात आलेला असून इतर मुद्यावील माहित योग्य ती फी भरुन अजूनपर्यंत शासकीय माहिती अधिकारी ठाणेदार पो.स्टे.गिरड यांचेकडून हस्तगत केलेली नाही. ती त्वरीत हस्तगत करावी. व मुद्या क्र. 3 च्या माहितीच्या संदर्भामध्ये श्री साहेबराव शिवनकर व शंकरराव चौधरी यांची पो.स्टे.गिरड मध्ये एकूण प्रकरणात साक्षीदार आहेत ही माहिती उघड केल्याने ते ज्या ज्या प्रकरणात साक्षीदार आहेत त्या त्या

प्रकरणातील आरोपी एकत्र येवून त्यांचेकडून या साक्षीदारांच्या जिवितास किंवा शरीरीक सुरक्षिततेस धोका निर्माण होवू शकतो. पोलसांना एकतर पंच व साक्षीदार मिळत नाहीत. व जे स्वखुशीने पंच साक्षीदार होतात त्यांचे विषयी माहिती उघड केल्याने ते पूढे स्वखुषीने पंच साक्षीदार होणार नाही व त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी करण्यास अडथळा निर्माण होईल व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) अन्वये आम्ही सुध्दा सदरची माहिती पुरविण्यास नकार देत आहो असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे निवेदन दाखल केलेले आहे. त्या निवेदनामध्ये मुद्या क. 3 ची माहिती ही कोणत्याही प्रकारची गोपनिय माहिती नाही व ती माहिती दिल्यामुळे कोणत्याही जिवीतास धोका निर्माण होणार नाही कारण पोलीस जे आरोपपत्र न्यायालयात दाखल करतात त्यात सर्व पंचाची साक्ष असते त्यामुळे ती माहिती गोपनिय राहू शकत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की पंचाचे नावे उघड केल्यास पुढे कोणीही पंच होणस तयार होणार नाही. तसेच ज्या पंचाच्या जिवीतास धोका होवू शकतो त्यातूनही हे दोघेही पंच कोण कोणत्या गुन्हयामध्ये पंच आहे याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती पो.स्टे.मध्ये तयार करण्यात येत नाही. त्यामुळे माहिती द्यावयाची झालीच तर संपूर्ण पो.स्टे.मधील कोणत्या न्यायालयात दाखल झालेल्या गुन्हयाच्या नस्ती शोधूनच ती माहिती तयार करुन द्यावी लागेल व त्याकरीता अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे व तशी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध असेलच माहितीच पुरविणे अपेक्षित आहे. माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे ती तशी माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही.

4. जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा निवेदन दाखल केलेले आहे ते खालीलप्रमाणे.

सेवेशी सविनय सादर विनंती की उपरोक्त नमुद विषयातील अर्जदार हा मुळचा मौजा गिरड गावचा रहिवाशी असून तो व त्याचे कुटुंबीय वडिलांसह तो गिरड गावामध्ये राहतो. सदर इसम काहीही कामधंदा करित नसुन त्याचे एकंदर वागणे हे सुध्दा गुन्हेगारी स्वरुपाचे असुन त्याचेवर पो.स्टे.इमामवाडा व पो.स्टे. गिरड येथे गुन्हे तसेच इस्तेगाशा नोंदि असुन तो सतत कायद्याचे विरुध्द वागण्याचे सवयीचा आहे. अर्जदार यांने आमचे विरुध्द मा. राज्य मानवाधिकार आयागाकडे आम्ही त्यांचेवर कायदेशिर कारवाया करतो म्हणून तक्रार केली होती.

सदर प्रकरणाची सन 2009 मध्ये मा. श्री सुभाश लाला सर. सदस्य मा. राज्य मानवाधिकार आयोग मुंबई यांचे कोर्टात सुनावणी होवून आमचे मा. आयागाने अर्जदार समज दिली होती की बेटा पहले खडे रहना शिखो व बातकरनेका तरिका शिखो और पालीस कि उपर आरोप करणेसे पहले अपनेमे सुधार करो असे म्हणून कलम 19 (3) मानवाधिकार कायद्यान्वये प्रकरण फेटाळुन लावलेले होते. तरीही सदर व्यक्तीचे वैयक्तीक वागणुकीमध्ये कुठलाही बदल होत नसुन त्याच्या कायदया विरुध्द वागण्याच्या कारवाया सतत चालु आहेत. मजकुर अर्जदार याचे वडील श्री मुकेश दुबे यांचेवर सुध्दा अफरातफरीबाबतचा गुन्हा पो.स्टे. गिरड येथे नोंद आसुन त्याचा अप क्र. 71/2006 कलम 409,420,468,471 भादंविचा नोंद आहे.

मजकुर अर्जदार यांचे कुटूंबीयांचाच गुन्हेगारी इतिहास असुन पोलीसांनी त्यांचे विरुध्द कुठलीही कायदेशिर कार्यवाही करु नये व सततचे त्यांचे नित्य कामामध्ये व्यत्यय आणण्याच्या हेतुने अर्जदार हा उचापती करीत असतो. करीता अहवाल निवेदन मा. महोदयांचे सेवेशी सादर आहे.

यावरुन विचार करता असे दिसून येते की अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 1,2 व 4 ची माहिती तयार आहे व दि. 7.10.2009 अन्वये दि. 8.10.2009 रोजी एकुण प्रती 375 असून त्याची किंमत 714 रु असल्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे भरणा करणे संयुक्तिक राहिल. व उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. व मुद्या क्र. 3 च्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन दोणे संयुक्तिक होणार नाही. उर्वरीत माहिती करीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत पो.स्टे.गिरड जा. क्र. 102/2009 दि. 7.10.2009 अन्वये दि. 8.10. 2009 रोजी एकुण 375 प्रतीच्या संदर्भामध्ये रु 714/– चा भरणा करुन माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी. अपीलकर्ता यांनी रु 714/– चा भरणा केल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 374/2010**

श्री दिपक महेन्द्र पांडेय
चुडी मोहल्ला वार्ड नं. 10 पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री हरीश धार्मिक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
वर्धा ता. जि. वर्धा
2) श्री एस. बी. वेलकुरवार
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिलदार कार्यालय देवळी
ता. देवळी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालयामध्ये नायब तहसिलदार पुलगाव यांचे कार्यालयातील प्रकरण क्र. रामाक्र.–3/आरटीएस 64/2009 तील पारित आदेश दि. 6.8.2009 मध्ये नमुद व माझे वरील उल्लेखीत अर्जात असलेले कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणीत प्रति पुरविणेबाबत. नायब तहसिलदार यांचे आदेशाविरुध्द अपिल करण्याचे कारणाने माहिती अतिआवश्यक. सोबत दि. 24.8.2009 व दि. 7.9.09 रोजीचे अर्ज जोडलेले आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व आपणास आणखी कोणत्या प्रति हव्या आहेत ते कार्यालयात उपस्थित होवून कळविल्यास उपलब्ध करुन देता येतील असे नायब तहसिलदार पुलगाव यांनी कळविलेले दिसून येते. पुन्हा दि. 21.11.2009 रोजी माहिती तयार आहे व आपण ती आवश्यक शुल्काचा भरणा करुन घेवून जावे असे कळविलेले दिसून येते. व दि. 20.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली परंतू प्रमाणित नाही असा आक्षेप अपीलकर्ता यांनी घेतलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 30.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 31.12.2009 रोजी देण्यात आलेला असून तहसिलदार देवळी यांनी हिराबाई ब्रम्हाप्रसाद पांडे यांचा तलाठी दप्तरला मौजा गुंजखेडा यामध्ये जी 7/12 ची नोंद झाली ती ज्याआधारे घेण्यात आली त्या कागदपत्राच्या प्रती हा आदेश प्राप्त होताच पुढील 10 दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना काही कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र साझा क्र. 1 गुंजखेडा/पुलगाव कडून अहवाल सादर करण्यात येते

की श्रीमती हिराबाई ब्रम्हाप्रसाद पांडे यांचा तलाठी दप्तरला मौजा गुंजखेडा यामध्ये जी 7/12 ची नोंद झाली ती ज्याआधारे घेण्यात आली त्या कागदपत्राच्या प्रती तलाठी रेकॉर्डला उपलब्ध नाही. ही बाब दि. 18. 11.2009 ला सुध्दा कळविण्यात आली होती असे नायब तहसिलदार यांना कळविण्यात आले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना 7/12 मध्ये जे नाव आलेले आहे त्या नावाच्या संदर्भामध्ये कोणत्या आधारे आलेले आहे ती फेरफार पंजी उपलब्ध करुन देण्यात आली नाही. आयोगापुढे 7/12 चा उतारा जन माहिती अधिकारी यांनी दाखविला. तालाठी सुध्दा हजर आहे. त्यांनी सांगितले की त्यांचे दप्तरामध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना दिलेली आहे. परंतू वारसानपंजी दिलेली नाही. त्याहीपेक्षा 7/12 च्या उता–यावर जे 4–5 फेरफार दुरुस्ती त्या फेरफाराच्या संदर्भामध्ये जी फेरफारपंजी उपलब्ध करुन दिली असेल ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना 7/12 मध्ये जी नावे आहेत त्या नावाच्या संदर्भामध्ये जे फेरफार घेतलेले दिसून येतात त्या फेरफाराच्या संदर्भातील उपलब्ध असलेली कागदपत्राची प्रमाणित प्रत विनामुल्य अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 371/2010**

श्री मधुकरराव विठ्ठलराव बोडे
नवेगाव (मुरखडा) पेट्रोलपंपाजवळ पो. मडझा
ता. जि. गडचिरोली 442605 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा)नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री राठोड
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा)नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी मिळकत व्यवस्थापक नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते.

1. मा. उप अभियंता, विशेष नियोजन प्राधिकरण (म्हाडा) चंद्रपूर यांचे पत्र क्र.223/विनिप्रा/तसनर/09 दि. 10.8.09 चे संदर्भात श्री आर.एम.देशमूख तांत्रिक सहा. उप विभागीय कार्यालय चंद्रपूर यांनी आपल्या मौख्यिक सूचनेनुसार 278(भूखंड) अल्प उत्पन्न गट गडचिरोली येथील भूखंड क्र.2 ची मोजमाप कार्यवाही करुन आपल्याकडे सादर केलेल्या दि. 17.11.07 च्या मोजणीपत्राची (कार्यालयीन टिपणीची) आपल्या कार्यालयाच्या रेकार्ड प्रमाणे सत्यप्रत पुरविण्याची विनंती आहे.
2. आपले कार्यालयाचे उपरोक्त दि. 17.11.07 चे मोजणीपत्रात (कार्यालयीन टिपणीत) नमुद केल्याप्रमाणे श्री सोनाग्रे यांचे दि. 14.8.07 चे अर्जाची सत्यप्रत पुरविण्याची विनंती आहे.
3. अनधिकृत/बोगस मोजणीपत्र (कार्यालयीन टिपणी) निर्गमित केल्याबद्यल श्री आर.एम.देशमूख तांत्रिक सहा. उप विभागीय कार्यालय चंद्रपूर यांचे विरुध्द पोलीस विभागाकडे तक्रार दाखल करण्याबाबत परवानगी प्रदान करण्याची विनंती आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10. 12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर दि. 24.12.2009 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्चाचा भरणा करावा असे पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दि. 8.1.2010 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी श्री राठोड मिळकत व्यवस्थापक यांना आदेश दिले की श्री आर.एम.देशमूख तांत्रिक सहा. उप विभागीय कार्यालय चंद्रपूर

यांच्याकडून माहिती घेवून ते अपीलार्थी यांना देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 21. 1.2010 रोजी मिळकत व्यवस्थापक यांनी उप अभियंता, विशेष नियोजन प्राधिकरण (म्हाडा) चंद्रपूर यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पत्र दिलेले दिसून येते. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 4.2.2010 रोजी श्री आर.एम.देशमूख तांत्रिक सहा. यांना पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक 16.2.2010 रोजी पत्र दिलेले आहे. परंतू त्यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की चंद्रपूरच्या कार्यालयात टिपणी सादर झालेली आहे व ती मिळकत व्यवस्थापक यांना सादर झालेली आहे असे दिसून येते. परंतू मिळकत व्यवस्थापक तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्पष्टपणे अशा प्रकारची टिपणी नागपूर कार्यालयात सादर झालेली नाही असे आयोगाकडे सांगितले. चंद्रपूर कार्यालयातील माहिती असेल तर ती चंद्रपूर कार्यालयात मागणे आवश्यक होते व त्याप्रमाणे ती माहिती आहे असे दिसून येते. त्यामुळे जर तशा प्रकारची टिपणी सादर झालेली नसेल तर तसे लेखी हे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यात अपेक्षित असलेली चंद्रपूर कार्यालयातून मिळकत व्यवस्थापक यांचेकडे सादर झालेली टिपणी मिळकत व्यवस्थापक यांच्येकडे सादर झालेली नाही असे लेखी द्यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 372/2010**

श्री आर. डी. दहाट
65 विवेकानंदनगर साई मंदीर मागे
वर्धा रोड नागपूर 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री पी. बी. घुले
जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी
शिक्षण उपसंचालक कार्यालय
नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांचेकडे पुनर्वियुक्तीच्या आदेशाची प्रमाणित प्रत तात्काळ देण्यात यावी अशी माहिती टपालाद्वार घेणार असे नमूद केलेले आहे. त्यावर दि. 7.12.2009 रोजी आपण संदर्भिय मागणी केलेल्या आपल्या पुनर्वियुक्तीच्या आदेशाची प्रत या कार्यालयात उपलब्ध नाही त्यांमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 1.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 15.2.2010 रोजी देण्यात आलेला असून श्री ऋखडाश्रम विद्यालय कुही जि. नागपूर या शाळेत आपणास नियुक्ती देण्यात आली होती. पत्राची प्रत जोडली आहे. सदर नियुक्तीस पुनर्नियुक्ती असे संबोधण्यात आले आहे. वेगळे पुनर्नियुक्ती आदेश देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

2

3. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना असे सांगितले की मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्यांचे समायोजनाचे आदेश होते. व त्याप्रमाणे प्रस्ताव सादर झाला होता. पुनर्नियुक्तीचे कुठेही आदेश नसतांना प्रस्तावात मात्र पुनर्नियुक्ती देण्यात यावी असे प्रस्ताव सादर झाले नव्हते. श्री ऋखडाश्रम विद्यालय कुही येथे जी नियुक्ती देण्यात आली आहे त्यास पुनर्नियुक्ती संबोधण्यात आली नव्हती. त्यांची पुर्वीची सेवा व नंतरची सेवा ही सेवा वेतनास ग्राहय धरण्यात येत नाही आहे. व ती त्यांची पुनर्नियुक्तीच आहे असे सांगण्यात येते. व त्यामुळे त्यांनी पुनर्नियुक्तीचे आदेश मागितलेले होते. त्यांना स्पष्टपणे पुनर्नियुक्तीचे आदेश नाहीत असे सांगण्यात आलेले आहे. मग त्यांचा पुनर्नियुक्तीचा आदेश कसा सादर झाला व ती पुनर्नियुक्ती का संबोधण्यात येते हे सिध्द करण्याकरीता माहिती मागितलेली होती. परंतू पुनर्नियुक्तीचा आदेशच नाही असे ते कळवित आहे. व जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा असे सांगितले की पुनर्नियुक्तीचा आदेशच नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांनी ही बाब ज्या अधिका–याकडे पुनर्नियुक्तीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता त्यांचे निदर्शनास आणून आदेशामध्ये दुरुस्ती करुन घेता येईल किंवा न्यायालयामध्ये याचिका दाखल करुन न्याय प्राप्त करुन घेता येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 366/2010**

श्री डॉ. किसनजी हनुजी जांभुळकर
माताटेकडी इंदोरा पो. बेझनबाग
नागपूर 440004 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक (अर्थ संकल्प व प्रशासकीय)
आरोग्य सेवा संचालनालय मुंबई
5 वा मजला आरोग्य भवन सेन्ट जॉर्जेस रुग्णालय आवार
मुंबई 400001
2) श्री एन. एम. ठाकरे
जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी
आरोग्य सेवा संचालनालय मुंबई
5 वा मजला आरोग्य भवन सेन्ट जॉर्जेस रुग्णालय आवार
मुंबई 400001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी आरोग्य सेवा संचालनालय मुंबई यांचेकडे चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ वर्ग 1 व वर्ग 2 च्या पदा करिता शैक्षणीक पात्रताचे मापदंडाच्या संदर्भामध्ये एकुण दहा मुद्यांवर प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.9.2010 रोजी आपले अर्जातील प्रश्नाचे उत्तर देणे अभिप्रत नसून केवळ कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. त्यानुसार चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ वर्ग 2 च्या पदासाठीचे सेवा प्रवेश नमुन्याची प्रत यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 30.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.3.2010 रोजी देण्यात आलेला असून कागदपत्रे अवलोकनानंतर माहिती अधिका–याकडून आपणास मुद्येनिहाय माहिती पुरविली नसल्याबाबत दिसून आली तर उपक्त माहिती आपणास विनाविलंब पुरविण्याबाबत त्यांना आदेशीत करण्यात येत आहे असे अपीलकर्ता यांना कळविण्यात येत आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 18.3.2010 रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी जी माहिती मागितलेली ती माहिती ही त्यांना जाणीवपूर्वक देण्याची टाळाटाळ केलेली आहे. मुद्येनिहाय माहिती न

देता प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती आहे असे ते देण्याचे टाळण्यात आल्याचे दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा अर्ज त्यावेळेस आला त्यावेळेस तर अधिकारी व कर्मचारी कमी असल्यामुळे व लोक न्यायालयीन प्रकरणे, विधानसभा अधिवेशन कामात व्यस्त असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती संपूर्णतः देणे शक्य झाले नाही. तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले की चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ या पदासाठीची जाहिरात राज्यातील विविध उपसंचालक आरोग्य सेवा यांनी ही पदे अस्थायी स्वरुपात भरण्यासाठी दिली होती त्या सर्व कार्यालयाना स्वतंत्र माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. तसेच जन माहिती अधिकारी आरोग्य सेवा संचालनालय मुंबई हे उपसंचालकाचे नियंत्रण अधिकारी नाही किंवा शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञही नाहीत. त्यामुळे द्वितीय अपीलातील मुद्या क्र. b, c, d, e याबाबत माहिती अधिकारी अभिप्राय देवू शकत नाही. विलंब झालेला आहे तो क्षमापीत असावा अशी विनंती केलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की जी माहिती त्यांना मुद्येनिहाय उपलब्ध झालेली आहे त्या संदर्भात जी जी कागदपत्रे त्यांचेकडे असतील ती उपलब्ध करुन दिल्यास त्यांचे समाधान होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या प्रत्येक माहितीच्या संदर्भात कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 367/2010**

श्री हेमराज तुकाराम गेडे
झाशी नगर छत्रपती वार्ड बियानी नगरचे बाजुला
तुकूम चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर 442401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री बी. आय. जोसेफ
जन माहिती अधिकारी तथा स्वच्दता निरीक्षक (का.)
नगर परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद चंद्रपूर येथील साफसफाईचे काम करणा–या कंत्राटदाराच्या संदर्भात दि. 1.12.2009 ते 30.12.2009 या कालावधीतील माहिती पाच मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.1.2010 रोजी अपीलकर्ता यांना एकूण 30 प्रति उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. व इतर माहितीच्या संदर्भामध्ये काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 9.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत असून त्यांचे दि. 30. 12.2009 चे अर्जाप्रमाणे मुद्या क्र. 2 ते 5 पर्यंतची माहिती कंत्राटदाराकडून प्राप्त झाली असल्यास या आदेशा पासून 7 दिवसाचे आत आपण विनामुल्य अपीलार्थीस कळविण्यात यावी उपलब्ध नसल्यास तसे स्वयंस्पष्ट लेखी अपीलार्थीस कळवावे असे आदेश दिलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांना 7 दिवाचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की कंत्राटदाराकडून करारनामाप्रमाणे सर्व माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते व त्यामुळेच त्यांनी सर्व माहितीमागितलेली होती. परंतू सहा–सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर सुध्दा कंत्राटदाराकडून ती माहिती उपलब्ध करुन घेतली जात नाही त्यामुळे त्यात भ्रष्टाचारास वाव मिळतो व म्हणून ती माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की कंत्राटदाराला

माहिती मिळविण्याकरीता पत्रे दिलेली आहेत परंतू ती देत नाही. कंत्राटदार कारारनाम्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा कागदपत्रे दिलेली नसतील त्यांचे विरुध्द कार्यवाही करणे क्रमप्राप्त असते. परंतू तीही केली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना चंद्रपूरवरुन नागपूरला द्वितीय अपीलाकरीता यावे लागले व खर्च करावा लागला. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांच्या दि. 30.12.2009 च्या अर्जातील 5 मुद्याच्या संदर्भात संपूर्ण कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसे न दिल्यास त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.
2) अपीलकर्ता यांना अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे व त्यांना द्वितीय अपील करावे लागल्यामुळे रु. 400/- नुकसान भरपाई देण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.नाग. / 315 / 2010</u>

1. सौ. सुनिता सुरेश घेर – अपीलकर्ता
मु. पो. ता. पारशिवनी
जि. नागपूर.

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक – उत्तरवादी
भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर.

3. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भुमी अभिलेख कार्यालय पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर.

(आदेश पारित दिनांक 3 / 05 / 2010)

निर्णय

1. अपीलकर्ता यांनी दि. 13.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 05.04.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 03. 05.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 14.01.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक तालुका निरीक्षक भूमी अभिलेख मोजणी, रेकार्ड व नकाशा अशी माहिती मिळण्याबाबत 5 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 3.02.2010 रोजी तपशिलात मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 22.02.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. परंतू प्रथम अपीलात व नोटीस काढण्याकरीता पाकीट द्यावे व असे दिलेले असून सुध्दा अपील मात्र घेण्याचे नाकारले. या कारणास्तव त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता यांना दिनांक 3.02.2010 रोजी जी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती अपिलकर्ता यांना आधीच आहे. परंतू त्यांनी सर्व

मुद्यांच्या संदर्भामध्ये कारणे विचारलेली आहेत. व त्याहीबद्यल त्यांना सविस्तर नियमाची माहिती दिली आहे. अपिलकर्ता यांची मुळ तक्रार ही दुरुस्ती करुन घेण्याकरीता दिसून येते. त्याकरीता त्यांनी महाराश्ट्र जमीन महसूल संहिता 1966 च्या कलम 135 व 106 प्रमाणे उपविभागीय अधिकारी यांचेकडे अधिक्षक, भूमी अभिलेख यांच्या माध्यमातून दुरुस्तीसाठी अपील दाखल करणे संयुक्तिक राहिल.अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.नाग./312/2010**

1. श्री नझीरुद्दीन – अपिलकर्ता
अध्यक्ष,दि नागरिक को–ऑप. हाऊसिंग सोसायटी
मर्या.नया नका II, लश्करीबाग,युनिट नं. 1 ,
मस्जिद जवळ, नागपूर – 17.

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा – उत्तरवादी
अधिक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
सदर नागपूर.

3. जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

**(आदेश पारित दिनांक 3/05/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 25.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 05.04.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 3.05.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 18.06.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे संस्थेची रक्कम रु. 40745/– व व्याज मिळण्याबाबत सोबतच्या जोडपत्रामध्ये दिनांक 14.03.2008 चा नागपूर सुधार प्रन्यासने दिलेला तपशिल दिलेला दिसून येतो. व त्यावर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 25.06. 2008 च्या पत्रान्वये उर्वरीत रक्कम परत मिळण्याबाबतचा अर्ज माहिती अधिकाराअंतर्गत मोडत नसल्यामुळे आपला माहिती अधिकाराअंतर्गत दिनांक 18.06.2000चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. असे कळविलेले दिसते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 23.02.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 13.04.2010 रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांनी हा आदेश मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत कार्यकारी अभियंता (उत्तर) तथा माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांचे कार्यालयात जावून संबंधित धारिकेचे अवलोकन करावे, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित

धारिका निरिक्षणार्थ उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीने मूळ अर्जात मागितलेले दस्तऐवज विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे असे आदेश दिलेले दिसतात. परंतू अपिलकर्ता यांनी जोडपत्र 'अ' व 'ब' नुसार कोणतीही माहिती मिळाली नाही या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या अर्जात त्यांनी पैसे परत मिळण्याची मागणी केली आहे. परंतू अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणतीही गुणवत्तेच्या बाबतची मागणी करता येत नाही कागदपत्रे उपलब्ध करुन देता येतात. व त्याकरीता अपिलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये नस्तीचे अवलोकन करावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता हे नस्तीचे निरीक्षणाकरीता आजपर्यंत आलेले नाही. परंतू अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, नस्तीचे निरीक्षणास ज्या ज्या वेळेस जावे त्या त्या वेळेस संबंधित अधिकारी उपस्थित नसतात. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की अपिलकर्ता जे पैसे परत मागत आहेत ते नागपूर सुधार प्रन्यास कडे घेणे निघत नाही. उलट संस्थेकडेच नागपूर सुधार प्रन्यासला घेणे निघत आहे व त्याकरीताच निरिक्षण करणे आव यक आहे त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना कामकाजाचे दिव ाीचे तारीख व वेळ कळवून त्या वेळेस उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरीक्षण करुन घ्यावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

ni

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.नाग./312/2010</u>

1. श्री आनंद अजाबराव धानोरकर — अपिलकर्ता
तुकाराम सभागृह चौक, धाडीवाल ले आऊट,
बौध्द विहाराजवळ, रिंग रोड, नागपूर –27.

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा — उत्तरवादी
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
रविनगर, नागपूर.

3. जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
रवि नगर, नागपूर.

(आदेश पारित दिनांक 3/05/2010)

<u>निर्णय</u>

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 29.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 05.04.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 3.05.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 14.01.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य तायडे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, यांचेकडे 3 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 29.01.2010 रोजी अपिलकर्ता यांना सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. परंतू त्याबाबतचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 3.02.2010 रोजी पाठविलेली माहिती अपूर्ण व समाधानकारक नसल्यामुळै एकूण 7 नवीन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. या सातही नवीन मुद्यांची माहिती अपिलकर्ता यांना दिनांक 16.02.2009 रोजी देण्यात आलेली आहे परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे असे सांगितले की अपिलकर्ता यांना दिनांक 5. 01.2010, 6.01.3010 व 25.01.2010 च्या अर्जाप्रमाणे दिनांक 1.02.2010

रोजी प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी माहिती दिलेली आहे. तरीही त्यांनी माहितीचे अर्ज केले, प्रथम अपील केले. प्रथम अपीलात नवीन मुद्ये उपस्थित केले. त्याचीही माहिती त्यांना दिली. व त्यामुळै अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निश्कर्श काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे

## आदेश

1. अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील

अपिल क्र. 383/2010

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री उमाशंकर पी. नामदेव ,<br>07, कमल–केशव प्लाजा, रामदासपेठ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | – | **अपिलकर्ता** |

**विरूध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | प्रथम अपिलिय अधिकारी तथा वरिष्ठ संशोधन अधिकारी<br>अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय,<br>खंडपीठ, नागपूर | – | **उत्तरवादी** |
| 3. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका<br>गार्डिनर हायस्कूल,<br>सिव्हिल लाईन्स् नागपूर | – | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक 18.05.2010)**

**<u>निर्णय</u>**

अपिलकर्ता यांनी दिनांक 12/04/2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितिय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितिय अपीलाची सुनावणी आज दिनांक 18/05/2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 04/01/2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका गार्डिनर हायस्कूल, सिव्हिल लाईन्स् नागपूर यांच्याकडे अ. क्र. 1 आदिवासी विकास विभागातर्फे दर्जेदार शिक्षणासाठी आपल्या शाळेला किती मुले देण्यात आली व कधी पासून ? या संदर्भात एकूण 11 मुद्दयांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. माहितीचा कालावधी 2008–2009 असा दिलेला आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 01/02/2010 रोजी अपिलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी एकूण 11 मुद्दयांमध्ये माहिती उपलब्ध करून दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि. 17/01/2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भात 04/03/2010 रोजी अपिलिय अधिकारी तथा वरिष्ठ संशोधन अधिकारी यांनी सदर प्रकरणी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करून तसे परस्पर संबंधितांना कळवावे असे आदेशात दिलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपिल दाखल केले आहे.

3. अपिलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करून दिली त्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करून दिलेली दिसून येते. त्यात मुख्याध्यापिकेच्या संदर्भातील माहिती ही वैयक्तिक स्वरूपातील असल्यामुळे त्यांना उपलब्ध करून देण्यास आक्षेप घेतला असे आयोगापुढे सांगितले.

4. प्रथम अपिलिय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी प्रथम अपिल हे आदिवासी विकास विभाग नागपुर यांचेकडे दाखल केले होते परंतु त्या कार्यालयाशी या विषयाचा काहीही संबंध नाही व ते अपिलीय अधिकारी सुध्दा नाहीत. मुख्याध्यापिका यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे तो खालील प्रमाणे आहे.

''मुद्या क्र.1 ते 11 पैकी मुद्या क्र. 2 या मध्ये आदिवासी मुलांचे नाव व पत्ते यांची माहिती मागितलेली असून त्याबाबत शाळेच्या मुख्याध्यापिकांनी नाव व पत्ते देण्याबाबत नकार दिला आहे. कारण श्री नामदेव यांचा संस्थेशी काही संबंध नसल्यामुळे या आदिवासी मुलांचा गैर उपयोग करू शकतो. ही शाळेची व मुख्याध्यापकांची फार मोठी जवाबदारी आहे.

मुद्या क्र.11 ची माहिती श्रीमती चौहान यांच्या शिक्षणांची मुळप्रतची मागणी केलेली आहे. सदर माहिती देण्याबाबत श्रीमती चौहान यांचा नकार आहे कारण ही त्यांची वैयक्तिक माहिती आहे'' .

श्री नामदेव यांनी मागितलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरूपात मागितली आहे व वारंवार हा माहित मागून त्रास देत आहे. व पैशाची मागणी करीत आहे व भरपूर मानसीक त्रास देत आहे. याच्या विरोधात बर्डी पोलीस स्टेशन वर तक्रार नोंदविली आहे.

गार्डिनर शाळा सिव्हिल लाइन्स् मध्ये असून ही शाळा मराठी माध्यमाची आहे. जिथे गरीब विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही शाळा गरीब मुलांना शिक्षण देऊन एक उत्तम नागरीक घडविण्याचे सामाजिक कार्य करीत आहे. पण या शाळेचे दुर्दैव म्हणजे की ही शाळा सिव्हिल लाईन्स् मध्ये, नागपूरच्या मध्यभागी आहे. श्री नामदेव व काही समाज विरोधकांची नजर या जागेवर असल्यामुळे शाळा बंद करण्याचा भरपूर प्रयत्न, बदनामी व पेपरबाजी करीत आहे आणि यासाठी गरीब आदिवासी मुलांचा गैरवापर करून जनहित नाही तर जनअहित करण्याचा यांचा उद्येश्य स्पष्ट आहे. तरी आम्ही अर्जदारास श्री नामदेव याला माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अंर्तगत विलंब न करता जी माहिती द्यावयाची आहे ती दिली आहे आणि त्याने आपल्या अर्जात हे स्विकारले आहे कि त्याला माहिती मिळाली आहे. तरी सुध्दा तो का त्रास देत आहे ? त्याच्या मागे त्याचा लपलेला उदेश्य काय आहे ? जनहित किंवा जन अहित ?

यावरून अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपिल खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1) अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपिल हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**मा. आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील

अपिल क्र. 384/2010

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री प्रशांत शामकांत बागडदेव,<br>भुखंड क्रमांक 53, दि पोस्टल ऑडीट कॉलनी,<br>राणाप्रताप नगर,<br>नागपूर – 32 | – | **अपिलकर्ता** |

**विरूध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | प्रथम अपिलिय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,<br>सहकारी संस्था, नागपूर<br>धनवटे चेंबर्स एनेक्स, सिताबर्डी, नागपूर. | – | **उत्तरवादी** |
| 3. | जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक<br>सहकारी संस्था, शहर –1, नागपूर<br>185, आयुर्वेदिक ले लाऊट, भांडे प्लॉट चौक, उमरेड रोड, नागपूर | – | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक 18.05.2010)**

## निर्णय

अपिलकर्ता यांनी दिनांक 05/04/2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितिय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितिय अपीलाची सुनावणी आज दिनांक 18/05/2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 16/02/2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे उपनिबंधक सहकारी संस्था शहर (1), कार्यालय नागपूर यांचे अधिकारीते खालील, श्रीप्रकाश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नागपूर (पंजीयन) क्र. N.G.P. /H.S.G./ 738, (02.02.1972) सहकार नगर खामला सोनेगांव रोड नागपुर, बाबत एकूण 7 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

2. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. 03/03/2010 रोजी मुद्दा क्र. 1 ची माहिती उपलब्ध करून दिली आहे. मुद्दा क्र. 2 ते 7 बाबतची माहिती संस्थेशी संबंधित असल्याने, अर्ज संस्थेकडे वर्ग करून संस्थेशी संपर्क करण्याबाबत कळविलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. 10/03/2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. 09/04/2010 रोजी देण्यात आला असून संस्थेचा दस्तऐवज असल्यामुळे माहिती अधिकारी यांना देणे शक्य नाही. सदरची माहिती

संस्था स्तरावरील असल्यामुळे अर्जदार यांनी सभासद या नात्याने संस्थेकडून उपलब्ध करून घेणे योग्य राहील. कार्यालयीन स्तरावरील माहिती देण्यात आली असल्यामुळे अपिल फेटाळण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

3. अपिलकर्ता विलंबाने उपस्थित झाले त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, माहिती अधिकारी यांच्या स्तरावरील माहिती त्यांना मिळाली. परंतु संस्था स्तरावरील माहिती ही संस्थेचे पदाधिकारी अपात्र ठरविलेले असतांना त्यांचेकडून उपलब्ध करून घ्यावी असा जो निर्णय दिला आहे तो योग्य नाही. संस्थेचा सभासद म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 32 प्रमाणे माहिती उपलब्ध करून घेता येते परंतु संस्था माहिती उपलब्ध करून देत नाही. असे असले तरी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी संस्थेकडून माहिती उपलब्ध करून घेवून अर्जदारास उपलब्ध करून देणे आवश्यक असते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती संस्था स्तरावरील माहिती आहे व त्यामुळे ती माहिती संस्थेकडूनच उपलब्ध करून घेण्याकरिता अपिलकर्ता यांना कळविण्यात आले होते.

4. अपिलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या अधिपत्याखालील श्रीप्रकाश सहकारी निर्माण संस्था मर्या. यांचेसंबंधी माहिती मागितलेली असल्यामुळे, मागितलेल्या माहिती पैकी जी माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या तरतुदी प्रमाणे सहकारी संस्थेकडून उपलब्ध करून घेता येते ती माहिती अपिलकर्ता यांना, ''माहिती'' या कलम 2 (च) प्रमाणे असलेल्या व्याख्येप्रमाणे उपलब्ध करून देणे संयुक्तिक आहे.

5. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) नुसार ''माहिती'' याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा आहे. त्यामधे अभिलेख, दस्तऐवज इ. आणि त्या–त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणतीही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती, याचा समावेश होतो, अशी तरतुद आहे. वर नमूद केल्याप्रमाणे जिल्हा उपनिबंधक यांनी सहकारी संस्थाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या तरतुदीप्रमाणे जी माहिती उपलब्ध करून घेता येईल ती पुरविणे योग्य राहील व जी माहिती उपलब्ध करून घेता येत नाही ती अर्जदाराने संस्थेकडून उपलब्ध करून घेणे संयुक्तिक राहिल. संस्थेचे पदाधिकारी यांना अपात्रते करिता नोटीस देण्यात आली. असली तरी जो पर्यंत पदाधिकारी आहेत तो पर्यंत त्यांच्याकडून किंवा प्रशासकांकडून ही माहिती अर्जदारास उपलब्ध करून घेता येईल त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे

# आदेश

1) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या तरतुदींप्रमाणे श्रीप्रकाश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नागपूर यांचेकडून जी माहिती उपलब्ध करून घेता येईल ती अपिलकर्ता यांना पुरवावी व जी माहिती उपलब्ध करून घेता येणार नाही त्या बद्यल कळवावे. ती माहिती अपिलकर्ता यांनी प्रत्यक्ष संस्थेकडून उपलब्ध करून घेणे संयुक्तिक राहिल.

2) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**मा. आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील

**अपील क्र. ३८२/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निलेश सुरेशराव निंबाळकर<br>वार्ड न.१०, मु. पो. नरखेड<br>ता. नरखेड जिल्हा नागपूर - ४४१ ३०४ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपिलिय अधिकारी तथा मुख्य अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय नरखेड,<br>ता. नरखेड जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता,<br>नगर परिषद कार्यालय नरखेड,<br>ता. नरखेड जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १२/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९/०४/२०१० रोजी नोटीस पाठवून दिनांक १८/०५/२०१० रोजी अपिलांचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २७/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगर परिषद, नरखेड जि. नागपूर यांना नगर परिषद नरखेड.यांचे पत्र. क्र. न.प.न. / सां.बां./ २०४/२००९ दि. २६/१०/२००९ वर त्यांचेकडून झालेल्या कारवाईची माहिती मागितलेली आहे. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून दि. ०८/०३/२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या अनुषंगाने माहिती अधिकारी यांनी दि. ०८/०४/२०१० रोजी नगर परिषदेचे पत्र क्र. न.प.न. /सां.बां./२०४ / २००९, दि. २६/१०/२००९ अन्वये झालेल्या कारवाईची माहिती ही बाब माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत मोडत नसल्याने यासंबंधीची माहिती आपणास उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविले. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी मा. राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपिल दाखल केले.

३. अपिलकर्ता गैरहजर आहेत पंरतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध
करुन दिलेली नाही. प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दि. ०९/०४/२०१० रोजी त्याचप्रमाणे दिलेला दिसून येतो.

४. अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये कोणत्याही प्रकारे प्रश्नार्थक माहिती मागितलेली आहे असे दिसून येत नाही. कारवाई बाबतची माहिती मागितली याचा त्या संदर्भात टिपणीच्या स्वरुपात जी कारवाई झाली असेल किंवा जी कारवाई प्रत्यक्षात करण्यात आलेली असेल त्या संदर्भात उपलब्ध असलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देणे असा होतो. व त्यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळच केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपिलिय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाच्या

निर्णयाच्या संदर्भात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केलेले नाही. व जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते सुध्दा (वेळ मारुन नेण्याकरिता) दिलेले उत्तर निर्णयात दिसून येते.

५. मा. आयोगापुढे जो लेखी खुलासा दाखल केलेला आहे त्याप्रमाणे जरी कळविण्यात आले असते तरी माहिती उपलब्ध करुन दिल्यासारखे झाले असते. कार्यक्षमता जी आयोगास खुलासा करतांना दाखविली जाते ती अर्जदारास माहिती देतांना दाखविल्यास प्रथम अपील द्वितीय होणार नाहीत. यावरुन माहिती उपलब्ध करुन न देण्याची प्रवृत्ति दिसून येते. व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम २० (१) प्रमाणे दोषी आढळून येत असल्यामुळे शास्तीस पात्र आहेत. शास्तीच्या संदर्भामध्ये त्यांना विचारले असता चूक झाली, यापुढे असे होणार नाही एवढेच स्पष्टीकरण त्यांनी दिले. वर नमूद केल्याप्रमाणे स्पष्टीकरण हे समाधानकारक नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द रुपये १०,०००/- ची शास्ती लादणे आवश्यक झाले आहे. तसेच प्रथम अपिलिय अधिकारी यांना अपिलकर्ता यांनी प्रथम अपिल का केले या बद्दलचे कोणतेही आकलन करुन न घेता निर्णय दिलेला असल्याने प्रथम अपिलिय अधिकारी तथा मुख्य अधिकारी यांनी अधिनियमांच्या तरतुदींचे तसेच शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे. व त्यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई होणे आवश्यक आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येते. अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून मागितलेल्या मुद्दांच्या संदर्भात झालेल्या संपूर्ण कारवाईची कागदपत्रे विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी कार्यालयाच्या कामकाजाचे दिवशीचे तारीख मिळवून लेखी कळवून त्यावेळेस माहिती उपलब्ध करुन द्यावी

२. जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, नगर परिषद नरखेड यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द रुपये १०,०००/- ची शास्ती कलम २० (१) प्रमाणे लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली शाखा अभियंता यांच्या दरमहाच्या वेतनातून वसूल करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करावी.

३. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**मा. आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील

**अपील क्र. ३८५/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. गौतम बाळकृष्णा धोंगडे<br>प्लॉट न. १४, अमर-आशा सोसायटी<br>इंद्रप्रस्थ नगर, नागपूर -४४० ०२२ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपिलिय अधिकारी तथा उपनिबंधक<br>सहकारी संस्था, शहर -१, नागपूर<br>१८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॉट चौक,<br>उमरेड रोड, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>लोकसेवा गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर<br>प्लॉट न. २७४, लोकसेवा नगर, पोस्ट-प्रतापनगर, नागपूर -२२ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे ॲड. श्री ए. एस. देशपांडे हजर आहेत.

२. अपिलकर्ता यांनी दि. १३/०७/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था शहर १, नागपूर यांचे कार्यालयामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

(१) दिनांक १८/०१/१९८९ च्या चार्ज रिपोर्ट नुसार लोकसेवा सह. ग़हनिर्माणसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी खालील सभासदांच्या प्लॉटचे विक्रीपत्र करुन दिलेले नाही ज्यांच्या चालान्स् रिझर्व बॅंकेत भरलेल्या होत्या ते का करुन देण्यात आले नाही ? त्यास जबाबदार कोण ? त्यांची नावे द्यावी.

१) श्रीमती अनु मुकुंद गजभिये - ५८५
२) धर्मदास बळीराम बागडे - ५८६
३) गौतम बाळक़ृष्ण धोंगडे - ५८८
४) श्रीमती छाया चोखीनाथ हिरेकर - ५९१
५) नारायण पांडुरंग गजभिये - ६५२

(२) दिनांक १८/०१/१९८९ च्या चार्ज रिपोर्टची प्रत देण्यात यावी.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३१/०७/२००९ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध नाही त्याकरिता आपण संस्थेशी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि. ०२/०९/२००९ रोजी सचिव/ अध्यक्ष, लोकसेवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नागपूर यांचेकडे माहिती मागणे करीता साधा अर्ज केलेला दिसून येतो. परंतू संस्थेचे सचिव यांनी दिनांक १४/०९/२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ सहकारी संस्थांना लागू होत नाही. सबब त्याआधारे आपणास लोकसेवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नागपूर या संस्थेकडून माहिती मागण्याचा अधिकार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. १२/१०/२००९ रोजी प्रथम अपील हे पून्हा उपनिबंधक सहकारी संस्था शहर १, नागपूर यांचेकडे दाखल केले. त्यावर दि. २१/११/२००९ रोजी अपीलकर्ता यांचे अपील मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत दाखल केली असून सदर सहकारी संस्थेला माहितीचा अधिकार लागू नसल्याचे स्पष्ट केल्याने अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिला आहे. तथापी संस्थेचा सभासद या नात्याने त्यांनी जी माहिती मागितली आहे ती पुरवावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. १२/१०/२००९ रोजी चे पत्राप्रमाणे सचिव, लोकसेवा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नागपूर यांना माहिती मागितल्याचे दिसून येते परंतु संस्थेनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व उलट उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडून आदेश प्राप्त झाला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्ता यांना कळविले. तसेच मागितलेली माहिती घेण्यामागे आपला काय उद्देश आहे आणि ते आपण कोणत्या कामाकरीता मागत आहात याची माहिती आपण संस्थेला द्यावी, जेणेकरुन संस्थेला त्यावर योग्य कारवाई करता येईल असे कळविले. त्यावर पुन्हा दि. ३०/११/२००९ रोजी अपीलकर्ता यांनी संस्थेच्या सुचनेची माहिती मागितल्याचे कारण कळविले. मात्र त्यानंतरही अपीलकर्ता यांना संस्थेने माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी संस्थेविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी तांत्रीकदृष्टया राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील प्रथम निर्णयाच्या विरुध्द दाखल करणे आवश्यक होते. परंतु अपीलकर्ता यांनी गैरअर्जदार विशाल वानखेडे, सचिव लोकसेवा सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेविरुध्द अपील दाखल केले आहे व त्यामुळेच संस्थेचे सचिव यांच्याकरीता आयोगाचे कार्यालयातून सुनावणीची नोटीस काढण्यात आली होती. वास्तवीक अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज हा उपनिबंधकांकडे केला होता, प्रथम अपील सुध्दा उपनिबंधकांकडेच केले होते. संस्थेकडे माहितीचा अर्ज केला नव्हता व त्यामुळे सदरचे अपील हे तांत्रीकदृष्टया दाखल करुन घेणे सुध्दा आवश्यक नव्हते व त्यामुळेच जनमाहिती अधिकारी यांचे वकील श्रीयुत ए. एस. देशपांडे यांनी युक्तीवाद करतांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी हया सहकारी संस्थांना लागू होत नाहीत. याबाबतचा मा. उच्च न्यायालय यांची याचिका क्र. ५६६६/२००७ चा निर्णय आयोगाचे निर्दशनास आणला व त्या कारणास्तव सदरचे अपील हे फेटाळण्यास पात्र आहे. परंतु अपीलकर्ता यांनी उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदींप्रमाणे सहकारी संस्थेत सुध्दा माहिती मागितली. परंतु ती माहिती सहकारी संस्थेने सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिली नाही. उपनिबंधक सहकारी संस्था हया देखील सभासदाने माहिती मागितल्यावर सुध्दा देत नाही या कारणास्तव उपनिबंधक कोणतीही कारवाई करण्यास तयार नाही. अशा परिस्थितीमध्ये अर्जदारास संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याचा मार्गच बंद झालेला आहे.

५. वास्तवीक अपिलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे सहकारी संस्थेची माहिती उपलब्ध करुन द्यावी असा अर्ज केला होता. त्याप्रमाणे सहकारी संस्था जर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण नाही तर त्या सहकारी संस्थेकडे अपीलकर्ता यांचा अर्ज हस्तांतरीत करणे हे योग्य नव्हते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) नुसार

"माहिती '' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे "माहिती'' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा आहे. त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज इ. आणि त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यांन्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणतीही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती, याचा समावेश होतो. अशी तरतुद आहे. असे असल्यामुळे सहकारी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहील. त्यावर ॲड. श्रीयुत ए. एस. देशपांडे यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, संस्थाना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा लागू नसल्यामुळे उपनिबंधक सहकारी संस्था हे सुध्दा सहकारी संस्थाकडून माहिती उपलब्ध करुन घेवून पुरवू शकणार नाही. हा त्यांचा युक्तिवाद "माहिती'' च्या व्याख्येच्या संदर्भात संयुक्तिक नाही.

वरील व्याख्येमध्ये "त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कायद्यान्वये म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे, सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी म्हणजे उपनिबंधक या सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी, कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती, त्यात मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सहकारी संस्था हे खाजगी निकाय होते, त्यामुळे अशा सहकारी संस्थांकडून म्हणजेच खाजगी निकायांकडून माहिती मिळवून अर्जदारास उपलब्ध करुन दिल्यास अशी माहिती "माहिती '' या संज्ञेच्या व्याख्येत समाविष्ट होते''. असा त्याचा अर्थ काढता येईल. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा प्रत्यक्षपणे सहकारी संस्थांना लागू होत नसला तरी उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे अर्ज केल्यास त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये असलेल्या तरतुदीनुसार माहिती उपलब्ध करुन घेवून अर्जदारास माहिती पुरविणे आवश्यक होते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी, उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय यांनी संबंधीत सहकारी संस्थेकडून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत उपलब्ध करुन पुरविण्यात यावी. तसा संबंधीत संस्थेने आदेश न पाळल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रमाणे उपनिबंधक सहकारी संस्था यांना कारवाई करता येईल.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)<br>
**मा. आयुक्त**<br>
**राज्य माहिती आयोग**<br>
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ३९२/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. चेतना हिरामण सोनवाने<br>तिवारी कॉलोनी, गुरुनानक वार्ड, गणेश नगर, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया - ४४१६०१ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी<br>ता. देवरी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी<br>ता. देवरी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपिलकर्ता यांनी दिनांक ०४/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी यांचे कार्यालयात माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक २४/०१/२०१० ला पद ' शिपाई ' ची लेखी परिक्षा, बैठक क्र. P-२ च्या निकालाची उत्तरपत्रिका तसेच प्रश्नपत्रिकेची मुळ उत्तरपत्रिका नक्कल मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०२/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांना केंद्रीय आयोगाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने दि. १०/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ३०/०३/२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो. सुनावणी प्रसंगी महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग मंत्रालय विस्तार मुंबई, शासन निर्णय क्र. संकिर्ण २००६/ प्र.क्र/ ३०९, का. १५, दि. २१/०२/२००७ चे शासन निर्णय वाचन करणे करिता त्यांना उपलब्ध करुन देण्यात आले. गुणांचा गुणदान तक्ता दाखविण्यात आला व समाधान झाल्याने प्रकरण नस्तीबध्द करण्यात आले. असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यानी असे सांगितले की, त्यांनी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मागितलेली आहे परंतु ती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आदिवासी विकास विभाग यांना दि. २१/०२/२००७ रोजी मा. माहिती आयोगाच्या निर्णयाचा आधार घेवून उत्तरपत्रिका तपासणे व

ज्या माहिती अधिकाऱ्याच्या ताब्यात उत्तरपत्रिका आहेत त्याची माहिती विश्वासार्हतेचे नाते असल्यामुळे उघड करणे योग्य नाही असे सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१) अंतर्गत सूट देण्यात आली आहे. व त्यामुळे अर्जदारास उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही असे कळविलेले असल्याने व केंद्रीय आयोगाचा निर्णय दिला असल्यामुळे उत्तरपत्रिकेची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही व प्रथम अपीलात सुध्दा तोच निर्णय कायम ठेवण्यात आला आहे.

४. केंद्रीय माहिती आयोगाचा निर्णय राज्य माहिती आयोगावर बंधनकारक नाही. त्याचप्रमाणे अधिनियमाच्या कलम ८ (१) मध्ये स्पष्टपणे उत्तरपत्रिका या गोपनिय असून प्रकट करण्यास अपवाद केला आहे अशी तरतुद नाही. तसेच परिक्षक व परिक्षा घेणारे सार्वजनिक प्राधिकरण यांचेमध्ये विश्वासार्हतेचे नाते असते व त्यामुळे तपासलेल्या उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत उपलब्ध करुन देता येणार नाही हे म्हणणे योग्य नाही. परिक्षक जेव्हा उत्तर पत्रिका तपासतात तेव्हा त्यांना दिलेले कर्तव्य ते करीत असतात. परिक्षक जेव्हा उत्तरपत्रिका तपासतात तेव्हा ते कर्तव्य त्यांनी विश्वासाने केले पाहिजे हे जरी खरे असले तरी ते कर्तव्य करतांना जी जबाबदारी आहे ती जबाबदारी योग्यरित्या पार पाडली आहे की नाही याबाबतची पारदर्शकता आवश्यक आहे. दिलेले कर्तव्य जबाबदारीने पार पाडले नसेल तर एखाद्या परिक्षार्थिचे नुकसान होऊ शकते. व त्याबाबत त्या परिक्षार्थिस शंका असल्यास त्याच्या शंकेचे निरसन करणे म्हणजेच पारदर्शकता असणे असे अधिनियमाच्या तरतुदीशी सुसंगत आहे. परिक्षकास उत्तरपत्रिका तपासण्याचा मेहनताना सुध्दा मिळतो व विश्वासार्हतेचे नाते असल्यामुळेच उत्तरपत्रिकेची प्रत देता येणार नाही हे म्हणणे योग्य होणार नाही. उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे, अधिनियमाच्या आदेशाच्या निकषाने अपीलकर्ता यांना उत्तरपत्रिकेचे निरिक्षण करण्याची परवानगी देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी जि. गोंदिया यांना मागितलेली परिक्षेतील उत्तरपत्रिकेची प्रत ही निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावी व निरिक्षण झाल्यावर उत्तरपत्रिका योग्य ठिकाणी ठेवण्याची जबाबदारी घ्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ३९१/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रेमनाथ एकनाथ निमजे<br>C/o, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा कृष्ठरोग, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक<br>आरोग्य सेवा, नागपूर विभाग नागपूर<br>माता कचेरीजवळ, दिक्षाभूमी चौक, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक<br>आरोग्य सेवा, कृष्ठरोग, गोंदिया<br>सिव्हिल लाईन, हनुमान मंदिर मागे, बटर हॉटेलजवळ,<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे गैरहजर आहेत जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक आरोग्य सेवा, यांचे तर्फे डॉ. जयप्रकाश चंद्रमोहन रामटेके हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २७/०४/२०१० रोजी बंगलोर येथील परमपुज्य श्री रविशंकर गुरुजी यांचे प्रशिक्षण कार्यालयात हजर राहण्याचे असल्यामुळे मुदत मिळावी अशी विनंती केली आहे. पंरतु जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे आज गोंदियावरुन शासनाचा प्रवास भत्ता वगैरे घेवून आले आहेत. व त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता सुध्दा शासनाचा कर्मचारी आहे व तसे जनमाहिती अधिकारी यांना कळविण्यात आलेले असून अपीलकर्ताने तसे कळविलेले नाही. व म्हणून अपीलकर्ताचा मुदतीचा अर्ज नाकारण्यात येत आहे.

३. अपीलकर्ता यांनी दि. १४/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी कार्यालय सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कृष्ठरोग) गोंदिया यांचेकडे अतिरिक्त ग्रेड वेतन दिलेले नाही, रुपये ४००/- कां ? अशी माहिती विचारली आहे. सदरची माहिती प्रत्यक्ष व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ११/०२/२०१० रोजी मुदतीच्या आत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. ती त्यांना दि. १६/०२/२०१० रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. पंरतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांना दि. १५/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात अपीलकर्ता यांना दि. ०४/०५/२०१०

रोजी पुन्हा स्पष्टीकरण वजा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. वास्तविक अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालकआरोग्य सेवा यांनी महाराष्ट्र शासन निर्णय क्रः वेतन ११०२ / प्र.क्र. ४३/ सेवा - ३ मंत्रालय मुंबई दि. ३१/०८/२००९ प्रमाणे जी कारवाई झाली होती ती त्यांना ११/०२/२०१० च्या पत्रानुसार कळविण्यात आली. परंतु त्यानंतर महाराष्ट्र शासन निर्णय क्रः वेतन ११०९ / प्र.क्र. ४४/ सेवा - ३ मंत्रालय मुंबई दि. ०१/०४/२०१० नुसार कारवाई करण्यात आली असे कळविले गेले. त्यामुळे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती पूर्वीच्या शासन निर्णयाप्रमाणे बरोबरच होती. व प्रथम अपीलाच्या नंतर ०१/०४/२०१० रोजी नवीन शासन निर्णयानुसार कारवाई करण्यात येईल असे कळविले असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली असून सुध्दा द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपील दाखल करण्याचे काहीही कारण नव्हते. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की, अपीलकर्ता यांनी हजेरीपटावर दि. ०९/०२/२०१० पर्यंत सही केलेली आहे. व त्यानंतर १०/०२/२०१०, ११/०२/२०१०, १२/०२/२०१०, १३/०२/२०१०, १४/०२/२०१०, १५/०२/२०१० या तारखांवर सही सुध्दा केलेली नाही व अर्ज सुध्दा दिलेला नाही. व दि. १६/०२/२०१० रोजी हजर होवून माहिती घेतलेली आहे त्याचे कारण त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली हे त्यांना दाखवायचे आहे असे त्यांना वाटते. वास्तविक अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले होते. त्यामुळे त्यांनी स्वतः ३० दिवसांत माहिती घेण्यास हजर व्हायला पाहिजे. त्यामुळे ते ज्या दिवशी हजर झाले त्यादिवशी त्यानी माहिती घेतलेली असल्याने ती माहिती विलंबाने मिळाली असे म्हणता येत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की त्यांनी हलचल रजिस्टरवर सुध्दा कोणत्याही सह्या केलेल्या नाही व अपीलकर्ता हे त्यांचेकडे कार्यालयात कार्यरत असल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींच्या अंमलबजावणी करिता त्यांचेकडे सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याचे काम दिलेले असल्यामुळे त्यांनी स्वतःच माहिती घेणे अभिप्रेत आहे. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्याने सदरचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ३९०/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. विजय उमराव डोंगरे उर्फ डोंगरवार<br>वार्ड क्र. ३, (पंचशील झेंडा चौक)<br>मु. पो. कटंगीकला गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी<br>(पंचायत विभाग जिल्हा परिषद) गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया तर्फे श्री संजय बनकर, अधिक्षक, ग्राम. पंचायत. विभाग जिल्हा परिषद गोंदिया हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २४/११/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, तथा कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे जिल्हयातील सर्व पंचायत समितीचे संदर्भातील एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहे असेही नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १२/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. २८/०१/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली असून अपीलार्थी यांना वेळोवेळी माहिती घेण्यासाठी व चर्चेसाठी बोलविण्यात आले होते, त्यामुळे अपीलार्थीने मागितलेली माहिती जी की, या कार्यालयात उपलब्ध आहे ती अपीलार्थी यांना मुदतीचे आंत पुरविण्यात यावी, असा निर्णय देण्यात आला होता. परंतु त्या बाबतही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही व माहितीही उपलब्ध झाली नाही, या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याबाबतीत अर्थबोध झाला नसल्याने अपीलकर्ता यांना दि. ०८/१२/२००९ रोजी चर्चेसाठी त्यांचे कार्यालयात बोलविण्यात आले होते. ते चर्चेसाठी आले होते, त्यांच्याशी चर्चा झाली परंतु त्यांनी सही करण्यास नकार दिला. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आतापर्यंत कोणत्याही

प्रकारचे पत्र  मिळालेले नाही. व ते चर्चेला उपस्थित झाले नाहीत. त्यानंतर दि. ११/१२/२००९ रोजी पंचायत समिती यांना माहितीसाठी पत्र देण्यात आले. अर्जदारासही प्रत उपलब्ध करुन देण्यात आली. दि. १६/१२/२००९ रोजी अर्जदारास माहिती प्राप्त करुन देण्यासाठी बोलविले परंतु अर्जदार आले नाही म्हणून दि. ०५/०१/२०१० रोजी दुसऱ्यांदा बोलविण्यात आले. त्यानंतर १८/०१/२०१०, ०६/०२/२०१० रोजी बोलविण्यात आले. दि. ३०/०३/२०१० रोजी प्रथम अपीलाच्या निर्णयाची प्रत दुसऱ्यांदा देण्यात आली तरीपण अपीलकर्ता हे माहिती उपलब्ध करुन घेण्यास कार्यालयात हजर झाले नाही.

४.  अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती एकत्रितपणे जिल्हा परिषद मध्ये उपलब्ध नाही व त्यानुसार ही सर्व माहिती प्रत्येक पंचायत समिती कडून मागवून उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मागितलेली माहिती अतिशय व्यापक प्रमाणात आहे. आतापर्यंत तीन पंचायत समित्यांकडून माहिती उपलब्ध झाली आहे. अपीलकर्ता यांना ती पुरविण्यात येईल. यावर जनमाहिती अधिकारी यांनी माहिती व्यापक प्रमाणात असली तरी ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावयाचे जरी असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती मागितलेली असल्याने व्यक्तीशः जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होवून जी माहिती उपलब्ध असेल ती घेणे संयुक्तिक राहील. व उर्वरीत माहिती जशी - जशी पंचायत समित्यांकडून उपलब्ध होईल तशी ती घेणे संयुक्तिक राहील.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ३९४/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. महेंद्रकुमार ऋषिजी धावडे<br>२१, द्रोणागिरी, गेडाम ले-आउट (भामटी)<br>नागपूर - २२. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपुर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी<br>माध्यमिक शिक्षण विभाग<br>जिल्हा परिषद नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपिलकर्ता यांनी दिनांक २१/१०/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा माध्यमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे भौतिक व शैक्षणिक सुविधा नसलेल्या शाळा, २००५ ते २००९ च्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

अ) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था अधिनियम १९७६ मधील कलम ३ नुसार गैरव्यवस्थापन असलेल्या संस्थांची सूची.

ब) शैक्षणिक/भौतिक सुविधांचा अभाव, अयोग्य शालेय इमारत, क्रिडांगणाचा अभाव, नियमानुसार वर्ग खोल्या नसने, ग्रंथालय, प्रयोगशाळा व शिक्षक कक्ष नसने, सेवा जेष्ठता सुचीतील वर्गवारीत बदल करणे इ. शाळांची सुची

क) २००५ ते २००९ च्या दरम्यान मान्यता काढलेल्या शाळा व पुर्नमान्यता बहाल करण्यात आलेल्या शाळांची सुची.

३. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २४/११/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ११.०१.२०१० रोजी दिलेला दिसतो. प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे समाधान झालेले नसल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी जो माहितीचा अर्ज दाखल केलेला आहे त्या माहिती अर्जाची दखलच घेतलेली नाही. व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी दिसून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा माहिती अर्जाची दखल घेतली नाही. आज उपस्थितीत असलेले जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी असे सांगितले की, तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली आहे

असे दुरध्वनीवरुन सांगितले. परंतु कागदपत्रांमध्ये तसे काहीही नमूद केलेले नाही. व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या तिनही मुद्दयांच्या संदर्भात उपलब्ध असलेली माहिती मिळाली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत त्यांच्या दिनांक २१/१०/२००९ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने तीनही मुद्दयांच्या संदर्भातील, माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता यांच्या दि. २१/१०/२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाची दखल घेतली नसल्याने त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये करण्याची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी करावयाची आहे. त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत त्यांना पाठविण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ३९५/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रकाश जनार्दनराव सोनकुसळे<br>प्रताप नगर जवळ, न्यु पोष्टल कॉलनी,<br>मुनोत लॉन मागे, वार्ड नं. १, वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर<br>आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर<br>आदिवासी भवन, गिरिपेठ, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, अनुसुचित जाती व जमाती पडताळणी समिती यांचेकडे श्री काशीनाथ जर्नादन सोनकुसळे यांची जात पडताळणीची नस्ती मिळणेबाबत माहितीचा कालावधी १९९४-१९९५ नमूद करुन माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.०८/०२/२०१० रोजी त्रयस्थ पक्षाला विचारणा करणे, श्री काशिनाथ सोनकुसळे यांचा सध्याचा पत्ता कळविण्याबाबत विचारणा केल्याचे दिसून येते. सदरचा पत्ता कळविल्यानंतर दि. १२/०३/२०१० रोजी श्री काशीनाथ सोनकुसळे यांना विचारणा केल्यानंतर व त्यांनी परवानगी दिल्यानंतर सदरचे प्रकरण न्यायालयीन प्रकरण असल्याने पॅनल ॲडव्होकेटकडून नस्ती प्राप्त झ ाल्यानंतर हवी असलेली कागदपत्रे देण्यात येतील असे दि. ०७/०४/२०१० च्या पत्रान्वये कळविले आहे. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी २०/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतरही माहिती

उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले. परंतु दि. ०४/०५/२०१० च्या पत्रावर पॅनल अॅडव्होकेट यांनी संबंधीत नस्ती दि. १०/०८/२००२ रोजी परत पाठविण्यात आलेली आहे, असे कळविलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची नस्ती आता उपलब्ध झाली आहे. त्यामुळे आता माहिती उपलब्ध करून देण्यास कोणतीही अडचण नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना संपूर्ण नस्तीच्या छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करून द्याव्यात. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः हा निर्ण य मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व माहिती उपलब्ध करून घ्यावी.

२. अपीलकर्ता यांच्या दि. ३१/१२/२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुद्दयांमध्ये माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्याने त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी करावयाची आहे. त्यासाठी त्यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ३९३/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अरुण चंपतराव खडतकर<br>संत तुकडोजी विद्यालयामागे, वार्ड क्र. १०,<br>प्रताप नगर, वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती कारंजा (घाडगे)<br>ता. कारंजा (घाडगे) जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी<br>पंचायत समिती कारंजा (घाडगे)<br>ता. कारंजा (घाडगे) जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०२/२०१० रोजी भविष्यनिर्वाह निधी ना परतावा प्रकरण मंजूरी आदेशाबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदर आग्रहाच्या अनुषंगाने, अपीलकर्ता यांना दिनांक ०६/०३/२०१० रोजी आपण बदली प्रवासभत्ता देयक या कार्यालयास ६ व्या वेतन आयोगा नुसार आकारणी केल्यामुळे मंजूर करता येत नाही. तरी आपण ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे देयक रकमेची आकारणी करुन देयक सादर करावे असे पत्र त्यांना दिलेले दिसून येते. तसे दि. १५/०२/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ०३/०३/२०१० रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी निवेदन दिलेले आहे. त्यामुळे भविष्य निर्वाह निधी खाता क्र. VD-२७६ बाबत ३ महिन्याचा कालावधी संपलेला दिसून येतो. दि. १४/०५/२०१० ला प्रकरण मंजूरी करीता पाठविलेले आहे. त्याची प्रत मिळाली परंतु विलंब झाल्याने त्रास सहन करावा लागला. बदली प्रवास भत्ता देयके मंजूरीबाबत मागणी प्रमाणे कोणताही दस्तऐवज प्राप्त नाही. दोन दिवसाचे वेतन मागणी प्रमाणे स्पष्टीकरण सादर. परंतु वेतन पाठविणेबाबत कोणताही दस्तऐवज प्राप्त नाही असे निवेदन दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना दस्तऐवज प्राप्त झालेला नसला तरी दि. १५/०२/२०१० चे पत्र हे

खारीज केलेले स्पष्ट दिसून येते. व त्यावरुन अपीलकर्ता यांनी कारवाई करुन मागितलेली दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचा आदेश देता येत नाही. आणि त्यातही त्यांना पूर्तता करण्यास कळविलेले दिसून येते. त्यामुळे कोणताही दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## **आदेश**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४०१/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. भगीरथ दलीरामजी नागलवाडे<br>१८, गुजराती कॉलनी, गणेशपूर, भंडारा<br>ता. जि. भंडारा. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी<br>ता. जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी<br>जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा<br>ता. जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |

**अपील क्र. ४०२/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य<br>जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा<br>ता. जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |
| ५. | जन माहिती अधिकारी<br>जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा<br>ता. जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्र. ४०१/२०१० मध्ये दि. २६/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी समाज कल्याण विभाग यांचेकडे सन २००५/२००६ व २००८/२००९ या कालावधीतील समाज कल्याण विभाग, जे एम पटेल, भंडारा या महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वाटपासाठी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना दिलेले हजेरीपट व इतर माहितीच्या आधारे अग्रीम रकमा व इतर सर्व प्रकारच्या रक्कम दिल्या गेल्या त्याचे विवरण व

त्या रकमांचे वाटप केव्हा केव्हा सदर महाविद्यालयाकडून करण्यात आले उर्वरीत किती रक्कम केव्हा केव्हा परत करण्यात आली त्याच्या विवरणाच्या स्वाक्षांकित प्रती यांची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि. २५/०३/२०१० रोजी प्राचार्य जे. एम. पटेल महाविद्यालय यांना विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिला आहे. व अपीलार्थीला सुध्दा प्रत दिली आहे. त्याप्रमाणे दि. ३१/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जे. एम. पटेल महाद्यिालय, भंडारा यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये रुपये ५०००/-, झेरॉक्सिंग खर्च, कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त भत्ता रू. १०००/- व पोस्टेज खर्च रू.५०/- असे एकूण रुपये. ६०५०/- रोख वा डी.डी. च्या स्वरुपात जमा करावे असे पत्र दिले होते. अपीलकर्ता यांनी अवास्तव रक्कम फी म्हणून आकारली आहे या कारणास्तव विशेष समाज कल्याण अधिकारी भंडारा यांचेकडे अपील केले होते. महाविद्यालयाकरीता प्रथम अपीलीय अधिकारी हे शिक्षण उपसंचालक आहेत. व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी नाही असे कळविलेले असतांना सुध्दा अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले नाही. मात्र दि. ०९/०४/२०१० रोजी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी भंडारा यांनी या कार्यालयाकडून जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा यांना देण्यात आलेली. भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क बाबतची माहिती (रेकॉर्ड) या कार्यालयात उपलब्ध आहे व ते पाहण्याकरीता खुले आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांनी समाजकल्याण विभागाकडूनच मागितलेली होती. परंतु ती माहिती समाजकल्याण विभागाने उपलब्ध करुन न देता महाविद्यालयाकडे अपीलकर्ता यांचा अर्ज हस्तांतरीत केला. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहिती मध्ये हजेरीपटाची माहिती मागितलेली होती. ती माहिती महाविद्यालयाकडे असते तसेच शिष्यवृत्ती महाविद्यालयाने दिल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती प्राचार्य मंजूर करतात. विद्यार्थ्यांचे त्याबद्यलचे रेकॉर्डही महाविद्यालयात असतात. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, भंडारा यांचे दि. ०९/०४/२०१० रोजीचे पत्रातूनच माहिती त्यांचेकडे उपलब्ध असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदरची माहिती त्यांना विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी भंडारा यांचेकडून देता आली असती असे त्यांच्या दिनांक ०९/०४/२०१० च्या पत्रावरुन स्पष्ट होत असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा प्राचार्य, जे.एम.पटेल महाविद्यालय, भंडारा यांचेकडे दिनांक ०८/०२/२०१० रोजी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. १९/०३/२०१० रोजी मुद्येनिहाय उत्तर दिलेले दिसून येते. तसेच उत्तराच्या माहितीकरीता येणारा अतिरिक्त खर्च सुध्दा कळविण्यात आलेला आहे. परंतु सदरचे पत्र हे मुदतीनंतर कळविण्यात आले असल्याने अपीलकर्ता यांनी तत्पूर्वीच दिनांक १५/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते. त्यासंदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांना दि. २९/०३/२०१० रोजी पुन्हा सर्व मुद्दांच्या संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते. प्रथम अपीलच्या संदर्भात दि.३०/०४/२०१० रोजी पून्हा खर्चाची मागणी केलेली दिसून येते. त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितल्याने त्यांनी प्राचार्य तथा जनमाहिती अधिकारी यांना माहिती मागितलेली आहे. खर्चाचा भरणा करावा हे कळविलेले नाही व त्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम ७ (६) प्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज आला त्यावेळी महाविद्यालयात परिक्षा व प्रॅक्टिकल सुरु झाले होते व त्यामुळे अपीलकर्ता यांना पत्र हे विलंबाने दिले होते. परंतु सदरचे कारण संयुक्तिक नाही. कारण त्याबाबत ३० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना तसे कळविण्यात आलेले असते, परंतु तसे ते कळविण्यात आले नाही. माहिती उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया मुद्दे विचारात घेवून ३० दिवसांचे आत पूर्ण करावयाचे असते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक आहे. त्यात विद्यार्थ्यांचे पत्ते उपलब्ध करुन देता येणार नाही. मात्र इतर माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी कार्यालय विशेष जिल्हा समिती अधिकारी यांचेकडे कामकाजाचे दिवशीचे तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून त्यांना मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांचे निरिक्षण करावे व आवश्यक असेल ती माहिती त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात यावे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर त्यांनी मागितलेल्या माहितीच्या नस्ती निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन देणे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

३. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ४०२/२०१० हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांनी त्यांच्या दिनांक ०८/०२/२०१० च्या अर्जात मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**(विलास पाटील)**
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४०४/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रमेश हिरामण नागपुरे<br>मु. शिवाजी वार्ड, शुक्रवारी, परागबार समोर,<br>स्टेशन रोड, भंडारा.<br>ता.जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा समादेशक<br>जिल्हा होमगार्ड कार्यालय भंडारा<br>ता.जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी<br>जिल्हा होमगार्ड कार्यालय भंडारा<br>ता.जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ३०/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, जिल्हा होमगार्ड कार्यालय भंडारा यांचेकडे सन २००८ मध्ये व २००९ मध्ये घेण्यात आलेल्या शहरी व ग्रामीण पुरुष व महिला भरतीचा अहवाल मिळणेबाबत च्या संदर्भात संपूर्ण माहिती शीघ्र टपालने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १०/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना दि. २५/०२/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. व जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती माहिती दि. ०७/०४/२०१० रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु ती अपूर्ण आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होवून त्यासंदर्भात संपूर्ण कागदपत्रांचे निरिक्षण करुन जी माहिती उपलब्ध झाली नसेल ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगास असे सांगितले की, जी माहिती उपलब्ध आहे ती दिलेली होती. तरी सुध्दा निरिक्षणाकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१.	अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्ता यांनी कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ जनमाहिती अधिकारी यांना लेखी कळवून त्यादिवशी उपस्थित होवून संबंधीत कागदपत्रांची तपासणी करुन त्यातील आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात यावे.

२.	अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील संपूर्ण नस्ती त्यांचेकडे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे. त्या विषयाच्या संदर्भातील जी कागदपत्रे उपलब्ध नसतील ती उपलब्ध नाही असे लेखी स्वरुपात द्यावे.

३.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४०५/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती पुजा तुषार मंडलेकर<br>एल.३७, यशवंत नगर, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर<br>ता.जि. नागपूर - ४४० ०१० | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकरी<br>परिवहन कार्यालय नागपूर (शहर)<br>ता.जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी<br>परिवहन कार्याल नागपूर (शहर)<br>ता.जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. विश्वास बागडदेव हजर आहेत. उपस्थितांपैकी प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, तथा उपविभागीय परिवहन अधिकारी यांचेकडे M.V. No:- MH३१-BB-२७२९ या वाहनाच्या संदर्भात कार्यालयाने पार्ट - B च्या संदर्भात जे रजिस्टर मेन्टेन केले आहे किंवा नमूना आहे त्याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही, म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ०३/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते. त्यानंतर दि. ०६/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांना अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर दि. २०/०३/२०१० रोजीच्या प्रथम अपीलाच्या निर्णयातून माहिती घेवून जावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दि. ३०/०३/२०१० रोजी अर्जदारास वाहन क्र. एमएच ३१ बीबी-

२७२९ या वाहनाच्या एकूण १८ छायांकित प्रती पुरविण्यात आलेल्या दिसून येतात. पंरतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे वकील यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, कार्यालयातील पार्ट 'B' प्रमाणे जे रजिस्टर मेन्टेन केलेले आहे त्या रजिस्टरची माहिती किंवा छायांकित प्रती, उपलब्ध करुन देण्यात यावे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अशा प्रकारचे कोणतेही रजिस्टर त्यांच्या कार्यालयात मेन्टेन करण्यात आलेले नाही. संबंधीत अधिनियमाचे कलम २८५ प्रमाणे कोणत्याही प्रकारचे नमूना किंवा रजिस्टर ठेवण्यात यावे अशी तरतुद केलेली नाही. परंतु Motor Vehicle Act, १९८८ च्या तरतुदीं प्रमाणे दि. २७/११/२००२ रोजी काढलेल्या सुचनेत म्हटल्याप्रमाणे पार्ट 'B' चे रजिस्टर उपलब्ध नाही. कारण सदरची सुचना जी सुधारीत नियम आहे व त्यात Rule २८५ ला सुधारणा केली आहे. व त्यात स्मार्ट कार्ड मधील अधीकची कोणती माहिती द्यावी याबद्यलचे ६ मुद्ये दिलेले आहे. कोणत्याही प्रकारचा नियम दिलेला नाही. तसेच नोंदणीकृत असावे असाही होत नाही. मात्र स्मार्टकार्डची माहिती ही संगणकामध्ये भरण्यात आलेली असल्याने त्या माहिती मध्ये या ६ मुद्यांच्या प्रमाणे माहिती त्या-त्या वेळेस भरणे आवश्यक आहे असा त्याचा अर्थ होतो. व त्या-त्या वेळेस ती माहिती स्मार्टकार्ड मध्ये भरली जाते व त्याकरीता विशिष्ट फी ची आकारणी केली जाते. परंतु ती संगणकामध्येच असते त्याप्रकारची कोणतीही कागदपत्रे किंवा नमुना हा कार्यालयात उपलब्ध नाही त्यावर पुन्हा अपीलकर्ता यांचे वकील यांनी अशाप्रकारचा नमुना आहे असे आयोगापुढे सांगितले. त्यावर वकीलांना पुरावे द्या म्हणून विचारले होते. परंतु वकीलांना तशा प्रकारचे पुरावे सादर करता आले नाही. मात्र शासकीय सुचनेप्रमाणे नियम २८५ मध्ये जी सुधारणा करण्यात आली आहे त्यामध्ये स्मार्टकार्ड मध्ये (जे संगणकात साठवलेले असते) कोण-कोणती माहिती समाविष्ट करण्यात यावी यासोबतची यादी देण्यात आलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी अपीलकर्ता यांनी आयोगापुढे ज्या पध्दतीने युक्तिवाद केला आहे त्याप्रमाणे उत्तर देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्ता यांना Motor Vehicle Rules २८५, २८६ तसेच अधिसुचनेने दुरुस्त केलेल्या नियमाप्रमाणे नमुना अथवा रजिस्टर आहे किंवा नाही याबाबतची माहिती स्पष्टपणे उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४०३/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. बसवेश्वर चंद्रशेखर तंबाखे<br>सिल्लेवाडा<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>भूमि अभिलेख कार्यालय नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक<br>भूमी अभिलेख कार्यालय सावनेर<br>ता. सावनेर जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १६/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २४/११/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमि अभिलेख कार्यालय सावनेर यांचे कडे आबादी सर्व्हे क्र. ५०, ३.८३ हे. (आराजी ९.४७) याचा बॉन्ड्री नकाशा, आराजी ९.४७ हे. जागे पैकी निस्तार पत्राच्या नोंदीप्रमाणे २ आर. जागा सार्वजनिक समारंभाकरीता राखून ठेवण्यात आलेली आहे, ती कुठे आहे व त्याचा भुखंड क्र. कोणता, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. ०९/१२/२००९ रोजी आपल्या मूळ अभिलेखाची जी माहिती / नक्कल पाहिजे ती तालुका निरिक्षक भुमी अभिलेख सावनेर कार्यालयात अर्ज करुन व विहित फी भरुन आपल्याला जी माहिती पाहिजे ती कार्यालयातून घ्यावी जेणेकरुन आपल्याला त्वरीत ही माहिती नकलेच्या स्वरुपात देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यासोबत खात्यांची माहिती सुध्दा दिलेली दिसून येते. तसेच इंक्वायरी रजिस्टर सिटी सर्व्हे पण दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना ही माहिती अपूरी व दिशाभूल करणारी वाटत असल्याने व त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी ११/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय हा दि. २५/०१/२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो व दि. ३०/०१/२०१० रोजी सं. नं. ५० मध्ये ००.२ आर जागा नकाशात कुठेही दर्शविलेली नाही यामुळे आपल्याला या ००.२ आर जागेचा नकाशा देता येत नाही अशी माहिती पोस्टाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना आराजी ९.४७ चा नकाशा पाहीजे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ९.४७ हे. चा च नकाशा उपलब्ध नाही.

तरीसुध्दा संपूर्ण नकाशा उपलब्ध आहे अशी माहिती त्यांना दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेला नकाशा तयार करुन पाहिजे असे दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे माहिती जशी आहे तशीच उपलब्ध होती. ९.४७ हे. आर चा नकाशा जर तयारच केलेला नसेल तर तो तसा उपलब्ध होवू शकणार नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की तो नमुन्यानुसार सुध्दा करता येत नाही यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्याने सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४३९/२०१०**

१. श्री प्यारेलाल आर गवळी - **अपीलकर्ता**
शांती निकेतन शिक्षण संस्था,
२०, एम.आय.जी., ५/३ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मार्ग,
सुपर स्पेशालिटी समोर, विश्वकर्मा नगर, नागपूर

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी/सक्षम प्राधिकारी - **उत्तरवादी**
नागरी जमीन कमाल धारणा, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर

३. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगर रचनाकार - **उत्तरवादी**
नागरी जमीन कमाल धारणा, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक २१/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १४/११/२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी नागरी जमीन कमाल धारणा, यांचेकडे एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. सदर माहिती मध्ये दि. ०७/१०/१९९३ रोजी अर्बन लँड सिलिंग कमेटीचे सभेत मंजूर ठरावाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७/११/२००६ रोजी वस्तुस्थिती उपलब्ध करुन

दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने यांनी मार्च २००९ मध्ये प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. ०५/०५/२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढें असे सांगितले की, त्यांनी आतापर्यंत मंत्रालयात सुध्दा ०७/१०/१९९३ च्या ठरावाची प्रत मागितलेली आहे. परंतू नागपूर येथे नागरी जमीन कमाल धारणा, यांचेकडूनच प्रत उपलब्ध करुन घ्यावी असे कळविण्यात आले. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, संपूर्ण अभिलेखाचा शोध दोनवेळा घेण्यात आला आहे. न्यायालयीन बट्टा कमिशन च्या वेळी सुध्दा ही संपूर्ण कागदपत्रे आयोगापुढे दाखल करण्यात आली होती. त्यावर सुध्दा ०७/१०/१९९३ रोजी सभा झाली, माहिती ठराव झाला आहे असे आढळून आले होते. असे असले तरी अपीलकर्ता यांना संपूर्ण कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देता येतील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येते. अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून संपूर्ण अभिलेखांचे निरिक्षण करुन त्यात दि. ०७/१०/१९९३ रोजी च्या बैठकीचे इतिवृत्त मिळाल्यापासून ती प्रत विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन घ्यावी.

२. अपीलकर्ता यांनी कळविलेल्या तारखेस उपस्थित झाल्यावर त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील संपूर्ण कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्यावेळी त्यांना अपेक्षीत असलेली माहिती मिळाल्यास विनामुल्य छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४४१/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दिपक बाबुराव म्हसलकर<br>मारोतीभाऊ समाधी परिसर, जुनी म्हाडा कॉलनी परिसर, सिंदी (मेघे)<br>वार्ड नं. ५, वर्धा. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वर्धा.<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा सिरस्तेदार<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मा. उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचे आदेश पत्र क्रं.प्र-१/उविअ/कावि-७४०/०८ दि.१५/०४/२००८ नुसार अर्जदार बाळकृष्ण नत्थुजी झाडे रा. वर्धा यांना त्यांचे अकृषक शेत सर्व्हे मु. २०९ एकूण आराजी २.७५ हे.आर. पैकी शिल्लक ०.१४ आर. जागेचा ७/१२ देण्याचे आदेश श्री सि.डी. पिंपळे (तलाठी) बोरगाव (मेघे), वर्धा यांना ज्या दस्तऐवजाच्या (कागदपत्रांच्या) आधारे दिले ते सर्व, फाईल मधील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मला देण्यात याव्या तसेच उपरोक्त प्रकरणा संबंधीचा संपूर्ण रेकॉर्ड मला पाहणीकरीता उपलब्ध करुन द्यावा. त्यासंबंधीचा दिनांक व वेळ मला कळवावे ही विनंती.

३.	सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषगाने अपीलकर्ता यांना दि. १९/०१/२०१० रोजी पत्र देवून दि. २१/०१/२०१० ला दु. १२.०० वाजता उपस्थित होवूननिरिक्षण करावे असे कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता हे शालेय कामकाजाच्या व्यस्ततेमुळे उपस्थित राहू शकत नाही, तेव्हा झेरॉक्स प्रती पाठवून द्याव्यात असे जनमाहिती अधिकारी यांना कळविले. व त्यानंतर ०५/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले तेव्हा अपीलकर्ता यांनी सांगितले की, जो अहवाल त्यांनी मागितलेला आहे तो अहवाल त्यांना आता पर्यंत प्राप्त करुन दिलेला नाही त्यावर जनमाहिती अधिकाऱ्यानी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये संपूर्ण कागदपत्रांच्या पाहणीकरीता विनंती केली होती, त्याप्रमाणे त्यांना पत्र दिले होते. परंतु उपस्थित न राहता त्यांनी संपूर्ण प्रकरणातील झेरॉक्सच्या प्रती पाठवून द्यावे असे कळविले होते. त्याप्रमाणे दि. २७/०१/२०१० रोजी प्रति पृष्ठ रुपये २ प्रमाणे १४४ पानांचे एकूण रु. २८८/- अधिक पोस्टेज खर्च रु. ६०/- असा रु. ३४८/- चा भरणा करावा असे विहित मुदतीत कळविले होते. परंतु याबाबत त्यांनी प्रथम अपीलामध्ये किंवा द्वितिय अपीलामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. सर्वसाधारणपणे खर्चाचा भरणा करावयाचे कळविले. अर्जदाराला ते पत्र मिळत नाही असेच ते म्हणतात व या प्रकरणात सुध्दा खर्चाचा भरणा करावयाचे असल्यावर सुध्दा प्रथम अपीलात किंवा द्वितिय अपीलात त्याबाबत उल्लेख न करता फक्त छायांकित प्रती दिलेल्या नाही एवढेच कारण त्यांनी दिलेले आहे.

४.	सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे विहित मुदतीत सर्व कारवाई केलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४४२/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नारायण पंचम डोंगरे<br>भानेगांव (आबादी), घर नं. १२३, वार्ड नं. ३, भुखंड क्र. १६/१,<br>पोष्ट खापरखेडा, भानेगांव ता. सावनेर जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत)<br>पंचायत समिती सावनेर<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्रामपंचायत भानेगांव<br>पो. खापरखेडा ता. सावनेर जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २६/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १८/०७/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत भानेगांव, सावनेर जि. नागपूर यांचेकडे जानेवारी १९८९ ते ३० एप्रिल २००९ या कालावधीत अर्जदारास वाटप झालेल्या भुखंड तक्रारीच्या संदर्भातील अर्ध्या भुखंडावर भागीदाराने केलेल्या बांधकामाच्या संदर्भामध्ये एकूण १५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांनी २१/११/२००८ रोजी तक्रार सुध्दा केलेली दिसून येते. त्या तक्रारीच्या संदर्भात सुध्दा माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना १४/०८/२००९ ला व्यक्तीशः भेटून अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०६/१०/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना मुद्या क्र. १ ची माहिती मिळाली, परंतु त्यांचे २१/११/२००८ चे तक्रारीप्रमाणे कोणत्याही प्रकारची माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही.

सचीव ग्रामपंचायत यांनी मुंबई ग्रामपंचायत (गावठाण विस्तार व इमारत) नियमाप्रमाणे कारवाई करणे आवश्यक होते. परंतु तशी कारवाई त्यांनी अद्यापपर्यंत केलेली नाही. किंवा केलेली असल्यास त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जो भुखंड वाटप झालेला आहे त्याचे वाटप दोघांना मिळून देण्यात आलेले आहे. व त्यातील अर्ध्या भुखंडावर

भागिदाराने बांधकाम केले व अर्ध्या भुखंडावर अर्जदाराचे वहीवाट आहे. परंतु अपीलकर्ता हे सदरचा भुखंड मोजणी करुन मागत आहेत. तशी मोजणी ग्रामपंचायतीस करुन देता येत नाही.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे खरे असले तरी सचिव ग्रामपंचायत यांना मुंबई ग्रामपंचायत (गावठाण विस्तार व इमारत) नियमाप्रमाणे कारवाई करता येते ती त्यांनी करणे संयुक्तिक राहील. त्यांनतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच ग्रामपंचायत सचिव, यांना अर्ज केल्यास अपीलकर्ता यांनी ग्रामपंचायत अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे गटविकास अधिकारी यांचेकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि.२१/११/२००८ रोजीच्या तक्रारीवर झालेल्या कारवाईची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४४०/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. ईश्वर गणपतराव सतई<br>६४, एम.आय.जी. २/८ हिवरी नगर,<br>नागपूर - ८ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>उमरेड<br>ता. उमरेड जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री एस आर देशमुख हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी ०५/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. ३०/१२/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा १७/०२/२०१० रोजी देण्यात आला असून अर्जातील विषय क्र. ३ (२) अन्वये प्रथम अपीलात त्यांनी विस्तृत मुद्दे नमूद केले आहेत, त्यामुळे अपीलातील ४ हीं मुद्यांवर मुद्योनिहाय माहिती अपीलार्थीस ७ दिवसांचे आंत निशुल्क द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानुसार दि. १२/०१/२०१० रोजी ४ मुद्यांवर त्यांना माहिती

उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये अनुपालन अहवालाची प्रत उपलब्ध नाही. वास्तविक विभागीय आयुक्त यांनी अनुपालन अहवाल सादर करावा असा आदेश दिला. त्यांना सुध्दा त्याबाबतची प्रत उपलब्ध झालेली नाही असे कळविलेले आहे. याचा अर्थ आतापर्यंत अनुपालन अहवाल त्यांनी केलेला नाही असे दिसून येते. जनमाहिती अधिकारी आज उपस्थित नाही परंतु त्यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की, अपीलकर्ता यांचा दि. ०५/१२/२००९ चा अर्ज त्यांचेकडे दाखलच झालेला नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती द्यावी असा आदेश दिलेला आहे. असे असले तरी त्यांना प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून प्रस्तुत द्वितिय अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. यामुळे त्यांनी मा. विभागीय आयुक्त यांचेकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४४३/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. बळीराम एस. पाल<br>फुटाला बस्ती चौपाटी जवळ,<br>अमरावती रोड, नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>जलप्रदाय विभाग, महानगर पालिका नागपूर<br>बोले पेट्रोलपंप मागे, डिक दवाखान्याजवळ, धरमपेठ नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>जलप्रदाय विभाग, महानगर पालिका नागपूर<br>बोले पेट्रोलपंप मागे, डिक दवाखान्याजवळ, धरमपेठ नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यानी दि. ०२/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जलप्रदाय विभाग, महानगर पालिका सिव्हिल लाईन्स नागपूर यांचेकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. त्याप्रमाणे ०२/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध आहे, व त्याकरीता रूपये ४१६/- चा भरणा करावा असे कळविल्याचे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती मराठी भाषेत उपलब्ध नाही त्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ०८/०४/२०१० रोजी दिलेला दिसून येतो. प्राप्त रेकॉर्डनुसार विभागातर्फे उपलब्ध माहिती मुदतीत देण्यात आल्याचे निदर्शनास आले, तसेच ज्या विभागाकडे माहिती उपलब्ध होती (इंग्रजीत), त्यानुसार माहिती अर्जदारास देण्यात आलेली असल्याने अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले. माहिती वेळेवर दिली नाही व मराठी भाषेत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी त्यात केली आहे.

३. कागदपत्राचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. व मूळ करारनामा हा इंग्रजी भाषेत उपलब्ध असल्यामुळे तो तसाच उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे कागदपत्रे जशी उपलब्ध असतील तशीच उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. अपीलकर्ता यांना करारनाम्याच्या प्रती ह्या मराठी भाषेत हव्या असल्यास राजभाषा संचालनालयाकडे तक्रार केल्यास यापुढे करारनामा हा मराठी भाषेत करावा अशी व्यवस्था होऊ शकेल. मात्र त्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. ४३८/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मनोहर तेजरावजी गोरे<br>C/o, बाबुरावजी सातपुते यांचे घरी, देशमुख ले आऊट<br>पेट्रोलपंप जवळ, काटोल ता. काटोल जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक<br>नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर.<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी<br>काटोल विभाग काटोल<br>ता. काटोल जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी १०/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक यांचेकडे १) दि. ०१/०२/२०१० रोजी दिलेल्या या रिपोर्ट वरील आपण केलेली कार्यवाही FIR ची प्रत २) माझ्या विरोधात ४९८/३४ अ दाखल करण्यात आलेले दि. १०/०१/२०१० रोजीचा माझ्या पत्निच्या रिपोर्ट अर्जाच्या प्रती शिघ्र डाकेने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. २५/०२/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते त्यात अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. २६/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. ०३/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहिती प्रमाणेच माहिती दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या दिनांक ०१/०२/२०१० च्या रिपोर्टच्या अनुषंगाने कोणतीही माहिती त्यांना अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही व त्यांचे विरुध्द त्यांच्या पत्निने दिलेल्या रिर्पोटची प्रत ही त्यांना आरोपपत्रासोबत मिळालेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी ज्यावेळेस माहिती मागितली त्या वेळेस त्यांचे रिपोर्टवर चौकशी सुरु होती परंतु आता चौकशी पूर्ण झाली आहे. त्यांच्या पत्निने दिलेली रिपोर्टची प्रत ही आरोपपत्राबरोबर दिलेली आहे व त्यांना ती मिळाली नसल्यास त्यांनी जे. एम. एफ. सी. कोर्ट काटोल येथे तक्रार करुन त्यांनी ती उपलब्ध करुन घ्यावी असे सांगितले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मा. न्यायालयामध्ये अर्ज करणे संयुक्तिक राहील. त्यांनी केलेल्या रिपोर्टच्या संदर्भातील चौकशी पूर्ण झाली असल्यामुळे त्या चौकशीचा निष्कर्ष / अहवाल अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. ०१/०२/२०१० च्या रिपोर्टप्रमाणे झालेल्या चौकशीचा अहवाल विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४३३/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती यशोधरा विश्वनाथ सहारे<br>मु. मालदुगी पो. गोठणगाव<br>ता. कुरखेडा जि. गडचिरोली | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक<br>महिला आर्थिक विकास महामंडळ, मुख्यालय मुंबई<br>वांद्रा, मुंबई | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी<br>महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय<br>गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांतर्फे श्री रंजन वानखेडे, जिल्हा समन्वय अधिकारी नागपूर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी १७/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ, कार्यालय गडचिरोली यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१. माझे आजपर्यंत झालेल्या ११ कराराच्या झेरॉक्स प्रती
२. माझ्या कामाच्या ११ करारातील मुल्यांकनाच्या झेरॉक्स प्रती
३. चौकशी समितीचा अहवाल माविम/गड २००८/१३३ दि. १९/०६/२००८ व ०४/०७/२००८ नुसार माविम गड. कार्यालयाने मुख्यालयाला चौकशी अहवाल पाठविला त्याच्या झेरॉक्स प्रती.

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने ११/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अर्जानुसार माहिती घेण्यासाठी तसेच चर्चा करण्यासाठी दि. २७/०१/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालय गडचिरोली येथे उपस्थित रहावे असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी दि. १८/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे द्वितिय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती अद्यापपर्यंत त्यांना मिळालेली नाही. महिला आर्थिक विकास महामंडळ, कार्यालय गडचिरोली येथे माहितीचा अर्ज घेण्याची टाळाटाळ केली जाते. तसेच प्रथम अपील अर्ज घेण्याची सुध्दा टाळाटाळ केली जाते. अपील अर्ज घेण्यास शिपाई यांना सुध्दा सांगितलेले आहे परंतु ते सुध्दा अर्ज घेत नाही म्हणून मुंबई येथील कार्यालयात प्रथम अपील दाखल करावे लागते. माहितीचा अर्ज केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांना भेटण्यासाठी गेले असता ते भेटत नाही व भेटले तरी वेळ नाही असे सांगतात. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जदार हे त्यांना केव्हाही भेटलेले नाही व त्यांना चर्चेसाठी व माहिती घेवून जाण्यासाठी पत्र दिले परंतु त्या हजर झाल्या नाही. प्रथम अपीलावर त्यांनी तारीख जरी दि. १८/०१/२०१० दिलेली असली तरी प्रत्यक्षात त्यांनी दि. २६/०२/२०१० रोजी अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय मात्र दि. २५/०२/२०१० रोजी देण्यात आलेला असून मागितलेली माहिती जिल्हा कार्यालय गडचिरोली यांचे कार्यालयात तयार असून जिल्हा समन्वय अधिकारी यांचेकडून आवश्यक ती फी भरुन घेवून जावे. असे कळविलेले दिसते त्याबाबत सुध्दा अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, आतासुध्दा माहिती उपलब्ध असून ती त्यांना उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. १७/१२/२००९ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ४२९/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मधुकर नारायण चोपडे<br>द्वारा विभागीय व्यवस्थापक, एफ.डी.सी.एम.लि. वन प्रकल्प विभाग<br>रमाबाई आंबेडकर वार्ड, भंडारा<br>ता. जि. भंडारा -४४१ ९०४ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय अधिकारी<br>वन प्रकल्प विभाग यवतमाळ<br>शिशु विहारची इमारत, स्टेट बँक चौक, ता. जि. यवतमाळ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक<br>वन प्रकल्प विभाग यवतमाळ<br>शिशु विहारची इमारत, स्टेट बँक चौक, ता. जि. यवतमाळ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/०५/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २२/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक वन प्रकल्प विभाग शिशु विहाराची इमारत यवतमाळ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१. वनक्षेत्र अधिकारी वणी यांनी माहे एप्रिल २००९ ते डिसेंबर २००९ याकाळात कामाचे हजेरीपत्रके ज्या पत्रक्रमांकान्वये सहाय्यक व्यवस्थापक यांचेकडे पूर्व पारित करण्यासाठी सादर केले आहे त्या पत्रक्रमांकाच्या कार्यालयीन प्रती आणि हजेरी पत्रकांची एकूण रक्कम.

२. सहाय्यक व्यवस्थापक यांनी वनक्षेत्र अधिकारी, वणी यांचे माहे एप्रिल २००९ ते डिसेंबर २००९ पर्यंत कामाचे हजेरीपत्रके पूर्वपारित करुन ज्या पत्र क्रमांकान्वये वनक्षेत्र अधिकारी वणी यांना पेमेन्ट करणेसाठी परत केले आहेत. त्या पत्रांच्या कार्यालयीन प्रती आणि पूर्वपारित हजेरीपत्रकांची रक्कम.

३. वनक्षेत्र अधिकारी वणी यांनी माहे एप्रिल २००९ ते डिसेंबर २००९ या काळात सादर केलेली निधीमागणी पत्रके आणि त्यासोबत जोडलेली पूर्वपारित व्हाऊचर्सची यादी.

४. पूर्वपारित हजेरीपत्रकांच्या रक्कमे इतकी वनक्षेत्र अधिकारी, वणी यांना माहे एप्रिल २००९ ते डिसेंबर २००९ या काळात दिलेली रक्कम.

| **धनादेश क्रमांक** | **तारीख** | **पूर्वपारित हजेरीपत्रकांची रक्कम** | **वाटप केलेली रक्कम** |
|---|---|---|---|
| **१.** | **२.** | **३.** | **४.** |

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ०३/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना दि. २०/०३/२०१० रोजी मुद्या क्र. १ ते ३ ची एकत्रीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसते. मुद्या क्र. ४ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीत मुद्या क्र. ४ प्रमाणे माहिती उपलब्ध आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सांगितले व ती माहिती अपीलकर्ता यांना आज उपलब्ध सुध्दा करुन देण्यात आली. असे असले तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. २२/१२/२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्याने तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचेविरुध्द रुपये २५०/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला दिसत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सुध्दा प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. २२/१२/२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजेच ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा अर्जाची सुध्दा दखल घेतलेली नसल्याने त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) नुसार रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीच्या रकमेची वसूली ही जनमाहिती अधिकारी यांच्या दरमहा वेतनातून करण्यात यावी व लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४३४/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुरेश यशवंत भौतकर, उपकार्यकारी अभियंता<br>(म. रा. विद्युत वितरण कं. मर्या.)<br>४३, जेतवन सोसायटी, खामला, नागपूर -४४० ०२५ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता (भंडारा)<br>सामुग्री व्यवस्थापन कक्ष, म.रा. विद्युत वितरण कं. मर्या.<br>प्रकाशगड, १ ला मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (भांडार)<br>सामुग्री व्यवस्थापन कक्ष, म.रा. विद्युत वितरण कं. मर्या.<br>प्रकाशगड, १ ला मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०४/११/२००९ रोजी श्री. पी. पी. बागुल जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक (क, अतांत्रिक आस्था.), म.रा.विज वितरण कंपनी मर्यादित, 'प्रकाशगड', वांद्रे (पूर्व) मुंबई यांचेकडे अॅड. एस.एस. घाटे यांनी २२/०९/२००९ ला सक्षम अधिकारी व्यवस्थापकिय संचालक, म.रा. विद्युत वितरण कं. मर्यादित, 'प्रकाशगड', वांद्रे (पूर्व) मुंबई यांना दिलेल्या नोटिसबाबत काय कार्यवाही करण्यात आली त्याची माहिती देण्यात यावी. सदरची माहिती स्पीड पोस्टने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. १३/११/२००९ च्या पत्रान्वये अॅड. घाटे यांनी दि. २२/०९/२००९ अन्वये पाठविलेला नोटिस दि. १३/११/२००९ पर्यंत व्यवस्थापकिय संचालक म.रा.वि. वितरण

कंपनी मर्या., 'प्रकाशगड', वांद्रे (पूर्व) मुंबई यांचे कार्यालयास प्राप्त झालेली नाही, सबब या संबंधीची माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. ०७/१२/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली होती परंतु अपीलकर्ता हजर न झाल्याने सदर अपीलाच्या निर्णयाची सुनावणी झाली नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती ही खोटी व दिशाभूल करणारी आहे. त्याकरीता त्यांनी आयोगापुढे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्या प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिलेली आहे.

मी व्यवस्थापकीय संचालकांच्या कार्यालयास दि. ०७/१२/२००९ ला (मुंबईला) व्यक्तीशः भेट देऊन पहिली नोटीस प्राप्त झाल्याची व त्यांचे कार्यालयाकडून पुढील कार्यवाहीसाठी त्यांचे अधिपत्याखाली काम करणारे 'कार्यकारी संचालक (मानव संसाधन)' यांचेकडे पत्र क्र. ११८९० दि. २५/०९/२००९ अन्वये, नंतर 'मुख्य महाव्यवस्थापक (कर्मचारी)' यांचेकडे पत्र क्र. ३५३५ दि. ०१/१०/२००९ अन्वये व शेवटी महाव्यवस्थापक (क - आस्थापना) यांचेकडे पत्र क्र. १८२५ दि. ०१/१०/२००९ अन्वये पाठविल्याची व मिळाल्याची खात्री करुन घेतली. तरीसुध्दा, 'माझ्या अपीलावरील सुनावणी प्रकरणी मीच उत्सुक नाही' असा आरोप करीत पत्र क्र. २४१४ दि. २९/०३/१० अन्वये अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलाची सुनावणी न घेताच किंवा पत्र क्र. ८२२९ दि. १३/११/२००९ मध्ये नमुद 'माहितीच्या तपशीला' बाबत खुलासा न करताच खोट्या सबबीखाली माझा दि. ०७/१२/२००९ चा अपील अर्ज दप्तरी दाखल केला.

५. वरील माहिती नुसार सदरची नोटीस ही व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, मुंबई यांचे कडे दिनांक २५/०९/२००९ रोजी प्राप्त झालेली आहे. व तसे अपीलकर्ता यांनी स्पष्टपणे त्यांच्या अपील अर्जामध्ये विचारणा केलेली असून सुध्दा जनमाहिती अधिकारी यांना नोटीस प्राप्त झालेली नाही असे कळविलेले आहे त्यावर सदरची नोटीस खरोखर दि. २५/०९/२००९ रोजी प्राप्त झाली आहे किंवा नाही याबाबतची शहानिशा ही व्यवस्थापकीय संचालकांच्या कार्यालयातून घेता येईल. व तसे जनमाहिती अधिकारी यांना सुध्दा विचारणा करुन माहिती उपलब्ध करुन घेता आली असती व त्याच वेळेस अपीलकर्ता यांना अपीलाबाबतची माहिती उपलब्ध झाली असती. प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा अपीलकर्ता गैरहजर असले तरी अपीलाची सुनावणी घेवून जनमाहिती अधिकारी यांनाच माहिती दिली किंवा नाही याबद्यल

विचारणा करणे आवश्यक असते कारण अधिनियमाचे कलम १९ (५) प्रमाणे माहिती दिली किंवा नाही याबद्यलची सिध्द करण्याची जबाबदारी ही जनमाहिती अधिकारी यांची असते. व त्यामुळे कारण मिमांसा देणारा निर्णय पारित करणे आवश्यक असते कारण त्या निर्णयाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील करावे लागते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या संदर्भात काय कार्यवाही केली ही माहिती सुध्दा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञापत्रामध्ये आयोगापुढे दिलेल्या माहितीची शहानिशा करणे आवश्यक आहे व तशी शहानिशा करुन संबंधीत जनमाहिती अधिकारी किंवा इतर अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करणे योग्य राहील. व तशी जबाबदारी निश्चित केल्यावर शास्तीची अंमलबजावणी करणे आवश्यक होईल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या प्रतिज्ञापत्रात नमूद केल्याप्रमाणे शहानिशा करण्यात आलेली नसल्यामुळे तशी शहानिशा करुन जबाबदारी निश्चित करुन देण्यात यावी व संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द शिस्त भंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४५४/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कृष्णा हेमराज कनोजिया<br>बुध्द नगर, आनंद बुध्द विहाराजवळ,<br>पो. आंबेडकर मार्ग, नागपूर -४४० ०१७ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम)<br>जिल्हा परिषद कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २६/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि.२६/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद कार्यालय चंद्रपूर यांचेकडे कनिष्ठ अभियंता, श्री. बी.बी. येनोरकर यांनी ग्रामपंचायत अंभोरा चंद्रपूरचे माजी सचिव श्री दिलीप बापुराव बैलनवार यांनी दि. २२/१२/२००९ रोजी मा. कार्यकारी अभियंता

(बांधकाम), जिल्हा परिषद कार्यालय चंद्रपूर यांना दस्तऐवज पुरावेसह रजिस्ट्री पत्राद्वारे पाठविण्यात आले होते. त्याबाबत वरील अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.२५/०२/२०१० रोजी अपीलकर्ता यांना तक्रारीची चौकशी करण्याकरीता अधिकारी नेमल्याचे कळविण्यात आले आहे. त्यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असेही कळविण्यात आले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. १२/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, संपूर्ण चौकशी अजुनही झालेली नाही व त्या चौकशीस विलंब होत आहे परंतु जनमाहिती अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ही संपूर्ण केस गुंतागुंतीची आहे व त्यामुळे त्यास विलंब होण्याची शक्यता आहे. परंतु तरीही ३, ४ महिन्याचे कालावधीत त्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. तरी ती चौकशी झाल्यावर अहवाल उपलब्ध करुन देण्यात येईल. असे असले तरी ह्या अपीलाचा निर्णय आज दिल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात काळजी घ्यावी लागेल अन्यथा चौकशी अहवाल तयार झाल्याच्या वेळी जो माहिती अधिकारी असेल तो शास्तीस पात्र राहील. करीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना चौकशी अहवाल झाल्याबरोबर विनामुल्य अहवालाची प्रत पाठविण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ४५५/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. जर्नादन गुलाबराव मून<br>केन्द्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,<br>७९१, नागसेन वन, नागपूर - १७ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी<br>जिल्हा परिषद परभणी<br>ता. जि. परभणी | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद परभणी<br>ता. जि. परभणी | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २६/०५/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि.२७/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०२.०२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिक्षक समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद परभणी यांचेकडे दि. १८/०८/२००४ ते ३१/१२/२००९ पर्यंत नवीन अपंगाच्या अनुदानीत विशेष शाळा - कर्मशाळेची माहिती एकूण ६ मुद्यांमध्ये साधारण पोस्टाने घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १२/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे कालावधीत कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही, किंवा माहिती सुध्दा दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. आज जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दि. ०३/०५/२०१० रोजी नोटीस निर्गमित करण्यात आली होती व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांना सदरची नोटीस उपलब्ध झालेली असली पाहिजे. व त्यामुळे त्यांनी आयोगापुढे उपस्थित असणे आवश्यक होते. त्यावरुन त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली असल्याने त्यांना अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. तत्पूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्ता यांच्या दि. ०२/०२/२०१० च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द रुपये २५०००/- ची शास्ती लादण्यात येईल.

२. अपीलकर्ता यांच्या दि.०२/०२/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत ३० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही किंवा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे रुपये २५०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगापुढे सादर करावा. तसे न केल्यास रुपये २५०००/- ची शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ४५६/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. गोपाल बालाजी झाडे.<br>८, पुरोहित ले - ले आऊट, अंबाझरी,<br>नागपूर - ४४० ०३३. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन)<br>दुग्ध व्यवसाय विकास विभाग,<br>प्रशासकिय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सीफेस, मुंबई-१८ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (अंतर्गत लेखा परिक्षा)<br>दुग्ध व्यवसाय विकास विभाग,<br>प्रशासकिय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सीफेस, मुंबई-१८ | - | **उत्तरवादी** |

**<u>अपील क्र. ४५७/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपासचिव<br>दुग्ध व्यवसाय विकास विभाग,<br>मंत्रालय मुंबई -३२ | - | **उत्तरवादी** |
| ५. | जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदूम)<br>दुग्ध व्यवसाय विकास विभाग,<br>मंत्रालय मुंबई -३२ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २६/०५/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि.२६/०४/२०१० व २७/०४/२०१० रोजी दोन्ही अपिले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहेत. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते.

अपील क्र. ४५६/२०१० मध्ये जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे हजर आहेत. व त्यांनी प्रथम अपीलाची कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अपील क्रमांक ४५७/२०१० मध्ये जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. तसेच त्यांनी कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत.

२. अपील क्रमांक ४५६/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. ०५/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (अंतर्गत लेखा परिक्षा) दुग्ध व्यवसाय विकास विभाग प्रशासकिय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सीफेस, मुंबई यांचेकडे अंतर्गत लेखा परिक्षा अहवाल १९९०-१९९१ मधील परिच्छेद क्र. २८, २९, ३० मधील आक्षेप प्रलंबित आहेत. त्या संदर्भात वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी तिनही वेळेची शासनाने मान्य केलेल्या ट्रे चे मंजूर दरांचे आदेशाच्या प्रमाणित छायाप्रती उपलब्ध कराव्यात अशी विनंती केल्याचे दिसून येते. तिन्ही वेळेचे शासनाने मान्य केलेल्या ट्रे चे मंजूर दराने आदेशाचे प्रमाणे छायाप्रती तसेच कॅन्सच्या संदर्भात कोणता आक्षेप आहे त्याची वस्तुस्थिती कळवावी. पुन्हा दुग्ध शाळेतील लेख्यांची तपासणी करुन योग्य तेथे दुरुस्ती करुन हिशेब पूर्ण करणे त्यानंतर भांडारातील नोंदीशी दुग्धशाळेतील नोंदीचा पडताळा केल्यानंतर दुग्धशाळेतील साठा कमी आढळल्यास प्रत्यक्ष साठ्याप्रमाणे नोंद घेवून पुस्तकी शिलकेच्या साठ्यातून कमी करुन तशी नोंद करुन स्वाक्षरी करण्याऐवजी काल्पनिक संख्या कमी दाखविणे व तेवढया किमतीचे नुकसान झाल्याचा आक्षेप घेणेबाबत, इ. च्या संदर्भातील अनुषंगाने अंतर्गत लेखा परिक्षणाचा / नियम / अधिनियम / पीरपत्रक असल्यास त्याची प्रमाणित छायाप्रत उपलब्ध करावी. अशा प्रकारची व इतर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. २३/०२/२०१० च्या पत्रान्वये सहाय्यक जनमाहिती अधिकारी, दुग्ध व्यवसाय विकास विभाग मुंबई यांनी सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय नागपूर, यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी हस्तांतर केल्याचे दिूसन येते. परंतू माहिती मिळाली नाही म्हणून दि.११/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीला दि. २९/०३/२०१० रोजी सदरची माहिती २५ वर्षापूर्वीची असल्याने शोध घेण्यास थोडा अवधी लागणार आहे, असे कळविल्याचे अपीलार्थीने प्रतिज्ञापत्रात कळविले आहे. त्यांनतर प्रादूविअ नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. १४७४ दि. ०८/०४/२०१० ने अंतर्गत लेखा परिक्षा अधिकारी यांचे दि. २६/०३/२०१० चे पत्रान्वये माहिती दिली, परंतू ही माहिती असंबध्द व टाळाटाळ करणारी असल्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयावर सुध्दा कोणतीही माहिती दि. २५/०४/२०१० पर्यंत मिळाली नाही म्हणून दि. २६/०४/२०१० रोजी द्वितिय अपील दाखल केले असे दिसते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली नऊ मुद्यांवरील कोणतीही माहिती मिळाली नाही. तसेच सदरची माहिती जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (अंतर्गत लेखा परिक्षा) व प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नागपूर यांनी ती कार्यालयातून संकलित करुन देणे आवश्यक होते. नागपूर कार्यालयातून सुध्दा जी माहिती उपलब्ध झाली आहे ती असंबध्द व टाळाटाळ करणारी आहे. नागपूर येथील जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असे सांगितले. परंतु सदरची माहिती असंबध्द व टाळाटाळ करणारी आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जो तपशील दिलेला आहे त्याबाबतची माहिती ही जनमाहिती अधिकारी यांनी दिली किंवा नाही याची शहानिशा न करता १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा ठोकळेबाज निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे त्यांनी शासन निर्णयाच्या व अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे असेच दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा संपूर्ण माहिती दिलेली नसल्यामुळे तसेच नागपूर कार्यालयाने जी माहिती दिली ती अपूर्ण आहे व ती माहिती मुंबई कार्यालयाने नागपूर कार्यालयाला द्यावी अशी जी टोलवाटोलवी सुरु आहे यामुळे जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत. तसेच अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपील मेमो मध्ये तपशीलात माहितीचे वर्णन केले असता कोणत्याही प्रकारे माहितीचे अवलोकन न करता १५ दिवसांत द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यावरुन त्यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे तसेच शासन निर्णयाचे उल्लंघन केले आहे म्हणून त्यांचेविरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्र. ४५७ /२०१० यांनी राज्य माहिती आयोगाकडे २७/०४/२०१० ला द्वितिय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी १६/०१/२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदूम) दुग्ध व्यवसाय विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे चौकशी अहवालात नमूद केल्यानुसार, नुकसान जेथे नमूद आहे त्या भागाचा प्रमाणित छायांकित दस्तऐवज, दि.०९/१०/१९९० रोजी दुधाच्या साठयाचे तपासणीच्या नुकसानीचा दि. ०८/११/२००० चे पत्राप्रमाणेच्या नुकसानीत आयुक्त कार्यालयाने ज्या नियमानुसार समावेश केला त्या नियमाची / शासन निर्णयाची / परिपत्रकाची प्रमाणीत छायाप्रत, ८९ लिटर दूधाच्या किमतीचा डीमांड ड्राफ्ट स्वतःकडे ठेवल्यामुळे रुपये ३६२/- चे नुकसान झाल्याचे दि. २८/११/२००० चे पत्रातील नुकसानीत

शासनाने ज्या नियमान्वये समावेश केला त्या नियमाची / शासन निर्णयाची / परीपत्रकाची प्रमाणित छायाप्रत तसेच इतर मुद्यांची माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. ०४/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय न दिल्यामुळे द्वितिय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, "मुद्या क्र. ३ ची माहिती अन्य प्रकरणात मिळालेली आहे. परंतु इतर कोणतीही माहिती मिळालेली नाही. दि. ११/०५/२०१० रोजी मुंबई येथे सुनावणी घेतली आदेशाचा मसुदा दिला, अद्याप आदेश दिले नाहीत. व माहिती सुध्दा दिली नाही". जनमाहिती अधिकारी हे हजर झाले नाहीत व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत व आयोगापुढे सुध्दा हजर झाले नाही. यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे असे दिसून येते. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींच्या अंमलबजावणी बाबत गंभीर नाहीत व त्यांना आयोगाची सुध्दा भिती वाटत नाही असे दिसून येते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदूम) दुग्ध व्यवसाय विकास विभाग, मंत्रालय मुंबई हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेविरुध्द सुध्दा प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील क्र. ४५६/२०१० हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत संपूर्ण माहिती संकलित करुन कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. ०५/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती असंबध्द व टाळाटाळ करणारी असल्याने त्यांचे विरुध्द कलम २० (१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले परंतु ते समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही, त्यामुळे त्यांचेविरुध्द रुपये २५०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसूली ही त्यांच्या दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात येवून

लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय हा शिघ्रतेने न दिल्यामुळे, अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले असल्याने त्यांचे विरुध्द योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करण्यात यावी.

४. अपील क्र. ४५७/२०१० हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत त्यांचे दि. १६/०१/२०१० च्या अर्जाप्रमाणे छायांकित प्रतीच्या स्वरुपात विहित मुदतीत नोंदणीकृत टपालाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्याने त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये २५०००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय प्राप्त झाल्यापासून त्यांचेविरुध्द रुपये २५०००/- इतक्या रकमेची शास्ती का लादण्यात येऊ नये याचा खुलासा १५ दिवसाचे आत आयोगास सादर करावा. तसे न केल्यास शास्ती कायम होईल, याची नोंद घ्यावी व ती त्यांच्या दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात येईल.

५. सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव, दुग्ध व्यवसाय विकास विभाग मंत्रालय मुंबई -३२ यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

६. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)

**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४५८/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. निलेश प्रभुदयाल चौधरी<br>अभियंता कॉलोनी, गणेशपूर, भंडारा<br>ता. जि. भंडारा -४४१ ९०४ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>बाबासाहेब धाबेकर आर्ट व कॉमर्स महाविद्यालय, रिसोड<br>ता. रिसोड जि. वाशिम -४४४ ५०६ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य<br>बाबासाहेब धाबेकर आर्ट व कॉमर्स महाविद्यालय, रिसोड<br>ता. रिसोड जि. वाशिम -४४४ ५०६ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २६/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि.२३/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी ०९/११/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, बाबासाहेब धाबेकर महाविद्यालय, रिसोड यांचेकडे श्री प्रमोदकुमार केशवराव नंदेश्वर अधिव्याख्याता यांचे वेतनविषयक माहिती दर्शविणारे विवरणपत्र, मासिक वेतनाचे प्रमाणपत्र, मासिक वेतनाच्या (Salary Slip) च्या छायांप्रतीची मागणी केली व सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी २९/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला नाही त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती अद्यापपर्यंत त्यांना मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी जे आयोगापुढे हजर झाले आहेत, त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना आम्ही ओळखत नाही. श्री प्रमोदकुमार केशवराव नंदेश्वर यांच्या पगाराची माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे ही माहिती आम्ही त्यांना दिलेली नाही. कोणत्याही सेवेत असणाऱ्या व्यक्तींच्या वेतनाची माहिती ही खाजगी बाब नाही. ती सार्वजनिक अभिलेखाचा भाग असल्यामुळे वेतनविषयक माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती आणलेली आहे ती अपीलकर्ता यांना देण्यास ते तयार आहेत असे आयोगापुढे सांगितले आहे. व आता त्यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)

**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ४५९/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. विनयानंद महादेवराव पाटील<br>२५, करीम-ले-आउट, गोपाल नगर,<br>नागपूर -२२. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद अमरावती<br>ता. जि. अमरावती. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद अमरावती<br>ता. जि. अमरावती. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २६/०५/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २३/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी श्री ओमप्रकाश बकोरिया, अध्यक्ष जिल्हा शिवकालीन पाणी साठवण योजना, जि. अमरावती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. अमरावती. यांचेकडे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती १. गौरखेडा ता. अचलपूर २. कुंभी ता. अचलपूर यांचे प्रस्तावातील विलंबाबाबत, अशा स्वरूपाची सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितलेली आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २४/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, आतापर्यंत त्यांना कोणताही पत्रव्यवहार किंवा माहितीची कागदपत्रे उपलब्ध झालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मुळात

सदरची माहिती ही वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, अमरावती विभाग यांच्या कार्यालया अंतर्गत असल्यामुळे त्यांचेकडे दि. ३०/१२/२००९ रोजी सदरचा अर्ज वर्ग करण्यात आला होता.

व तसे अपीलकर्ता यांना त्या पत्राच्या प्रतिलिपि सुध्दा देण्यात आल्या आहेत. दिनांक ११/०१/२०१० रोजी सुध्दा जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, अमरावती. यांचेकडे सुध्दा पुन्हा अर्ज हस्तांतरीत करण्यात आला. व त्याची प्रतिलिपी अपीलकर्ता देण्यात आली होती. जे प्रथम अपील दाखल केले होते. त्यासंदर्भात दि. ०४/०३/२०१० रोजी अपीलीय अधिकारी, द्वारा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कॅम्प रोड, अमरावती यांचेकडे वर्ग केला आहे असे सांगितले. असे असले तरी शासकीय माहिती अधिकारी भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांनी अपीलकर्ता यांना यूपीसीने (under certificate of posts) ने दिनांक १६/०१/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ही माहिती उपलब्ध झालेली नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी माहिती नोंदणीक़त टपालाद्वारे मागितली होती परंतु त्यांना ती तशीच न देता यूपीसीने (under certificate of posts) ने दिली होती. ती त्यांना उपलब्ध झालेली नाही. आयोगाच्या निदर्शनास असे आले आहे की, सर्वच अपीलकर्ते यांना अर्जाच्या संदर्भात व्यवहार केला तरी तो उपलब्ध झ ालेला नाही असे ते आयोगापुढे सांगतात. इतर पत्रे किंवा आयोगाने पाठविलेली नोटीसे त्यांना मिळतात परंतु ३० दिवसाचे आतील कोणताही पत्रव्यवहार किंवा पाठविलेली माहिती ही त्यांना मिळत नाही. या प्रकरणात सुध्दा अपीलकर्ता यांना दोनवेळा माहिती दिलेली आहे, व माहिती सुध्दा त्यांच्या पत्त्यावर पाठविलेली आहे परंतु ती त्यांना मिळालेली नाही. मात्र आयोगाने पाठविलेला नोटीस त्यांना त्यांच्या त्याच पत्त्यावर यूपीसीने मिळालेला आहे. परंतु असे असले तरी आता सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देता येईल असे आयोगापुढे सांगितले व तशी ती अपीलकर्ता यांना दिलेली सुध्दा आहे त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**मा. आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार.**

**तक्रार क्रमांक ५६/२००९**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजु शंकरराव निकोसे<br>मु. पो. सावरी (बिडकर)<br>ता. चिमूर (वरोरा) जि. चंद्रपूर | - | **तक्रारकर्ता** |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा<br>तहसिल कार्यालय चिमूर<br>ता.चिमूर जि. चंद्रपूर | - | **गैरतक्रारदार** |

**(आदेश पारित दिनांक १८/०५/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारकर्ता यांनी दि. २१/१२/२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे तक्रारकर्ता हे हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी दि. २१/१२/२००९ रोजी अर्जदार यांचा अपील क्र. ४३६/२००९ च्या दि. २६/०८/२००९ च्या निर्णयातील आदेश क्र. १ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ (१) प्रमाणे आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सदर तक्रारीची सुनावणी आज दि. १८/०५/२०१० रोजी घेण्यात आली.

३. जनमाहिती अधिकारी, तहसील कार्यालय, चिमूर यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांची नस्ती मिळाली आहे व त्यावेळी त्यांना अपेक्षित असलेली कारवाई करुन देण्यात आली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असल्यास त्यांचे समाधान झालेले आहे. सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१. तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येते.
२. निर्णयाची प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**मा. आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत तक्रार.

**तक्रार क्र. ६७/नाग/२०१०**

१. श्री मोहन काशीनाथ सोनकुसरे - **तक्रारकर्ता** रा. इंदिरा नगर, वार्ड नं.७
पो. लांझेंडा ता.जि. गडचिरोली.

२. जन माहिती अधिकारी तथा - **गैरतक्रारदार**
पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय)
पोलीस अधिक्षक कार्यालय
ता.जि. गडचिरोली.

**(आदेश पारित दिनांक १४/०६/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारकर्ता यांनी दि. १५/०१/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार यांचे तर्फे श्री डी. एन. चव्हाण पोलीस निरिक्षक हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी दि. १५/०१/२०१० रोजी त्यांचे अपील क्र.७७४/२००९ च्या दि. ०६/१०/२००९ रोजी दिलेल्या निर्णयातील आदेशाचे अनु. क्र.१ प्रमाणे माहिती अपूर्ण उपलब्ध करुन दिली या कारणास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीच्या संदर्भामध्ये आयोगाचे कार्यालयाने दि. १०/०३/२०१० रोजी खुलासा नोटीस काढलेला आहे. त्याप्रमाणे दि.०८/०५/२०१० रोजी तक्रारदार यांना संजिवनी निधीचे नियमावली तसेच विपत्ती निधीचे या कार्यालयाचे परिपत्रक आदेशाचे (नियमावलीत नाही) साक्षांकीत प्रती दि. २४/११/२००९ रोजी पाठविण्यात आले. आयोगाचे निर्णयाप्रमाणे ही माहिती नसल्याने माहिती घेण्यासाठी तक्रारदार यांनी नकार दिला असा खुलासा केलेला आहे.

३. तक्रारकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रामुख्याने त्यांना वित्तिय नियमान्वये निधींची नियमावली व रुपये १,७५,०००/- ची मंजूरी प्रत हे आवश्यक आहे. कारण त्यांना अग्रीम दिलेला आहे किंवा कसा याबाबत टिपणीमध्ये स्पष्टीकरण नाही. विपत्ती निवारण निधी मधून जी मदत गोळा होते ती पुन्हा घेतली जात नाही कारण तो त्यांच्याच वेतनातून दर महिन्यात कपात करुन घेतलेला निधी असतो व अशा प्रक्रारे ३० लाखांचा निधी जर गोळा होत असेल तर त्या निधीतून दिलेली मदत ही कशाप्रक्रारे घेतात हे कळत नाही व त्याकरीता ती नियमावलीत असणे आवश्यक आहे. अग्रीम मंजूर केलेला आहे किंवा मदत मंजूर केलेली आहे याबाबत निश्चितत: नसल्याने विलंबाच्या संदर्भात अडचण निर्माण होईल. व म्हणून दिलेल्या आदेशाच्या प्रतची आवश्यकता आहे. त्याकरीता तक्रारकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत संजिवनी निधी, पोलीस कल्याण निधीचा जी. आर. व विपत्ती निवारण निधीचे रुपये ४०/- कपात करण्याचा आदेश देण्यात आलेला आहे. परंतू तक्रारकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जी माहिती मिळाली आहे तीच माहिती आता आम्हाला पुन्हा देत आहेत. आम्हांला जे रुपये १,७५,०००/- मंजूर केले आहेत त्या बाबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती विभागाने देणे आवश्यक आहे. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा सदरच्या नियमावलीचा कसून शोध घेवून किंवा पोलीस मुख्यालयातून उपलब्ध करुन घेवून तक्रारकर्ता यांना पुरविण्यात यावी.

## आदेश

१. तक्रारकर्ता यांची तक्रार मंजूर करण्यात येते.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**मा. आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार**

**तक्रार क्र.१०५/नाग/२०१०**

१. श्री सुरेश रामभाऊ कुहीकर - **तक्रारकर्ता** मु. पो. सिर्सी, ता. उमरेड,
जि. नागपूर ४४१२१४

२. जन माहिती अधिकारी तथा - **गैरतक्रारदार**
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद नागपूर

**(आदेश पारित दिनांक १४/०६/२०१०)**

**निर्णय**

१. तक्रारकर्ता यांनी दि. २६/०३/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/०६/२०१० रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे तक्रारकर्ता हे गैरहजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, पत्र क्र. ५४४८ अन्वये सुनावणी घेतली. सुनावणी दरम्यान निर्णय झालेला नाही. परंतू या कार्यालयाचे ५६०२ दि. ०९/१०/२००९ रोजी अध्यक्ष, लोकसेवा शिक्षण संस्था, सिर्सी ता. उमरेड यांनी पत्र दिलेले आहे. परंतू चौकशी अद्याप झालेली नाही. तसेच मान्यतः काढून घेण्याचा प्रस्ताव उपसंचालक यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. तसे असल्यास सदरच्या कार्यवाहीच्या संदर्भातील अहवाल तसेच प्रस्ताव वगैरेची कागदपत्रे ही तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

## <u>आदेश</u>

१. तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत तक्रारदार यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व प्रस्तावाच्या प्रती पोस्टाने विनामुल्य पाठविण्यात यावे.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**मा. आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**